म. ग्रं. सं. ठाणे
विषय चारित्र
सं. क्र. ५३८

RFFBK-0000503

वा. क्र. 403

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥

# श्रीछत्रपति शिवाजीमहाराज यांचें चरित्र.

अर्थात्

## स्वराज्यसंस्थापनेचा इतिहास.

संपादक व प्रकाशक

मोरो आपाजी सहस्रबुद्धे.

मुद्रक

बाळकृष्ण विष्णु साठे.

पुणे, 'यशवंत' प्रेस.

सोलएजंट

रघुनाथ नारायण बुकसेलर

REFBK-0000503

शके १८३१ ] [ सन १९०९

# अर्पण पत्रिका.

हें पुस्तक.

**प्रो. काशिनाथ विनायक छत्रे.**

' धि न्यू इंडियन सरकस ' चे

चालक व मालक.

**यांस.**

त्यांची स्वधर्मनिष्ठा, स्वदेश हिताविषयीं उत्कट कळकळ, त्यांची परोपकार बुद्धि, त्यांचे अश्रांत परिश्रम, त्यांचा दृढ निश्चयी स्वभाव, त्यांचें विलक्षण औदार्य, सार्वजनिक लोकोपयोगी संस्थांना मदत करण्याची हौस, गुणिजनांविषयीं पूर्ण आदरभाव इत्यादि त्यांच्या ठिकाणीं वसत असलेल्या श्रेष्ठ गुणांबद्दल वाटणाऱ्या अभिमानाचें किंचित् द्योतक ह्मणून अत्यंत आदरपूर्वक अर्पण केलें आहे.

पुस्तक कर्ता.

# प्रस्तावना.

आपल्या ह्या सुवर्णभूमीचा इतिहास परकीयांनीं लिहिला असल्यामुळें तो अगदीं एकांगी असून अपुरा आहे, इतकेंच नव्हे तर, आपल्या थोर पूर्वजांविषयीं आपल्या मनांत भलतेच खोटे नाटे ग्रह उत्पन्न करणारा आहे. या ह्मणण्याचें प्रत्यंतर पाहण्यास लांब जाण्याचें कारण नाहीं. श्री शिवाजीमहाराजांचाच इतिहास घ्याना. 'शिवाजी हा एक लुटारू व बंडखोर होता, त्यानें अफझुलखानास कपटानें ठार मारलें' वगैरे वगैरे माहिती आमच्या तरूण पिढीला शिकविल्या जाणाऱ्या इतिहासांतून दिलेली असते. या माहितीवरून साहजिकपणेंच शिवाजी हा एक लुटारू, बंडखोर व खुनी इसम होता, अशा प्रकारचा दुष्टग्रह इतिहासाचें फारसें ज्ञान नसणाऱ्या सामान्य जनांच्या मनावर होतो. हा दुष्टग्रह नाहींसा करून आपल्या पूर्वजांचें यथार्थज्ञान तरूण पिढीस करून देणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. हा दुष्टग्रह बऱ्याच अंशानें नाहींसा करणारें एक केळुसकरांनीं लिहिलेलें श्रीशिवाजीमहाराजांचें चरित्र आहे. परंतु तें बरेंच विस्तारानें लिहिलें असल्यामुळें व त्यांत जुन्या कागदपत्रांतील उतारे विशेष असल्यामुळें त्याचें बरोबर आकलन सर्वांस करितां येण्यासारखें नाहीं. म्हणून निरनिराळ्या बखरींच्या आधारानें सर्व गोष्टींचा सांगोपांग विचार करून हें त्रोटक चरित्र सामान्यवाचकांकरितां लिहिलें आहे. त्रोटक चरित्र लिहिण्याचा विचार असतांही विषयाच्या महत्वामुळें चरित्राचीं पानें जवळ जवळ दोनशें

# प्रस्तावना.

आपल्या ह्या सुवर्णभूमीचा इतिहास परकीयांनीं लिहिला असल्यामुळें तो अगदीं एकांगी असून अपुरा आहे, इतकेंच नव्हे तर, आपल्या थोर पूर्वजां-विषयीं आपल्या मनांत भलतेच खोटे नाटे ग्रह उत्पन्न करणारा आहे. या ह्मणण्याचें प्रत्यंतर पाहण्यास लांब जाण्याचें कारण नाहीं. श्री शिवाजीमहारा-जांचाच इतिहास घ्याना. 'शिवाजी हा एक लुटारू व बंडखोर होता, त्यानें अफझुलखानास कपटानें ठार मारलें' वगैरे वगैरे माहिती आमच्या तरूण पिढीला शिकविल्या जाणाऱ्या इतिहासांतून दिलेली असते. या माहितीवरून साहजिक-पणेंच शिवाजी हा एक लुटारू, बंडखोर व खुनी इसम होता, अशा प्रकारचा दुष्टग्रह इतिहासाचें फारसें ज्ञान नसणाऱ्या सामान्य जनांच्या मनावर होतो. हा दुष्टग्रह नाहींसा करून आपल्या पूर्वजाचें यथार्थज्ञान तरूण पिढीस करून देणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. हा दुष्टग्रह बऱ्याच अंशानें नाहींसा करणारें एक केळुसकरांनीं लिहिलेलें श्रीशिवाजीमहाराजांचें चरित्र आहे. परंतु तें बरेंच विस्तारानें लिहिलें असल्यामुळें व त्यांत जुन्या कागदपत्रांतील उतारे विशेष असल्यामुळें त्याचें बरोबर आकलन सर्वांस करितां येण्यासारखें नाहीं. म्हणून निरनिराळ्या बखरींच्या आधारानें सर्व गोष्टींचा सांगोपांग विचार करून हें त्रोटक चरित्र सामान्यवाचकांकरितां लिहिलें आहे. त्रोटक चरित्र लिहिण्याचा विचार असतांही विषयाच्या महत्वामुळें चरित्राचीं पानें जवळ जवळ दोनशें

झालीं आहेत. श्री शिवाजीमहाराज लुटारू व बंडखोर नसून स्वराज्यसंस्थापक होत असेंच म्हणणें भाग आहे. कारण लुटारू अगर बंडखोर गृहस्थ पिढ्यानूपिढ्या टिकणारीं राज्यें कधींही स्थापूं शकत नाहींत. शिवाजीमहाराजांनीं स्थापिलेलें स्वराज्य भक्कम पायावर असल्यामुळें त्याच्यावर १६६५ सालीं औरंगजेबाकडून संकट आलें असतां व त्यांच्या पश्चात् राजारामाच्या वेळींही मराठी राज्यावर भयंकर घोर-पड आली असतांही त्यांतून तें बचावलें व पुढें कित्येक वर्षें पर्यंत टिकलें. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें श्रीशिवाजीमहाराजांच्या चरित्रास स्वराज्यसंस्थापनेचा इतिहास हें नांव दिलें तर तें अधिक शोभेल, यांत शंका नाहीं. शिवाजी महा-राजांच्या कालीं व त्यापूर्वीं सर्वत्र मुसलमानांचा अंमल असल्यामुळें त्यांनीं आ-पल्या तरवारीच्या जोरावर मुसलमानी धर्माचा प्रसार करण्याचें काम सुरू केलें, जिकडे तिकडे भररस्त्यांत गोवध होऊं लागून ब्राह्मणांचा फार छळ होऊं ला-गला व हिंदूधर्माचें त्राण कोण करतो अशी चिंता सर्वत्र वटूं लागली. धर्म-च्छल हेंच काय तें त्यावेळचें प्रत्यक्ष दुःख होतें. त्याकालीं हिंदूंना मुसलमानांच्या बरोबरीनें नोकऱ्या मिळत होत्या व बराचसा राज्यकारभारही हिंदूंच्या हातीं होता. यामुळें स्वतंत्र सत्तेची तृष्णा लोकांत वाढली नाहीं. परंतु तरवारीच्या जोरावर मुसलमानी धर्माचा प्रसार करण्यासाठीं हिंदूंचा छळ होऊं लागतांच स्वधर्मसंरक्षणार्थ हिंदूंच्या अंतःकरणांत बीजरूपानें असलेली स्वातंत्र्याची ला-लसा जोरानें वाढली व या लालसेचें फळ शिवाजीमहाराजांनीं केलेली स्वराज्य संस्थापना हें होय. धर्मच्छल हेंच त्यावेळचें प्रत्यक्ष दुःख असल्यामुळें स्वधर्म संरक्षण हेंच त्यावेळच्या देशाभिमानाचें कार्य होतें; व हें कार्य शिवाजीमहा

राजांपूर्वींच्या व त्यांच्या वेळच्या साधुसंतांनीं बऱ्याच अंशानें केल्यामुळें शिवाजी महाराजांच्या कार्याची भूमिका तयार झाली. साधुसंतांनीं धर्मजागृति करून शिवाजीच्या कार्याची भूमिका कशाप्रकारें तयार केली हें या चरित्रांतील दुसऱ्या भागांत थोडक्यांत दाखविलें आहे.

शिवाजीच्या बालपणाच्या वर्णनानंतर 'शिवाजीनें अफझुलखानास कपटानें मारलें नसून स्वसंरक्षणार्थ त्याला खानाचा वध करावा लागला' हें मुद्देसूद रीतीनें दाखविलें आहे. शिवाजीनें सुरत शहर लुटलें तेव्हां इंग्रजांनीं आपल्या सामर्थ्यानें स्वतांचें व दुसऱ्यांचें संरक्षण केलें असें आजपर्यंतच्या इतिहासांत नमूद केलें आहे. पण इंग्रज हे शिवाजीचे शत्रू नसल्यामुळें तो त्यांच्या वाटेसच गेला नाहीं, असा उल्लेख इतिहासांत सांपडला आहे. शिवाजी-महाराजांनीं आरमाराकडेही लक्ष दिलें होतें व त्यामुळें फिरंगी ( पोर्तुगीज ) लोकांना शिवाजीबरोबर तह करावा लागला. शिवाजीची राज्यपद्धति, त्याचें राजकारण व धोरण यांचें विवेचन प्रसंगविशेषीं करण्यांत आलें असून श्रीसमर्थांचा स्वराज्यसंस्थापनेच्या कामीं शिवाजीमहाराजांना कशा प्रकारचा उपयोग झाला हें स्वतंत्र भागांत दाखविलें आहे. अकराव्या भागांत श्रीशिवाजी-महाराजांची योग्यता किती होती याचें विवेचन करून शेवटच्या म्हणजे बाराव्या . . पातशाहीबरोबर निकरान कांहीं भागांत श्रीशिवाजीमहाराजांनीं सारखें अविश्रांत झगडून, जी स्वराज्यसंस्थापना-रूपी भव्य मंदिराची मूहूर्तमेढ उभी करून त्याची प्राण-प्रतिष्ठा केली, तिची पूर्वसिद्धता कशा प्रकारची होती, याचें अल्पसें चित्र या भागांत काढण्याचें योजिलें आहे. या पुढील हकीकतीवरून स्वतंत्र

ठरवावें. परंतु हें चरित्र वाचून वाचनेच्छु जनांस जर इतिहास वाचनाची गोडी विशेष लागेल व ते श्रीशिवाजीमहाराजांप्रमाणेंच स्वधर्मनिष्ठ, स्वार्थत्यागी, पितृभक्त व देशाभिमानी होण्याचा प्रयत्न करतील तर माझ्या या श्रमाचें सार्थक झालें असें मी समजेन.

शेवटीं रा. रा. सरदेसाई यांची मराठी रियासत, कै॰ न्यायमूर्ती रानडेकृत Rise of the Maratha Power. रा. रा. केळुसकर यांचें शिवचरित्र व जुन्या बखरी इत्यादि पुस्तकांचा मला प्रस्तुत पुस्तक लिहितांना फार उपयोग झाला व सदहू ग्रंथकर्त्यांचा मी फार आभारी आहें, हें नमूद करणें अवश्य आहे.

ग्रंथकर्ता.

क्र. प. ३१६

ॐ

# श्री छत्रपति शिवाजी महाराजांचें चरित्र

अर्थात

## स्वराज्यसंस्थापनेचा इतिहास.

### भाग १ ला.

### पूर्वसिद्धता.

क्षत्रियकुलावतंस महाभाग श्री **शिवाजी** महाराज यांनीं अतुळ पराक्रम करून अखिल भरतखंडभर पसरलेल्या वैभवशाली मुसलमान पातशाहीबरोबर निकरानें कांहीं वर्षे एकसारखें अविश्रांत झगडून, जी स्वराज्यसंस्थापनारूपी भव्य मंदिराची मुहूर्तमेढ उभी करून त्याची प्राणप्रतिष्ठा केली, तिची पूर्वसिद्धता कशा प्रकारची होती, याचें अल्पसें चित्र या भागांत काढण्याचें योजिलें आहे. या पुढील हकीकतीवरून स्वतंत्र

स्वराज्यस्थापना करण्याची शक्ति मराठ्यांचे अंगीं प्रादुर्भूत होण्यास कोणती परिस्थिति अनुकूल झाली अथवा अशी अनुकूल परिस्थिति प्राप्त करून घेण्यास त्या काळच्या पुरुषांनी कोण कोणते व कसकसे प्रयत्न केले, हें वाचकांचे लक्षांत येईल.

अगदीं प्राचीन कालापासून या भरतभूमीच्या इतिहासाकडे नजर फेंकिली असतां असें दिसून येईल कीं, या भूमींत अनेक राज्यक्रांत्या घडून आल्या आहेत. रामायणकालीं या भूमीवर रावणासारखा महापराक्रमी परंतु दुष्ट, क्रूर, जुलमी साम्राज्याधिपति राजा राज्य करीत होता, तरी श्रीरामचंद्रावतार होऊन यःकश्चित् वानरसेनेकडून त्याचा नायनाट झाला. भारतकालीं दुर्योधन, दुःशासनादि कौरव अत्यंत मत्त होऊन मदांधपणें या भरतखंडावर आपलें सार्वभौमत्व गाजवीत असतां, धर्म, भीम, अर्जुनादि पांच पांडवबंधूंनीं आपल्या अंगच्या शौर्यानें, नीतिबलानें व स्वकर्तव्यनिष्ठेनें कौरवांचा फडशा केला. या दोन अत्यंत प्राचीन कालीन इतिहासांवरून असा सामान्य नियम निघतो कीं, एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राकडून जिंकलें जातें त्या वेळीं जिंकणाऱ्या राष्ट्राच्या उच्चतर गुणांचा पगडा जितराष्ट्राच्या हीन गुणांवर बसल्याशिवाय राहत नाहीं. प्रथम आर्यलोक हिंदुस्थानांत आले व त्यांनीं तत्कालीन अनार्य रानटी लोकांस जिंकून स्वसत्ता स्थापित केली, याचें कारण तरी त्यांच्या अंगचे श्रेष्ठतर गुणच होत. हे आर्यलोक राज्य करीत असतां सुधारणेच्या बाबतींत आर्यहिंदूंपेक्षा मुसलमान अधिक दर्जाचे नसून कांहीं शतकें त्यांनीं हिंदूंवर आपलें राज्य कसें गाजविलें ?, असा प्रश्न साहजिक उपस्थित होतो. परंतु याचा उलगडा असा आहे कीं, वस्तुतः हिंदूलोक मुसलमानांकडून मुळीं तत्वतः जिंकलेच गेलेले नव्हते; तर, त्या कालीं जरी राजा मुसलमान होता, तरी, विद्या, कला वगैरे मध्यें हिंदूंचेंच वर्चस्व कायम होतें. हिंदूंचें हिंदुत्व नष्ट झालेलें नव्हतें. सनातन हिंदुधर्माची ज्योत मंद झाली होती तरी ती विझलेली नव्हती. पूर्वापार चालत

आलेल्या ग्रामसंस्थेसारख्या अत्यंत उपयुक्त संस्था अबाधित चालू होत्या. या गोष्टींचा येथें उल्लेख करण्याचें कारण इतकेंच कीं, राज्याच्या चिरस्थायीपणाचा विचार करतांना जेत्यांकडून जितांचें स्वत्व कोठपर्यंत नष्ट झालें आहे, हें पाहिलें पाहिजे. जिंकणारांचे अंगीं कांहीं लोकोत्तरगुण आहेत, व त्यांच्या प्रभावानें जिंकलेले लोक दिपून जाऊन अगदीं स्वत्व विसरून गेले, असें जोंपर्यंत झालें नाहीं; तोंपर्यंत, पूर्णपणें एक **जित** व दुसरे **जेते** अशा संज्ञा त्यांना लागू करणें योग्य होणार नाहीं. पाश्चिमात्य अत्यंत प्राचीन अशा **ग्रीस** आणि **रोमन** राष्ट्रांचा इतिहास पाहिला असतां असेंच दिसून येईल कीं, त्यांनीं आपल्या उच्चतर सुधारणेच्या जोरावर शेजारच्या हीनावस्थ सुधारणेच्या राष्ट्रांस जिंकिलें व त्यांना आपल्या संसर्गानें सुशिक्षित केलें. परंतु रोमनराष्ट्र अत्यंत विस्तृत होऊन वैभवाच्या शिखरास जाऊन पोंचलें तेव्हां त्याला वैभवमदानें पूर्ण पछाडलें व षड्रिपूंपैकीं एका रिपूचा पगडा बसल्याबरोबर काम क्रोधादि इतर रिपुजंत्रीला आरंभ होऊन अन्याय, जुलूम, अनीति वगैरे दुर्गुणांची झपाझप वाढ झाली व अत्यंत रानटी असे **गॉल्स** लोक तें अत्यंत अवाढव्य असें **रोमन साम्राज्य** रसातळास पोंचविण्यास कारण झाले. सारांश इतकाच कीं, **महाराष्ट्रांत** जरी **मुसलमानशाही** स्थापन झाली होती, तरी हिंदूंचें **हिंदुत्व** नष्ट झालें नव्हतें; त्यांचा स्वाभिमान जागृत होता; त्यांचें **शूरत्व** जिवंत होतें; त्यांची स्वधर्मनिष्ठा बळकट होती. तात्पर्य, राष्ट्र जिवंत असल्याच्या ज्या ज्या खुणा आहेत त्या त्या सर्व तत्कालीन हिंदूलोकांमध्यें स्पष्टपणें दृग्गोचर होत होत्या.

यामप्रमाणें **महाराष्ट्रीयांचें** स्वत्व लुप्त झालेलें नसल्यामुळें दक्षिणेंत परकीय **मुसलमानांची** सत्ता जरी कांहीं काळपर्यंत प्रस्थापित झाली होती तरी, त्या परकी सत्तेचें एतद्देशीय **हिंदूंच्या** मदतीशिवाय चालेना. त्यापूर्वी हजारों वर्षें **महाराष्ट्राचें** स्वातंत्र्य कायम असल्यामुळें अनेक स्थळीं शूरवीर मराठे सरदार फौजबंद होते. त्यांचा नायनाट करण्याचें जरी त्या परकी सत्तेच्या मनांत

होतें, तरी त्या कामीं लागणारें सैन्य त्यांना बाह्यप्रदेशांतून आणतां येण्यासारखें नव्हतें. त्या सरदारांस खुष ठेविल्याशिवाय किंवा आपलेंसें करून घेण्याशिवाय मुसलमान राजांना गत्यंतर नव्हतें. यामुळेंच मुसलमानी परकी सत्तेचा टिकाव न लागतां मराठ्यांना त्या सत्तेचा पाडाव करून दक्षिणेंत स्वराज्य स्थापितां आलें. याशिवाय महाराष्ट्रावर मुसलमानांचा ताबा पूर्णपणें न बसण्यास मुख्यतः या भागाची अवघड निसर्ग रचना, येथील हवापाणी, लोकांचा पूर्वापार चालत आलेला कंटक स्वभाव व ग्रामसंस्थेसारखे चालू असलेले अत्यंत उपयुक्त असे प्रघात इत्यादि अनेक गोष्टी कारण झाल्या. **ग्रामसंस्था** हें लोकांचें स्वातंत्र्य रक्षण करणारें मुख्य साधन सर्व **हिंदुस्थान**भर चालू होतें, तरी त्याचा प्रभाव विशेषतः **महाराष्ट्रांत**च दिसून आला. या संस्थेची अशी तऱ्हा होती कीं, प्रत्येक गांव आपापल्या हद्दींत एक प्रजासत्ताक राज्यच होतें. सरकारी कर घेण्याबाहेर गांवच्या अंतस्थ व्यवस्थेंत सरकारास हातच घालतां येऊं नये, अशी व्यवस्था या ग्रामसंस्थेंत असल्यामुळ मुसलमानांनीं आपली शिकस्त केली, तरी त्यांचें वजन प्रजेवर पडलें नाहीं. उत्तर हिंदुस्थानांत फ़ारशी व उर्दू, या परकी भाषा सर्व सरकारी कामांत चालू झाल्या; परंतु महाराष्ट्रांत मराठ्यांची स्वभाषा जी मराठी तिचाच उपयोग सरकार दरबारांत होत असे. शेजारीं विजयानगरचें प्रबळ हिंदु राज्य अस्थित्वांत होतें, त्याचाहि वचक मुसलमानांना फार होता. यामुळें मुसलमानांच्या अंगांतील खरें क्रौर्य महाराष्ट्रांत दिसून आलें नाहीं; व हिंदुप्रजेचा हिंदुपणा नष्ट झाला नाहीं. या वरील विशिष्ट कारणांनींच महाराष्ट्र स्वराज्य-संस्थापनेचा इतिहास राष्ट्रीयदृष्टीनें फार महत्त्वाचा आहे.

येथपर्यंत श्री शिवछत्रपतींचा अवतार होण्याला अर्थात् **स्वराज्यस्थापनेला** जीं कारणें झालीं त्यांचा सामान्य विचार झाला. आतां व्यक्तिविषयक उदाहरणें देऊन, ज्या सरदार घराण्यांनीं व त्यांतील श्रेष्ठ पुरुषांनीं आणि मुत्सद्यांनीं आपलें स्वत्व जागृत ठेविलें, त्यांचा विचार कर्तव्य आहे. इ. सन

१३१८ या सालापर्यंत दक्षिणेंत मराठ्यांचेंच राज्य होतें. शेवटचें राजघराणें **यादवांचें** होय. वरील सालीं यांचा पूर्ण पराभव होऊन इकडे **मुसलमानी** राजसत्ता सुरू झाली. या साला पासून इ. स. १६२७ सालीं **शिवरायाचा जन्म** होईपर्यंत जीं नररत्नें या मुसलमानी अमदानींत चमकून गेलीं त्यांपैकीं **कमलसेन** नांवाचा एक ब्राह्मण मुत्सद्दी सोळावे शतकाचे आरंभीं होता. हा **निजामशाहींत** मुख्य प्रधानकीचे कामावर होता. हा अत्यंत हुषार असून त्याचे कारकीर्दींत पुष्कळ मराठे लोक **निजामशाहींत** मोठ्या नांवलौकिकास चढले. हे लोक डोंगरांत राहून बाहेरच्या प्रजेस त्रास देत; परंतु त्यांच्या अंगचें शौर्य, तेज व कर्तबगारी पाहून **कमलसेनानें** त्यांना मोठमोठ्या हुद्याच्या जागा दिल्या; त्यामुळें ते खुष होऊन त्यांचा राज्यास चांगलाच उपयोग होऊं लागला. धोरणी मुत्सद्दी असला म्हणजे तो लोकांची कर्तबगारी ओळखून त्यांचा कसा उपयोग करून घेतो याची ओळख वरील उदाहरणावरून स्पष्ट पटते. याच कालांत **संभाजी चिटणीस** नांवाच्या गृहस्थास 'प्रतापराव' असा किताब मिळून त्याची परकीय राज्यांतील वकिलातीच्या कामाकडे नेमणूक झाली.

**मुरारपंत** नांवाचा एक ब्राह्मण दिवाण **अदीलशाहींत** २०।२५ वर्षें मुख्य प्रधान होता. याच **मुरारपंतानें** **शहाजींचा** ( शिवाजीचे वडील ) **विजापूर** दरबारीं प्रवेश केला. मराठे सरदारांच्या जोरावर यानें अनेक राजकीय उलाढाल्या केल्या, त्यांचें वर्णन पुढें योग्य प्रसंगीं येणार आहे. पुष्कळ कठीण प्रसंगीं याचा **शहाजीला** व **शहाजींचा** याला उपयोग होऊन त्यांचा स्नेह अव्याहत चालला.

याचप्रमाणें **कुतुबशाहींत** **मुरारराव**, **आकण्णा**, **माकण्णा** नांवाचे दोघे बंधू, **जयदेवराव**, **रायराव** व **कदमराव** हे गृहस्थ मोठे प्रसिद्ध होते. **मुरारराव** **इब्राहीम कुतुबशहाचे** असेरीस मुख्य प्रधान होता. **आकण्णा**, **मांकण्णा** हे **अबुहुसेनशहाचे** पदरीं असून सर्व राज्यकारभार मुखत्यारीनें हांकीत होते. याच शहाच्या कारकीर्दीत आरंभीं **जगदेवराव नाईक** व **रायराव** हे प्रमुख असून **जगदेवरावानें** तर **कुतुबशहास** राज्यपद मिळविण्याचे कामीं फारच

मदत केली होती व त्यामुळें त्याच्यावर शहाची मर्जी नेहमीं बहाल असे. या दोघांनीं पुष्कळ मराठे लोकांस फार पुढें आणिलें व दरबारांत व सैन्यांत मराठ्यांचा भरणा फार मोठा झाला. हें मुसलमानांस न खपून त्यांनीं शहाचें मन या दोघां-विषयीं अगदीं कलुषित केलें. शहानें रायरावाचा वध केला, परंतु जगदेवराव पळून गेला. त्यानें स्वपराक्रमानें कुतुबशाही, निजामशाही व आदिलशाही या तिन्हीं राज्यांस इतकें भंडावून सोडलें कीं, त्यांना आपल्या अस्थित्वाविषयीं मोठी काळजी उत्पन्न झाली. शेवटीं त्याला कांहीं मुलूख तोडून देऊन त्याची समजूत करणें मुसलमानांस भाग पडलें. राजाचा रंक व रंकाचा राव करणें अशा प्रकारची याची योग्यता आहे, अशी जगदेवरावाविषयीं सामान्य समजूत त्या कालीं झालेली होती व यामुळेंच याचें नांव इतिहासांत चिरस्मरणीय झालेलें आहे. तात्पर्य, शिवजन्मापूर्वी ५०।७५ वर्षें मराठेलोक स्वातंत्र्य मिळवि-ण्याचे खटपटीस लागलेले होते व तिचेंच फल शिवजन्म हें होय. कदमराव ह्मणून एक बलाढ्य सरदार होऊन गेला व त्यानें आपल्या पराक्रमबलानें म-हमद आदिलशहाला अगदीं जेरीस आणिलें होतें.

या शिवाय मोरे, शिरके, निंबाळकर, घाटगे, घोरपडे, मोहिते, गुजर, माने, डफळे, महाडिक, जाधव आणि भोंसले वगैरे सरदार घराणीं याकालीं अनेक मोठमोठे पराक्रम करून इतिहास प्रसिद्ध झालेलीं आहेत. मोरे घराण्यां-तील एका पुरुषाला युसुफ आदिलशहानें १२००० पायदळाचा अधिकार देऊन नीरा आणि वारणा नद्यांमधील प्रदेश काबीज करण्यास पाठविलें व त्यानें तें काम उत्तमप्रकारें फत्ते केलें. या कामगिरीबद्दल शहा खुष होऊन त्यानें त्या पुरुषाला " चंद्रराव मोरे " असा किताब देऊन जावळी प्रांताचा राजा केला. यानंतर या घराण्यानें विजापूरकराचें चांगलेंच साहाय्य केलें; त्यामुळें अदिलशाहींत यांचा उत्तम मान राहून यांच्यावर अदिलशहाची मोठी भिस्त होती. यशवंतराव मोरे या पुरुषानें परिंड्याच्या लढाईंत मोठा पराक्रम करून निजामशहाचा अगदीं पराभव केला. व निजामशाहीचें हिरवें निशाण

हस्तगत केलें. हेंच निशाण अदिलशहानें प्रसन्न होऊन या घराण्याला बाक्षिस दिलें. या घराण्यानें सतत सात पिढ्या जावळीचें राज्य केलें यावरून हें किती योग्यतेला चढलें होतें हें दिसून येतें. शिर्के हें घराणें पुष्कळ दिवसांपासून कोंकणप्रांतीं स्वतंत्र होतें. यांचें स्वातंत्र्य हिरावून घेण्यासाठीं ब्राम्हणी सुलतानांना भगीरथ प्रयत्न करावे लागले होते. दुर्गादेवीच्या दुष्काळानंतर कृष्णा व गोदावरी यांच्यामधील मुलूख ओसाड पडला असतां, तेथील मराठे सरदारांनीं बंडें करून, सर्व डोंगरी किल्ले मुसलमानांपासून हिसकावून आपल्या स्वाधीन करून घेतले; ते परत घेण्यास्तव अहमदशहा ब्राह्मणी सुलतानानें सरदार मलिकउत्तुजार यास दादो नरसो काळे नांवाच्या हुषार ब्राम्हणास समागमें देऊन पाठविलें. त्यानें तेथील बंडे मोडलीं, परंतु तो शिर्क्यांचे वाटेस गेला नाहीं. पुढें अलाउद्दीनशहाचे कारकीर्दीत बरोबर मोठें सैन्य घेऊन तो शिर्क्यांवर चालून आला; त्यावेळीं शिर्क्यांचा पराभव होऊन त्यांचें राज्य मुसलमानांचे ताब्यांत गेलें; तेव्हां उत्तुजार यानें शिर्क्यांवर मुसलमान होण्याविषयीं बळजबरी चालविली. शिर्क्यांचे शेजारीं खेळणाप्रांतीं शंकरराय नांवाचा राजा राज्य करीत होता. " तुह्मी व आह्मी एक होऊन प्रथम या शंकररायास जिंकू. त्याला आपण मुसलमान करावें म्हणजे मागाहून मीही मुसलमान होतों." असा उत्तुजार याशीं विचार करून शिर्क्यानें त्याला खेळणाप्रांतांत शिरण्याची मसलत दिली. खेळणाप्रांत ह्मणजे संगमेश्वर व कोल्हापूर यांमधील घाटमाथ्याचा भाग होय. अशा बिकट व भयंकर प्रदेशीं त्याला हुलकावून नेऊन व शंकरराय व आपण एक होऊन शिर्क्यानें छापा घालून उत्तुजारच्या फौजेचा विध्वंस केला व त्याला ठार मारिलें. शंकरराय हा शिर्क्यांपेक्षांही बलाढ्य होता व सबंध कोकणपट्टी त्याची होती. तीनशें लढाऊ जाहाजांचें आरमारहि त्याच्या जवळ होतें. हीं दोन उदाहरणें अशीं आहेत कीं, यांवरून मुसलमानांस हार न जातां स्वतंत्रता कायम ठेविण्याची त्या वेळींही मराठ्यांची उत्कट मनीषा होती, असें सिद्ध होतें. शिवाय समोर

मैदानावर शत्रूंनीं दोन हात करण्याची अंगांत ताकद नसल्यास गनीमी काव्यानें लढून त्याला जेरीस आणण्याची हातोटी त्यावेळेपासूनच मराठ्यांच्या अंगीं बाणलेली होती हेंही स्पष्ट होतें. निंबाळकर हें घराणें आदिलशाहींत सुप्रसिद्ध होतें. हे मूळचे पवार, परंतु निंबाळ गांवावरून यांनां निंबाळकर ह्मणत. यांचेकडे फलटणची सरदेशमुखी होती. या घराण्यांत जगपाळराव ह्मणून एक पाणीदार सरदार होऊन गेला. जाधवराव आपली मुलगी शहाजीस देइना तेव्हां त्यानें मालोजीस तें लग्न घडवून आणण्यांत उत्तम प्रकारचें साहाय्य केलें. पुढें मराठेशाही स्थापन झाल्यावर या घराण्यानें मोठमोठे पराक्रम केले. शिवाजीमहाराजांची प्रथमस्त्री सईबाई ही याच घराण्यांतील होती. घाटगे हें घराणेंही त्यावेळचे सरदारांत मोठें प्रमुख होतें. हे मुळचे मलवडींचे देशमूख. पुढें त्यांना माण प्रांताची देशमुखी व सरदेशमुखी मिळाली. कामराज ह्म यांचा मूळ पुरुष. हा ब्राह्मणी राज्यांत मनसबदारीवर होता. इब्राहिम आदिलशहानें नागोजीराव घाटगे यांस सरदेशमुख व झुंझारराव असे दोन किताब दिले होते. विजापूरच्या राज्यांतून यांना पुष्कळ जहागिरी मिळाल्या होत्या. 'सर्जेराव' 'प्रतापराव' वगैरे पुष्कळ किताब या घराण्यानें मिळविले होते घोरपडे हेंहि एक नामांकित घराणें होतें. यांनीं एक किल्ला घोरपडीच्या मदतीनें वर चढून सर केला म्हणून यांना हें नांव पडलें. विजापूरकरांचे पदरीं हे देशमूख होते. हें घराणें फार जुनाट असून आदिलशाहीकडून यांना 'अमीर-उल्-उमराव' असा किताब होता. या घराण्यांतील पुष्कळ पुरुष पुढें इतिहासप्रसिद्ध झाले. मोहित्यांचें घराणेंही असेंच होतें. याच घराण्यांतील एक पराक्रमी पुरुष स्वपराक्रम दाखवून श्री शिवाजी महाराजांचा पुढें सेनाधिपति झाला. माने हेहि प्रसिद्ध सरदारांपैकीं एक होते व ते विजापूर दरबारीं नामांकित शिलेदार होते. डफळे यांचें मूळ नांव चव्हाण. डफळापूरचे पाटील म्हणून त्यांस डफळे म्हणूं लागले. विजापूर दरबाराकडून त्यांना मनसब होती. जतचें डफळ्यांचें घराणें हल्लींही प्रसिद्ध आहे. याप्र-

माणेंच महाडिक यांचें घराणें देखील त्याकालीं प्रसिद्ध असून पराक्रमी होतें. जाधव आणि भोंसले हीं दोन घराणीं फार प्राचीन असून नामांकित होतीं. या दोन घराण्यांपासून श्री शिवाजी महाराज संभूत झाले असल्यामुळें व पुढील कथानकाचा या घराण्याशीं निकटचा संबंध असल्यामुळें यांचा इतिहास पुढें कुलवृत्तांत या सदराखालीं येईल.

येथवर सामान्य आणि व्यक्तिविषयक असें जें पूर्वसिद्धतेचें वर्णन केलें आहे त्यावरून असें स्पष्ट होतें कीं, मुसलमानशाहीच्या स्थापनेपासूनच मराठे लोकांचें वजन उत्तरोत्तर राजदरबारांतून वाढत होतें. मुसलमानी निरनिराळ्या राज्यांतून दुही असल्यामुळें व तीं एकमेकांस बुडवूं पहात असल्यामुळें त्यांच्या त्या दुःस्थितीचा फायदा मराठे सरदारांना साहजिक करून घेतां आला. तसेंच एकाच्या अथवा दुसऱ्याच्या वतीनें लढण्यांत आणि राजकारणें करण्यांत युद्धकलेचा व मुत्सद्दीपणाचाहि अनुभव येऊं लागला व त्यामुळें त्यांच्या झटापटींत स्वतःचें महत्व प्रस्थापित करण्यांस मराठ्यांस उत्तम संधि मिळाली. असा एक साधारण नियमच आहे कीं, मनुष्याच्या मनांत एकदां स्वोत्कर्षाची हांव उत्पन्न झाली कीं, ती शेवटच्या पायरीवर जाऊन पोंहोचल्याशिवाय थांबतच नाहीं. याचप्रमाणें तत्कालीन मराठ्यांची स्थिति होती. त्यांच्या अंतःकरणांत जी एकदां स्वोत्कर्षाची हांव उत्पन्न झाली ती दिवसेंदिवस वाढत जाऊन व अखेर श्री शिवरायावतार होऊन अंतिम पायरी जी स्वराज्यसंस्थापना तिच्यावर जाऊन ती पोहोंचली. या भागांत स्वराज्यसंस्थापनेच्या पूर्वसिद्धतेच्या एका अंगाचा विचार केला आहे. पुढील भागांत तिचें दुसरें अंग जी धर्मजागृति तिचा विचार करूं.

# भाग २ रा.

## धर्मजागृति आणि साधुसंत.

आपल्या या भरतखंडाच्या पूर्वापार इतिहासाचें निरीक्षण केलें असतां असें आढळून येईल कीं, ज्या ज्या कालीं आपल्या भरतखंडवासियांना सर्व बाजूंनीं अवनति प्राप्त झाली होती, त्या त्या कालीं त्या अवनतीपासून आपली मुक्तता करून घेण्याला आपला हा सनातन हिंदुधर्मच त्यांच्या अत्यंत उपयोगीं पडला. या सनातन हिंदुधर्माची थोरवी फार मोठी आहे, हें विसाव्या शतकांतील फार शोधक व विद्वान् परकी पंडित देखील प्रांजलपणें कबूल करूं लागले आहेत. या धर्माचे आधारग्रंथ जे वेद त्या वेदग्रंथांत सर्व प्रकारचें ज्ञान-भांडार भरलेलें आहे, असें सर्व धर्मांचे लोकांस कळून चुकलें आहे व वेदांचा अभ्यास सर्व धर्मांतील शोधक लोक करूं लागले आहेत. असा जो श्रेष्ठ हिंदु-धर्म त्याला परकी मुसलमानांची सत्ता येथें सुरू झाली तेव्हांपासून कांहीं एक विशिष्ट कालपर्यंत ग्लानि प्राप्त झाली होती. हा काल ह्मणजे इसवी सनाचे बारा, तेरा, चौदा, पंधरा आणि सोळा शतकांतला होय. या अवधींत मुसलमानांच्या राजकीय भरभराटीमुळें धर्मवेडाच्या पांघरुणाखालीं गरीब हिंदु-प्रजेवर अतिशय जुलूम चालू होता. धर्म वेडाच्या भरांत अनेक हिंदु देवतांच्या मूर्ति महंमदी धर्माच्या लोकांकडून भंग पावत होत्या. अनेक हिंदु देवालयांचा विध्वंस करून त्या ठिकाणीं मशिदी बांधल्या जात होत्या. हिंदुस्त्रियांच्या पाति-व्रत्याचा जुलमानें व राजरोसपणें उपमर्द होत होता. अशा प्रकारचे मुसलमा-नांकडून अत्याचार घडूं लागल्यामुळें व प्रखर धर्मच्छलामुळें हिंदुधर्माला एक प्रकारें ग्लानि व उदासीनता प्राप्त झाली होती. जेव्हां जेव्हां कांहीं एक क्रिया

ह्मणून घडत असते तेव्हां तेव्हां उलट बाजूनें प्रतिक्रियाही घडतच असते, हा जो सामान्य सिद्धांत त्याला अनुसरून वर जी हिंदुधर्माची स्थिति वर्णिलेली आहे तिच्या प्रतिकारार्थ प्रयत्नहि चालू झाले होते. हे प्रयत्न ह्मणजे तत्कालीन साधुसंतांनीं कायावाचामनें करून जी स्वधर्मसेवा केली, जी धर्मजागृति केली, जें सनातन हिंदुधर्माचें सर्व रहस्य आबालवृद्धांना नीट समजावून दिलें व ज्या बोधामृत सिञ्चनानें 'ईश्वराचे ठिकाणीं सर्व माणसें सारखीं, त्यांत उच्चनीच भाव ईश्वराचे घरीं नाहीं, निसर्ग दत्त असे जे हक्क ते सर्वांना समप्रमाणानें उपभोगावयास मिळाले पाहिजेत,' वगैरे वगैरे उदात्त विचार बलहीन व निकृष्ट स्थितिप्रत पोंचलेल्या हिंदुप्रजेच्या मनांत उद्भवूं लागले ते होत. आपल्या सनातन धर्माचें अतिश्रेष्ठ व उदात्त असें एक तत्व आहे व तें 'परधर्म सहिष्णुता' हें होय. या तत्वाचें आविष्करण तत्कालीन साधुसंतांच्या उपदेशांतून अशा रीतीनें केलेलें आहे कीं, 'सर्वांनीं आपापल्या धर्माप्रमाणें चालावें, स्वधर्मपालनासाठीं मरण आलें तरी बेहत्तर, परंतु परधर्म स्वीकारूं नये, अन्यधर्मी मनुष्याला बलात्कारें हिंदुधर्म ग्रहण करण्यास लावूं नये व परधर्माची नालस्ती करूं नये.' आपण इतर धर्मांचा विचार केला तर आपल्यास असें दिसेल कीं, वर नमूद केलेल्या हिंदुधर्माच्या मतांविरुद्ध अन्य धर्मांचे प्रयत्न पूर्वीपासून चालत आले आहेत आणि अद्यापि या विसाव्या शतकांत देखील कमी अधिक प्रमाणानें चालू आहेत. अशा प्रकारची हिंदुधर्माची श्रेष्ठ योग्यता असल्यामुळेंच त्या कालीं युरोपखंडांतहि अशाच प्रकारची धर्म जागृतीची लाट उसळली असतां तेथें जो रक्तपात झाला, तसा प्रकार महाराष्ट्रांत मुळींच झाला नाहीं. धर्मजागृतीवाचून राष्ट्रोन्नति होणें नाहीं, धर्मजागृति हें राष्ट्रोन्नतीचें अत्यावश्यक असें अधिष्ठान होय, हे विचार लोकांची विपन्नावस्था पाहून श्रेष्ठ माणसांचें मनांत उभे राहिले व त्याप्रमाणें त्यांचे प्रयत्न सुरू झाले. ही कामगिरी करण्याकरितां श्रीशिवकालापर्यंत जे साधुसंत या महाराष्ट्रांत निर्माण झाले

त्यांच्या जीवनवृत्तांची व प्रयत्नांची दिशा कळणें ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्वाचें आहे. व शिवरायासारख्या महा पुरुषास महाराष्ट्रांत स्वराष्ट्रोन्नति करून स्वराज्यस्थापना करण्याचें सामर्थ्य प्राप्त होण्यास हेच प्रयत्न विशेषतः कसे कारण झाले, हें नीट समजावें ह्मणून प्रमुख प्रमुख साधुसंतांचें त्रोटक वर्णन यापुढें आम्ही देत आहों.

स्वातंत्र्याच्या कमाईसाठीं कांहीं शतकें मागील भागांत सांगितल्याप्रमाणें अनेक सरदार घराण्यांकडून जसा सतत झगडा चालू होता, तसा धर्मजागृतीचा झगडाहि सतत कांहीं शतकें या संतमालिकेकडून चालू होता आणि या उभयप्रकारच्या लोकांच्या प्रयत्नांचीं व अव्याहत झगडण्याचीं अमृतासारखीं गोड फळें ह्मणजे महाप्रतापी श्रीशिवाजी महाराज आणि परमपूज्य श्रीरामदासस्वामी यांचे या महाराष्ट्रभूमीवर अवतार, हीं होत. बाराव्या शतकांत देवगिरीचे यादव राज राज्य करीत असतां पहिले महाराष्ट्र साधु ज्ञानदेव यांनीं सुप्रसिद्ध ज्ञानेश्वरी नामक भगद्गीतेवर टीकात्मक ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ वेदांतपर असून यांतील ज्ञान भांडार इतकें अगाध आहे कीं, त्याचें वर्णन करणें लेखणीला केवळ अशक्य आहे. याच शतकांत मुकुंदराज नांवाचा परम थोर ब्राम्हण साधुकवि होऊन गेला. याचे विवेकसिंधु आणि परमामृत असे दोन वेदांतपर ग्रंथ उपलब्ध आहेत. या नंतर कांहीं कालपर्यंत या सुरू झालेल्या धर्मजागृतीच्या कामाला मुसलमानांच्या दक्षिणेंतील स्वाऱ्यांमुळें खळ पडल्याप्रमाणें झाला, परंतु पुढें हळुहळू राष्ट्रीयजागृतीचा उपक्रम पुनः चालू झाला आणि मराठ्यांच्या सत्तेच्या उत्कर्षाचे सुमारास या संतमालिकेचे मणी एका मागून एक भराभर चकाकू लागले. या काळांत महाराष्ट्रांत हीं मानव रत्नें सुमारें पन्नास निर्माण झालीं. यांमध्यें कांहीं स्त्रिया होत्या, कांहीं मुसलमानहि होते. अर्धे अधिक ब्राह्मण वर्गांतील असून बाकीचे अन्य जातीचे ह्मणजे मराठे, कुणबी, शिंपी, माळी, सोनार, कुंभार आणि म्हार असे भिन्न भिन्न

जातींचे होते. या मिश्र मंडळापासून एक विशेष गोष्ट ध्यानांत घेण्यासारखी आहे. ती अशी कीं, समाज एकदां खडबडून जागा झाला म्हणजे ती जागृति एका विशिष्ट वर्गांतच न होतां;उच्च, नीच आणि मध्यम अशा सर्वप्रकारच्या वर्गांत होत असते. याच वेळीं महाराष्ट्रांतच नव्हे तर सर्व हिंदुस्थानभर ही धर्मजागृति सुरू होती. **नानका**नें पंजाबांत जागृति करून **शीख**धर्मानें **हिंदुधर्म** आणि **महंमदी धर्म** यांचा सलोखा करण्याचा प्रयत्न केला. पूर्वेकडे **चैतन्या**नें तिकडील लोकांना **शाक्तधर्म** आणि **कालीपूजा** यांच्यापासून **भागवतधर्मा**कडे परावृत्त करण्याचा यत्न केला. **रामानंद** आणि **कबीर**, **तुळसीदास** आणि **सुरदास**, **जयदेव** आणि **रोहिदास**, यांनींहि आपआपल्यापरी धर्मजागृतीचें कार्य चालविलें होतें. यांच्या उपदेशाचा परिणामहि थोडाथोडका झाला असें नाहीं; परंतु महाराष्ट्रांत जी संतकविमाला निर्माण झाली व तिनें जें कार्य घडवून आणलें त्याची योग्यता खात्रीनें कांहीं अपूर्व होती असें म्हटलें पाहिजे. **चांगदेव** आणि **ज्ञानदेव**, **निवृत्तीनाथ** आणि **सोपानदेव**, **मुक्ताबाई** आणि **जनाई**, **आकाबाई** आणि **वेणूबाई**, **नामदेव** आणि **एकनाथ** **रामदास** आणि **तुकाराम**, **शेकमहंमद** व **शांतीब्राह्मणी**, **दामाजी** व **उद्धवचिद्घन**, **भानुदास** आणि **कूर्मदास**, **बोधलेबुवा** आणि **संतोबापोवार**; **केशवस्वामी** आणि **जयरामस्वामी**, **नृसिंहसरस्वती** आणि **रंगनाथस्वामी**, **चोखामेळा** व **गोराकुंभार**, **नरहरी सोनार** आणि **सांवतामाळी**, **बहिरंभट** व **गणेशनाथ**, **जनार्दनपंत** आणि **सुधोपंत**, याशिवाय आणखीही पुष्कळ नावें देण्यासारखीं आहेत. परंतु या नाममालिकेवरून महाराष्ट्रांत ही चळवळ किती विस्तृत प्रमाणावर होती हें चांगलें समजतें.

या नररत्नांचे जीवनवृत्तांत जर आपण वाचले तर आपल्याला असें आढळून येईल कीं, हे बहुतेक साधुकवि होते; म्हणजे हे पूर्ण ईश्वरभक्त व निष्कामबुद्धीनें कार्य करणारे असून कवित्व करणारे होते. यांचीं चरित्रें अद्भुतचमत्कारांनीं भरलेलीं आहेत. ते चमत्कार जशाचेतसे अक्षरशः खरे मानणें किंवा न

माननें ही गोष्ट निराळी; हें ज्याच्या त्याच्या मर्जीचें काम आहे. तथापि त्यांच्या चमत्कारांचें जें नैतिकरहस्य म्हणून आहे, तें मनावर ठसल्याखेरीज रहावयाचें नाहीं. त्यांच्या चरित्रांतील तात्पर्य त्यानीं दाखविलेल्या चमत्कारांत नसून त्यांनीं स्वोदाहरणानें जनसमाजास जे सर्वोत्कृष्ट नैतिक कायदे घालून दिले आणि मनुष्य जन्माला येऊन त्या त्रे सार्थक करण्यासाठीं प्रत्येक मनुष्यानें कांहींएक विशिष्ट प्रकारचें उच्चत्तम असें आपलें कर्तव्य बजाविलें पाहिजे असा जो धडा घालून दिला त्यांत आहे. अशा प्रकारची जागृति उत्पन्न करण्यांत एकंदर जनसमुहावर ज्या उपदेशामृताचा वर्षाव ह्या संतमंडळींनें केला, त्यांतील तत्वें किती उदात्त आणि गंभीर आहेत यांचा आपण विचार करूं.

यांच्या उपदेशाचें पहिलें तत्त्व—भक्ति तत्त्व—हें होय. यापूर्वी यज्ञयागादि कर्ममार्गाचें जें अतिशय बंड माजलें होतें व ज्यामुळें ब्राम्हणेतरांना ईश्वराधनेचा मार्ग दुर्लभ झाला होता तें मोडून, अनन्यभावानें कोणत्याही मनुष्यानें मग तो उच्च वर्णांतील असो, मध्यम वर्गांतील असो, वा हीन जातीचा असो, ईश्वरोपासना केली असतां त्याला ईश्वरप्राप्ति होने, हा जो सुलभ भक्तिमार्ग तो यांनीं प्रचारांत आणिला. वाटेल त्यानें भक्तिभावानें ईश्वरभजन करावें, अमुक एकच असा विशिष्ट. ईश्वरोपासनेचा मार्ग नाहीं, अमुक कुलांत जन्म झाला असतांच श्रेष्ठत्व प्राप्त होतें असें नसून श्रेष्ठत्व हें स्वतःच्या अंगच्या योग्यतेनेंच प्राप्त होणारें आहे, ईश्वराचे ठिकाणीं सर्व प्राणिमात्र सारखेच प्रिय आहेत, त्याच्यापाशीं दुजाभाव नाहीं, इत्यादि उदात्त विचार या साधूंनीं शिकविले, इतकेंच नव्हे, तर ते स्वतःच्या सद्वर्तनानें लोकांच्या प्रत्ययास आणून दिले.

यांच्या .उपदेशांतील दुसरें मोठें तत्त्व म्हटलें म्हणजे, जातिजातींतील अहंमन्यतेमुळें एकमेकांत जो द्वेषभाव वाढत होता, तो नष्ट करण्याचा यांनीं प्रयत्न केला हें होय. साधुवर्गांत सर्व जातीचे लोक असून ते सर्व अद्यापिही सर्वांना सारखेच प्रिय व पूज्य आहेत या वरूनच त्यांच्या प्रयत्नाचें श्रेष्ठत्व स्पष्ट होत आहे. श्रीमंत गरीब, लहान मोठा, ब्राम्हण अब्राम्हण, स्त्रीपुरुष, असले

भेद ईश्वराला पसंत नाहींत, खरा थोरपणा ज्ञान व सदाचरण यांनीं अंगीं येतो हे विचार या संतजनांनीं सर्वांस शिकविले व आपल्या शुद्ध व सरळ वर्तनानें आणि एक निष्ठनें स्ततः करून दाखविलेल्या अनेक चमत्कारांनीं ते लोकांना व्यक्त करून दिले.

तिसरें उत्तम तत्त्व यांनीं लोकांना समजावून दिलें तें असें कीं, ईश्वर-प्राप्तीकरून घेण्यास अथवा ईश्वराचें यथायोग्य ज्ञान होण्यास संसाराचा त्यागच केला पाहिजे असें नाहीं. योगसाधन, संन्यासग्रहण, दूर वनांतरीं एकांतवास, हीं जरी ईश्वरप्राप्तीचीं साधनें असलीं तरी तीं गौण होत, त्यांच्या पासून सामान्य जनसमाजाला व्हावा तसा फायदा होत नाहीं. ह्मणून संसारांत राहून, घरदार, बायकापोरें, धनवित्त यांनीं भरलेला जो मायारूप संसार त्याच्यावरील फाजील आसक्ति सोडून, अन्तःकरण पूर्वक ईशभजन केल्यानें ईशप्राप्ति होऊन त्याबरोबर इतरांनाहि उत्तम धडा मिळतो, असें या साधु वर्गानें लोकांच्या निदर्शनास आणून दिलें. या वर्गांतील बहुतेक माणसें स्वतः संसारांत राहणारीं असून परमार्थ साधनांत कोणत्याहि प्रकारें कमी योग्यतेचीं नव्हतीं, हीहि गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

चवथें तत्त्व यांनीं प्रचारांत आणिलें तें असें कीं, आपल्या या आर्य सनातन धर्मांतील ज्ञानसंग्रह जो संस्कृत ग्रंथांत होता तो यांनीं भाषांतर रूपानें प्राकृत ग्रंथांत ओतला. याचा असा सुपरिणाम झाला कीं, ज्ञानलाभ जो फक्त आजपर्यंत संस्कृत भाषाभिज्ञांसच होत होता, तो फक्त त्यांसच न होतां, सर्वसामान्यजनसमूहास होऊं लागला. त्यांत या संतकवींची भाषा सोपी, सरळ, रसभरित आणि प्रासादिक असल्याकारणानें, ज्ञानवृद्धि भराभर होऊन, सामान्य जनतेच्या अंगीं स्वतः विचार करण्याची शक्ति प्राप्त झाली.

पांचवें तत्त्व हें कीं, ईश्वरस्वरूपाविषयीं उदात्त व योग्य अशा कल्पना जनांच्या मनांत ठसविण्यास ही संतमंडळी कारण झाली. इतर धर्मांतून ईश्वरस्वरूपाविषयींच्या कल्पना ज्या आढळून येतात त्यांत आणि आपल्या सनातन

आर्य धर्मांतील तद्विषयक कल्पनांत फार अंतर आहे. अन्य धर्मांत ईश्वर ह्मणजे प्रमादांबद्दल दंड करणारा व मनुष्यांस शिक्षा लावणारा अत्युग्ररूपी असा न्यायाधीश, असें ईश्वरस्वरूपाचें वर्णन आहे; परंतु यांच्या ईश्वरस्वरूपाविषयींच्या निरूपणांत ईश्वर माता, ईश्वर पिता, ईश्वर सखा, ईश्वरच सोयरा. न्याय व शिक्षा करतांना देखील मातापितरांप्रमाणं प्रेमकरणारा, अशी तऱ्हेचें वर्णन आहे. ईश्वर दयाळु आहे, प्रेमाळु आहे, सर्वांभूतीं सारखा, तो भक्तजनांच्या संकटनिवारणार्थ धांवून येणारा, तो भक्ताबरोबर जेवतो, बोलतो, अशा प्रकारच्या कल्पना या संतमंडळाच्या उपदेशांत पदोपदीं व्यक्त होतात.

सहावें तत्त्व म्हणजे भक्तिमार्ग सुरू करून त्यायोगें लोकांना एकीचें तत्त्व यांनीं शिकविलें, हें होय. भक्तिमार्ग म्हणजे सर्वांत सोपा, त्यापासून आत्मज्ञानाचा अनुभव जितका लवकर येतो तितका अन्य मार्गांनीं येणें शक्य नाहीं; शिवाय या एकच धोपट मार्गानें गेल्यानें एकप्रकारची विलक्षण जूट समाजांत उत्पन्न होऊन कोणतेंहि काम एकदिलानें करण्यास समाज तयार होतो. आद्यापिहि भरपावसाळ्यांत सर्व कामकाज बाजूस ठेवून पंढरीचे यात्रेस लोकांच्या झुंडीच्या झुंडी कशा जातात, याचा अंमळ विचार केला असतां वरील विधानाची सत्यता कळून येईल. या भक्तिमार्गाच्या जोरावर महाराष्ट्रसाधूंनीं आपल्या लोकांस स्वकर्तव्यपरायण केलें व तेणेंकरून राष्ट्राचें परम कल्याण झालें.

सातवें तत्त्व म्हणजे या साधुवर्गानें योग्य तेवढा मूर्तिपूजेचा निषेध केला हें होय. ह्मसोबा, नवलोबा, चंडकाई, मुंडकाई वगैरे आसुरी दैवतें—ज्यांना . धर्मग्रंथांत आधार नाहीं—त्यांना धर्माच्या नांवावर बळी वगैरे देण्याचा जो अनुचित प्रकार कांहीं अडाणी व आपमतलबी लोकांत प्रचलित होता तेवढ्या पुरताच त्यांनीं तशाप्रकारच्या क्षुद्रोपासनेचा निषेध केलेला आहे बाकी सगुण आणि निर्गुण अशीं दोन्ही ईश्वरस्वरूपें त्यांना मान्य


होतीं. कोणत्याहि देवतेची उपासना केली, तरी ईश्वर ह्मणून एकच, असें समजूनच जो तो साधु आपल्या उपास्य देवतेस भजत असे. रामदास रामोपासक होते. एकनाथ आणि जयरामस्वामी पूर्ण कृष्णभक्त होते. तुकाराम, चोखामेळा आणि नामदेव यांचें उपास्यदैवत पंढरीचा विठोबा हें होतें. नरहरीसोनार उत्कट शिवनिष्ठ होता. जनार्दनस्वामी आणि नृसिंहसरस्वती यांची दत्तात्रयाच्या ठिकाणीं अढळ भक्ति होती. अशारीतीनें जरी हे निरनिराळ्या देवतांचें भजनपूजन करीत, तरी प्रत्येकाचा भाव ईश्वर ह्मणून एकच आहे असाच होता. निर्गुणापेक्षां सगुणाची उपासना सोपी ह्मणून मूर्तीच्या ठिकाणीं दृढभाव धरणें हा ईश्वरप्राप्तीचा एक अत्यंत सुलभ असा मार्ग आहे, त्याशिवाय एकाग्र मन होण्यास सुलभ असें दुसरें साधन नाहीं, अशा तऱ्हेचें वळण त्यांनीं आपल्या उपदेशाला दिलेलें आहे. ह्मणून हल्लींच्या गर्हणीय अर्थानें हे महाप्रासादिकसाधु मूर्तिपूजक होते असें मानणें, ह्मणजे त्यांच्या श्रेष्ठ विचारांविषयीं स्वतःचें अज्ञान प्रकट करणें होय, असेंच ह्मटलें पाहिजे. आठवें आणि शेवटलें तत्व या संतमालिकेच्या उपदेशांत प्रतिपादन केलेलें दिसून येतें तें 'राम आणि रहिम एकच' हें होय. हिंदूंतील सर्व जातींमध्यें सलोखा करण्याचें काम तर या महापुरुषांनीं केलेंच; परंतु त्याहिपेक्षां विशेष महत्वाचा प्रयत्न ह्मटला ह्मणजे यांनीं हिंदुधर्म आणि महंमदीधर्म यांच्यामध्यें समेट करण्याचें श्रेय संपादिलें हा होय. याचा परिणाम असा झाला कीं, पूर्वी जे मुसलमानांकडून अत्याचार घडत असत त्याला पुष्कळ आळा पडला; कित्येक मुसलमान हिंदुदेवतांचे उपासक बनले, आणि अनेक हिंदु मुसलमानसाधूंस भजूं लागले. यावरून एक गोष्ट स्पष्टपणें सिद्ध होते ती ही कीं, लोकपुढाऱ्यांनीं जर योग्यदिशेनें प्रयत्न केले, तर या दोन्ही धर्मांचा सलोखा होऊन परस्परांमध्यें सहानुभूति उत्पन्न होण्याला हरकत येत नाहीं.

या उदात्त तत्वांचा उपदेश करून या साधुवृंदानें जो महाराष्ट्रभर शिक्षणप्रसार केला, त्यांचे कोणकोणते व कसकसे सुपरिणाम घडून आले, हें आपण

पाहिलें पाहिजे. या शिक्षणानें राष्ट्रोन्नतीचें एक मुख्य अंग जी धर्मजागृति ती करण्याचें श्रेय या साधुवर्गाला दिलें पाहिजे. यांच्या उपदेशानें जातिजातींतील व हिंदुमुसलमानांमधील तीव्र द्वेष शमला. ब्राम्हणेतरांस, शूद्रांस देखील ब्राम्हणांच्या बरोबरीनें आपली सामाजिक आणि धार्मिक उन्नति करून घेण्यास सुलभ मार्ग उपलब्ध झाला. साधुसंतांच्या निर्मळ, सहनशलि आणि परोपकारी अशा पवित्र चरित्रक्रमाचें प्रत्यक्ष अवलोकन झाल्यानें आपलें राष्ट्रहि सहनशील, परोपकारी, एकजूटीनें काम करण्यास योग्य असें बनत चाललें. संसारांत राहून स्वपरहित साधणें हाच आपला मुख्य धर्म, हेंच आपलें श्रेष्ठतम असें कर्तव्य, हाच पुरुषार्थ, हेंच जन्मास आल्याचें खरें सार्थक, अशा प्रकारची वृत्ति लोकांच्या अंगीं पूर्णपणें बाणली जाऊन त्यांच्या ठिकाणीं स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलित झाली. सर्व प्रकारचे लोक कंबरा बांधून स्वत्वरक्षण करण्यास उद्युक्त झाले. बायकांना देखील स्वत्वाची ओळख पटून राष्ट्रोन्नतीच्या कामास यथाशक्ति हातभार लावण्यास त्या पुढें येऊं लागल्या. निर्वाहापुरतें अन्न-वस्त्र असलें ह्मणजे पुरे, बाकीच्या धनवित्ताचा उपयोग परोपकारांतच झाला पाहिजे अशा प्रकारचें वळण एकंदर जनतेला साधुसंतानीं स्वोदाहरणानें लावून दिलें. या मुळें आपल्या समाजांत स्वार्थत्यागी आणि निरिच्छ माणसें पुष्कळ जन्मास आलीं आणि त्यांचा उपयोग राष्ट्रकार्याकडे करून घेण्यास श्रीसमर्थ रामदासांना सुकर झालें. याप्रमाणें स्वार्थत्याग आणि निष्कामबुद्धि या दोन उदात्त वृत्तींचा जनतेच्या मनांत उदय झाल्याबरोबर त्यांचा उपयोग राष्ट्रकार्याकडे कसा होतो याचा सप्रमाण प्रयोग श्रीसमर्थांनीं प्रत्यक्ष व्यवहारांत करून दाखविला. सारांश, आबालवृद्ध स्त्रीपुरुष एकदिलानें काम करण्यास तत्पर, सर्व जातींमध्यें ऐक्यभाव, सर्वांचें उद्दिष्ट एकच, अशी एकंदर समाजाची तयारी झाल्याबरोबर स्वराज्यसंस्थापनेची इमारत हां हां ह्मणतां कशी वर उठली हें पुढील कथानकावरून सहज लक्षांत येईल. अशा प्रकारची तयारी होती म्हणूनच श्रीशिवरायाच्या अंगीं राज्यस्थापनेला आरंभ करण्याचें सामर्थ्य प्राप्त

झालें. एकच मनुष्य एखादें महत्वाचें काम अंगावर घेऊन तें पार पाडण्यास कितीही हुषार असला, तरी इतर आजूबाजूची मंडळी त्याला पाठबळ देण्यास तयार झालेली नसेल व इतर सर्व साधनांची तयारी झालेली नसेल, तर एका पुरुषाचे हातून कोणतेंही महत्कृत्य तडीस जावयाचें नाहीं. या पेक्षां, सर्व बाजूंनीं सिद्धता झाल्यावर तिचा योग्य मार्गानें उपयोग करून घेण्यास श्रीसमर्थांसारखे समर्थ, आणि श्रीशिवाजी सारखे महा पराक्रमी पुरुष निर्माण होण्यास कालावधि लागत नाहीं, असेंच ह्मटलें पाहिजे.

येणेंप्रमाणें महाराष्ट्र स्वराज्यसंस्थापनेचें सर्व साहित्य कसें तयार झालें तें सांगितलें. या साहित्याचा प्रत्यक्ष उपयोग श्रीरामदासांनीं कसा केला याचा विचार ते प्रत्यक्ष श्रीशिवाजीमहाराजांचे गुरू असल्यामुळें, पुढें एका स्वतंत्र भागांत श्रीरामदास आणि शिवाजीमहाराज या सदराखालीं करूं.



# भाग ३ रा.

## कुलवृत्तांत.

भोसले आणि जाधव या दोन कुलांपासून श्रीशिवाजी महाराजांची उत्पत्ती झालेली आहे. यांचे वडील शहाजीराजे हे भोसले घराण्यांतील असून, यांची माता जिजाबाई या जाधव घराण्यांतील होत्या. निजामशाहीचे अखेरीस हीं दोन्हीं घराणीं दक्षिणेंत फार प्रसिद्धीस आलेलीं होतीं.

पहिल्या भागांत महाराष्ट्रांतील कित्येक प्रमुख प्रमुख मराठे घराण्यांच्या हकीकती दिल्या आहेत, त्यांच्यापैकीं भोसल्यांच्या अंगीं करारीपणा, शूरत्व, कर्तृत्वशक्ति, दृढनिश्चय, स्वाभिमान वगैरे वगैरे कित्येकगुण अतिरेकानें वास करीत होते; त्यामुळें महाराष्ट्रीयांचें धूरीणत्व याच घराण्याकडे आलें व श्रीशिवाजीसारखा सकलगुणमंडित महापुरुष निपजण्याचें श्रेय याच कुलाला मिळालें, हेंही योग्यच होय. यापुरुषाच्या पूर्वजांचा चरित्रक्रम पुढील वर्णनावरून लक्षांत येईल.

निजामशाहीचे शेवटीं जाधव घराण्यांतील लखूजी जाधवराव नांवाचा सरदार त्या राज्यांत प्रमुख होता. देवगिरीच्या यादवांचें राज्य बुडवून मुसलमानांनीं आपलें राज्य दक्षिणेंत स्थापिलें, त्या यादवांचे वंशज आपण आहों असें हें जाधव समजत व ही त्यांची समजूत बहुतेक अंशीं खरी होती. या घराण्याकडे सिंदखेडची देशमुखी होती; शिवाय निजामशाहीकडून त्यांच्याकडे दहाहजारस्वारांची मनसब असून फौजेच्याखर्चाकरितां निराळी जहागीर नेमून दिलेली होती.

भोसल्यांचें घराणें दाक्षिणेंत फार प्राचीन आहे. या घराण्याच्या क्षत्रियत्वाबद्दल वाद आहे; परंतु आजपर्यंत जी ऐतिहासिक माहिती उपलब्ध झालेली आहे, तिच्यावरून भोसल्यांचा उगम चितोडच्या अस्सल रजपूतवंशांत झालेला आहे असें दिसून येईल. उत्तरेकडे गेलेले रजपूत लोक हे मुळचे दक्षिणेंतील मराठेच होत; कालांतरानें ते परत दक्षिणेंत मूळदेशीं आले असें ह्मणण्यास हरकत नाहीं. शिवजन्म हीन कुलांत झाला, असें प्रतिपादन कांहीं परकी महाराष्ट्रद्वेषी ग्रंथकारांनीं केलेलें आहे; परंतु तसें करतांना श्रीशिवरायाची नालस्ती करण्याचाच त्यांचा हेतु होता, ही गोष्ट आपण लक्षांत ठेविली पाहिजे. तें कसेंहि असलें, तरी या घराण्यांतील पुरुषांमध्यें आणि विशेषतः श्री शिवरायामध्यें क्षत्रियांच्या अंगचे सर्व गुण अतिरेकानें वास करीत होते, ही गोष्ट सिद्ध आहे.

या घराण्याचा वंशवृक्ष जो उपलब्ध आहे तो येणें प्रमाणें. चितोडचा राणा लक्ष्मणसिंह, हा यांचा मूळपुरुष. याचा मुलगा अजयसिंह. अजयसिंहाचा सुजनसिंह व त्याचा मुलगा दिलीपसिंह. या दिलीपसिंहाचा मुलगा भोसाजी व याच्या नांवावरूनच या घराण्याला भोसावंत अथवा भोसले असें उपनांव पडलें. भोसाजीचा मुलगा देवराजजी आणि हाच प्रथम दाक्षिणेंत आला. देवराजजीचा पुत्र इंद्रसेनजी व त्याचा पुत्र शुभकृष्णजी. शुभकृष्णजीचा रूपसिंहजी व त्याचा मुलगा भूमींद्रजी. याचा मुलगा धापजी व धापजीचा बरडजी. याला दोन मुलगे—संभाजी आणि खेळोजी. संभाजीचा बाबजी. बाबजीला दोन पुत्र होते. एक मालोजी आणि दुसरा विठोजी; पैकीं मालोजीला शहाजी आणि शरीफजी असे दोन मुलगे होते. शहाजीला तीन मुलगे, पैकीं पहिला संभाजी, दुसरा शिवाजी आणि तिसरा व्यंकोजी. यांपैकीं दुसरा शिवाजी हाच महाराष्ट्र स्वराज्यसंस्थापनेचा उत्पादक होय.

या घराण्यांतील देवराजजी नांवाचा पुरुष प्रथम दक्षिणेंत आला, हें वर आलेंच आहे. या पुरुषापासून पुढें या कुलांत संभाजी नांवाचा जो पुरुष झाला त्याच्यापर्यंतच्या पुरुषांची विशेषशी खात्रीलायक माहिती उपलब्ध नाहीं. ते दाक्षिणेंत आल्यावर साताराप्रांतीं हिंगणी, बेरडी, देऊळगांव वगैरे गांवच्या पाटिलक्या खरेदी करून राहूं लागले. या घराण्याचीं राजपुतान्यांत एकलिंगकुलस्वामी आणि चितोडदेवी अशीं दोन कुलदैवतें होतीं. दाक्षिणेंत आल्यानंतर सिंघणापूरचा महादेव हा कुलस्वामी आणि श्री तुळजापूरची-भवानी ही कुलस्वामिनी असें मानून, या घराण्यांतील पुरुष वरील उपास्य-दैवतांची परम भक्ति करूं लागले. एका मागून एक हे पुरुष परम धर्मशील, शूर, पराक्रमी, असे निपजूं लागले. वंशवृद्धि होत गेली तसतशीं यांनीं आणखीही इतर पुष्कळ वतनें दाक्षिणेंत संपादन केलीं.

संभाजीचे नातू मालोजी आणि विठोजी; या दोघांनीं प्रथम लखूजी-जाधवराव यांचे पदरीं बारगिरीची नोकरी पत्करिली आणि त्या कामांत त्यांनीं आपल्या धन्याची मर्जी उत्तम प्रकारें संपादन केली. मालोजी शरीरानें फार भव्य असून मोठा ताकतदार होता. याचे स्वारीला घोडें देखील टिकत नसे, ह्मणून जाधवरावानें त्यास देवडीची चाकरी दिली. मालोजीच्या स्त्रीचें नांव दिपाबाई असून ती प्रसिद्ध निंबाळकर घराण्यांतील जगपाळराव नांवाच्या सरदाराची बहीण होती. मालोजीच्या अंगची कर्तबगारी पाहून जाधवरावानें निजामशहाकडून मालोजीला सैन्यांत किल्लेदारीची जागा देवविली. यानंतर मालोजीनें आपली पागा वाढविली व तो मोठमोठालीं सरकारीं कामें बजावूं लागला. याच्या पोटीं संतान होत नव्हतें ह्मणून दिपाबाईनें अहमदनगरच्या शहासरीफ नांवाच्या पिरास नवस केला. त्याप्रमाणें पीर नवसाला पावून तिला दोन पुत्र झाले. पिराच्या नवसानें हे झाले ह्मणून यांचीं नांवें शहा आणि सरीफ अशीं ठेविलीं. पहिला शहा हाच आपल्या चरित्रनायकाचा पिता शहाजी हा होय.

यापुढें दिवसेंदिवस मालोजीच्या अंगची कर्तृत्वशक्ति एकसारखी वाढत गेली व त्याप्रमाणें निजामशाहींत त्याचें वजनहि अधिकाधिक वाढूं लागलें. शहाजी पांच वर्षांचा झाला असतां एक क्षुल्लक अशी गोष्ट घडून आली; परंतु सकृद्दर्शनीं क्षुल्लक अशा दिसणाऱ्या या गोष्टीचा पुढील इतिहासावर कांहीं विलक्षण परिणाम घडून आला व त्यामुळें पुढील इतिहासाचें स्वरूप अगदीं निराळें झालें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ही गोष्ट म्हटली ह्मणजे मालोजींचा मुलगा शहाजी आणि जाधवरावाची कन्या जिजाबाई, यांच्या लग्नाची होय. एकेदिवशीं शिमग्याचे सणांत रंगपंचमी निमित्त मालोजीराजे वडील पुत्र शहाजी यास बरोबर घेऊन जाधवरावांचे घरीं पानसुपारीला गेले होते. शहाजी स्वरूपानें देखणा असून चपळ व पाणीदार दिसत असे. अशीं मुलें साहाजिकच सर्वांना आवडतात; त्याप्रमाणें या मुलाला पाहून जाधवरावांना फार आनंद वाटला व त्यांनीं लडिवाळपणें त्याला जवळ बोलावून आपल्या शेजारीं बसविलें. त्यांची मुलगी जिजा ही तीन वर्षांची असून त्यांच्या जवळच बसलेली होती. दोन मुलें एकत्र जमलीं कीं त्यांच्या बालक्रीडा चालू होतात, या बालस्वभावानुरूप तीं दोन्हीं मुलें एकमेकांवर रंग, गुलाल उधळून खेळूं लागलीं. या गोष्टीचें जाधवरावांस सानंद कौतुक वाटून ते थट्टेनें ह्मणाले ' मुली, तुला हा नवरा आवडतो काय? उभयतांचा हा जोडा चांगला दिसतो.' ते थट्टेचे शब्द जमेसधरून मालोजी म्हणाले 'ऐकाहो, जाधवराव काय बोलले तें. आजपासून जाधवराव आमचे व्याही झाले.' हें त्यांचें भाषणहि विनोदाचेंच आहे असें त्यावेळीं जाधवरावांस वाटलें. त्यांनीं आपली स्त्री म्हाळसाबाई हिजला हा झालेला प्रकार कळविला, तेव्हां तिला तर मालोजींच्या या उद्धट बोलण्याचा फार राग आला. तिनें आपल्या नवऱ्याच्या मनांत असें भरविलें कीं, मालोजी हा आपला ताबेदार, पैशानें, मानानें, हरएकप्रकारें आपल्यापेक्षां हीन; तेव्हां त्याच्याबरोबर शरीरसंबंध करणें कोणत्याहि दृष्टीनें उचित होणार नाहीं. याप्रमाणें मनांत विकल्प

उत्पन्न केल्यामुळें पुढें जेव्हां **मा**लोजीनें मुलीकरतां मागणी घातली, तेव्हां **जा**धवरावानें आपल्यास ही सोयरीक पसंत नाहीं असा साफ जबाब दिला. **मा**लोजीला या वचनभ्रष्टतेचा फार राग आला. आपलें कुल हीन नसून केवळ पैशाच्या अभावामुळेंच **जा**धवरावांकडून असा अपमानास्पद जबाब ऐकून घ्यावा लागत आहे, याचें वाईट वाटून त्याला फार दुःख झालें. परंतु नुसतें दुःख करीत बसून काय उपयोग! **जा**धवरावाची कन्या आपल्या पुत्राला करण्याची योग्यता अंगीं प्राप्त करून घेऊन, 'करीन तर शहाजीला **जा**धवरावाचीच मुलगी करीन,' असा त्याच दिवशीं कृतसंकल्प करून दृढनिश्चयी, मानी, करारी आणि बाणेदार असा **मा**लोजी ती गोष्ट घडवून आणण्याचे तयारीस लागला. तो **तु**ळजापूरच्या **श्री**भवानीदेवीचा निःसीम-भक्त होता. तत्कार्य सिध्यर्थ त्यानें देवीची अढळ निश्चयबळानें उपासना सुरू केली. निःसीमभक्ति आणि निश्चळनिष्ठा असल्यावर ईश्वरी साक्षात्कार हा झालाच पाहिजे; त्याप्रमाणें एकदिवस **मा**लोजी शेतांत गेला असतां त्याला दृष्टांत झाला. देवीनें दर्शन देऊन वर दिला कीं 'तुझे इष्ट मनोरथ परिपूर्ण होतील. चिंता करूं नकोस. तुझे वंशांत **श्री**सांचाचा अवतार होऊन तो **श**ककर्ता होईल. याला प्रमाण, जवळच्या वारुळांत द्रव्यसंचय आहे तो घे, तेणें तुझी कार्यसिद्धि होईल.' त्याप्रमाणें त्यानें जाऊन पाहिलें तों त्या वारुळांत खरोखरच द्रव्यानें भरलेला हांडा त्याला सांपडला. तो घेऊन **मा**लोजीनें त्यांतील द्रव्य **श्री**गोंदेकर शेषाप्पानाईक नांवाच्या सावकाराकडे नेऊन ठेविलें. नंतर त्यांतील पुष्कळसा दानधर्म करून **मा**लोजीनें मोठा लौकिक मिळविला. घोडीं खरेदी करून पागेंत भर घातली. **श्री**शिखरमहादेव येथें मोठी यात्रा भरत असे परंतु तेथें पाण्याचें मोठें दुःख असून यात्रेकरूंचे फार हाल होत असत; तन्निवारणार्थ **मा**लोजीनें तेथें एक मोठा तलाव बांधिला. पुष्कळ जीर्ण झालेल्या देवालयांचे जीर्णोद्धार केले. अशीं अनेक परोपकारांचीं कृत्यें करून **मा**लोजीनें पुनः एकवार **जा**धवरावाकडे मुलीबद्दल मागणी केली.

परंतु जाधवराव आपला हेका सोडीना. तेव्हां दरबाराकडूनच शह बसविण्याचा विचार करून जगदेवराव निंबाळकराचे मार्फत त्यानें जाधवरावावर दरबाराकडे फिर्याद दिली. आधींच मराठ्यांचा राज्याला उपयोग मोठा, त्यांतून मालोजी तर मोठा कर्तबगारीचा माणूस, तेव्हां त्याला दुखवितां कामा नये, असा विचार करून दरबारानें मालोजीस पांचहजार घोडेस्वारांची मनसब व राजे हा किताब देऊन शिवाय, शिवनेर, चाकण, पुणें आणि सुपें या प्रांतांची जहागीर करून दिली. याप्रमाणें मालोजीची योग्यता वाढवून व कुलशीला संबंधानें मुलगी देण्यास कोणतीही हरकत नाहीं असें कबूल करून घेऊन, बादशहानें जाधवरावाकरवीं जिजाबाई शहाजीस देवविली. लग्नसमारंभास निजामशहा स्वतः जातीनें हजर राहिले. या प्रमाणें हें लग्न निर्विघ्न मोठ्या थाटानें पार पडलें व ईश्वरी सूत्राप्रमाणें जें घडवायाचेंच तें घडलें.

पुढें शहाजी मोठाझाल्यावर इ. स. १६१९ या सालीं मालोजी राजे मृत्यु पावले. भोसले व जाधराव या दोन घराण्यांमध्यें जी एकदां चुरस पडली ती वास्तविक वरील लग्नसंबंध घडून आल्यानें नष्ट व्हावयाची, परंतु तसें न होतां ती अधिकच वाढत गेली. शहाजी “ बापसे बेटा सवाई ” असाहोता. तो उत्तरोत्तर विशेष हुशार व कर्तृत्ववान होत जाऊन त्याचें राज्य कारभारांत बरेंच वजन वाढलें. अशा संधीस दिल्लीहून शहाजहान पूर्वी पासूनच निजामशाही बुडविण्याचें चालू असलेलें काम तडीस नेण्याकरीतां दक्षिणेंत आला. निजामशाहीचे बाजूनें मलिकंबर नावाचा सरदार लढत होता व त्याला मराठे सरदारांचें पूर्ण पाठबळ होतें. शहाजहान आणि मलिकंबर यांच्यांत एक मोठी निकराची लढाई झाली, तींत मलिकंबर पराभव पावला. या लढाईंत मराठ्यांनीं लढण्याची शिकस्त करून मोठा पराक्रम केला. पुढें शहाजहानानें निजामशाही सरदारांत फितुरी आरंभिली. मलिकंबर व जाधवराव हे दोघेहि मोंगलांना फितूर झाले. शहाजी जसा कर्तृत्ववान तसाच तो पूर्ण स्वामिनिष्ठही

होता त्याच्यापुढें शहाजहानाचें कांहीं एक चालेना. यासमयीं मुर्तजा नांवाचा एक लहान मुलगा निजामशाहीचे तक्तावर होता. त्याच्या आईचा शहाजीवर अत्यंत विश्वास असून ती त्याच्या पूर्ण तंत्रानें वागत असे. शहाजीनें त्या दोघांस आपल्या ताब्यांत घेऊन राज्यकारभार आटोपला. मोंगलांची सरशी होऊं लागली तेव्हां त्यांजपुढें निभाव लागणें कठीण असें वाटून शहाजी त्या दोघांस घेऊन कोकणांत माहुलीच्या किल्ल्यांत गेला व तेथून निजामशाहीचा कारभार करूं लागला. याच संधीस दिल्लीकडे मोंगलबादशाहींत कांहीं घोंटाळा उपस्थित झाल्यामुळें शहाजहान, जाधवरावाच्या मदतीस कांहीं फौज ठेवून, घाईघाईनें दिल्लीस निघून गेला.

जाधवरावाच्या मनाला शहाजीचा सूड उगवून घेण्यास आयतीच संधि सांपडली. त्यानें मोंगली फौज बरोबर घेऊन माहुलीस वेढा घातला. हा वेढा सहामहिनेपर्यंत चालला होता. येथें जाधवराव आणि शहाजी यांच्यामध्यें पुष्कळ झटापटी झाल्या, त्यांत शहाजीचीच सरशी झाली. परंतु मुर्तजाचे आईनें आंतून जाधवरावापाशीं मिलाफ केल्यामुळें शहाजीस राग आला व आपला बंधु सरीफजी यास मुर्तजाजवळ ठेवून तो कांहीं निवडक स्वारांनिशीं विजापुराकडे जावयास निघाला. ही बातमी जाधवरावास लागतांच त्यानें त्याचा फलटनपर्यंत पाठलाग केला. तेथें त्या उभयतांमध्यें चांगलीच चकमक उडाली. जाधवरावाच्या मनांत शहाजीस जिवंत पकडून कैद करावयाचें होतें; परंतु तो बेत सिद्धीस न जातां शहाजी निसटून गेला. मात्र जिजाबाई गरोदर असल्यामुळें तिला पळतां येईना तेव्हां ती बापाच्या हातीं सांपडली. जाधवरावानें आपल्याबरोबर स्वगृहीं येण्याविषयीं तिला पुष्कळ आग्रह केला, परंतु ती मानी स्त्री त्या गोष्टीस कबूल झाली नाहीं. तिनें शिवनेरी किल्ल्यांत जाऊन रहाण्याचा हट्ट धरिला; तेव्हां निरुपाय होऊन जाधवरावानें तिची शिवनेरी किल्ल्यावर रवानगी करून दिली. तेथें सन १६२७ च्या एप्रिल महिन्यांत ती प्रसूत होऊन महाराष्ट्रस्वराज्यसंस्थापक श्री शिवाजी राजे जन्मास आले.

इकडे मुर्तजा निजामशहा सर्व राज्यकारभार आपले हातीं घेऊन आपले मर्जीप्रमाणें राज्य चालवूं लागला. तेव्हां लखुजी जाधवराव शहास शरण गेला. परंतु पूर्वी आपल्या विरुद्ध मोंगलांस तो फितुर झाल्याची गोष्ट शहाचे मनांत डाचत होती. त्यानें फसवून जाधवरावास दौलताबादचे किल्यांत आणिलें व तेथें त्याचा व त्याच्या मुलाचा विश्वासघातानें वध केला. तेव्हां जाधवरावाची स्त्री आपली फौज बरोबर घेऊन सिंदखेडास गेली व तेथून आपला दीर जगदेवराव जाधव यास बरोबर घेऊन ती शहाजहान बादशहास भेटली. बादशहानें तिच्या नवऱ्याची मनसब जगदेवरावाला दिली. यानंतर जाधव शेवटपर्यंत मोंगलांच्याच आश्रयाखालीं होते.

इ. स. १६२८ त खानजहान लोदी नांवाच्या मुसलमान सरदारानें दक्षिणेंत मोंगलांविरुद्ध बंड केलें. तें मोडून निजामशाही जिंकण्याकरतां स्वतः शहाजहान दक्षिणेंत आला. खानजहानास मुख्य आश्रय शहाचीचा असून निजामशाही सरदारांचेंहि चांगलें पाठबळ होतें. जाधव मोंगलांना मिळालेच होते व इतर मराठे सरदारहि एकामागून एक शहाजहानाला वश होत होते. यामुळें, शिवाय लोदीचा पक्षहि पडता असल्या कारणानें, शहाजी देखील शहाजहानास शरण गेला. त्यानें त्याला सहा हजारांची मनसब देऊन पूर्वींची निजाम शाहींतील जहागीर त्याजकडे कायम केली व इतर मराठे सरदारांसही शहाजहानानें कांहीं नेमणुका करून दिल्या. याप्रमाणें मराठे सरदारांचें पाठबळ नष्ट झाल्याबरोबर लोदीचें बंड मोडलें गेलें. तेव्हां, शहाजहानानें निजामशाही बुडविण्याचे प्रयत्न सुरू केले. मलिकंबराचा पुत्र फत्तेखान हा यावेळीं निजामशाहींत मुख्य वजीर होता. त्याला वश करून घेण्यास्तव शहाजहानानें त्याला कांहीं जहागीर नेमून दिली, तींत पूर्वी शहाजीला दिलेला कांहीं मुलूख पुनः फत्तेखानास दिला. या विश्वासघातकीपणाचें वैषम्य वाटून शहाजीनें आदिलशाहींतील मुख्य दिवाण मुरारपंत याचे मार्फत विजापुरकरांकडून मोठी फौज मागून घेतली आणि तो पुनश्च मोंगलां-

विरुद्ध लढण्यास सिद्ध झाला. फत्तेखानासहि शहाजीनें आपल्या पक्षाकडे वळविलें. मोंगलांचा सरदार महब्बतखान यानें या सर्वांचा पराभव करून निजामशहा आणि फत्तेखान यांस कैद केलें व त्यांना ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत पाठविलें. यानंतर मोंगलांनीं विजापुरकरांवर स्वारी केली परंतु तींत त्यांना यश आलें नाहीं. परिंड्याच्या लढाईंत त्यांचा पराभव होऊन ते परत बऱ्हाणपुरास गेले. मोंगलांची पिछेहाट झालेली पाहून यावेळीं निजामशाहीचा पुनश्च जिर्णोद्धार करण्याकरितां शहाजीनें मोठ्या उत्साहानें तयारी चालविली. या प्रसंगीं या वीरपुरुषानें जें वर्तन केलें, जी मुत्सद्दीगिरी लढविली, जें राजकारणकुशलत्व प्रकट केलें व जें कर्तृत्व दाखविलें, त्यांवरून शहाजीच्या अंगची खरी योग्यता लोकांच्या निदर्शनास आली. या अचाट कर्तबगारी वरूनच "मनांत आणील त्यास राज्यपदप्राप्ति करून देईल" (किंग मेकर) अशी त्याची सर्व देशभर कीर्ति झाली. आजपर्यंतचा शहाजीचा इतिहास अवलोकन केला असतां जो जो पक्ष त्यानें उचलला त्याची त्याची कामगिरी त्यानें एकनिष्ठपणें केली, असेंच आपल्यास दिसून येईल. यावेळीं निजामशाहीखालीं मोडत असलेला सर्व प्रदेश स्वाधीन करून घेऊन पर्वतदुर्गांच्या आश्रयानें मोंगलांबरोबर दोन हात करण्याची त्यानें कडेकोट सिद्धता केली व निजामशाहीच्या सिंहासनावर पूर्वीच्या वंशांतील एका अल्पवयस्कमुलास बसवून निजामशाहीचा अंमल त्यानें पूर्ववत् चालू केला. या महत्वाच्या कार्यांत विजापूरकरांचा मुख्य दिवाण मुरारपंत आणि मुख्य सेनापति रणदुल्लाखान यांचें शहाजीस मोठें साहाय्य झालें.

शहाजीच्या या कृत्यांमुळें त्वेष चढून निजामशाहीचा कायमचा नायनाट करण्याच्या हेतूनें शहाजहान बादशहा मोठ्या फौजेनिशीं पुनः दक्षिणेंत उतरला. यावेळीं फौजेचे निरनिराळे भाग पाडून व ते निरनिराळ्याशूर मुसलमान सरदारांच्या हाताखालीं देऊन त्यानें सर्व बाजूंनीं एकदम हल्ला सुरू केला. प्रथम विजापुरचें शहाजीला

२९ ... ५०३

साहाय्य होतें तें नष्ट करण्याकरितां त्यांनीं एकदम विजापुरावर चाल केली; तेव्हां अदिलशहानें बादशहाशीं तह केला. नंतर मोंगलांनीं एकामागूनएक भराभर निजामशाहींतील मुलूख काबीज केला व तें राज्य आपण व अदिलशहा यांच्यांत वांटून घेतलें. याप्रममाणें १६३७ त निजामशाहीचा शेवट झाला तेव्हां शहाजीनें मुरारपंताकडून विजापूरकरांचे पदरीं जहागीर मिळविली. पुढें शेवटपर्यंत त्यानें विजापूरकरांचीच नोकरी केली. येथें शहाजीचें पूर्वचरित्र संपलें. त्याच्या उत्तरचरित्रांतील महत्वाचा भाग यथावकाश प्रस्तुत कथानकांत अवश्य तेवढा पुढें येणारच आहे.

याप्रमाणें या तीन भागांत जी हकीगत आली आहे, तिच्या वरून एकंदर महाराष्ट्राची परिस्थिति बदलत जाऊन मराठे लोकांचें महत्त्व राजदरबारांतून उत्तरोत्तर कसें वृद्धिंगत होत होतें हें ध्यानीं येईल. उत्तरेकडील मोंगलांनीं दक्षिणेंतील मुसलमानी राज्यें बुडविण्याची खटपट केली ती मराठ्यांच्या चांगलीच पथ्यावर पडली. परभारें मुसलमानी सत्तेचा नाश होत आहे असें पाहून त्यांच्या स्वराज्यस्थापनेच्या कल्पनेस जोराचे अंकुर फुटूं लागले. अकबर, जहांगीर व शहाजहान या तीन बादशहांनीं अत्यंत श्रम करून दक्षिणेंतील अहमदनगरचें राज्य काबीज करण्यांत स्वशक्तीचा मात्र ऱ्हास करून घेतला. दक्षिणदेश अवघड, तेथील डोंगरीमुलखांत उत्तरेकडील मिजासी फौजेचा निभाव लागणें कठीण, यदाकदाचित् तो देश जिंकला गेला तरी तो पूर्णपणें ताब्यांत ठेवण्यास पराकाष्ठेचे प्रयास पडून अखेर तो पचनीं न पडतां केव्हां तरी ओकून टाकावा हा लागणारच, वगैरे गोष्टी लक्षांत घेऊन ते हा देश जिंकण्याच्या भानगडींत पडले नसते तर तें त्यांच्या फायद्याचें झालें असतें. 'दोघांचा तंटा आणि तिसऱ्याचा लाभ' या न्यायानें झालेल्या गोष्टी त्या मराठ्यांच्या चांगल्याच फायद्याच्या झाल्या. औरंजेबासारखा धूर्त व पराक्रमी पुरुष पुढें दक्षिणच्या कारभारावर असूनहीं, त्याच्या हातून मराठ्यांस दाबून ठेवणें शक्य झालें नाहीं.

याचें कारण तरी मराठ्यांना स्वत्वरक्षणाचें ज्ञान झाल्यानंतर मोंगलांनीं दक्षिणदेश बुडविण्यासाठीं जे युद्धप्रसंग केले ते मराठ्यांस जाचक न होतां उलट लष्करी व राजकीय शिक्षण देण्याचे कामीं उपयोगीं पडले, हेंच होय. राज्यांच्या घडामोडी कशा होतात, डोंगरी प्रदेशांत युद्ध चालविण्यास गनिमी काव्यानें लढणें कसें सोयीचें असतें, मोंगल कसकसे व कोठकोठें चकले, आपला देश आपल्याच ताब्यांत ठेवण्यास कायकाय साधनांची तयारी असावी लागते, वगैरे वगैरे अवश्य अशा गोष्टींचें ज्ञान मोंगलयुद्धांनीं त्यांना आयासावांचून प्राप्त झालें. कोणत्याही देशांत स्वराज्यस्थापना होण्यापूर्वी सामान्य जनसमूहाच्या मनांत जशाप्रकारची स्फूर्ति व्हावी लागते. तशाप्रकारची स्फूर्ति या पूर्व-वृत्तांतावरून साधारण मराठमंडळाच्या मनांत झाली होती असें आपल्याला दिसून येईल. शहाजी हा निःसंशय बुद्धिवान, शूर व कर्तृत्ववान् असा पुरूष होता. त्याच्या मनांतहि अस्पष्टपणें स्वराज्यस्थापनेच्या कल्पना बिंबलेल्या होत्या. परंतु त्याचें आयुष्य एका अथवा दुसऱ्या परकी सत्तेच्या आश्रयाखालीं नोकरी बजाविण्यांत गेलें असल्यामुळें स्वतंत्रस्वराज्यस्थापनेला आरंभ करण्याचें साहस त्याच्या हातून झालें नाहीं; तें साहस त्याच्याच पोटीं जन्मास आलेल्या परंतु स्वतःच्या जहागिरींत स्वतंत्रपणें वाढलेल्या स्वतंत्र विचारांच्या पुत्ररत्नाकडून करण्यांत आलें. बाकी असा आरंभ करण्याला जी सिद्धता असावी लागते त्या सिद्धतेच्या तयारीस पूर्वकालीन सर्व मराठे सरदार आणि विशेषतः शिवरायाचे पूर्वज लागून ती सिद्धता शहाजीनें परिपक्क दिशेला आणिली, ही गोष्ट निर्विवाद आहे.

# भाग ४ था.

## बालशिवाजी.

शालिवाहन शक १५४९ प्रभवनाम संवत्सर, वैशाख शुद्ध पंचमी, रोहिणी नक्षत्रावर, ( ता. १० एप्रिल, इ. सन १६२७ ) पुण्यापासून सुमारें २५ कोशांवर जुन्नर नजीक शिवनेरी किल्ल्यांत महाराष्ट्र स्वराज्य संस्थापक श्री शिवाजी भोसले यांचा जन्म झाला.

शिवजन्मकालासंबंधानें बरेंच मत भिन्नत्व आहे. परंतु सुप्रसिद्ध कैलासवासी महाडकर ज्योतिषी यांनीं सर्व प्रकारचा पुरावा एकत्र करून पूर्ण विचारांतीं हीच मिती निश्चित केलेली असल्यामळें तीच आह्मी दिली आहे. शिवजन्म झाला त्या वेळीं त्यांना चार ग्रह—गुरु, मंगळ, रवि आणि चंद्र—उच्चीचे असून, शुक्र हा ग्रह स्वगृहींचा होता. गर्भवती स्त्रीचे आचारविचार आणि मनोविकार यांचे परिणाम गर्भस्थ बालकावर होऊन त्यांचा परिस्फोट बालक जन्म पावल्यानंतर त्याच्या बालपणांतच होऊं लागतो, असें जें वैद्यशास्त्राचें मत आहे त्याचें पुष्टीकरण या बाल शिवाजीच्या चरित्र क्रमावरून उत्तम प्रकारें प्रत्ययास येतें. शिवाजीच्या वेळेस माता जिजाबाई गरोदर असतां गर्भस्थ शिवाजीचा काल युद्धप्रसंग, धांवपकड वगैरे गोष्टींनीं मोठा धामधुमीचा असल्यामुळें मातेच्याउदरांत असल्यापासूनच शिवाजीस संकटें सोसण्याची संवय लागली होती असें ह्मटलें पाहिजे. शूर, धीर, वीर असे जे महापराक्रमी पुरुष आजपर्यंत होऊन गेले त्यांचीं चरित्रें वाचलीं असतां जन्म-कालीं व बालपणीं संकटें प्राप्त होणें हें भावी उत्कर्षाचें एक सुचिन्हच आहे असें साधारण अनुमान निघतें. निदान आपल्या चरित्रनायकाच्या इतिहासावरून

तर हें अनुमान तंतोतंत खरें ठरतें. पराक्रमी मोंगल बादशहा अकबर याच्या जन्माचीही अशीच गोष्ट आहे व तिचें शिवजन्माशीं बहुतेक साम्य आहे. दोघांचे जन्म पिते दूरदेशीं गेले असतां वनवासांत झाले. शिवाजीचाजन्म शिवनेरीकिल्ल्यांत झाला व अकबराचा उमरकोटकिल्ल्यांत झाला. दोघांसही बाल्यदशेंत पितृदर्शन व पितृसुख हीं नव्हतीं.

या बालशिवाजीच्या भावीचरित्राचा प्रभाव अत्यंत हृदयंगम असा आहे व त्याचा उगम त्याला बाळपणीं ज्याप्रकारचें शिक्षण मिळालें त्यांतच आहे. बाळपणीं शिक्षण देण्याला मुलाची माताच एक योग्य आहे. तिच्यापेक्षां मायाळू, प्रेमळ आणि खऱ्याकळकळीचा शिक्षक मिळणें दुर्मिळ होय. त्यांतून शिवाजीची माता जिजाबाई जाधवांसारख्या थोर, कुलीन मराठे सरदार घराण्यांत लखूजीजाधवसारख्या महापराक्रमी व शूरपुरुषाच्या पोटीं जन्म-घेतलेली असून त्याप्रमाणें मानी, निश्चयी स्वाभिमानी आणि मनोनिग्रही अशी होती. शिवाय शिवजन्मापासून पितृसुख किंवा भर्तृसुख यांचा आधार नष्टवत् असल्याकरणानें सांप्रत तिच्या नैसर्गिक स्वभावांत धैर्य, साहस, कंटकपणा इत्यादिगुणांची परिस्थित्यनुरूप भर पडली होती. अशा मातेकडून शिक्षण मिळण्याला बालकही मह्य भाग्यवान् असावें लागतें व त्याप्रमाणें श्रीशिव-रायांचें भाग्य होतें ह्मणूनच जिजाबाईसारखी योग्यतेची माता त्यांना शिक्षक मिळाली.

साधारणतः बालकास मातेचाच लळा असतो. त्यांतून शहाजीराजे शिवाजीच्या बालपणांत जवळ नसून दूर बिजापूर दरबारीं असल्यामुळें एकट्या मातेशिवाय अन्य ममतेचें मनुष्य शिवाजीला जवळ नव्हतें व त्यामुळें त्याला मातेचाच लळा विशेष होता. राजदरबारी दिखाऊ ऐषआराmaचा वारा न लागतां त्याचें बाळपण खेडेगांवच्या जंगलांत आणि उन्हा-तान्हांत गेल्याकारणानें साहाजिकच त्याचा स्वभाव बाल्यावस्थेपासूनच कंटक असा होता. लहानपणीं शिवाजीचा स्वभाव फार हूड असे व लहान-

पणच्या हूडपणाला योग्य वळण लाविलें असतां हींच मुलें पुढें नांवलौकिकास चढतात असा साधारण अनुभव आहे. त्याप्रमाणें जिजाबाईनें बालशिवाजीचा हूडपणा पाहून, योग्य शिक्षण दिलें असतां हा आपल्या सर्व कुळाचें नांव काढील अशी तिला आशा उत्पन्न झाली. तिनें गतकालीन पूर्वजांच्या शूरपणाच्या आणि वैभवाच्या गोष्टी सांगून आपले बालकाचे हृदयांत मोठीं हिंमतीचीं व साहसाचीं कृत्यें करण्यास हुरूप आणिला. ती स्वतः बहुश्रुत बायको होती व तिनें कीर्तनें पुराणें पुष्कळ ऐकिलेलीं होतीं. ती शिवाजीला नेहमीं रामायण व महाभारत या थोर ग्रंथांत वर्णिलेल्या शूरत्वाच्या, साहसीपणाच्या, मर्दुमकीच्या, मुत्सद्दीपणाच्या आणि राजनीतीच्या गोष्टी सांगत असे. या वरील दोन राष्ट्रीय ग्रंथांची थोरवी केवढी आहे व यांतील ज्ञानभंडार किती महत्वाचें आहे हें कोणाला नव्यानें सांगावयास नकोच. या मातृमुखांतून खऱ्या कळकळीनें बाहेर पडलेल्या गोष्टी ऐकून शिवाजीच्या मनावर असा कांहीं विलक्षण परिणाम झाला कीं, त्याला बालपणांतच कथापुराणें श्रवण करण्याचा मोठा नाद लागला. आसपास कोठेंही कथापुराण असो तो तेथ धांवत जावयाचाच. चिंचवड, देहू, आळंदी वगैरे क्षेत्रांच्या ठि[illegible]णी तो नेहमीं देवदर्शनासही जात असे. याप्रमाणें स्वतःच्या मातेकडून धर्मशिक्षणाचें बाळकडु पाजलें गे[illegible] कारणानें शिवाजीची धर्मनिष्ठा श्रेष्ठ प्रकारची झा[illegible] पुढील स[illegible] आयुष्य [illegible] ज्याच्यावर मदार तें धर्मशिक्षण स्वतः देऊन लिहिणें, वाचणें, घोड[illegible] बसणें दांडपट्ट्या[illegible] हात करणें वगैरे वगैरे इतर प्रकारचें शारीरिक व मानस[illegible] शिक्षणही तिनें योग्य शिक्ष[illegible] शिवाजीला दे[illegible]लें. तात्पर्य [illegible] प्रकार[illegible] गृहशिक्षण शिवा[illegible] स[illegible]ना[illegible]पासून प्राप्त [illegible] गोष्टींचें आणि त[illegible]कालीन परिस्थि[illegible] ह शक[illegible] झा[illegible] तिनें [illegible] दिलें [illegible] [illegible] [illegible] पु[illegible] [illegible] प्रत्यक्ष प[illegible] हो[illegible] [illegible] माही [illegible]ना. म्हणून, शत्रूंचें पारिपत्य करून कुळाचा उद्धार करणारा [illegible]

याचें कारण तरी मराठ्यांना स्वत्वरक्षणाचें ज्ञान झाल्यानंतर मोंगलांनीं दक्षिणदेश बुडविण्यासाठीं जे युद्धप्रसंग केले ते मराठ्यांस जाचक न होतां उलट लष्करी व राजकीय शिक्षण देण्याचे कामीं उपयोगीं पडले, हेंच होय. राज्यांच्या घडामोडी कशा होतात, डोंगरी प्रदेशांत युद्ध चालविण्यास गनिमी काव्यानें लढणें कसें सोयीचें असतें, मोंगल कसकसे व कोठकोठें चकले, आपला देश आपल्याच ताब्यांत ठेवण्यास कायकाय साधनांची तयारी असावी लागते, वगैरे वगैरे अवश्य अशा गोष्टींचें ज्ञान मोंगलयुद्धांनीं त्यांना आयासावांचून प्राप्त झालें. कोणत्याही देशांत स्वराज्यस्थापना होण्यापूर्वीं सामान्य जनसमूहाच्या मनांत जशाप्रकारची स्फूर्ति व्हावी लागते. तशाप्रकारची स्फूर्ति या पूर्ववृत्तांतावरून साधारण मराठमंडळाच्या मनांत झाली होती असें आपल्याला दिसून येईल. शहाजी हा निःसंशय बुद्धिवान, शूर व कर्तृत्ववान् असा पुरुष होता. त्याच्या मनांतहि अस्पष्टपणें स्वराज्यस्थापनेच्या कल्पना बिंबलेल्या होत्या. परंतु त्याचें आयुष्य एका अथवा दुसऱ्या परकी सत्तेच्या आश्रयाखालीं नोकरी बजाविण्यांत गेलें असल्यामुळें स्वतंत्रस्वराज्यस्थापनेला आरंभ करण्याचें साहस त्याच्या हातून झालें नाहीं; तें साहस त्याच्याच पोटीं जन्मास आलेल्या परंतु स्वतःच्या जहागिरींत स्वतंत्रपणें वाढलेल्या स्वतंत्र विचारांच्या पुत्ररत्नाकडून करण्यांत आलें. बाकी असा आरंभ करण्याला जी सिद्धता असावी लागते त्या सिद्धतेच्या तयारीस पूर्वकालीन सर्व मराठे सरदार आणि विशेषतः शिवरायाचे पूर्वज लागून ती सिद्धता शहाजीनें परिपक्व दिशेला आणिली, ही गोष्ट निर्विवाद आहे.

# भाग ४ था.

## बालशिवाजी.

शालिवाहन शक १५४९ प्रभवनाम संवत्सर, वैशाख शुद्ध पंचमी, रोहिणी नक्षत्रावर, ( ता. १० एप्रिल, इ. सन १६२७ ) पुण्यापासून सुमारें २५ कोशांवर जुन्नर नजीक शिवनेरी किल्ल्यांत महाराष्ट्र स्वराज्य संस्थापक श्री शिवाजी भोसले यांचा जन्म झाला. शिवजन्मकालासंबंधानें बरेंच मत भिन्नत्व आहे. परंतु सुप्रसिद्ध कैलासवासी महाडकर ज्योतिषी यांनीं सर्व प्रकारचा पुरावा एकत्र करून पूर्ण विचारांतीं हींच मिती निश्चित केलेली असल्यामळें तीच आह्मी दिली आहे. शिवजन्म झाला त्या वेळीं त्यांना चार ग्रह—गुरु, मंगळ, रवि आणि चंद्र—उच्चीचे असून, शुक्र हा ग्रह स्वगृहींचा होता. गर्भवती स्त्रीचे आचारविचार आणि मनोविकार यांचे परिणाम गर्भस्थ बालकावर होऊन त्यांचा परिस्फोट बालक जन्म पावल्यानंतर त्याच्या बालपणांतच होऊं लागतो, असें जें वैद्यशास्त्राचें मत आहे त्याचें पुष्टीकरण या बाल शिवाजीच्या चारित्र क्रमावरून उत्तम प्रकारें प्रत्ययास येतें. शिवाजीच्या खेपेस माता जिजाबाई गरोदर असतां गर्भस्थ शिवाजीचा काल युद्धप्रसंग, धांवपकड वगैरे गोष्टींनीं मोठा धामधुमीचा असल्यामुळें मातेच्याउदरांत असल्यापासूनच शिवाजीस संकटें सोसण्याची संवय लागली होती असें ह्मटलें पाहिजे. शूर, धीर, वीर असे जे महापराक्रमी पुरुष आजपर्यंत होऊन गेले त्यांचीं चारित्रें वाचलीं असतां जन्म-कालीं व बालपणीं संकटें प्राप्त होणें हें भावी उत्कर्षाचें एक सुचिन्हच आहे असें साधारण अनुमान निघतें. निदान आपल्या चारित्रनायकाच्या इतिहासावरून

तर हें अनुमान तंतोतंत खरें ठरतें. पराक्रमी मोंगल बादशहा अकबर याच्या जन्माचीही अशीच गोष्ट आहे व तिचें शिवजन्माशीं बहुतेक साम्य आहे. दोघांचे जन्म पिते दूरदेशीं गेले असतां वनवासांत झाले. शिवाजीचाजन्म शिवनेरीकिल्ल्यांत झाला व अकबराचा उमरकोटकिल्ल्यांत झाला. दोघांसही बाल्यदशेंत पितृदर्शन व पितृसुख हीं नव्हतीं.

या बालशिवाजीच्या भावीचरित्राचा प्रभाव अत्यंत हृदयंगम असा आहे व त्याचा उगम त्याला बाळपणीं ज्याप्रकारचें शिक्षण मिळालें त्यांतच आहे. बाळपणीं शिक्षण देण्याला मुलाची माताच एक योग्य आहे. तिच्यापेक्षां मायाळू, प्रेमळ आणि खऱ्याकळकळीचा शिक्षक मिळणें दुर्मिळ होय. त्यांतून शिवाजीची माता जिजाबाई जाधवांसारख्या थोर, कुलीन मराठे सरदार घराण्यांत लखूजीजाधवसारख्या महापराक्रमी व शूरपुरुषाच्या पोटीं जन्म-घेतलेली असून त्याप्रमाणें मानी, निश्चयी स्वाभिमानी आणि मनोनिग्रही अशी होती. शिवाय शिवजन्मापासून पितृसुख किंवा भर्तृसुख यांचा आधार नश्वत् असल्याकरणानें सांप्रत तिच्या नैसर्गिक स्वभावांत धैर्य, साहस, कंटकपणा इत्यादिगुणांची परिस्थित्यनुरूप भर पडली होती. अशा मातेकडून शिक्षण मिळण्याला बालकही महा भाग्यवान् असावें लागतें व त्याप्रमाणें श्रीशिव-रायांचें भाग्य होतें ह्मणूनच जिजाबाईसारखी योग्यतेची माता त्यांनां शिक्षक मिळाली.

साधारणतः बालकास मातेचाच लळा असतो. त्यांतून शहाजीराजे शिवाजीच्या बालपणांत जवळ नसून दूर बिजापूर दरबारीं असल्यामुळें एकट्या मातेशिवाय अन्य ममतेचें मनुष्य शिवाजीला जवळ नव्हतें व त्यामुळें त्याला मातेचाच लळा विशेष होता. राजदरबारी दिखाऊ ऐषआरा-माचा वारा न लागतां त्याचें बाळपण खेडेगांवच्या जंगलांत आणि उन्हा-तान्हांत गेल्याकारणानें साहाजिकच त्याचा स्वभाव बाल्यावस्थेपासूनच कंटक असा होता. लहानपणीं शिवाजीचा स्वभाव फार हूड असे व लहान-

पणच्या हूडपणाला योग्य वळण लाविलें असतां हींच मुलें पुढें नांवलौकिकांस चढतात असा साधारण अनुभव आहे. त्याप्रमाणें जिजाबाईनें बालशिवाजीचा हूडपणा पाहून, योग्य शिक्षण दिलें असतां हा आपल्या सर्व कुळाचें नांव काढील अशी तिला आशा उत्पन्न झाली. तिनें गतकालीन पूर्वजांच्या शूरपणाच्या आणि वैभवाच्या गोष्टी सांगून आपले बालकाचे हृदयांत मोठीं हिंमतीचीं व साहसाचीं कृत्यें करण्यास हुरूप आणिला. ती स्वतः बहुश्रुत बायको होती व तिनें कीर्तनें पुराणें पुष्कळ ऐकिलेलीं होतीं. ती शिवाजीला नेहमीं रामायण व महाभारत या थोर ग्रंथांत वर्णिलेल्या शूरत्वाच्या, साहसीपणाच्या, मर्दुमकीच्या, मुत्सद्दीपणाच्या आणि राजनीतीच्या गोष्टी सांगत असे. या वरील दोन राष्ट्रीय ग्रंथांची थोरवी केवढी आहे व यांतील ज्ञानभांडार किती महत्त्वाचें आहे हें कोणाला नव्यानें सांगावयास नकोच. या मातृमुखांतून खऱ्या कळकळीनें बाहेर पडलेल्या गोष्टी ऐकून शिवाजीच्या मनावर असा कांहीं विलक्षण परिणाम झाला कीं, त्याला बालपणांतच कथापुराणें श्रवण करण्याचा मोठा नाद लागला. आसपास कोठेंही कथापुराण असो तो तेथें धांवत जावयाचाच. चिंचवड, देहू, आळंदी वगैरे क्षेत्रांच्या ठिकाणीं तो नेहमीं देवदर्शनास्तव जात असे. याप्रमाणें स्वतःच्या मातेकडून धर्मशिक्षणाचें बाळकडू पाजलें गे[illegible] कारणानें शिवाजीची धर्मनिष्ठा श्रेष्ठ प्रकारची झाली. पुढील सर्व आयुष्या[illegible] ज्याच्यावर मदार तें धर्मशिक्षण स्वतः देऊन लिहिणें, वाचणें, घोड्या[illegible] बसणें दांडपट्ट्याचे हात करणें वगैरे वगैरे इतर प्रकारचें शारीरिक व मानस[illegible] शिक्षणही तिनें योग्य शिक्षकांकडून शिवाजीस [illegible] दिलें. तात्पर्य उक्त प्र[illegible] कारचें गृहशिक्षण शिवाजीस मातेपासून प्राप्त झा[illegible]. त्या [illegible] गोष्टींचें आणि तत्कालीन परिस्थि[illegible] ह शक्य [illegible] झा[illegible] तिनें [illegible] दिलें [illegible] महत्त्वा[illegible] तिनें पु[illegible] उ[illegible] लाद[illegible] प्रत्यक्ष प[illegible]च्या हो[illegible] माहीत होता. ह्मणून, शत्रूचें पारिपत्य करून कुळाचा उद्धार करणारा शककर्ता

पुरुष आपले कुळांत निपजणार आहे, असे देवांचे दृष्टांत झाले आहेत, परंतु ते केव्हां खरे होणार कोण जाणे!' असे दुःखोद्गार शिवाजीपाशीं वारंवार काढून तो शककर्ता पुरुष तो स्वतःच नसेल कशावरून! अशा प्रकारचा अस्पष्टभाव तिनें शिवरायाच्या मनांत उत्पन्न केला. लहानपणीं बालकाच्या हृत्पटलावर कोणत्याही गोष्टीचें प्रतिबिंब पडलें म्हणजे त्याचा ठसा कधींहि पुसला जात नाहीं, तद्वत् शिवाजी जसजसा मोठा होत गेला तसतसे मातेचे वरील दुःखोद्गार त्याच्या अंतःकरणावर अधिकाधिक ठसले जाऊन आपणास ईश्वरानें कांहीं एक अपूर्व अशी कामगिरी बजाविण्याकरितां निर्माण केलें आहे असा त्याचा दृढ ग्रह झाला.

शिवाजीच्या शिक्षणाचें श्रेय जिजाबाईच्या खालोखाल त्याचे गुरुवर्य दादोजी कोंडदेव यांच्याकडे आहे. दादोजी कोंडदेव हे फलटण गांवचे कुळकर्णी असून यांचें सर्व आयुष्य शहाजीची इमानें इतबारें नोकरी करण्यांत गेलें. यांचें जीवनचरित्र फारसें उपलब्ध नाहीं. हा पुरुष अत्यंत सचोटीचा, प्रामाणिक, धार्मिक व परोपकारी असा होता. यानें दोन महत्वाचीं कामें केलीं. एक शिवाजीचें शिक्षण व दुसरें शहाजीच्या पुण्याच्या जहागिरीची सुव्यवस्था. पूर्वी नारोपंत हणमंते नांवाचा कारकून शहाजीनें जिजाबाईजवळ ठेविला होता. परंतु शहाजीस जेव्हां कर्नाटकची कामगिरी विजापूरदरबाराकडून मिळाली तेव्हां त्यानें नारोपंतास तिकडे बोलावून घेऊन दादोजी कोंडदेव यांस पुण्याच्या जहागिरीवर नेमिलें व जहागिरीची व्यवस्था आणि शिवाजीचें संगोपन हीं कामें त्यांजकडे सोंपविलीं. हीं दोन्ही कामें दादोजीच्या हातून उत्तम प्रकारें पार पडलीं. त्यांनीं शिवाजीला दिलेलें मुख्य शिक्षण म्हटलें म्हणजे धर्माचें व नीतीचें होय. भारत, भागवत इत्यादि ग्रंथ त्यांनीं शिवाजी कडून ऐकवून, त्यांतील युद्धप्रसंगाच्या कथा, नीति व हिंदुधर्माचीं उदात्त तत्त्वें त्यास चांगलीं समजावून दिलीं. स्वतःचें वर्तन अत्यंत पवित्र व पापभीरु असल्यामुळें त्यांच्या समागमानें शिवाजीचें मन व बुद्धि सुसंस्कृत झाली. शिवाय तत्कालानुसार मर्दु-

मर्दानी शिक्षण, जमीन महसुलाची व हिशेबाची पद्धति, लष्कर ठेवून स्वतःचा व जहागिरीचा बचाव करण्याची तयारी, व प्रजेला वागविण्याची संतोषकारक पद्धति इत्यादि अनेक गोष्टींचें ज्ञान दादोजीनें शिवाजीस उत्तम प्रकारें करून दिलें. तसेंच घोड्यावर बसणें, तिरंदाजी करणें, भाल्याची फेंक मारणें तरवार गाजविणें व पट्टा वगैरे हत्यारांचे हात करणें इत्यादि गोष्टीहि दादोजीनें शिवाजीस शिकविल्या. या शिक्षणाचा असा परिणाम झाला कीं, त्यायोगें शिवरायाचे ठिकाणीं साहसाची व उद्यमाची आवड उत्पन्न झाली.

दादोजी कोंडदेव यांजकडे सोंपविलेलें दुसरें काम म्हणजे जहागिरीची व्यवस्था हें होय. मुसलमानी अमदानींत सर्वत्र दंगेधोपे, लुटालूट अशी अव्यवस्था असून खुद्द शहाजी दूरदेशीं असल्यामुळें त्याच्या जहागिरीला बाहेरील लुटारू लोकांचा व रानटी पशूंचा फार त्रास पोंचत असे. त्यांच्या बंदोबस्ता करतां मावळे लोकांची एक पायदळ पलटण दादोजीनें तयार केली व गांवोगांव चौक्या पहारे बसवून चोरट्यांची भीति नाहींशी केली. आपल्या जहागिरींतील किल्ले दुरुस्त करून त्यांजवर शिबंदी ठेवून दिली. बक्षिसें वगैरे लावून मावळे लोकांकडून वाघ, लांडगे वगैरे हिंसक पशू मारविले. योग्यप्रकारें जमिनीची मोजणी व प्रतबंदी ठरवून पिकाचे मानानें वसूल घेण्याचे नवे ठराव केले. पुष्कळ वर्षे सार्‍याची माफी देऊन रानवट जागा लागवडीस आणल्या. पूर्वी टाकाऊ म्हणून ठरलेल्या शेतांना बागाइती जमीनीचें स्वरूप आणिलें. या सुधारणांचा असा परिणाम झाला कीं लोकवस्ती भराभर वाढून अल्पावधींत जहागिरींत आबादानी व भरभराट झाली. वसूलहि पूर्वींपेक्षा पुष्कळ येऊं लागला. या सर्व गोष्टींपासून शिवाजीस अप्रत्यक्षपणें उत्तमप्रकारचें शिक्षण मिळालें. त्यानें मोठेपणीं जमीन वसुलाची व राज्याची जी व्यवस्था केली ती यावेळीं दादोजीनें घालून दिलेल्या पायावरच रचिलेली होती. न्याय वगैरे तोडतांना दादोजी शिवाजीस जवळ बसवीत असे, तसेंच त्याला जमाबंदीची व लोकस्थितीची माहिती होण्याकरतां बरोबर गांवोगांव हिंडवीत असे. याचाहि उपयोग पुढील आयुष्यक्रमांत शिवाजीला पुष्कळ झाला.

वरील हकीकतीवरून माता जिजाबाई आणि गुरुवर्य दादोजी यांची थोरवी किती मोठी होती हें वाचकांचे ध्यानांत आलेंच असेल. या दोन योग्य माणसांच्या सहवासांत प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणें आपल्या बाल चरित्र नायकाला जें शिक्षण प्राप्त झालें त्याचा प्रभाव बाल्यदशा संपण्यापूर्वींच दृग्गोचर होऊं लागला. शिवाजी सुमारें बारावर्षांचा झाला अशतां शहाजी राजे यांनीं जिजाबाई आणि शिवाजी यांना विजापुरीं आपल्या जवळ आणिलें. तेथें असतां त्याच्या अंगचें धैर्य, स्वधर्माविषयीं वाटणारी कळकळ, खरें क्षात्रतेज इत्यादि बालपणींच अंगीं बाणलेल्या गुणांचा जो परिस्फोट झाला त्याची कल्पना पुढील विवेचनावरून होण्यासारखी आहे. विजापुरीं गेल्यावर एके दिवशीं बादशहा शहाजींच्या गोटांत त्याला भेटण्याकरितां गेला असतां त्याला शिवाजीनें लवून मुजरा न करितां फक्त सलाम केला पोरवय असल्यामुळें त्याबद्दल बादशहास जरी त्याचा राग आला नाहीं तरी आश्चर्य वाटून त्यानें त्यासंबंधी शहाजीस प्रश्न केला. शहाजीनें उत्तर केलें कीं, 'मुलगा अज्ञ आहे, त्याचा खेडेगांवांत काळ गेल्यामुळें दरबारी रीतरिवाज त्याला ठाऊक नाहीं. इकडे कांहीं काळ राहिल्यावर रीतरिवाज समजूं लागून तो योग्य अदब बजाऊं लागेल' ही गोष्ट बादशहास पटून तो विषय त्या वेळीं तितकाच राहिला.

शहाजीचा विजापुरच्या राज्यांत मोठा मानमरातब व वजन असल्यामुळें शिवाजीचें वर्तन एखाद्या सरदाराला साजेल असें होतें. शहरांत फिरावयास निघाला म्हणजे त्याच्या स्वारीस त्याला [illegible] एक लहानशा पालखी, पालखीस लहान लहान भोई, पुढें चालण्यास [illegible] [illegible] छोटे तट्टू व त्यांच्यावर [illegible] लहान [illegible] [illegible]

असे. ही स्वारी [illegible] [illegible] मोठें [illegible]

सन एक [illegible] ही स्व[illegible] [illegible]

यांनीं गाई मारून त्यां[illegible] विक्र[illegible] [illegible]

जीच्या शरीराची नखशिखांत संतापानें आग झाली. त्याला अत्यंत क्रोध येऊन त्याचे डोळे अगदीं लाल बुंद झाले. दरबार भरला होता ह्मणून तो तडक तसाच दरबारांत गेला व नेहमींच्या जागेवर जाऊन बसला. त्याची ती कुद्ध आणि खिन्न मुद्रा पाहून बादशहा ह्मणाला ' आज तुमची मुद्रा अशी कां दिसते ? रोजच्या प्रमाणें दिलखुष दिसत नाहीं. ' शिवाजीनें उत्तर केलें ' आह्मी हिंदु, आम्हाला गाई म्हणजे देवतुल्य पूज्य. त्यांचे वध उघड भररस्त्यावर पाहून मनाला अतिशय वाईट वाटलें इतकेंच.' हें ऐकून बादशहा बोलला. 'तुम्हाला जसें बकऱ्यांचे वधाचें कांहीं वाटत नाहीं, तसें आम्हांला गोवधाचें कांहीं वाटत नाहीं. ' या भाषणानें त्या वीराचा क्रोध अनावर होऊन तो कांहीं बोलणार इतक्यांत, शहाजी एकदम पुढें झाला आणि म्हणाला 'आजपर्यंत हा जहागिरीच्या किल्ल्यावर राहत असल्यामुळें असला प्रकार कधींही त्याच्या दृष्टीस पडलेला नाहीं. तशांतून अल्लड स्वभाव, त्यामुळें त्याला तसें वाटलें. खावंदांनीं विषाद मानूं नये.'

या विनयाच्या भाषणानें बादशहाची समजूत झाली. दरबारांत हिंदुसरदारांचेंच वर्चस्व असल्यामुळें भर रस्त्यावर होणारा गोवध बंद केल्यानें हिंदुलोक खुष होतील व ते खुषी रहाण्यांतच आपल्या राज्याची सुरक्षितता आहे, असा विचार करून बादशहानें रस्त्यावर गोवध न करण्याविषयीं व गोमांस विक्रीस न मांडण्याविषयीं शहरांत दवंडी पिटविली व हा हुकूम मोडणारास कडक शिक्षा होईल असें जाहीर केलें या गोष्टीमुळें सर्व हिंदुलोकांस शिवाजीचा मोठा आदर वाटूं लागला व त्याच्या अंगची बालवयांतच दिसून येणारी स्वाभाविक ओजस्विता पाहून हा कोणी तरी अलौकिक कर्ता पुरुष निपजणार आहे असें लोक भविष्य करूं लागले.

घरीं आल्यावर शहाजीनें रागयुक्त मुद्रेनें खालीलप्रमाणें शिवाजीस उपदेश केला. 'तुह्मी मुलें अद्याप अज्ञान; ज्या गोष्टी आपल्या हातच्या नाहींत त्या बद्दल विषाद मानणें, बादशहास दरबारी पद्धतीनें लवून कुरनिसात न करणें इत्यादि गोष्टी बऱ्या नव्हेत. आम्हास या गोष्टी समजत नाहींत असें नाहीं.

आह्मी जर लहानपणीं असे वागलों असतों तर आह्मांस हे दिवस दिसले नसते. यासाठीं विचारानें देशकाल पाहून वागाल, तर त्यांतच तुमचें कल्याण आहे; लीनतेनें आर्जवपूर्वक वागाल, तर राज्य तुमचें आहे, पण मागच्यापुढच्या विचार न करितां चालाल, तर राज्यांतुन हांकून देतील आणि मग पश्चात्ताप करीत बसण्याची पाळी येईल। '

त्या काळच्या परिस्थितीचा विचार करतां शहाजीचा उपदेश जरी बरोबर होता तरी शिवाजीसारख्या स्वतंत्र विचाराच्या बालवीराला तो मान्य होण्यासारखा नव्हता. शिवाजी जितका उच्छृंखल आणि अल्लड होता तितकाच तो मातृपितृभक्त असून विनयशलि होता. पित्याचा उपमर्द होईल असें जाणून शिवाजीनें वरील उपदेश ऐकून घेऊन त्यावर काहींच उत्तर केलें नाहीं. परंतु या गोष्टीवरून तत्कालीन पूर्वपिढींतील लोक–विचारांचा प्रवाह कोणत्या दिशेनें चालला होता व पुढील तरुण पिढीच्या विचारांना कोणती दिशा लागलेली होती याची कल्पना चांगली करतां येते.

जरी वर सांगितल्याप्रमाणें भररस्त्यावर गोवध न करण्याविषयीं व गोमांस विक्रीस न मांडण्याविषयीं बादशाही हुकूम सुटला होता, तरी त्याची अंमलबजावणी योग्य प्रकारें होत नसे. या हुकमाविरुद्ध कधीं कधीं गोमांस विक्री करतां रस्त्यावर मांडलेलें शिवाजीच्या दृष्टीस पडतच असे. एकेदिवशीं रस्त्यावर गोमांस मांडलेलें पाहून त्याच्या मनाला फार खिन्नता वाटली आणि तो पित्यापाशीं येऊन म्हणाला ' आपण वडील, मी लहान. आपण आपल्या बरोबर मला दरबारीं घेऊन जाता, पण रस्त्यांत गोमांस दृष्टीस पडलें म्हणजे माझ्या मनाला खेद वाटतो. आपण बादशहाचे नोकर, तेव्हां आपल्याला दरबारीं जाणें भाग आहे. परंतु माझी तशी गोष्ट नाहीं. मला नियमानें दरबारीं जाण्याचें कारण नाहीं. मी दरबारला येत जावें अशी जर आपली मनापासून इच्छा असेल तर रस्त्यावरील गोवध बंद करवावे. तसें न होईल, तर यापुढें मी दरबारीं म्हणून कधींहि येणार नाहीं. कारण गोमांस मी प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांनीं पाहिलें की,

मी देहभान विसरून जातों. तेव्हां अशा एखाद्या प्रसंगीं माझ्या हातून काय होईल याचा कांहीं नियम नाहीं. संतापाच्या भरांत एखाद्या कसायाच्याशिरच्छेद करण्यास मी चुकणार नाहीं. यास्तव, या गोष्टीचा विचार करून आपण योग्य तो बंदोबस्त करावा, अशी माझी चरणापाशीं सविनय प्रार्थना आहे.'

हें भाषण ऐकून शहाजीला मोठा विचार पडला. एकार्थी शिवाजीचें म्हणणें बरोबर आहे असें त्यास वाटलें. परंतु यापुढें कसें वागावें हें त्याला सुचेना. अशा विचारांत तो पडला असतां, मिरजुमला नांवाचा मुसलमान सरदार त्याला भेटण्याकरतां आला. शहाजीनें त्याला सर्व हकीकत कळवून, तो त्याचा परम स्नेही असल्यामुळें पुढें काय करावें याविषयीं त्याला दिलासा विचारिला. त्यानें असा सल्ला दिला कीं, आजपासून शिवाजीला दरबारीं आपल्या बरोबर आणूं नये, व बादशहानें शिवाजी न येण्याचें कारण विचारिलें तर त्याची मर्जी पाहून सर्व गोष्टी त्याच्या कानावर घालाव्या. त्याप्रमाणें शहाजीनें त्या दिवशीं मुलाला आपल्याबरोबर दरबारीं नेलें नाहीं.

शिवाजी स्वरूपानें फार देखणा असून दिसण्यांत फार चपळ व पाणीदार असे. तसाच तो शहाणाहि होता. त्यामुळें बादशहा त्याच्यावर फार लोभ करीत असे. शिवाजीला पाहिल्याबरोबर बादशहाला फार आनंद वाटून त्याची मुद्रा अगदीं सुप्रसन्न होत असे. थोडे दिवस शिवाजी दरबारीं न आल्यामुळें बादशहानें त्याविषयीं शहाजीपाशीं चौकशी केली. तेव्हां शहाजीनें मोठ्या नम्रतेनें उत्तर दिलें 'खावंद, आपण पूर्वी शहरांत गोवध बंद होण्याविषयीं हुकूम सोडिला होता; परंतु तो बरोबर अंमलांत येत नाहीं. शिवाजी अज्ञान बालक, त्याला तो प्रकार सहन होत नाहीं. आणि अशा एखाद्या प्रसंगीं त्याच्या हातून एखाद्या कसायास देहांत प्रायश्चित्त मिळेल अशी भीति वाटते; सबब मी त्यास मुद्दाम दरबारीं आणीत नाहीं.'

आपला हुकूम पाळला जात नाहीं असें ऐकून बादशहाला राग आला आणि त्यानें पुनः असा जाहिरनामा काढिला कीं 'गोहत्या हें हिंदुलोक महत्पाप

समजतात व त्यांना त्यापासून फार चीड येते. वास्तव, जर कोणी उघडपणें रस्त्यावर गोवध करील किंवा गोमांस विकील, तर त्यास देहान्त शिक्षा केली जाईल. या हुकमाविरुद्ध वागणारास जरी कोणी हिंदूनें देहान्त शिक्षा केली, तरी तो गुन्हा मानला न जातां त्याची चवकशी सरकारांत केली जाणार नाहीं, असा सक्तीचा हुकूम जाहीर करून शहरापासून एका बाजूला बादशहानें कसाईपुरा वसविला आणि सर्व कसायांस तेथें जाऊन राहण्याचा हुकूम झाला. अशी व्यवस्था लागली तेव्हां शिवाजी पूर्ववत् पित्याबरोबर दरबारीं जाऊं लागला.

यानंतर एके दिवशीं शिवाजी शहरांत आपल्या बालस्वारांनिशीं फिरावयास निघाला असतां, एक धट्ट कसाई पाटींत गोमांस घेऊन तें भर राजरस्त्यावर राजगृह दरवाज्याजवळ विकावयास बसला होता. त्याला पाहून शिवाजीच्या अंगाचा तिळपापड झाला आणि तत्क्षणीं रागाच्या आवेशांत त्यानें आपली तरवार उपसून तिनें त्याचें शिर धडापासून वेगळें केलें. त्या कसायाच्या स्त्रीनें बादशहाकडे तक्रार नेली, तेव्हां बादशहानें तिला सांगितलें कीं 'तुझ्या नवऱ्यानें माझ्या स्वतःच्या हुकमाविरुद्ध वर्तन केलें आहे, तेव्हां त्याला जी शिक्षा मिळाली ती यथायोग्य झाली.' दफणाप्रीत्यर्थ बादशहानें तिला चार रुपये देऊन तिला रांडरोटी सुरू केली.

या गोष्टीचा मुसलमान लोकांत अतिशय बोभाटा झाला. जो तो ह्मणूं लागला कीं, 'आतां मुसलमानांचा बोज राज्यांत उरला नाहीं. शहाजीचा मुलगा तर इतका चढला आहे कीं, तो बादशहास लवून कुरनिसात देखील करीत नाहीं. तरी बादशहाला त्याचें कांहींच न वाटून उलट तो त्याच्याच कलाप्रमाणें वागतो. आतां शिवाजी अधिकाधिक शेफरला जाऊन, भररस्त्यावर तो मुसलमानांचे खून करूं लागेल. हें चिन्ह कांहीं ठीक नाहीं.'

या गोष्टीमुळें शहाजी राजे यांना मात्र अत्यंत काळजी वाटूं लागली मुलगा चांगला हुशार, बुद्धिमान् व गुणी आहे; परंतु असा हूडपणा करितो याला काय उपाय करावा ? याला कांहीं शिक्षा करावी तर याचा स्वभाव अति तापट व

करारी, तेव्हां भलताच कांहीं परिणाम व्हावयाचा. असा विचार करून त्याला त्यांनीं दोन उपदेशाच्या गोष्टी सांगितल्या. त्या शिवाजीनें मुकाट्यानें ऐकून घेतल्या, परंतु त्यावर प्रत्युत्तर असें कांहींच केलें नाहीं.

या नंतर शहाजीनें जिजाबाईस शिवाजीला दोन हितगोष्टी सांगून पहाण्याविषयीं सांगितलें. त्याप्रमाणें तिनें गोड, ममतेच्या शब्दांनीं असा उपदेश केला कीं, ' तुह्मी आतां मोठे झाला. वडिलांच्या मर्जीविरुद्ध वागून त्यांच्या मनाला विषाद वाटावा असें वर्तन तुमच्यासारख्या सद्गुणी मुलाला शोभत नाहीं. वाडवडिलांनीं परिश्रम करून व अनेक संकटें सोसून जें कांहीं कमाविलें आहे त्याचें रक्षण तुमच्या हातून झालें पाहिजे. असा हूडपणा करून कसें चालेल ! कोणतीहि गोष्ट करणें झाली तरी मागचा पुढचा सारासार विचार करून काय करणें तें केलें पाहिजे. वडिलांस हरएक प्रकारची मदत करतां येण्यासारखें तुमचें वय झालें असून अंगीं कर्तबगारी नाहीं, असेंहि नाहीं. मग त्यांना वाईट वाटेल किंवा दौलतीस धक्का पोहोंचेल असें वर्तन तुह्मी करावें, हें ठीक नाहीं. कोणत्याहि प्रकारें आपला दुर्लौकिक करून घेऊं नका आपल्या कुलशीलाचा विचार करा. त्याला बट्टा लावूं देऊं नका, असें तुह्मांला माझें सांगणें आहे. ' हे मातेच्या मुखांतून ममतेनें निघालेले बोधपर शब्द ऐकून घेऊन शिवाजीनें उत्तर केलें कीं, ' आपलें सांगणें मला शिरसा वंद्य आहे. मी आपल्या बाहेर नाहीं. परंतु स्वधर्माची परधर्मीयांकडून होत असलेली विटंबना, गोमातांचे उघडपणें निर्दयतेनें होत असलेले वध वगैरे वगैरे ऱ्या हिंदूला अत्यंत चीड आणणाऱ्या गोष्टी पाहिल्या ह्मणजे माझें देहभान मी विसरून जातों. या करितां माझ्या हातून अविचाराचें कृत्य घडूं नये अशी जर आपली मनीषा असेल, तर मला येथ ठेवूं नका. मुसलमानी राज्याबाहेर कोठेंतरी दूर नेऊन ठेवा, अशी आपणास माझी हात जोडून प्रार्थना आहे.'

हें पुत्राचें ह्मणणें जिजायाईनें शहाजीराजे यांस कळवून अशी विनंति केली कीं, ' मुलगा चांगला बुद्धिमान् , होतकरू, शहाणा आणि मर्यादशील

असून असा हूडपणा करितो, याजबद्दल त्याच्यावर राग करून त्याला शिक्षा करणें योग्य होणार नाहीं. कारण, त्याचा आणि मुसलमानांचा जन्मांतरींचाच द्वेषभाव असावा असें दिसतें. असें नसतें तर, या अल्प वयांत तो अशा रीतीनें त्यांच्याशीं वागताना. आम्ही कितीही शिकविलें तरी त्याला यवनांची तावेदारी पत्करून रहाणें आवडणार नाहीं. त्याला जवळ ठेवून नसतें संकट ओढवून घेण्यापेक्षां त्याला आपल्यापासून चार पावलें दूर ठेवावें, हें मला बरें दिसतें. याउप्पर आपल्या मनास योग्य दिसेल त्याप्रमाणें करावें. मला जें वाटलें तें सुचविलें.' शहाजीस हा विचार पसंत पडून त्यांनें शिवाजीस दूर ठेविण्याचा संकल्प केला. याच सुमारास दादोजी कोंडदेव जहागिरीचा हिशोब देण्यासाठीं विजापुरीं आले होते, त्यांच्या बरोबर शहाजीनें स्वपुत्रास पुण्यास पाठवून दिलें.

विजापुरास शिवाजीला जिजाबाईसह आणण्यापूर्वीच इ० स० १६४० त शहाजी राजे यांच्या संमतीनें शिवाजीचा निंबाळकरांकडील कन्या सईबाई हिजशीं विवाह झाला होता, परंतु अदिलशहाचें अंतःकरणापासून शिवाजीवर प्रेम असल्यामुळें व त्याच्या अंगच्या गुणांचें त्याला कौतुक वाटत असल्यामुळें आपल्या डोळ्यादेखत त्याचा दुसरा विवाह व्हावा असा बादशहानें शहाजीराजे यांच्याशीं आग्रह धरिला. त्याप्रमाणें प्रसिद्ध शिर्केघराण्यांतील सोयराबाई नांवाची सुलक्षण वधू नेमस्त करून शहाजीराजे यांनीं विजापुरीं शिवाजीचा दुसरा विवाह मोठ्या थाटानें केला. दरबारचे सर्व अमीर उमराव व खुद्द बादशहाही या विवाहसमारंभास हजर होते.

## भाग ५ वा.

### बालवीर शिवाजी.

विजापुराहून शिवाजी परत पुण्यास आला त्या वेळीं त्याचें वय १५ वर्षांचें होतें. विजापुरीं पितृसमागमांत त्याचा काल सुमारें ३ वर्षें लोटला. या अवधींत त्याच्या अंगची जी तेजस्विता प्रकट झाली, जो करारीपणा दिसून आला, त्याचें वर्णन मागील भागांत आलेलेंच आहे. शिवाजीच्या अंगीं एक विलक्षण अशी शक्ति होती ती ही कीं, ज्याला ज्याला ह्मणून त्याचें दर्शन होई अथवा ज्याचा ज्याचा ह्मणून त्याच्याशीं संबंध येई, तो तो त्याच्या तेजानें दिपून जाई. कोणीही शिवाजीला भेटो, तो भेटल्याबरोबर त्याच्या मनांत शिवाजीविषयीं आदरबुद्धि व प्रेम उत्पन्न होऊन तो त्याचा अंकित झालाच ह्मणून समजावें. असें सामर्थ्य अंगीं असण्यास मनुष्यामध्यें तितका ईश्वरीअंश अधिक असावा लागतो; त्याप्रमाणें तो आपल्या चरित्रनायकामध्यें होता ह्मणूनच शिवाजी ह्मणजे एक अंशभूत ईश्वरी अवतार होऊन गेला, अशी समजूत सामान्य जनतेची होऊन गेलेली आहे. अशी गोष्ट नसती तर मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें विजापुरसारख्या वैभवसंपन्न मुसलमान बादशहाला शिवाजीचा एवढा मोह पडताना. शिवाजी ह्मणजे यःकश्चित् अल्पवयी असा एका मराठे सरदाराचा मुलगा, त्याच्या एकट्याच्या आग्रहास्तव सबंध मुसलमान प्रजेच्या विरुद्ध बादशहा वर्तन करितो हें कशाचें द्योतक आहे? याचा वाचकांनींच विचार करावा.

माता जिजाबाई आणि गुरुवर्य दादोजी कोंडदेव यांनीं शिवाजीला जें शिक्षण दिलें त्याचा उल्लेख मागें आलाच आहे. विजापुरास पितृसान्निध्यांत असतां त्याच्या शिक्षणांत आणखी भर कशी पडली हें आपण पाहिलें पाहिजे. शहाजीराजे यांचें राजदरबारांत मनस्वी वजन असल्यामुळें सर्व मराठे व मुसलमान सरदारांशीं त्यांचा नित्य संबंध येई. यामुळें दरबारी रीतिरिवाज, अमीर उमरावांच्या चालीरीति, राज्य शकट चालविण्याचे प्रकार, भिन्न भिन्न खात्यांची अंतर्बाह्य व्यवस्था वगैरे वगैरे गोष्टींचें निरीक्षण शिवरायाला करावयास उत्तम संधि मिळाली. वरील गोष्टीं संबंधीं तज्ज्ञ लोकांस वारंवार प्रश्न करून जेवढी माहिती मिळवितां आली तेवढी त्यानें मोठ्या कळकळीनें मिळविली. विजापुरांत असतां या बालवीरानें आपला एक क्षण देखील व्यर्थ घालविला नाहीं. चैनींत व ऐषआरामांत जसे साधारण सरदार-पुत्र आपलें जिणें व्यर्थ घालवितात, तसा प्रकार शिवाजीच्या हातून कधींहि घडला नाहीं. लष्कराची व्यवस्था, पागेकडील बंदोबस्त, दारुगोळा, तोफा, बंदुका वगैरेंचीं तजवीज कशी असते, इत्यादि गोष्टींनीं त्याचें लक्ष नेहमीं वेधून गेलेलें असे. आपल्या पुत्राच्या ठिकाणीं अशाप्रकारें चौकसबुद्धि व हुषारी वसत असलेली पाहून शहाजीराजे यांस फार समाधान वाटे. राजकारण विषयक कांहीं कोणाशीं मसलती चालल्या असतां ते मुलास मुद्दाम जवळ घेऊन बसत. राजकारणें त्याला समजावून सांगत. अशा रीतीनें पुष्कळ गोष्टी ऐकावयास व पहावयास मिळून, शिवाजी जात्याच तैल व तीव्र बुद्धीचा असल्याकारणानें, त्याला या अवधींत अत्यंत व्यावहारिक आणि उपयुक्त असें ज्ञान प्राप्त झालें.

विजापुराहून परत आल्यानंतर सुमारें चार वर्षांनीं, वयाच्या १९ व्या वर्षी तोरणा किल्ला हस्तगतकरून स्वराज्यस्थापनारूपी टोलेजंग इमारतीच्या पायाचा जो दगड बसविला गेला, त्याला लागणारी साधनसामुग्री गोळा करण्याचा उपक्रम शिवाजीनें आल्याबरोबर सुरू केला. जहागिरीच्या ठिकाणीं आल्यावर पहिला विचार त्याच्या मनांत स्फुरूं लागला तो असा

कीं, ' जें वाडवडिलांनीं मिळविलें तें स्वस्थ खात बसणें योग्य नाहीं. आपण हिंदु, सर्व दक्षिण देश यवनांनीं ग्रासून टाकिला. देव, गोब्राह्मण व क्षेत्रें यांना पीडा केली. धर्म बुडविला. तेव्हां प्राणहि वेंचून धर्मरक्षूं व पराक्रमें नवीन दौलत संपादूं. तें अन्न भक्षूं. नवें साधूं तरच या कुलांत जन्मल्याचें सार्थक. दैवावर भार घालून पुरुषयत्न बलवत्तर होय. दैव पंगू आहे, वास्तव प्रयत्नें सबळ करावें. तरी दैव जसें अधिक साह्य होईल तसतसें अधिक करीत जावें दैव परिणामास नेणार समर्थ आहे. ' हे विचार गुरुवर्य दादोजीस कळवून त्यानें त्यांचा सल्ला विचारिला तेव्हां त्यांनीं सांगितलें ' वडिलीं दौलत संपादिली, ती गमावली हें तुमच्या वांट्यास येऊं नये. '

वरील दादोजींच्या उद्गारांवरून शिवाजी यासमयीं ज्या खटपटींत होता तिला प्रोत्साहन प्रत्यक्षपणें दादोजींच्याकडून मिळालेलें दिसत नाहीं. कारण उघडच आहे कीं, दादोजींच्या वृद्ध दृष्टीला शिवरायाच्या मनांत घोळत असलेले नवीन स्वतंत्र विचार व तदनुसार त्याच्याकडून घडत असलेली कृति, हीं कशींशींच दिसत होतीं. सामान्यतः वृद्ध पिढी आणि ताज्या दमाची होतकरू नूतन पिढी यांच्या आचार विचारांत जितकें अंतर असावयाचें तितकें तें या कालींहि प्रत्ययास आलें. तरी शिवरायानें आपल्या वृद्ध गुरूंच्या उपदेशाचा धिक्कार करून त्यांचा अपमान केला, असा प्रकार कधींहि घडला नाहीं. परंतु त्यांचा योग्य तो चोज राखून हृदयांत बाणलेलें इष्ट [illegible] शकार्य घडवून आणण्याचा सुरू केलेला उपक्रमही त्यानें सोडिला नाहीं. केव्हांहि नवीन विचार, कृतींत उतरवून कांहि घडवून आणण्याचा प्रयत्न सुरू झाला म्हणजे त्यांत अडथळे हे यावयाचे [illegible] हा जो सामान्य अनुभव तो आपल्या चरित्र नायकासहि आला हें त्याच्या पुढील चरित्र कथनामध्यें वेळोवेळीं दिसून येईलच.

[illegible] पहिलें काम शिवाजीनें [illegible] घेतलें [illegible] हें कीं, आप[illegible] हांग-[illegible] [illegible] च त्यानें प्रथम [illegible] सुरू केली. [illegible] जोण लोक राहतात, [illegible] ची चालचलणूक कशी आहे, त्यांची सांपत्तिक स्थिति कशी

प्रकारची आहे, ते आपल्या विचारांना कितपत अनुकूल होतील या गोष्टींचें सूक्ष्म निरीक्षण त्यानें केलें. त्या भागांत मावळे लोकांचा भरणा असल्याचें त्याच्या निदर्शनास आलें. ते दिसण्यांत आडमुठे व बावळट होते. तरी ते अत्यंत प्रामाणिक, जात्या शूर, अतिशय कंटक व अगदीं साधेभोळे होते व त्यांच्या अंगचे अमूल्य गुण त्याच्या मार्मिक बुद्धीला तेव्हांच कळून चुकले. मनुष्याची पारख करण्यांत त्याचा मोठा हातखंडा असे. त्यांची योग्य पारख झाल्याबरोबर शिवाजी त्यांचा स्नेह संपादूं लागला. तो स्वतः त्यांच्या घरीं जाऊं येऊं लागला, तेव्हां ते फार दरिद्री असून हालअपेष्टांत आपले दिवस कंठीत आहेत असें त्याला आढळून आलें. यास्तव त्यांच्या अड-चणीच्या प्रसंगीं त्यांना तो पैशांची मदत करूं लागला. आपण उच्च व हे नीच असें न मानतां त्यांच्याशीं मिळून मिसळून शिवाजी वागूं लागला. त्यामुळें त्यांचेंही प्रेम त्याच्या ठिकाणीं उत्तरोत्तर अधिकाधिक जडत गेलें व तोहि त्यांच्याशीं अधिकाधिक प्रेमानें वागूं लागला. ते शिवाजीचे एकनिष्ठ भक्त बनले व तत्कार्यांस प्राणही खर्ची घालण्यास तत्पर झाले.

या मावळ्यांमध्यें कांहीं वरिष्ठ दर्जाचे असत व त्यांना देशमुख म्हणत. हे देशमुख त्यांचे पुढारी होते. यांच्यापैकीं येसाजी कंक, तानाजी मालुसरे व बाजी फसलकर हे तीन मुख्य होते व ते शिवाजीचे जिवश्चकंठश्च स्नेही झाले. तो त्यांचा स्नेह पुढें आमरणांत ढळला नाहीं. यांचा उपयोग शिवाजीला के-वढा झाला हें पुढें यथावकाश व्यक्त होईलच. यांच्या साह्यानें सह्याद्री पर्वतां-तील दरीखोरीं वगैरे बिकट जागांची त्यानें माहिती करून घेतली. त्यांनीं त्याला त्या पहाडी व डोंगराळ भागांतील सर्व रस्ते, पाऊलवाटा, चोरवाटा, लपून बसण्याच्या आणि माऱ्याच्या जागा दाखवून दिल्या. याप्रमाणें शिवाजीनें त्याभागाची उत्तमप्रकारें सर्व माहिती व त्या भागांतील संपूर्ण प्रजेची उत्तम अनुकूलता प्राप्त करून घेतली.

शिवाजीच्या या औदार्यामुळें पैशाचा फार खर्च होऊं लागला. त्या योगें दादोजींच्या काटकसरीची संवय झालेल्या वृद्ध मनास कसेंसेंच वाटूं लागून त्यांनीं शिवाजीपाशीं एके दिवशीं पुढील उद्गार काढिले. 'आपण मालकच आहां. आपण कोणासही कांहीं द्यावयाचें म्हटलें तर आम्हांस तें देणें भागच आहे. परंतु आपणास जी नेमणूक आहे तिच्या बाहेर खर्च होऊन आपल्या वडिलांकडे जाणारी रक्कम कमी झाली तर तिकडून आम्हांस नाहक ठपका येईल, करितां आपणास जास्त खर्च करण्याची परवानगी आणून द्यावी, म्हणजे आमचें कांहीं बोलणें नाहीं.' यावर शिवाजीनें उत्तर दिलें. 'तुम्हांला त्याची काळजी कशाला? जो अधिक खर्च येईल त्याची मंजुरी आम्ही वडिलांकडून आणवूं.' बिचाऱ्या दादोजींना शिवरायाचें पुढील धोरण काय माहीत? जहागिरींतील चराचरवत् प्रजेचें निःसीम प्रेम संपादन करून त्यांच्या मदतीनें जें महदुद्देशकार्य साधावयाचें होतें त्याची त्यांना काय कल्पना? जहागिरीच्या उत्पन्नाची कसोशीनें योग्य ती वृद्धि करून खर्चवेंच जाऊन प्रामाणिकपणें जितकी अधिक रक्कम आपल्या धन्याकडे पाठवितां येईल तेवढी पाठवावयाची येवढीच आपली कामगिरी, असें त्यांस वाटणें साहजिक होतें व त्यांच्या दृष्टीनें तें योग्यच होतें.

शिवाजीचें एकंदर धोरण या वेळीं कशा प्रकारचें होतें तें पुढील उताऱ्यावरून स्पष्ट होतें. 'कारकून सरदार वगैरे ममतेंत मसलतींत येतील त्याप्रमाणें घेऊन, आणखी चांगले मर्द शिपाई पाहून त्यांस जवळ ठेवावें. कारकून चांगला कर्ता लिहिणार पाहून त्यास ठेवावा. तसेंच राजकारणें करावीं. मातबर चहूं जागचे मराठे यांसी आप्तपणा करावा; पत्रें लिहावीं; त्यांस आणून भेट घ्यावी. आपण त्यांजकडे जाऊन आम्हांस अनुकूळ असावें असें बोलावें. असें करण्यातें ज्यांनीं महाराजांचें बोलणें परम आदराचें व पराक्रमाचें ऐकावें त्यांस वेध लागून वाटावें कीं, हे परम थोर आहेत. यांचेच संमतें चालावें, हे सांगतील तसें चालावें. प्राणहि गेले तरी

जावोत. परंतु सेवा करून यांचे आज्ञेत चालावें. अशी सर्वांचीं चित्तें वेधून टाकिलीं.' हा उतारा एका जुन्या बखरींतील आहे. याधरून पुढें जें कार्य शिवाजीनें उपक्रमास आणिलें त्याची सिद्धता कशाप्रकारें चालविली होती हें चांगल व्यक्त होतें.

या कालीं ह्मणजे शिवाजीच्या ऐन तारुण्याला कोठें आरंभ होतो आहे न होतो आहे तोंच, त्यानें ज्या कित्येक मसलती व कारस्थानें यांना सुरवात केली, त्यांत त्याला कोण कोण पूर्ण अनुकूल होते याचा उल्लेख करण्याचें हेंच स्थल होय. या कामीं गुरु दादोजी कोंडदेव त्याला जसे उघडउघड अनुकूल असावे तसे ते नव्हते. हें वाचकांचे लक्षांत आलेंच असेल. तरी माता जिजाबाईचें त्याला पूर्ण साहाय्य होतें. मावळे लोकांच्या तीन मुख्य पुढाऱ्यांचीं नांवें वर आलींच आहेत; शिवाय दादोजीच्या हाताखालीं आबाजी सोनदेव, रघुनाथ बल्लाळ आणि बाळकृष्णपंत मुजुमदार या नांवाचे तीन तरुण कारकून काम करीत असत त्यांचें आंतून गुप्तपणें शिवाजीला पूर्ण पाठबळ असे. तसेंच गोमाजी नाईक पानसंबळ वगैरे आणखीहि दुसरी मंडळी त्याला साहाय्य करीत असे. ही मंडळी पुढें प्रसिद्धीस येऊन तिनें शिवरायानें आरंभिलेल्या स्वराज्यस्थापनेच्या कार्यांत कसा हात भार लावला हें ओघाओघानें पुढें व्यक्त होणारच आहे.

अशा प्रकारच्या खटपटी, मसलती व कारस्थानें करण्यास आजूबाजूची तत्कालीन परिस्थिति कशी होती याचे अल्पशं विवेचन करून हें प्रकरण आटोपतें घेऊं.

शिवाजीच्या उद्देशास पहिली अत्यंत उत्तेजक अशी गोष्ट [illegible] ... [illegible] चरित्रक्रम होतोय [illegible] त्यांनीं जो पराक्रम केला तो वाचविण्यासाठीं त्यांनीं [illegible] बलाढ्य शत्रूंशीं [illegible] एकदां [illegible] प्रचंड [illegible] किंवा शिवाजी पुढें [illegible] मांडिलेला [illegible] आदिलशाहींत [illegible] नोकरी

पतकरून वडिलांनीं कर्नाटकची मोहीम कशी यशस्वी केली व तेथें विजापूरक-रांची दृढसत्ता कशी स्थापित झाली या गोष्टी त्याला विदित होत्या. यावरून शिव-रायाचा असा दृढ ग्रह झाला कीं, आपण आपल्या लोकांची जूट करून त्यांना योग्यप्रकारें तयार केलें तर आपल्याला महाराष्ट्रांतील यवनांच्या सत्तेचें क्रमा-क्रमानें निर्मूलन करतां येईल. आणखी असें कीं, पुणें, सुपें, मावळ वगैरे भागां-तील कांहीं देशमुख या समयीं मुसलमानी जुलमी सत्तेस त्रासून बंडावे करूं लागले होते, व ते आपआपसांतहि, कलह करीत असत. या असंतुष्ट लोकांस एकीचें महत्व किती आहे हें समजावून दिलें असतां त्यांचे अंतःकलह मिटले जाऊन व स्वातंत्र्याची योग्य कल्पना त्यांच्या मनांत रुजली जाऊन त्यांचाहि इष्ट कार्यसिद्धीकडे उपयोग करून घेतां येईल, अशी त्याच्या मनाची खात्री झाली. शिवाय पुणें, सुपें मावळ वगैरे निजामशाही प्रांत विजापूर सरकारच्या ताब्यांत नुकतेच आलेले असल्यामुळें त्यांचा त्या सरकाराकडून उत्तम प्रकारें बंदोबस्त झालेला नव्हता. दादोजी कोंडदेवासारख्या व्यवहारदक्ष व कृपाळू पुरुषाच्या तेथील उत्तम व्यवस्थेमुळें प्रजा आबाद होऊन हिंदूचें राज्य झालें असतां आपण सुखी होऊन आपली भरभराट होईल असें तिला वाटूं लागलें होतें. त्यामुळें तेथील सर्व प्रजाजन तनुमनधनेंकरून शिवाजीसारख्या तेजस्वी, उदार व परम कुशल सरदारपुत्रास पूर्ण साहाय्य करण्यास उद्युक्त झाले व त्या अनुकूलतेनें त्याचा हुरूप दृढतर झाला. राजकीय शिक्षण शिवाजीला घरचेंच होतें. नेहमीं घरांत माता जिजाबाई, गुरु दादोजी कोंडदेव व इतर कारभारी मंडळी त्याच गोष्टी बोलत. त्यांत विजापूर दरबारीं प्राप्त झालेल्या अनुभवाची आणखी भर पडली होती. त्याप्रमाणेंच विजापूर सरकार त्यासमयीं पूर्ण भरभरा-टींत असून तेथें ज्या ज्या म्हणून राजकीय घडामोडी होत व उलाढाल्या चालत त्यांचें ज्ञान शिवाजीस तेथें त्याचे वडील असल्यामुळें साहजिकच होत असे.

याप्रमाणें माता जिजाबाईनीं शिवरायाच्या सुपीक मनोभूमींत पेरिलेलें स्वराज्यप्रीतीचें जोमदार बीज उत्तम प्रकारें अंकुरित होऊन मातेच्या हातून त्याचें योग्य प्रकारें सिंचन झालें व त्या आल्यांत अनुकूल देशकाल परिस्थिति,

उत्साह, आवेश, स्वत्वरक्षणाची ओळख, स्वोत्कर्षप्रीति, परक्या जुलमी सत्तेविषयीं उत्पन्न झालेला तिटकारा, प्रोत्साहक असें पितृचरित्र वगैरे वगैरे गोष्टींचें योग्य खत पडून त्या अंकुराचा पुढें सुंदर वृक्ष कसा बनला व त्याच्या शाखा-विस्तारानें अखिल जगास कसें चकित करून सोडलें याचें वर्णन पुढील भागांत करूं.



५१ 503

# भाग ६ वा.

## जवानमर्द शूर शिवाजी.

स्वराज्यस्थापनेच्या प्रचंड उद्योगाचा आरंभ कसा कसा करावा याविषयीं शिवाजीच्या मनांत उद्भवलेलें विचार — काहूर व त्या विचारांचा मावळे वगैरे लोकांत त्यानें केलेला प्रसार आणि इष्टकार्यसिद्धयर्थ लोक वश करण्यांत त्यानें केलेली खटपट वगैरे गोष्टींचें अल्पसें विवेचन मागचे भागांत आलेंच आहे. आरंभ करण्यापुरती अवश्य ती तयारी झाली असें वाटून शिवाजीनें ज्या कृत्यानें अंगीकृत कार्यास आरंभ केला, तें कृत्य ह्मणजे त्यानें इ० स० १६४६ या वर्षी प्रथम तोरणा नांवाचा किल्ला हस्तगत करून घेतला हें होय. हा किल्ला पुण्यापासून सुमारें १० कोसांवर आहे. तेथील किल्लेदाराकडे बोलणें लावण्याकरितां शिवाजीनें येसाजी कंक, तानाजी मालुसरे आणि बाजी फसलकर या तीन मावळे लोकांच्या मुख्य पुढाऱ्यांस पाठविलें. त्यांनीं किल्लेदारापाशीं सामोपचाराचें बोलणें करून त्याला वश केलें व किल्ला आपले स्वाधीन करून घेतला. पुढें शिवाजीनें या किल्ल्याची डागडुजी केली; तेव्हां त्याला तेथें पुष्कळ द्रव्य संचय सांपडला. हा शुभशकुन केवळ श्री कुलस्वामिनी भवानी देवीच्या प्रसादानेंच आपल्याला झाला असें शिवाजीला मनःपूर्वक वाटूं लागलें व ती त्याच्या मनाची झालेली भावना त्यानें आपल्या अनुयायांस विदित केली. यायोगें त्यांची त्याच्यावर अधिकच निष्ठा जडून ते त्यास विशेष उत्साहानें साह्य करूं लागले. शिवाजीनें या किल्ल्यावर दारुगोळा वगैरे युद्धोपयोगी सामान जमा करून तेथें संरक्षणार्थ मावळे लोक ठेविले. याप्रमाणें त्यानें या किल्ल्याचा कडेकोट बंदोबस्त केला. नावडतोब एक खलिता लिहून तो त्यानें विजापूर दरबारीं पाठविला.

त्यांत किल्ला घेण्याचें कारण असें दर्शविलें कीं, तोरणा प्रांताचा वसूल व्हावा तसा होत नाहीं व त्या मुळें पातशाही सरकाराचें नुकसान होतें. तें न व्हावें एतदर्थ हा किल्ला आम्हीं आमचे ताब्यांत घेतला असून या प्रांताचा वसूलही आम्ही सरकारांत अधिक पाठवूं. या खलित्याचें उत्तर विजापुराहून बरेच दिवस पर्यंत आलें नाहीं व तसें होणेंच शिवाजीस इष्ट होतें. या गोष्टीवरून बलिष्ट शत्रूशीं अंगांत पुरी धमक येईंपर्यंत उघडपणें वैर न मांडितां वेळ मारून नेण्याची हातोटी शिवाजीला किती उत्तम साधली होती हें व्यक्त होतें.

यानंतर लगेच शिवाजीनें तोरणा किल्ल्याचे शेजारींच सुमारें दीड कोसांवर राजगड नांवाचा एक अगदीं नवीनच किल्ला बांधण्याचें काम सुरू केलें. बांध-काम मोरोपंत पिंगळे यांच्या देखरेखी खालीं चाललें होतें. हा नवा किल्ला बांध-ल्याची खबर जेव्हां विजापुरीं कळली, तेव्हां बादशाहाला शिवाजीच्या हेतू विषयीं संशय आला व त्यानें शहाजीला मुलाच्या या कृत्यांविषयीं जाब विचारिला. शहाजीनें उत्तर दिलें कीं, 'या गोष्टी आपल्यास बिल-कुल माहित नसून माझी त्या कामीं संमति ही नव्हती. परंतु शिवाजीचा हीं कामें करण्यांत सरकार विरुद्ध कांहीं हेतु नसून तो तीं सरकारच्या फायद्याच्याच हेतूनें करीत असावा असें मला वाटतें.' असें जरी त्यानें दरबारास उत्तर दिलें तरी पुण्यास दादोजी कोंडदेव यांस पत्र लिहून शिवाजीचा बंदोबस्त कर-ण्यास त्यानें कळविलें. त्याप्रमाणें अशा गोष्टी सर्वांच्या नाशास कारण होतील असें दादाजीनें शिवरायास पुष्कळ प्रकारें समजावून सांगितलें. शिवाजीनें मुका-ट्यानें त्यांचा उपदेश ऐकून घेऊन व ठीक आहे ह्मणून वेळ मारून नेली. पुढें लवकरच दादोजी कोंडदेव मृत्यु पावले. आरंभीं जरी शिवाजीच्या दांडगाईच्या कृत्यांचा त्यांना राग येऊन त्यांचा परिणाम वाईट होईल असें वाटत होतें तरी अखेर मरणसमयीं त्यांनीं गोब्राह्मणप्रतिपाळ आणि स्वधर्म रक्षा हीं कामें अवश्य करा ह्मणून जो शिवाजीला उपदेश केला त्यावरून त्यानें आरंभिलेलें कार्य श्रेष्ठ असून त्यांत त्याचे हेतु मोठे उदात्त असेच आहेत अशी त्यांच्या मनाची खात्री झालेली होती असें दिसून येतें.

दादोजींच्या मृत्यूमुळें जहागिरीची संपूर्ण व्यवस्था स्वतंत्रपणें शिवाजीच्या हातीं आली. कांहीं दिवसांनीं मागील सालाची राहिलेली वसुलाची बाकी मागण्या करतां शहाजी राजे यांजकडून लोक आले त्यांना शिवरायानें ' इकडचा खर्च वाढल्यामुळें इकडील पैका आमचा आम्हांसच पुरत नाहीं, असें सांगून परत पाठविलें. याचा शहाजी राजे यांस बिलकूल राग न येतां ' सर्व आटोप पुत्रानें केला, अचाट कर्मे करूं लागले, द्रव्य व मुलुख त्यांचाच आहे, ' असा संतोष मानून आपणावर कांहीं आरोप येऊं नये अशा हेतूनें विजापुराहून तंजावर प्रांतीं ते चार पावलें दूर जाऊन राहिले. वरील उद्गारांवरून शहाजीराजे शिवाजीनें आरंभिलेल्या स्वतंत्र-स्वराज्य संस्थापनेच्या विरुद्ध नसून अंतर्यामीं ते अनुकूलच होते, असें म्हटलें पाहिजे. प्रसिद्धपण त्यांना आपल्या पुत्राला प्रत्यक्ष साहाय्य करतां येत नव्हतें ही गोष्ट निराळी.

शहाजीच्या जहागिरींत त्यांच्या तर्फेची दुसरी कांहीं मंडळी होती. त्यांच्यापैकीं कित्येकांना शिवरायानें चालविलेली चळवळ व धामधूम खपत नसे. त्यांचें असें मत होतें कीं, विजापूर सारख्या प्रबल यवन बादशाही बरोबर असें प्रतारणेचें व बेदिलीचें वर्तन करून शिवाजी आपला, आपल्या पित्याचा व आपल्या कुलाचा सर्वस्वीं नाश करून घेईल. त्या मंडळींत बाजीमोहिते म्हणून शिवाजीचा सावत्रमामा सुपें येथें प्रमुख होता. शहाजी राजे यांचा हुकूम झाल्या शिवाय त्या प्रांताचा वसूल तो शिवाजीस देईना इतकेंच नव्हे तर तो त्याच्या भेटीसही येईना या गोष्टीचा राग येऊन शिवाजीनें त्याचें पारिपत्य करण्याचें मनांत योजिलें. मोहित्या जवळ तीनशें स्वारांची पागा होती; सबब शिवाजीनें निवडक मावळे लोकांची एक टोळी तयार करून तिच्यासह एके दिवशीं मध्यरात्रीं अचानक त्यानें बाजीमोहिते याजवर छापा घालून त्याला व त्याचे पक्षाचे लोकांस कैद केलें. खजिना, मुलुख, पागा वगैरे आपल्या स्वाधीन करून घेतलीं व मोहित्यास पित्याकडे कर्नाटकांत पाठवून दिलें. सुपें शहाजीच्या जहागिरी खालीं मोडत असल्यामुळें वरील गोष्ट

शिवाजीच्या पूर्ण अधिकारांतला होता, त्यामुळें त्या गोष्टींचें विजापुरसरकारासही वाईट वाटण्याला कांहीं कारण नव्हतें. परंतु या कृत्याचा परिणाम पदरच्या सर्वमाणसांवर व इतर लोकांवर मोठा जरबेचा झाला. प्रत्यक्ष मामा खरा, तरी नाकापेक्षां मोती जड काय उपयोग? या न्यायानें त्याची ही भीड ज्यानें ठेविली नाहीं त्याच्याशीं फारच जपून वर्तन केलें पाहिजे; त्याच्या आज्ञेचा भंग केला अथवा त्याच्या विरुद्ध कांहीं खटपट केली तर वाटेल त्यास योग्य शासन करण्यास तो कदापि चुकणार नाहीं, अशी सर्वांची खात्री होऊन ते त्याला फार वचकून वागूं लागले.

याप्रमाणें शिवाजीचा जिकडे तिकडे वचक बसल्यानंतर त्यानें पुण्याचे पूर्व बाजूस सुमारें दहा कोसांवर चाकण नांवाचा किल्ला होता तो हस्तगत केला. हा किल्ला पुण्यास जाणेंयेण्याच्या रस्त्यावर असल्यामुळें त्याचा शिवाजीला फार उपयोग होता. हा किल्ला फिरंगोजी नरसाळा याचे ताब्यांत होता, त्याला वश करून शिवाजीनें तो काबीज केला व फिरंगोजीच्या अंगची खरी योग्यता पारखून त्यालाच त्यानें आपल्या तर्फेनें तेथील किल्लेदारी दिली. हा फिरंगोजी अत्यंत स्वामिनिष्ठ होता. याची स्वामिभक्ति पुढें याच किल्ल्यांत एका आणीबाणीच्या प्रसंगीं कसास लागली, तिचें वर्णन पुढें त्याप्रसंगीं देण्यांत येईल. यानंतर शिवाजीनें कोंडाणें नांवाचा मजबूत व अवघड किल्ला तेथील मुसलमान किल्लेदारास पैसे भरून आपणाकडे घेतला व त्याला सिंहगड असें नवें नांव दिलें.

वरील सर्व किल्ले शिवरायानें मोठ्या युक्तीनें व सलोख्यानें आपल्या ताब्यांत आणिले. होतां होईल तों प्राणहानि व रक्तपात होऊं न देतां साधेल तेवढें साधावयाचें असें त्याचें मूळपासून धोरण होतें. शिवाजीनें आमरणांत कष्टांत व साहसाचीं कृत्यें करण्यांत आपलें आयुष्य खर्च करून मोठा दिग्विजय संपादन केला तरी निष्कारण प्राणहानि किंवा रुधिरपात करण्याचें क्रूर पातक त्याच्या हातुन केव्हांहि घडलें नाहीं.

इ. स. १६४८ त शिवाजीनें पुरंधरचा किल्ला घेतला. हा किल्ला पुण्याहून बारामतीला जो रस्ता जातो त्या मार्गावर आहे. बारामती व इंदापुर हे प्रांत

त्याच्या जहागिरींत मोडत असल्या कारणानें हा मध्यें मार्गावर असलेला किल्ला आपल्या ताब्यांत असणें शिवाजीला अवश्यक वाटलें. हा किल्ला पूर्वी नीळकंठराव नाईक नांवाच्या एका ब्राह्मणाकडे असून तो गुरु दादोजींचा पूर्ण स्नेही होता. शिवाजीच्या घराण्याचाही पूर्वापार या नाईक घराण्याशीं चांगला घरोबा होता. परंतु याच सुमारास नीळकंठराव नाईक वारला व त्याच्या तिघां मुलांमध्यें किल्लेदारी संबंधीं आपसांत तंटा लागला. त्यांच्यापैकीं एका मुलानें शिवाजीस मध्यस्ती करून हा तंटा मिटविण्याविषयीं विनंति केली. त्याप्रमाणें शिवाजीनें त्या किल्ल्यावर जाऊन तंटा मिटविण्याचा प्रयत्न केला; परंतु तो निष्फळ होतो असें पाहून त्यानें तो किल्ला स्वतःच्या ताब्यांत घेतला. त्या भाईबंदीच्या तंट्यामुळें तेथील शिबंदीचे लोकांना फार त्रास भोगावा लागत असे ह्मणून तेहि शिवाजीला अनुकूल होते. या तिघां भावांना शिवरायांनें वतनें करून दिलीं, त्यांना आपल्या पदरीं नोकऱ्या दिल्या व पुढें त्यांच्या मगदुराप्रमाणें त्यांना त्यानें योग्यतेलाही चढविलें.

वरील प्रकरणांत शिवाजीनें तिघां भावांचा विश्वासघात करून स्वतःचा कावा साधला असा कांहीं ग्रंथकारांचा शिवाजीवर आक्षेप आहे, परंतु तो फोल आहे. कारण स्वतःच्या व्यक्तिविषयक उत्कर्षार्थ दुष्टबुद्धीनें जर त्यानें हें विश्वासघातांचें काम केलेलें असतें तर त्यानें त्या तिघां भावांस वतनें-नोकऱ्या वगैरे देऊन योग्यतेला चढविलें नसतें. आपापसांतील दुही वाढवावयाची नसून ती त्याला अजीबात नष्ट करावयाची होती. तसें होण्यास तंट्याचें मूळबीजच नष्ट करून अन्यत-हेनें त्यांचा उत्कर्ष होण्यांतच त्याचें सुखसमाधान राहील असेंच त्याला वाटलें. शिवाय स्वदेश बंधविमोचनासाठीं अविश्रांत सतत झगडण्याचें श्रेष्ठ देशकार्य शिरीं घेतलेलें असल्यामुळें त्याच्या हातून स्वतःच्या व्यक्तिविषयक उत्कर्षाच्या गर्ह्य हेतूनें विश्वासघात झाला असें म्हणणें म्हणजे शिवरायाच्या एकंदर उदात्त धोरणाचा जाणून बुजून विपर्यास करणें होय हेंही आपण लक्षांत धरलें पाहिजे.

याप्रमाणें अंगीकृत कार्यांत शिवाजीस एका मागून एक सिद्धि मिळत

चालली तसतशीं अधिकाधिक साहसाचीं कामें करण्यास त्यास उमेद येत चालली. निजामशाहीचा शेवट झाला तेव्हां कल्याण प्रांत विजापूरसरकारच्या ताब्यांत आला. या प्रांतावर त्या सरकारचा मुल्लाना अहंमद नामक सरदार नेमिलेला होता. याच्या ताब्यांत बरेच किल्ले असून त्यांच्यावर असावा तसा उत्तम बंदोबस्त नव्हता. शिवरायाचा मोर्चा आतां या मुल्लाना सुभेदाराकडे वळला. त्याच्याकडून कांहीं खजिना विजापुराकडे रवाना झाला होता त्याच्यावर शिवाजीनें अकस्मात् झडप घालून तो लुटला. नंतर बरोबर कांहीं शूर लढवय्ये मावळे लोक घेऊन त्यानें तिकोना, लोहगड वगैरे किल्ल्यावर जोराचे हल्ले करून ते हस्तगत केले.

इकडे शिवाजीनें आबाजी सोनदेव यास खुद्द मुल्लानाचा समाचार घेण्यास पाठविलें होतें. त्यानें त्याला पकडून कैद केलें व सर्व कल्याण प्रांत जिंकिला. शिवाजी लागलींच कल्याणास गेला व आबाजी सोनदेव याच्या अंगची विलक्षण कर्तृत्वशक्ति पाहून तो आश्चर्यचकित झाला व त्या साहसाच्या कामगिरीबद्दल त्यानें त्याला कल्याणचा सुभेदार केलें शिवरायाच्या साहाय्यकारी मंडळींत कोणाच्या हातून कांहीं विशिष्ट कामगिरी बजावली गेली व तिचें त्याच्याकडून कांहीं चीज झालें नाहीं असें केव्हांही होत नसे. यामुळें प्रत्येकजण हातावर शिर घेऊन त्याला मदत करण्यास सदैव तत्पर असे.

पुढें लवकरच शिवरायाची दृष्टी जंजिऱ्याच्या हबशांकडे वळली. यासमयीं जंजिऱ्यास फत्तेखान नांवाचा अंमलदार होता. याच्याविरुद्ध याच्या हाताखालचे कांहीं सरदार उठून त्यांनीं शिवाजास त्या प्रांतावर स्वारी करण्याविषयीं विनंति केली. त्याप्रमाणें तिकडे स्वतः त्यानें स्वारी करून हबशांचे तळें, घोसाळें व रायरी असे तीन किल्ले घेतले. तिकडे आपला ताबा बसवून चिरवाडीस एक नवा किल्ला बांधिला. नंतर हरिहरेश्वर नामक पुण्यक्षेत्रीं जाऊन व तेथें देवदर्शन घेऊन परत येत असतां गोवळकर सावंत येऊन भेटले. त्यांची योग्यता पाहून त्यांना पदरीं चाकरीस ठेविलें. या सावंतांजवळ एक मूल्यवान् तरवार होती ती तीनशें होन व शिवाय पोषाख देऊन शिवरायानें

त्याजपासून घेतली. ही मिळाल्यापासून शिवरायाला दिवसेंदिवस विलक्षण विजय प्राप्ति होत गेली, ह्मणून पुढें तिला श्री भवानी देवीचा प्रसाद समजून त्यानें भवानी तरवार असें नांव दिलें. शिवाजी भक्तिपुरःसर या तरवारीची नित्य नेमानें पूजा करीत असे. रायरीच्या डोंगरावर पूर्वीचा एक छोटेखानी किल्ला होता, तो पाडून शिवाजीनें तेथें लिंगाणा नांवाचा मजबूत नवा किल्ला बांधिला व यासच पुढें १६६२ या वर्षीं त्यानें रायगड असें नवें नांव दिलें. या स्वारींत शिवाजीला अलोट संपत्ति मिळून त्याचें सामर्थ्यही बरेंच वाढलें.

कुलस्वामिनी श्री भवानीची आपल्यावर पूर्ण कृपादृष्टि असून हातीं घेतलेल्या सत्कार्यांत दिवसेंदिवस ती आपल्याला अधिकाधिक यशस्वी करीत आहे, अशी खात्री पटल्यावर शिवाजीनें दुसर भराऱ्या मारण्याची तयारी केली. दक्षिण कोंकणप्रांतीं राजापूर नांवाचें एक व्यापारी श्रीमंत शहर त्या कालीं होतें व तें हबशाच्या ताब्यांत होतें. त्याच्या जुलमी अंमलानें तेथील सर्व प्रजाजन त्रस्त झाले असून ते त्यांतून मुक्त होण्यास उत्सुक आहेत असें शिवाजीच्या कानीं आलें. तेव्हां त्यानें राजापुरावर एकदम स्वारी करून तें घेतलें. नंतर आजुबाजूच्या प्रांतांत शिरून तेथेंही त्यानें आपला अंमल बसविला. या स्वारींत शिवरायाला एक नररत्न प्राप्त झालें त्याची हकीकत मोठी मनोरंजक आहे. ती अशी:—

आबाजी हरी चित्रे नांवाचा एक प्रभु गृहस्थ जंजिऱ्याचे हबशाचा मुख्य दिवाण होता. हबशी राजाची कांहीं कारणानें त्याजवर खप्पा मर्जी होऊन त्यानें त्याला त्याच्या भावासह ठार मारिलें व त्याच्या बायकामुलांस मस्कत येथें नेऊन गुलाम ह्मणून विकण्याचा एका सलाशाला हुकूम करून त्यांना त्याच्या स्वाधीन केलें. आबाजीची पत्नी गलबाई मोठी धूर्त बायको होती. तिनें अत्यंत काकुळती येऊन मोठ्या युक्तीनें त्या सलाशाचें मन वळविलें व त्याच्याकडून राजापूर येथें तिनें आपली व आपल्या मुलांची मुक्तता करून घेतली. तेथें तिचा भाऊ विसाजी शंकर ह्मणून एक मोठा व्यापारी होता.

त्यानें ती आपली बहीण आहे अशी कोणाला ओळख न देतां त्या खलाापासून तिला मुलांसह विकत घेतलें. गुलबाईला तीन मुलगे होते. वडील बाळाजी, मधला चिमणाजी व धाकटा श्यामजी तिच्या भावानें या तिघांचा उत्तम प्रकारें विद्याभ्यास करविला. बाळाजी मोठा झाला तरी हबशी सत्तेच्या भीतीस्तव आपल्या खऱ्या नांवानें लोकांत त्याला प्रकट होतां येईना. शिवाजी नांवाचा कोणी महा प्रतापी मराठा सरदार यवनांच्या सत्तेंतून हिंदूंची मुक्तता करून स्वातंत्र्य व स्वराज्य यांची प्राप्ति करून देण्यास अवतरला आहे असें बाळाजीस समजलें तेव्हां त्याला पराकाष्ठेचा आनंद झाला. त्या वेळीं तो राजापुरांत एका कसबेदाराच्या हाताखालीं कारकुनीचें काम करीत होता. संधि साधून आपल्या हीन स्थितीचें व मनांत घोळत असलेल्या उच्च विचारांचें त्यानें शिवरायास एक पत्र लिहिलें. शिवाजीनें राजापुरीं जे लोक पकडले होते त्यांत बाळाजी होता. त्याची चौकशी चालली असतां मातेनें धांवत येऊन शिवरायाचे पदकमलांवर लोटांगण घेतलें व आपलें सर्व वृत्त त्याला निवेदन केलें. तत्काल शिवाजीनें तें कुटुंब आपले पदरीं घेतलें व बाळाजीची हुशारी पाहून त्याला चिटणिशीचें काम दिलें. पुढें हरएक प्रकरणांत हा बाळाजी आवजी शिवाजीच्या अतिशय उपयोगीं पडून तो त्याच्या प्रमुख सल्लागारांपैकीं एक झाला.

अशा रीतीनें जवानमर्द शिवाजीनें स्वपराक्रमेंकरून कल्याणापासून थेट दक्षिणेंत राजापुरापर्यंत कोकणांतील मुख्य मुख्य स्थळें व घाटमाथ्यावरील मोठमोठे किल्ले यांच्यावर आपला अंमल बसविला; व त्याचें एक चिमुकलेंसें राज्य स्थापित झालें. राज्यांत व बाहेर त्याची जरब बसून सर्वांना त्याचा दरारा वाटूं लागला. धन संचय करून त्यानें आपला फौजफाटा वाढविला. त्याच्या उत्तम शिस्तीमुळें लोक राजी झाले. सह्याद्री ओळ ह्मणजे मोठा बिकट पहाडी प्रदेश असें समजून तेथील पूर्ण माहितगार, भरपावसांत डोंगर चढणें उतरणें, किर्र झाडींत शिरणें वगैरे कामांत मावळे व कोंकणे लोक मोठे पटाईत ह्मणून त्यांसच प्रथम त्यानें नोकरीस ठेविलें. नामांकित शिपाईबाण्याचा मनुष्य असेल त्याला आणावा, राजकारणें करून नवे नवे किल्ले काबीज करावे,

होतां होईल तों भेदांनीं व माहितगार मनुष्यांचे साह्यानेंच रक्तस्राव व प्राणहानि वगैरे न होतां जेवढा मुलूख स्वसत्तेखालीं आणितां येईल तेवढा आणावा, किल्ले, कोट वगैरे ताब्यांत येतील त्यांजवर अत्यंत विश्वासू व मर्द असे हवालदार, सरनोबत वगैरे रक्षणार्थ नेमून आपला अंमल चालू करावा, असा उपक्रम शिवरायानें चालू केला.

अशा प्रकारांनीं स्वराज्यस्थापनेच्या उपक्रमाचें निशाण फडकल्या बरोबर मोठमोठीं कर्तृत्ववान् माणसें शिवाजीजवळ गोळा झालीं. सर्व ठिकाणच्या राजकारस्थानांची गुप्तपणें चर्चा सुरू झाली. मनुष्यसंग्रह वाढला. कमाविलेल्या मुलखाचा उत्तम बंदोबस्त करण्यांत आला. शत्रूचा चंचुप्रवेशही होणार नाहीं, अशी कडेकोट जिकडे तिकडे व्यवस्था लागली. आज्ञेंत वागून इमानेंइतबारें चालतील त्यांची योग्यता वाढवून, उन्मादानें अवहेलना करितील त्यांचें योग्य पारिपत्य करण्यास शिवरायानें कसूर केली नाहीं. आपल्या सहकारी मंडळीस त्यानें मोठमोठीं जबाबदारीचीं कामें दिलीं; कारण अशीं कामें देण्याइतकी त्याची तयारी झाली होती. श्यामराजपंताला पूर्वींच पेशवाईचें काम देण्यांत आलें होतें. आबाजी सोनदेवांची कल्याणच्या सुभेदारीवर नेमणूक झाल्याविषयीं मागें आलेंच आहे. त्याचा बंधु निळो सोनदेव यास मुजुमदारी देण्यांत आली. अण्णाजी दत्तो सुरनीस झाला. गंगो मंगाजीस वाकनिशी मिळाली. नेताजी पालकर याजकडे सरनोबती येऊन फौज वाढविण्यांत आली. बाळाजी आवजी चिटनीस, चिमणाजी फडणीस आणि श्यामजी कारखानिस अशा तिघां बंधूंच्या नेमणुका झाल्या. राघो बल्लाळ अत्रे फौजेकडे सबनीस होतेच. येसाजी कंक पायदळावर सरनोबत झाला. याप्रमाणें शिवरायानें या समर्थ नेमणुका करून स्वराज्याची व्यवस्था केली.

येथपर्यंत शिवाजीनें आरंभिलेलें देशकार्य सुरळितपणें चाललें; त्यांत विशेष म्हणण्यासारखीं विघ्नें उपस्थित झालीं नाहींत. परंतु या पुढें शिवरायावरील संकटपरंपरेला सुरुवात झाली. संकटांशिवाय मनुष्याची खरी परीक्षा होत

नाहीं. खरें सोनें असलें ह्मणजे तें जितकें जितकें अधिक तापवावें तितकें तितकें तें अधिक कसोटीला उतरतें. या पुढील संकट-प्रसंगीं आपल्या चरित्रनायकानें जी चिकाटी दाखविली, जे अतुल पराक्रम केले, जो मुत्सद्दीपणा लढविला, जी बुद्धिमत्ता प्रकट केली, जीं साहसाचीं व मर्दुमकीचीं कार्यें तडीस नेलीं, ज्या हालअपेष्टा सोसल्या व जे आमरण सतत परिश्रम केले परंतु आपलें ब्रीद ह्मणून कांहीं केल्या सोडिलें नाहीं, त्यायोगें तें हिणकस सोनें नसून उत्तम बावन्नकशी सोनें होतें असें संपूर्ण जगाच्या स्पष्टपणें निदर्शनास आलें.

# भाग ७ वा.

## रणधीर शिवाजी योद्धा.

मागील भागांत म्हटल्याप्रमाणें शिवाजीवर पहिलें संकट प्राप्त झालें तें पितृ-बंधन हें होय. शिवरायानें तोरणा किल्ला घेऊन विजापूर सरकारची केलेली पहिली आगळीक शहाजी राजांच्या कानावर आलीच होती. परंतु तिचा निकाल लागण्यापूर्वींच ते कर्नाटकच्या स्वारीवर निघून गेले. नंतर खजिना लुटला, आणखी किल्ले घेतले. कल्याणच्या सुभेदारास जिंकून सर्व कल्याणप्रांत अंगाखालीं घातला, वगैरे वगैरे अनिष्ट बातम्या एकामागून एक धडकून विजापूर दरबारांत मोठी चळवळ उडून गेली. इतक्यांत, कैद केलेल्या मुल्लानाला शिवरायानें मुक्त केल्यामुळें त्यानें विजापुरीं जाऊन स्वमुखानें शिवाजीच्या बंडाळीची सर्व हकीकत अदिलशहाला निवेदन केली. ती ऐकून शहा गोंधळून गेला. त्याला वाटलें कीं, शहाजीची आंतून या कामीं पुत्राला फूस असली पाहिजे. एरवीं त्याच्याकडून अशीं कृत्यें करण्याचें साहस होणें शक्य नाहीं. तेव्हां याबद्दल प्रथम शहाजीला जबाबदार धरून त्याला शासन केलें पाहिजे; म्हणजे आपोआप शिवाजीचा बंदोबस्त होईल. विजापूर बादशाहीचें सामर्थ्य मोठें, अशी बादशहाला घमेंड असल्यामुळें शिवाजी हा यःकश्चित् एक सरदाराचा मुलगा तो काय आणि तो करणार तरी काय ? अशा समजुतीनें निराळें सैन्य पाठवून त्याचें पारिपत्य करण्याचें त्याच्या मनांत आलें नाहीं. त्यानें शहाजीस पकडून हुजूर आणण्याविषयीं कर्नाटकांत बाजी घोरपडे यास गुप्त हुकूम पाठविला. त्याप्रमाणें त्यानें शहाजीस भोजनाचे मिषानें घरीं आणून दगलबाजीनें कैद केलें. नंतर त्याला समागमें घेऊन तो विजापुरीं आला.

शहानें शहाजीला आपले समोर आणून सांगितलें कीं, 'मुलानें दंगा केला त्यांत तुमचें अंग आहे. तर त्याचा बंदोबस्त तुम्ही एकदम करावा.' शहाजींनें उत्तर केलें कीं, 'मुलगा आपल्या कह्यांत नाहीं. तो सरकारचा गुन्हेगार आहे. त्याचा सरकारांनीं वाटेल तसा बंदोबस्त करावा. माझी त्यागोष्टीला हरकत नाहीं.' परंतु या उत्तरानें बादशहाचें समाधान झालें नाहीं. त्यानें शहाजीस अशी जबर धमकी दिली कीं, 'अमुक मुदतींत शिवाजीचा बंदोबस्त न झाल्यास तुह्मांस भिंतींत जिवंत चिणून प्राण घेऊं.' ही समग्र हकीकत शहाजीनें शिवरायास लिहून कळविली.

या पित्याच्या जिवावरच्या संकटानें शिवाजी जरी मोठा निधड्या छातीचा पुरुष होता तरी त्याचें धाबें दणाणून गेलें. त्याला कांहीं सुचेनासें झालें. तो मोठ्या पेचांत पडला. बादशहाला शरण जाऊन पित्याची सुटका करावी तर इतक्या उंचीपर्यंत चढविलेली स्वराज्याची इमारत ढांसळून पडणार. तसें न करावें तर, परम पूज्य व प्रिय पित्याचा खास बळी पडणार. तो निस्सीम पितृभक्त व सत्पुत्र असल्यामुळें कांहीं होवो, हरतऱ्हेनें पितृसंकट निवारण झालेंच पाहिजे, असा त्याच्या मनाचा दृढ निश्चय ठरला व त्या प्रमाणें तो पितृबंधमोचनाचा विचार करूं लागला. त्यानें मातुश्रीचा व इतर मंडळींचा सल्ला विचारिला तेव्हां त्यांचेंहि मत त्यानें विजापुरीं जाऊं नये असें पडलें. त्याची पत्नी सईबाई हिनेंहि विजापुरीं जाणें धोक्याचें आहे असेंच सुचविलें.

अशा रीतीनें थोडे दिवस विचार करण्यांत गेल्यावर शिवरायाला एक युक्ति सुचली. पितृसंकट निवारण्याची त्यानें जी ही बिनतोड युक्ति योजिली ती पाहून त्याच्या बुद्धिसामर्थ्याची जेवढी तारीफ करावी तेवढी थोडीच होणार आहे. त्याच्या सुपीक मेंदूंत एकदम असा विचार आला कीं, या वेळीं पितृमुक्तता होण्याला विजापूरच्या बादशहाला दुसरीकडून शह दिला पाहिजे; एरवीं आपली इष्ट गोष्ट साध्य होणें नाहीं. आपण स्वसामर्थ्यानें स्वतः शह द्यावा तर विजापूर सारख्या प्रबळ रिपुबरोबर उघड उघड दोन हात करण्याची

आजच आपली ताकद नाहीं व तशी तयारी इतक्यांत होणें शक्य नाहीं. अशा परिस्थितीचा विचार मनांत आणून त्यानें दिल्लीच्या शहाजहान बादशहाची या कामीं मदत घेतली, दिल्लीहून मदत मिळण्याला अडचण पडणार नाहीं, अशी शिवाजीला खात्री होती. कारण त्यानें त्या बादशहाला कोणत्याहि कृत्यानें दुखविलेलें नव्हतें. शिवाय त्याचा दक्षिणेंतील राज्यें बुडविण्याचा पूर्वीं पासूनचाच कृतसंकल्प असल्या कारणानें त्या कामीं शिवाजीनें चालविलेल्या बंडाळीनें त्याचा फायदाच होईल असेंहि मोंगल सरकारास वाटत होतें. शिवरायानें दिल्लीस आपला वकील पाठवून बोलणें चालविलें व शहाजहान बादशहाच्या पदरीं नोकरी करण्याची आपली फार इच्छा आहे असें वकिलाबरोबर सांगून पाठविलें. एकंदर मराठे सरदारांची व त्यांतुन विशेषतः शहाजीची शक्ति किती मोठी आहे याचा प्रत्यक्ष अनुभव पूर्वी आलेलाच होता. शिवाजीची कीर्तीहि त्या बादशहाच्या कानावर गेलेली होती. ही मराठे मंडळी अनुकूल झाल्यास विजापूरचें राज्य नामशेष करून टाकण्यास आपल्यास बिलकूल कालावधि लागणार नाहीं असें मनांत आणून त्यानें शिवरायाचें ह्मणणें एकदम मान्य केलें. शहाजीचीं पूर्व कृत्यें जरी बादशहाच्या स्मरणपटलावरून दूर झालेलीं नव्हतीं, तरी या वेळीं तिकडे कानाडोळा करून शहाजीराजे आपल्याकडे आल्यास त्यांना आपल्या पदरीं नोकरींत ठेवून, शिवरायाला पांचहजारांची मनसब करून देण्याचें बादशहानें वचन दिलें.

इकडे मागें लिहिल्या प्रमाणें जरी विजापूरच्या सुलतानानें शहाजीराजे यांस धमकी दिली होती तरी तसें करण्याची त्याची छाती नव्हती. कारण त्याचें व त्याच्या मुलाचें कर्तृत्व तो पूर्ण ओळखून होता. इतक्यांत, शहाजीची मुक्तता करण्याविषयीं शहाजहानानें सुलतानास पत्र लिहिलें. तेव्हां अशा क्षुल्लक गोष्टीवरून शहाजानासारख्या बलाढ्य बादशहा बरोबर वैर करण्यासहि तो तयार नव्हता; ह्मणून त्यानें शहाजीची सक्त कैद कमी करून जामिनावर त्याला मोकळें केलें व विजापुरांतच फक्त नजरेखालीं राहण्याची

त्याला परवानगी दिली. त्याप्रमाणें पुढें सुमारें चार वर्षे तो विजापुरांत होता. सन १६५३ त त्याला परत कर्नाटकीं जाण्याचा हुकूम मिळाला. या मुदतींत शिवरायानें विजापूर सरकारची नवीन आगळीक केली नाहीं व त्या सरकारानेंही अन्य तऱ्हेनें त्याचें पारिपत्य करण्याचें मनांत आणिलें नाहीं. अशा रीतीनें एकदम आलेलें संकट टळलें व शिवरायालाहि पुढील घटना करण्यास अवकाश मिळाला.

या मिळालेल्या फुरसुतींत शिवरायानें जरी विजापूरसरकारची कांहीं कुरापत काढिली नाहीं तरी तो केवळ स्वस्थ बसून राहिलेला नव्हता. कारण तसें राहणें शिवाजीसारख्या अविश्रांत उद्योग करण्याची संवय असलेल्या थोर पुरुषास आवडणें अगदीं अशक्य होतें. तो त्या काळीं संपादित सत्तेचें सामर्थ्य वाढविण्यांत मग्न असून स्वशत्रूशीं उघडपणें रणांगणावर झुंजण्यास सिद्ध झाला. यापुढें शिवाजीचें व विजापूर सरकाराचें उघड युद्ध सुरू झालें. अशा रीतीनें बलाढ्य शत्रूबरोबर समोरासमोर युद्धाला उभें राहण्याला ज्या गोष्टींनीं त्याला प्रोत्साहित केलें त्यांचें सामान्य विवेचन प्रथम करून नंतर युद्धाच्या कथानकाकडे वळूं.

यवनद्वेष व यवनी धर्माचा तिटकारा या गोष्टी तर जन्मतःच शिवरायाच्या हृदयांत खिळलेल्या होत्या व तसें असण्याचीं कारणें हीं प्रसंगोपात मागें सांगण्यांत आलींच आहेत. परंतु आणखीही पुष्कळ गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत. त्या अशा—महाराष्ट्रांत (आपल्याच देशांत) आपलेंच ह्मणजे स्वराज्य असावें असें त्याला व त्याच्या उपदेशकांना मनापासून वाटत होतें. पुणें प्रांत व सुपें परगणा नवीनच निजामशाहीकडून विजापूरच्या ताब्यांत गेलेले असल्यामुळें त्यांवर नव्या सरकारचा जितका दृढ अंमल बसावयास पाहिजे तितका तो दृढपणें बसलेला नव्हता. पुण्याजवळच्या अशा मावळप्रांताची सुधारणा शहाजीच्या तर्फेनें दादोजी कोंडदेवासारख्या थोर व व्यवहारदक्ष अशा पुरुषाच्या देखरेखी खालीं झाली असल्यामुळें तेथें साक्षात् यवनी सत्ता

दृग्गोचर होत नव्हती. होनाप्पा देशपांडे, मोरो तानदेव व श्रीनिवासराव वगैरे पुंड लोकांनीं बंडाळी सुरू केली होती. देशमुख व देशपांडे हे परस्परांच्या कुरापती काढून आपसांत नेहमीं झुंजत व त्या योगें पश्चिम महाराष्ट्रांत गोंधळ माजून राहिला होता. विजापुरीं मुत्सद्दी व सरदार यांच्यांत बखेडा उत्पन्न झाला होता. दिल्लीच्या मोंगलांनीं विजापूरच्या राज्यांत बंड-फितुऱ्या उपस्थित करण्याचे प्रयत्न चालविले होते. दादोजी कोंडदेव, शहाजीराजे व इतर तरुण कारकूनमंडळी विजापूरच्या सत्तेचे मोठेसे भक्त नव्हते. संतमंडळाचाही यवनी जुलमीसत्तेवर फार कटाक्ष होता. विजापूरचे बादशहाही नरम झालेले असून त्यांच्यांतील कडवें यवनत्व व क्रौर्य नष्ट झालेलें होतें. राम व रहीम एकच अशी पुष्कळ विचारी यवनांची खात्री झालेली होती. निंबाळकर, शिरके वगैरे ससैन्य सरदारांना आपसांतील वैरें साधून घेण्याला शिवाजीची मदत घेणेंच आवश्यक वाटूं लागलें होतें. शहाजीच्या पदरीं सजीव असें जय्यत सैन्य तयार होतें. या सर्व प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शक्तींचा एकजीव करून त्याच्या जोरावर विस्तृत व प्रबल सत्तेशीं टक्कर देण्यास शिवाजी कसा प्रवृत्त झाला त्याचा यापुढें विचार करूं.

विजापुराहून बाजी शामराज नांवाचा सरदार प्रथम शिवाजीवर आला. त्याचा उद्देश शिवाजीचा पराभव करून त्याला जिवंत पकडण्याचा होता. या समयीं शिवाजी महाडास होता. जावळीचे चंद्रराव मोरे बलाढ्य असून त्यांचें या कामीं बाजी शामराज यांस साहाय्य होतें. त्यांच्या आश्रयानें पारघाटाचे पायथ्याशीं बाजी शामराज शिवरायावर अचानक छापा घालण्याचे हेतूनें दबा धरून बसला. ही बातमी शिवाजीच्या हेरांकडून त्याला पूर्वीच कळली होती. त्यानें आपल्या साथीदारांची एक निवडक टोळी बरोबर घेऊन अकस्मात एक दिवस त्याच्यावर हल्ला केला व त्याला पळावयास लाविलें. नंतर तो मोऱ्यांचा समाचार घेण्यास उद्युक्त झाला. हा शेजारींच असलेला मार्गावरचा कांटा काढून टाकल्याशिवाय शिवरायाला गत्यंतर नव्हतें. हा प्रबळ

मराठा सरदार आपल्यास अनुकूल होईल तर त्याचा उद्दिष्ट कार्याला मोठा उपयोग होईल असें जाणून त्याला सामोपचारानें आपल्या बाजूकडे वळविण्याचा शिवरायानें प्रथम प्रयत्न केला; परंतु तो सिद्ध होणार नाहीं असें दिसलें, तेव्हां अन्यमार्गानें त्याचें पारिपत्य करण्याचें त्यानें मनांत आणिलें. मोऱ्यांचा आणि शिवाजीचा पूर्वीं घरोबा होता. एकमेकांकडे एकमेकांचे कारकून वगैरे कामाकाजा निमित्त जात येत असत. एकदां शिवाजीनें राघो बल्लाळ व संभाजी कावजी या दोन पदरच्या सरदारांस कांहीं मिष करून जावळीस पाठविलें. जावळीच्या राज्यांतील अंतस्थ माहिती काढून आणण्याचा त्यांचा हेतु होता. तेथें गेल्यावर मोरे यांस ठार मारण्याचा त्यांनीं घेत केला व त्या प्रमाणें तो तडीस नेऊन ते पळून गेले. वेळ प्रसंग पडल्यास आसपास फौज तयार ठेवावी असा त्यांच्या कडून शिवरायास पूर्वींच निरोप पोंचलेला होता. त्याप्रमाणें त्यानें फौजेची तयारी ठेविली होती. जावळीच्या फौजेनें त्यांचा पाठलाग केला तेव्हां शिवरायानें सैन्यानिशीं चारी बाजूंनीं एकदम जावळीवर चाल केली. चंद्ररावाचे पुत्र व दिवाण हणमंतराव यांनीं लढण्याची शिकस्त केली. परंतु हणमंतराव मारला जाऊन मोऱ्यांचा पूर्ण मोड झाला. चंद्ररावाचें कुटुंब व राज्य शिवरायाच्या हस्तगत झालें. त्यांचा जामिन वगैरे घेऊन त्यांचें राज्य त्यांच्याच हवालीं करून देण्याचा शिवरायाचा उच्च विचार होता; परंतु विजापूरकरांकडे संधान बांधून तिकडे पळून जाण्याचा त्यांनीं दुष्टविचार केला. त्या संबंधाचे मुद्देसूद कागदपत्र हातीं लागले ते पाहून त्यांची रुजवात घालून शिवरायानें उभय मोरे पुत्रांचा शिरच्छेद केला. बायकामाणसें जिवंत सोडून दिलीं. सर्व चीजवस्त जप्त केली. अशा प्रकारें या मोरे घराण्याचा शेवट झाला.

या मोरे प्रकरणासंबंधानें निरनिराळ्या बखरींतून निरनिराळ्या हकीकती प्रसिद्ध झालेल्या आहेत. कांहीं अर्वाचीन इतिहासलेखकांच्या मतानें ही अत्यंत निंद्य अशी गोष्ट शिवरायाच्या हातून घडली व त्यामुळें त्याच्या उज्वल

चरित्रक्रमास कलंक लागला असें आहे. चंद्रावाचा त्यानें खून करविला असें त्यांचें मत आहे. कित्येकांच्या मतें त्यानें पाठविलेल्या सरदारांनीं आपल्याच जबाबदारीवर हें कृत्य केलें व तें मागाहून शिवाजीला संमत झालें असें आहे; परंतु यासंबंधानें कोणतीच गोष्ट विश्वसनीय अशी निश्चित झालेली नाहीं. १६५५ ते १६५६ त शिवाजीनें मोऱ्यांना देशकार्याकडे वळविण्याचा प्रयत्न केला. ते वश होईनात सबब त्यानें त्यांना जिंकिलें. त्या प्रसंगांत चंद्रराव मारला गेला. त्याचे मुलगे पुण्यास पुढें कैदेंत होते. राघो बल्लाळ व संभाजी कावजी या मोहिमेंत प्रमुख असून मोरे प्रकरण चार महिने चालू होतें. एवढ्याच गोष्टी विश्वसनीय आहेत. केवळ नैतिक तत्त्वदृष्ट्या शिवरायानें मोऱ्यास ठार मारलें ही गोष्ट दूषणीय ह्मणतां येईल. परंतु राजकारणांत परिस्थित्यनुरूप कुटिल राजनीतीचा समावेश करावा लागतो, त्याप्रमाणें हें कृत्य शिवाजीस अशा प्रकारें शेवटास लावण्याचें भाग पडलें असावें. कुटिलराजनीतीचीं उदाहरणें रामायण आणि महाभारतासारख्या जगमान्य पुरातन ऐतिहासिक ग्रंथांतूनहि अनेक प्रसंगीं आढळतात. शिवरायाच्या पूर्व आणि उत्तर चरित्रावरून कोणतीहि गोष्ट विकोपास जाऊं न देतां साधावयाची असें त्याचें एकंदर धोरण होतें, ही गोष्ट देखील त्याच्यावर दोषारोप करितांना लक्षांत ठेविली पाहिजे. त्याप्रमाणें ती कांहींच्या लक्षांत आलेली दिसत नाहीं. मोऱ्यां सारखा बलाढ्य मराठा सरदार श्रेष्ठ देशकार्यांस विरुद्ध होतो तेव्हां "पोटचें खरें, परंतु तें आडवें येईल तर कापूनच काढिलें पाहिजे" या ह्मणी प्रमाणें मोऱ्यांना मार्गा वरून नष्टच करणें शिवरायास भाग पडलें असलें पाहिजे, हेंही येथें नमूद केलें पाहिजे. शिवाय या प्रकरणावरून तसेंच आणखीही इतर यवनी सत्तेच्या आश्रित-मराठे सरदारांना शिवरायाला शासन करावें लागलें त्यावरून, त्यानें सुरू केलेल्या सक्रिय राष्ट्रिय चळवळींत मध्यम आणि खालच्या वर्गांतील लोक स्वोल्हासानें साह्य करण्यास पुढें आले, परंतु गर्भ श्रीमंत-परकी सत्तेच्या आश्रयानें वाढलेली सरदार मंडळी-प्रथम पुढें आली नाहीं ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे.

असो. या नंतर शिवरायानें पारघाटाचें नाकें ताब्यांत ठेवण्यासाठीं एक मजबूत नवा किल्ला बांधिला व त्याचें नांव प्रतापगड ठेविलें.

जावळी प्रकरण निकालास लागून फार दिवस झाले नाहींत तोंच शिवरायानें आपला मोर्चा हिरडसच्या देशमुखाकडे वळविला. हा देशमुख मोठा शिरजोर असून त्याचा ओढा शिवाजी विरुद्ध विजापूर सरकाराकडे होता. त्याच्या ताब्यांत रोहिडा नांवाचा अत्यंत बळकट असा किल्ला होता. शिवरायानें एका एकीं रात्रीं त्याच्या वर हल्ला चढविला. देशमुखानेंहि मोठ्या शौर्यानें पुष्कळ वेळ किल्ला लढविला, परंतु अखेर तो मारला गेला व किल्ला शिवरायाचे हस्तगत झाला. देशमुखाच्या पदरीं बाजी प्रभु नांवाचा विलक्षण असा दिवाण होता. त्याचें अजब शौर्य पाहून शिवाजी थक्क झाला. त्याचा त्याबद्दल बहुमान करून त्यानें त्याला आपले पदरीं ठेविलें. त्याचें पूर्वीचें उत्पन्न त्याच्याकडे चालू ठेविलें. या प्रभु सरदारानेंहि आमरण शिवाजीची नोकरी इमानें इतबारें करून आपलें नांव अजरामर केलें. या प्रमाणें पन्हाळगडापावेतों शिवरायाचा प्रत्यक्षपणें अंमल चालू झाला. वाडीचे सांवत, सुर्व, कोंकणांतील दळवी वगैरे मराठे सरदार प्रथम शिवाजीचे विरुद्ध असून त्यांनीं विजापूरकरांची बाजू घेतलेली होती. परंतु मोरे प्रकरणानें शिवाजीचा दरारा इतका वाढला कीं, सर्व मराठे सरदार त्याला वचकू लागले व ते त्याच्या कलाप्रमाणें वागण्यास तयार झाले. त्यामुळें वरील सरदार मंडळीस आपल्या बाजूला सामील करून घेण्यास शिवाजीला फारसे प्रयास पडले नाहींत.

अशा प्रकारें अप्रत्यक्षपणें केलेले प्रयत्न व्यर्थ झाल्यानें, त्यांतून विशेषतः मोरे यांचे प्रकरणानें, विजापूरचें दरबार फार चिरडीस गेलें. प्रत्यक्ष विजापुराहून सैन्य पाठविल्याविना शिवाजीचा बंदोबस्त होणार नाहीं अशी त्यांची खात्री झाली. शिवाजी आपल्या ताब्यांतील एका सरदाराचा पुत्र, केवळ पुण्याच्या जहागिरीचा मालक, तेव्हां त्याची धांव ती कितीशी जाणार ! अशी जी त्या सरकाराला घमेंड होती ती निमाली. शिवाजी आपल्या जहा-

गिरी बाहेर किल्ले वगैरे बांधून स्वतःची बळकटी करूं लागला, एकामागून एक मराठे सरदारांस लढून अगर सामोपचारानें आपल्या कटांत आणून मराठमंडळाचें वर्चस्व तो प्रस्थापित करूं लागला, तेव्हां त्याचें पारिपत्य होतें कसें! असा विजापूरदरबारास मोठा विचार येऊन पडला. पित्याच्या कह्यांत शिवाजी नाहीं व त्याच्या बंडाळीस बापाचें अनुमोदन अथवा प्रोत्साहन नाहीं अशी खात्री झाल्यामुळें बापाला छळणेंहि व्यर्थच, अशी त्यांची समजूत झाली. शिवाय पूर्व अनुभवावरून तसें केल्यानें शिवाजी एकदम उठून मोंगलांस जाऊन मिळेल व तिसरेंच संकट उद्भवेल अशीही त्यांना धास्ती होतीच. अशा विचारांनीं सर्व गोष्टींची चर्चा होऊन अखेर अफझुलखान नामक प्रसिद्ध सरदाराच्या हाताखालीं मोठें सैन्य देऊन त्याला शिवाजीवर पाठवावयाचें असें विजापूरदरबारीं निश्चित ठरलें.

अफझुलखान हा विजापूर येथील एक नामांकित सरदार असून कर्नाटकच्या युद्धांत त्यानें मोठें नांव मिळविलेलें होतें. त्यामुळें अदिलशहाची त्याच्यावर विशेष भिस्त होती. ठरल्याप्रमाणें 'डोंगरांतील उंदीर शिवाजी यास जिवंत अगर मेलेला कसातरी पकडून आणीन' अशी भरदरबारांत प्रतिज्ञा करून तो बारा हजार निवडक लोकांनिशीं मोहिमेवर निघाला. शिवाजी राजगडीं होता तो तेथून निघून प्रतापगडीं गेला. तेथें जाण्याचा हेतु असा कीं, अफझुलखानाबरोबर दोन हात करण्याची पाळी आल्यास ते उघड मैदानांत न होतां वाईसारख्या विकट प्रांतीं व्हावे. तो प्रतापगडावर आहे असें ऐकून खानहि वाईकडेच आला. येतां येतां तुळजापूरची भवानी व पंढरपूरचा विठोबा हीं देवस्थानें भ्रष्ट करण्याचा त्यानें अत्याचार केला. त्यामुळें सर्व हिंदुमात्रांचीं मनें प्रक्षुब्ध होऊन या युद्धाला धार्मिक स्वरूप प्राप्त झालें. कोणत्याहि प्रकारें शिवाजीच्या हातून या खानाचा नाश व्हावा असें सर्व हिंदु प्रजेस वाटूं लागलें. हा प्रसंग मोठा आणीबाणीचा असून व या संग्रामाचे परिणामहि मोठे महत्त्वाचे आहेत असें पूर्णपणें जाणून शिवाजी व त्याचे जोडीदार यांनीं तदनुसार

खानाशीं सामना करण्याची अगदीं जय्यत तयारी केली. एक मारलें पाहिजे नाहींतर मेलें तरी पाहिजे, या शिवाय तिसरा मार्ग नाहीं; असें वाटण्याइतका शिवाजी या प्रसंगीं जिवावर उदार झाला.

वाईस पोंचल्यावर वाईचा कुळकर्णी कृष्णाजी भास्कर यास खानानें शिवाजीकडे पाठविलें. शिवाजीनें आपला कारकून पंताजी गोपीनाथ यास खानाकडे पाठविलें. शिवरायाच्या एका सरदारानें फकिराच्या वेषानें खानाच्या छावणींत जाऊन तेथील खितंबातमी काढून ती शिवरायाला विदित केली. शिवरायानें खानाला निरोप पाठविला कीं, "आपल्या सारख्या ससैन्य बलाढ्य सरदाराशीं सामना करण्याचें माझ्या ठिकाणीं सामर्थ्य नाहीं. माझे अपराधांची क्षमा करून खान जीवदान देतील तर आपल्या ताब्यांतील सर्व मुलूख सोडून देण्यास आपण तयार आहों." या निरोपानें खानास वाटलें कीं, शिवाजी त्याला आहे तेव्हां आपण खास यशस्वी होणार. सामोपचारानेंच शिवाजी वश होत आहे तेव्हां तें बरेंच असें खानास वाटलें. कसें तरी करून त्याला किल्ल्या बाहेर काढून व जिवंत पकडून विजापुरीं न्यावें असा त्याचा मनसुबा होता. वाई प्रांताचा तो सुभेदार असल्यामुळें त्याला त्या प्रांताची चांगली माहिती होती. त्या खडतर डोंगराळ प्रदेशीं युद्ध जुंपल्यास आपल्या सैन्याची फार खराबी होईल असेंही तो जाणून होता. त्याचें सैन्य वाई आणि महाबळेश्वर यांच्या दरम्यान पसरलेलें दिसत होतें. परंतु शिवरायाचें सैन्य दाट झाडींतुन आणि दऱ्याखोऱ्यांमधून दडून बसलेलें असल्यामुळें एकदम दिसून येत नव्हतें. आपण शरण येण्यास तयार आहों असें शिवरायानें आपला वकील पंताजी गोपीनाथ याच्यामार्फत खानास कळविलें; त्यानें खान निश्चित वाटणाऱ्या भावी यशप्राप्तीनें अगदीं हुरळून गेला. खानाचा वकील कृष्णाजी भास्कर यास शिवरायानें हिंदुधर्म आणि स्वत्व यांच्या रक्षणाच्या गोष्टी सांगून त्याच्या ठिकाणीं त्यानें स्वदेशाभिमानाची ज्योत पूर्ण उद्दीपित केली होती; त्यामुळें शिवाजीच्या बोलण्याची सत्यता त्याच्याकडून खानास भासविण्यांत

येत होती. अशा प्रकारें उभयपक्षीं यात्नतः खलबतें चालून अखेर खानानें प्रतापगडाखालीं शिवरायाच्या भेटीस यावें असें एकमतानें ठरलें.

याप्रमाणें ठरल्यावर शिवरायानें भेटीची व आत्मबचावाची व्यवस्था फार दक्षतापूर्वक लाविली. खानाच्या राहण्याची व खाण्या पिण्याची व्यवस्था एखाद्या राजाला शोभेल अशी उत्तम प्रकारची ठेवून त्याप्रमाणानेंच त्यानें त्याच्या सैन्याची व्यवस्थाही अगदीं चोख ठेविली. अर्थात्, त्याच्या विषयीं या व्यवस्थेमुळें उलटबाजूच्या कोणाच्याही मनांत कांहीं किंतु राहिला नाहीं. भेटीच्या समारंभाप्रीत्यर्थ किल्ल्याखालीं शिवरायानें एक सुशोभित सुंदर मंडप तयार करविला. खानाच्या मंडळीला ती जागा दाखविली तेव्हां ती पाहून ती मंडळी फार खुष झाली. रानांत जिकडे तिकडे चौक्या पहारे बसवून किल्ल्यांत येण्यास फक्त एक वाट शिवरायानें राखून ठेविली. बाकीच्या वाटा झाडें तोडून पाडून बंद करून टाकिल्या. भेटींतील व नंतरच्या बारीक सारीक गोष्टींची व्यवस्था आगाऊच ठरवून ठेविली. प्रसंगोपात्त दुर्दैवानें कांहीं दगा फटका होऊन अनिष्ट परिणाम घडल्यास स्वराज्याची पुढील तजवीज कशी लावावयाची याची निरवानिरवही या समयीं शिवरायानें माता जिजाबाईंना सांगून ठेविली.

भेटीच्या ठरलेल्या दिवशीं शिवरायानें उत्तम लष्करी पोषाख चढविला. श्रीभवानी देवीचें स्मरण करून तिचा शकुन घेतला. मातुश्रींच्या पदकमलीं नत होऊन त्यांचा शुभ आशीर्वाद घेऊन तो निघाला. त्यानें बरोबर फक्त जिवलग मित्र तानाजी मालुसरे यास घेतलें. खान बरोबर १५०० लोक घेऊन निघाला होता, परंतु त्यांना पाहून शिवाजी घाबरून जाईल व भेटीस येणार नाहीं, असें वकिलांनीं सांगितल्यावरून त्यानें त्यांना मागें ठेविलें व एक हत्यारबंद शिपाई बरोबर घेऊन तो भेटीस आला. दोघे एकमेकांस आलिंगन देण्यास पुढें झाले. भेटता भेटताच खानानें शिवाजीस बगलेंत घट्ट आवळून धरून वार करण्यास हात वर उगारिला; इतक्यांत त्याचें कपट ओळखून शिव-

रायानें हातांतील वाघनखें त्याच्या पोटांत खुपसलीं. त्याबरोबर ' दगारे दगा ' ह्मणून ओरडून खानानें शिवाजीच्या मस्तकावर तरवारीचा वार केला, परंतु शिरस्त्राणामुळें तो वार वर्मी लागला नाहीं. तत्काळ चपळाई करून शिवरायानें आपल्या तरवारीचा खानावर वार केला व त्यानें त्यास पोटापर्यंत चिरून काढिलें. तेव्हां खान गतप्राण होऊन पडला. त्यानें बरोबर घेतलेला शिपाई शिवाजीवर धांवून आला. परंतु परस्पर तानाजीनेंच त्याचा समाचार घेतला. पालखीच्या भोयांनीं खानाचें प्रेत पालखींत घालून तें पळविण्याचा प्रयत्न केला, पण शिवाजीच्या लोकांनीं भोयांना मारून खानाचें शीर कापून घेतलें व तें किल्ल्यावर पोंचतें केलें. अशा प्रकारें विजापुरच्या प्रचंड वाघाला डोंगरांतील उंदरानें चीत मारिलें हें केवढें आश्चर्य !

नंतर कांहीं वेळपर्यंत उभयपक्षांकडील सैन्यांमध्यें लढाई झाली. ही प्रतापगडची लढाई ह्मणून इतिहासांत प्रसिद्ध आहे. अफझुलखान पडल्याची बातमी मिळतांच शिवरायाचें छपून बसलेलें मावळी सैन्य एकदम चोहोंकडून प्रकट झालें व त्यानें जोराचा हल्ला करून अस्ताव्यस्त पसरलेल्या खानाच्या सैन्याची अगदीं दाणादाण केली. किल्ल्याच्या पायथ्याजवळील खानाच्या लोकांचें नेताजी पालकर यानें चंदन उडविलें. मागें राहिलेल्या फौजेवर पिंगळे तुटून पडला. ' शरणागतांस जीवदान द्यावें, अकारण रक्तपात करूं नये ' असा शिवरायाचा त्याला सक्त हुकूम होता, त्याप्रमाणें तो वागला. खानाचें पुष्कळ द्रव्य व सामान शिवरायाचे हातीं लागलें. पुष्कळ लोक पकडले गेले; त्यांच्यापैकीं जे खुषीनें शिवाजीची नोकरी पत्करण्यास तयार झाले त्यांना त्यानें आपल्या नोकरीस ठेविलें. जे कबूल नव्हते त्यांना त्यानें परत देशीं पाठविलें. अशा प्रकारें या प्रकरणाचा शेवट झाला.

या शिवछत्रपतिचरित्रांत अर्थात् स्वराज्यसंस्थापनेच्या इतिहासांत ज्या कांहीं शंकास्पद गोष्टी आहेत त्यांपैकींच अफझुलखानाच्या वधाची एक असून ती ऐतिहासिक दृष्ट्या फार महत्त्वाची आहे. कारण या गोष्टीच्या निकालावर

पुढील पुष्कळ गोष्टी अवलंबून होत्या. तत्कालीन आणि अर्वाचीन परकी ग्रंथकारांनीं या गोष्टीचा विपर्यास करून शिवाजी ह्मणजे एक कपटी विश्वासघातकी आणि नीच खुनी मनुष्य होता असें दर्शवून या प्रकरणाला अफझुलखानाचा खून असें घाणेरडें नांव त्यांनीं दिलेलें आहे. परंतु हा खून नसून वध होता असें आपल्याला पुढील अल्पविवेचनावरून दिसून येईल.

अफझुलखानानें भरदरबारांत जी घोर प्रतिज्ञा केली होती तिच्यावरून तो शिवरायाचा जीव घेण्याला अथवा निदान त्याला जिवंत पकडण्याला टपलेला होता असेंच ह्मटलें पाहिजे. त्याप्रमाणेंच शिवाजी एकदां मार्गांतून नष्ट झाला ह्मणजे विजापूरचा एक मोठा शत्रु नाहींसा झाला असेंहि त्यास वाटणें साहजिक होतें. तत्राप जिवंत सांपडल्यानें कार्यभाग उरकण्यासारखा असता तर तसा त्यानें प्रयत्न केला असता; परंतु शिवाजी जिवंत त्याच्या हातीं लागणें त्या स्थितींत केवळ अशक्य होतें. उलटपक्षीं एकदां खानाचे तडाक्यांत आपण सांपडलों तर जिवाची अथवा स्वराज्याची आशा करणें व्यर्थ होय हें शिवाजी पूर्णपणें जाणून होता. तेव्हां कोणत्या तरी युक्तिप्रयुक्तीनें त्याला आपल्या कह्यांत आणणें शिवरायाला भाग होतें. उघडपणें खानाबरोबर लढण्याची ताकद अंगीं नसल्यामुळें त्यानें भेटीची युक्ति योजिली. ह्मणून खानाला ठार करण्याचा त्याचा हेतु होता असें ह्मणतां येणार नाहीं. तसें असतें तर ती गोष्ट घडवून आणण्यास शिवरायास स्वतःचाच जीव धोक्यांत घालण्याचें कांहीं कारण नव्हतें. भेटीच्या पूर्वींच दोन चार मल्लगर्दी आंत सोडून त्यांच्या कडून त्याला सर्व काम भागवितां आलें असतें. परंतु तसें न करतां स्वतः तो भेटीस गेला व भेटलाही. भेटतांना कपट दिसल्यावरूनच खानाचा वध करण्याचें त्याला भाग पडलें असावें. तो त्याच हेतूनें गेला होता व खानाच्या मनांत कोणताहि दुष्ट हेतु नव्हता असें अनुमान करण्यास ऐतिहासिक दृष्ट्या तरी कांहीं पुरावा सांपडत नाहीं.

खानाच्या वधानें मिळालेला अवसर शिवाजीनें व्यर्थ दवडिला नाहीं. तो

एकदम फौज घेऊन बाहेर पडला. कोल्हापूर प्रांतावर त्याचा फार दिवस डोळा होता. त्या प्रांतांत शिरून त्यानें पन्हाळा किल्ला तेथील किल्ले दाराला वश करून युक्तीनें हस्तगत केला. त्याचप्रमाणें त्यानें पवनगड व वसंतगड हे किल्लेही काबीज केले. नंतर रांगणा आणि खेळणा हे दोन किल्ले मोठ्या निकरानें लढून घेतले. खेळणा किल्ला पुढें विशाळगड यानांवानें प्रसिद्धीस आला. या खबरा अदिलशहांच्या कानावर जाऊन त्यानें मिरजेच्या रुस्तुमज्जमान सरदारास शिवाजीवर चालून जाण्यास हुकूम केला. त्याप्रमाणें तो शिवाजीवर चालून आला; परंतु त्याजबरोबर शर्तीनें लढून त्यानें त्याला कृष्णा नदीपार हांकून दिलें व आपण खंडण्या घेतघेत थेट विजापुरापर्यंत गेला व तेथून माघार घेऊन तो इतक्या वेगानें परत निघाला कीं कोणाचीही त्याचा पाठलाग करण्याची छाती झाली नाहीं. मागें शिवाजीच्या सरदारांनीं दाभोळ व राजापूर हीं शहरें काबीज केलीं. याप्रमाणें विजापूरकरांच्या युद्धांतील ही पहिली मोहिम समाप्त झाली.

अफझुलखानासारखा बलाढ्य नामांकित सरदार, परंतु त्याची देखील डाळ न शिजतां तो मारला गेला. रुस्तुमज्जमानाचा पूर्ण पराभव होऊन त्याला पळ काढणें भाग झालें, व शिवरायानें तर राज्यांतील मुलखावर वाटेल तसा हात मारण्याचा क्रम सपाट्यानें चालविला वगैरे वगैरे गोष्टींनीं अदिलशाहाची मोठी तारांबळ उडून गेली. शिवाजीचा बंदोबस्त कसा होतो ? असा सर्व दरबारच्या मंडळीस मोठा विचार येऊन पडला. यावेळीं सिद्दीजोहार नांवाचा कर्तबगारीचा मनुष्य कर्नुळच्या जहागिरीवर होता त्याला शिवरायावर पाठवावें असा विचार शहाच्या मनांत आला. त्याप्रमाणें त्याला बोलावून घेऊन शिवाजीची खोड मोडण्याची कामगिरी शहानें त्याला सांगितली व ती त्यानें मान्य केली. त्याच्या हाताखालीं दहा हजार घोडेस्वार आणि पंधरा हजार पायदळ इतकें सैन्य देऊन शहानें त्याची रवानगी केली. अफझुलखानाचा मुलगा फाजल बापाच्या वधाचा सूड उगविण्याचे इरायानें त्याच्या बरोबर निघाला. ही संधि

साधून जंजिऱ्याचा सिद्दी व वाडीचा सांवत हेही शिवाजीवर उठले. उलट शिवरायानें बिलकुल न डगमगतां स्वतःचा बंदोबस्त अगदीं कडेकोट केला. स्वसामर्थ्याची खात्री त्याच्या मनाला आतां चांगलीच पटलेली होती. स्वशत्रूच्या शक्तीची पारख होऊन त्यांचीं व्यंगें काय असतात हें त्याला कळून चुकलें होतें, आपल्या विश्वासांतील निवडक सरदार त्यानें चोहोंकडे नेमिले व त्यांना निरनिराळ्या प्रदेशांवर निरनिराळीं कामें सांगितलीं. राघो बल्लाळ यानें सिद्दीचा बंदोबस्त करावा. वाडीच्या सांवतांचा समाचार बाजी फसलकर यानें घ्यावा. पुरंदर, सिंहगड, प्रतापगड वगैरे प्रांतीं मोरोपंत पिंगळे यांनीं फौजबंद रहावें. कल्याण प्रांतांत आबाजी सोनदेव होताच. अशी आजूबाजूला तयारी ठेवून स्वतः शिवाजी पन्हाळा किल्ल्यावरच राहिला. त्याची बातमी ठेवून सिद्दी जोहार थेट पन्हाळा किल्ल्यावर चालून आला. त्यानें पाऊसकाळ होता तरी मोर्चे चढवून त्या किल्ल्याला वेढा दिला. बाहेरच्या लोकांशीं दळवळण बंद पडून शिवाजी किल्ल्यांत अडकून राहिला. यामुळें शिवरायाचा कांहींएक उपाय चालेना. उघड लढाई द्यावी तर तसें करणेंही अशक्य होतें, कारण सिद्दीचें सैन्यबल फार मोठें होतें. हरएक प्रकारें युक्तिप्रयुक्ति योजून किल्ल्याबाहेर सुरक्षित पडणेंच त्याला इष्ट होतें व तशी संधि मिळण्याची तो वाट पहात होता. प्रथम त्यानें जोहाराशीं तहाचें बोलणें सुरू केलें. नंतर एकदां खालीं येऊन त्यानें जोहाराची मुलाकत घेतली व आपण स्वाधीन होण्यास तयार आहों असें त्याला भासविलें. त्यावरून शिवाजी खास आतां आपले हातीं येणार असें वाटून त्यानें वेढ्याचे काम जरा ढिलाईनें चालविलें. तह ठरला असें समजून शिद्दीचे लोक बेसावध राहूं लागले. आशा ही मनुष्याला फसविणारी आहे त्याप्रमाणें सिद्दीलाहि तिनें फसविलें. एके दिवशीं मध्यरात्रीचे सुमारास शिवरायानें एक निवडक मावळे लोकांची टोळी बरोबर घेऊन सर्वांचा डोळा चुकवून तो खालीं उतरला व बेधडक आपल्या लोकांनिशीं बाहेर पडला व त्यानें एकदम रांगणा किल्ल्याचा मार्ग धरिला. उजाडल्यावर तो निसटून गेल्याची बातमी सिद्दीला लागली, तेव्हां अफझुलखानाचा

मुलगा फाजल व सिद्दी जोहाराचा मुलगा अजीज यांनीं निवडक घोडेस्वार बरोबर घेऊन त्याचा पाठलाग केला. सुमारें दुपार होईपर्यंत तर तो त्यांना दिसला नाहीं. त्या वेळीं तो रांगणा किल्ल्याचा घाट चढत आहे असें त्यांना दिसलें. शत्रूचें सैन्य पाठीवर येत आहे असें पाहून शिवरायानें घांटांतील एका खिंडींत कांहीं निवडक मावळे शिपाई साह्यास देऊन बाजी प्रभु या सरदारास खिंडीच्या तोंडावर ठेविलें. आपण वर किल्ल्यावर जाऊन सुरक्षित पोंचल्याविषयीं तोफांची सरबत्ती देईपर्यंत शत्रुसैन्याला अडवून धरण्याविषयीं त्यानें त्याला हुकूम केला. त्याप्रमाणें तो निधड्या छातीचा शूर शिपाई बाजी प्रभु खिंडीच्या तोंडावर आपल्या थोड्या लोकांनिशीं आडवा उभा राहिला. शत्रुसैन्य अंगावर चालून आलें. बाजी प्रभूनें असा जोराचा मारा केला कीं, त्याबरोबर तें मागें हटलें. पुन्हां कांहीं वेळानें फाजल यानें निवडक ताजे दमाचे लोक बरोबर घेऊन हल्ला चढविला. परंतु तो रणधीर जिवावर उदार झालेला शूर सरदार एक इंच देखील मागें हटला नाहीं. या प्रसंगीं त्याचे बहुत लोक पडून त्यांनीं यमसदनाची वाट धरिली, तरी तो मोठ्या आवेशानें लढत होता. त्याचें धैर्य ह्मणून यत्किंचित् देखील खचलें नाहीं. त्याचा सर्व लय किल्ल्याकडील तोफेकडे लागलेला होता. बहुतेक मावळ्यांच्या रणकुंडांत आहुत्या पडल्या. शेवटीं बाजीप्रभूलाही वर्मी गोळी लागून तो जमीनीवर धाडकन् पडला. पूर्वींच अतिशय जखमा लागून तो घायाळ झालेला होता. एकदां जमीनीला आंग लागल्यावर फिरून उठण्याची ताकद त्याच्यामध्यें राहिली नव्हती; तरी तो तसाच पडून अवशिष्ट लोकांना लढण्यास प्रोत्साहन देत होता. अखेर नाड्या आटपत येऊन त्याचा अंतकाल समीप आला; परंतु किल्ल्यांतील तोफांचे आवाज ऐकण्यासाठीं त्याचे प्राण घुटमळत होते. इतक्यांत पुण्यप्रतापी शिवाजी सुरक्षित किल्ल्यावर पोंचून तोफा सुटल्या. त्यांचे आवाज ऐकून मृत्यूनें गांठलेल्या या रणवीरास अत्यंत समाधान वाटलें. ' मीं आपली कामगिरी बजाविली. आतां मी सुखानें मरतों ' असे उद्गार काढून त्या वीरानें प्राण सोडिला. बाजीसारखा दृढनिश्चयी, जिवा-

लाजीव देणारा, पूर्ण इमानी आणि स्वामीकार्यार्थ प्राण खर्ची घालण्यास तत्पर असणारा पदरचा योद्धा धारातीर्थी नष्ट झाल्याचें अत्यंत दुःखोद्वेगक व अशुभ वर्तमान ऐकून शिवरायाला किती दुःख झालें असेल याची कल्पना वाचकांनींच करावी ! लढाईत जखमा लागून प्राणोत्क्रमणाची वेळ आली असतांही त्याच्या चित्तांत स्वामिकार्याव्यतिरिक्त अन्य विचार आले नाहींत व अशा भयंकर स्थितींत देखील स्वामिकार्याच्या फलश्रुतीनेंच ज्याचें समाधान झालें, त्यादेश-भक्ताची योग्यता केवढी थोर म्हटली पाहिजे ! अल्प साह्य असतांही जिवावर गुदरलेल्या संकटाची पर्वा न करितां शत्रूच्या प्रचंड सैन्याला ज्यानें तोंड दिलें व देह धारातीर्थी ठेविला त्या बाजी प्रभूची कीर्ति यावच्चंद्रदिवाकरौ अजरामर राहणार यांत चिलकुल संदेह नाहीं. ग्रीसच्या इतिहासांत स्पार्टन लोकांनीं थर्मापिलीच्या खिंडींत अतुल धैर्यानें आपल्या दोनशें प्राणांच्या आहुत्या दिल्या असें वर्णन आहे. त्या प्रसंगाहून या प्रसंगाची किंमत कांहीं अधिक लागेल असें जें कांहीं ग्रंथकारांनीं म्हटलें आहे तें यथा योग्य आहे. कारण एका एकनिष्ठ सरदाराच्या मर्दुमकीवर सर्व राज्याचा बचाव होणें व त्या कामांत त्या सरदाराचे प्राण खर्ची पडणें अशा गोष्टी फारच विरळा घडतात. महाराष्ट्रीयांच्या अंगीं त्या कालीं कोणत्या प्रकारचा आवेश उत्पन्न झाला होता याची ओळख या प्रसंगावरून उत्तम पटते.

अशा रीतीनें अफजुलखान व सिद्दी जोहार यांची वाट लागलेली पाहून आदिलशहा स्वतः सैन्य बरोबर घेऊन शिवरायावर चालून आला. पन्हाळा, पवनगड वगैरे थोडे किल्ले त्यानें काबीज केले. रांगणा व विशाळगड घेण्यांत त्याला यश आलें नाहीं. इतक्यांत कर्नाटकांत बंड उद्भवल्यामुळें त्याला परत जाणें भाग पडलें. या वेळीं वाडीच्या सावतानें मला कुमक दिल्यास मी शिवाजीचें पारिपत्य करितों, असें बादशाहास कळविलें व त्यानें त्याचें म्हणणें मान्य केलें. बाजी घोरपडे व बहलोलखान यांस त्याच्या मदतीला देऊन बादशहा परत गेला. बाजी घोरपडे सावताला मदत करण्याचे फंदांत न पडतां

मुधोळास आपल्या जहागिरीचे ठिकाणीं जाऊन स्वस्थ बसला. तो शहाजीस विश्वास घातानें पकडण्याचे कामीं मुख्य होता हें मागें आलेंच आहे. तेव्हां पासून तो शिवरायाचे मनांत डाचत होता. त्याला शासन करण्याची संधी केव्हा येईल ह्मणून शिवाजी आगदीं वाट पहात होता. ती संधी या समयीं शिवरायाला आली. तो गाफील आहे अशी बातमी त्याला लागली. त्या बरोबर तो मुधोळास गेला व एकदम अचानक छापा घालून त्यानें घोरपड्याला त्याच्या सर्व लोकांसह ठार केलें. नंतर शिवरायानें सावंताचें पारिपत्य केलें; तेव्हां तो शिवाजीला शरण आला. त्याला वाडीची देशमुखी पूर्ववत् देऊन आपले पदरीं ठेविलें. त्याच्या मुलखांत शिवरायानें आपली शिबंदी ठेविली. याप्रमाणें बहुतेक कोंकण भाग त्याच्या ताब्यांत येऊन पुष्कळ शूरलोकांचा त्याच्या सैन्यांत भरणा झाला. शिवरायानें या भागांत आणखी कित्येक नवे किल्ले बांधिले.

अशा रीतीनें जमीनीवरील बहुतेक शत्रूंच्या हातून मोकळा होतांच शिवाजीनें आपलें लक्ष समुद्रावरील जंजिऱ्याच्या सिद्दीकडे वळविलें. पूर्वींच त्यानें शामराजपंतास सिद्दीवर पाठविलें होतें परंतु त्याचा पराभव होऊन त्याचे पुष्कळ लोक सिद्दीकडून मारले गेले होते. शिवरायाला अपजयानें माळ घातलेला हा पहिलाच प्रसंग होता. तो सहन न होऊन त्यानें शामराजपंतास पेशवाईचे पदापासून पदच्युत केलें व त्याचे जागीं मोरोपंत पिंगळे याची नेमणूक केली. मागून राघो बल्लाळ यास सिद्दीवर शिवाजीनें पाठविलें होतें. त्याच्या साह्यास या समयीं अधिक फौज पाठवून त्यानें सिद्दीला जंजिऱ्याचे किल्ल्यांत कोंडिलें, तेव्हां निरुपाय होऊन त्यानें शिवाजीशीं तह केला. या तहांत एकमेकांनीं एकमेकांचे मुलखांस उपद्रव करूं नये असें ठरलें.

असा तह झाला तरी समुद्रावर आपला कायमचा ताबा असावा असा विचार मनांत येऊन शिवरायानें स्वतःचे असें एक आरमार तयार केलें. एकंदर चार पांचशें जहाजें तयार करवून कुलाबा हें त्याचें मुख्य ठिकाण

केलें. सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग येथें कांहीं जहाजें ठेवून दिलीं. दर्यासागर व मायनाक भंडारी असे दोन सरदार या आरमारावर मुख्य नेमिले. त्यांचे हाताखालीं दर्यावर्दी शूर लोक देऊन व तोफा वगैरे युद्धोपयोगी सामान जय्यत ठेवून शिवरायानें समुद्राच्याबाजूचा आपला बंदोबस्त कडेकोट केला. या आरमारानें पोर्तुगीज (फिरंगी) लोकांनाही शिवाजीचा वचक वाटूं लागला. त्यांनीं वकील पाठवून त्याच्याशीं तह केला. या तहानें असें ठरलें कीं, शिवरायानें फिरंगमुलखास उपद्रव देऊं नये व त्यांनीं त्याला तोफा, दारूगोळा वगैरे सामान पुरवावें. या वरून समुद्राच्या बाजूनेंही परकी लोकांपासून आपल्या देशाचें रक्षण झालें पाहिजे ही गोष्ट शिवरायाच्या ध्यानांत येऊन चुकली होती, असें स्पष्ट होतें.

या एकंदर हकीकती वरून आपल्या रणधीर चरित्रनायकानें एकसारखें कांहीं वर्षें युद्ध चालवून अदिलशहाची पाठ कशी पुरविली हें आपण पाहिलें. शिवाजी म्हणजे यःकश्चित् बंडखोर अशी जी मोठी घमेंड होती ती नष्ट होऊन, तो आपल्या आहारा बाहेरील एक प्रबल असा शत्रु आहे, अशी विजापूर दरबाराची खात्री झाली. त्याचा पाडाव करण्याचा नाद सोडून देऊन त्याच्याशीं तह करून सलोखा करणेंच त्यांना भागपडलें. सांवत, घोरपडे, सिद्दी वगैरे सर्व सरदार शिवाजीचे आधीन झाले; अफझुलखान प्राणास मुकून सिद्दीजोहार पराभूत झाला; स्वसैन्याची दुर्दशा उडून उलट शिवाजीचें सामर्थ्य या युद्धानें दुणावलें, कर्नाटकांत तर नवीन बंड उपस्थित झालें, अशा बदललेल्या परिस्थितीचा विचार करून शिवरायाबरोबर यापुढें तह करणेंच अदिलशहास शहाणपणाचें वाटलें, परंतु शिवाजी तह करण्यास तरी कबूल होतो किंवा नाहीं अशी उलट शहास चिंता वाटूं लागली. शिवाजी ऐकेल तर फक्त बापाचेंच ऐकेल असा विचार मनांत आणून त्यानें शहाजीराजे यास बोलावून आणिलें व त्यांना शिवरायाकडे तह करण्याकरितां पाठविलें. त्यांनाही फार दिवसांपासून आपल्या कर्तृत्ववान प्रियपुत्रास भेटण्याची प्रबल इच्छा झालेली होती. तशांत

बाजी घोरपडे याचा सूड घेतल्यानें तर, पुत्राच्या कर्तबगारीविषयीं त्यांच्या मनांत विशेष आदर उत्पन्न होऊन त्याचा त्यांना अत्यंत अभिमान वाटत होता. तेव्हां मुलगा माझ्या ताब्यांत नाहीं, तरी यत्नकरून पहातों, असें शहास सांगून ते शिवाजीकडे येण्यास निघाले; येतांना तुळजापूर व पंढरपूर या क्षेत्रीं देवदर्शन करून ते स्वदेशीं आले. शिवाजी मोठा सरंजाम बरोबर घेऊन पितृदर्शनास सामोरा गेला. जेजुरी येथील खंडोबाच्या देवालयांत प्रथम पितापुत्रांच्या भेटी झाल्या. मुक्कामास जाण्याकरितां शहाजीराजे मेण्यांत बसून चालले, तेव्हां शिवराय अनवाणी मेणा धरून बाजूनें चालत होता, यावरून तो किती विनयशील होता, त्याचें पित्याचे ठिकाणीं किती निस्सीम प्रेम होतें, सत्पुत्राचें कर्तव्य ओळखून तें उत्तम प्रकारें बजाविण्यास तो किती तत्पर होता, या गोष्टी उघड होतात. घरीं पोंचल्यावर सद्गदित अंतःकरणानें उभयतांचें कांहीं वेळ संभाषण झालें. नंतर सर्व मंडळींसह ते पुण्यास आले. तेथें कांहीं दिवस मुक्काम करून त्यांनीं राजगड, प्रतापगड वगैरे किल्ले पाहिले. एकंदर राज्यांतील उत्तम बंदोबस्त पाहून शहाजीराजे यांस सानंद कौतुक वाटून मोठा संतोष झाला. पुढें रामदास स्वामींचा दर्शनलाभ घेऊन ते पन्हाळ्यास गेले. तेथून प्रियपुत्राचा निरोप घेऊन राजे तंजावरास परत गेले. जातांना आमच्या जिवांतजीव आहे तोंपर्यंत तरी तुम्हीं विजापूर-पातशाहीशीं यापुढें झगडूं नये अशी त्यांनीं पुत्रास शपथ घातली. त्याप्रमाणें वागण्याचें शिवरायानें पित्यास वचन दिलें. तह झाला त्यांत शिवरायानें स्वपराक्रमानें पादाक्रांत केलेला सर्व मुलूख त्याजकडेसच रहावा व या उपर त्यानें आदिलशाहींतील मुलखास उपद्रव देऊं नये असें ठरलें.

या युद्धानें शिवरायाच्या स्वकष्टार्जित राज्याचा विस्तार पुष्कळ वाढला व त्याच्या सत्तेचीही अभिवृद्धि झाली, या गोष्टी तर खऱ्याच; परंतु या युद्धाचा परिणाम म्हटला म्हणजे परकी यवनीसत्ता व तिचें जडजोखड झुगारून देऊन स्वसत्तेखालीं जे येतील त्यांचें संरक्षण करून सर्व प्रजाजनांस उन्नतावस्थेस आण-

ण्यास तो समर्थ असून योग्य आहे अशी प्रचिती या भरतखंडवासीयांस स्वकृतीनें त्यानें आणून दिली हा होय. मोहिते, घोरपडे, मोरे, सांवत, दळवी, सुर्वे वगैरे कित्येक सरदार आरंभतः कमी अधिक प्रमाणानें शिवाजीच्या विरुद्ध होते. याचें कारण शिवाजीचा डाव फसला तर ते राजद्रोही ठरून ज्या परकी सत्तेचे ते अंकित होते तिच्याकडून त्यांचें अत्यंत नुकसान झालें असतें, असा त्यांना भ्रांतिमूलक भ्रम झालेला होता. परंतु स्वपराक्रमाच्या जोरावर शिवरायानें जेव्हां या भ्रमाचा निरास केला तेव्हां त्यांच्यावर वचक बसून ते त्याचे अंकित झाले. शिवपक्षाची सत्यता व सामर्थ्य पूर्णपणें त्यांच्या निदर्शनास आलीं. अशा रीतीनें आपल्या ठिकाणीं सत्ताधीशत्व स्थापित करून अत्यंत स्वार्थत्यागानें त्यानें स्वराज्य-स्थापनेचा भक्कम असा पाया रचिला; त्यावर मजला उभारून कळस चढविण्यांत कसा आला हें आपण पुढें पाहूं.

# भाग ८ वा.

## प्रौढप्रतापी शिवाजीराजे.

विजापूरकरांबरोबर शिवाजीचें युद्ध सुमारें ५।६ वर्षें चालून अखेर त्यांना शिवरायाशीं तह करणें कसें भाग पडलें हें आपण पाहिलें. या युद्धाचा शेवट झाला ह्मणून शिवरायाला कोणी शत्रु उरला नाहीं, अथवा स्वीकृत कार्य पूर्णपणें तडीस गेलें अशांतली गोष्ट नव्हती. स्वस्थापित स्वराज्यावर अद्यापि अनेक संकटें यावयाचीं होतीं. पुष्कळ आणीबाणीचे प्रसंग पुढेंच होते. पूर्वींच्या शत्रूंपेक्षां बलवत्तर अशा शत्रूबरोबर टक्कर देऊन त्याचा पाठीशीं असलेला ससेमिरा अजून उडवून द्यावयाचा होता. स्वबल पूर्णत्वानें कसोटीस लागण्याची वेळ अजून बाकी होती. शिवराया जितका शूर व साहसप्रिय होता, तितकाच तो धोरणीही होता. विजापूरकरांशीं लढत असतां तो मोगलांच्या वाटेस फारसा केव्हांही गेला नाहीं. कारण, दोन बलाढ्य सत्तांशीं एकदम एकाच कालीं झगडून यशप्राप्ति संपादण्याचें सामर्थ्य तोंपर्यंत त्याच्या ठिकाणीं आलेलें नव्हतें, हें तो पक्कें ओळखून होता. स्वपरबलाबलाची खात्री पटल्याशिवाय तो कोणतेंही महत्त्वाचें कृत्य हातीं धरीत नसे; ह्मणूनच सर्व आयुष्यक्रमांत केव्हांही अपयशाचें खापर माथीं फुटण्याचा प्रसंग त्याच्यावर आला नाहीं.

असो; शहाजहान गादीवर असतां विजापूरकरांच्या बंदिवासांतून पितृमुक्तता करण्यास्तव शिवरायानें मोंगलांशीं संधान बांधून आपलें कार्य कसें साधलें हें मागें आलेंच आहे. त्यावेळीं त्यांची नोकरी करण्यानें कबूल करून चौथाई व सरदेशमुखीचे हक्क आपल्याला मिळावे ह्मणून त्यानें शहाजहानाशीं

मागणें केलें होतें. त्यावेळीं त्यानें स्वत: दिल्लीदरबारांत येऊन त्या हक्कांसंबंधानें बोलणें करावें, ह्मणजे त्याचा योग्य विचार करूं, असें उत्तर मोंगलांकडून शिवाजीला मिळालें होतें. नंतर इ. स. १६५७ त औरंगजेबानें विजापुरावर स्वारी केली तेव्हां शिवराया त्याला मदत करण्यास पुढें झाला होता. औरंगजेबाच्या मनांतही सर्व दक्षिण देश काबीज करून तो स्वसत्तांकित करण्याचे विचार घोळत असल्यामुळें त्याकामीं शिवाजीचा फार उपयोग होईल असें वाटून तोही त्याची मदत घेण्यास उत्सुक होता. इतक्यांत शहाजहान दिल्लीस आजारी पडला व औरंगजेब विजापूरवाल्यांशीं कसाबसा तह करून परत दिल्लीस गेला.

पुढें कांहीं दिवसांनीं शिवाजीनें जुन्नर शहरावर छापा घालून तें लुटलें व पुष्कळ लूट आणिली. हीच त्यानें केलेली मोंगलांची पहिली आगळीक होय. परंतु तत्काल त्या गोष्टीवर विरजण घालण्याकरितां औरंगजेबाकडे त्यानें आपला वकील पाठविला व त्याच्या द्वारें झालेल्या गोष्टीची माफी करण्याविषयीं विनंति केली. त्या समयीं राज्यप्राप्तीस्तव औरंगजेब आपल्या भावांशीं झगडण्यांत गुंतलेला असल्यामुळें त्यालाही त्या गोष्टीकडे विशेष लक्ष देण्यास फावलें नाहीं. नंतर लवकरच, कृष्णाजी भास्कर यास दिल्लीस पाठवून दक्षिणेंतील मुलखाचें संरक्षण करण्याचें काम आपलेकडे द्यावें अशी शिवाजीनें दुसरी मागणी केली. यावर औरंगजेबाकडून अनुकूल असाच जबाब आला. जुन्नर लुटल्याबद्दल औरंगजेबाला क्रोध आला नव्हता अशांतली गोष्ट नव्हती, परंतु ती वेळच अशी होती कीं, दिल्लीच्या सिंहासनाच्या भानगडींत औरंगजेबाला इकडील गोष्टींकडे लक्ष देण्यास फुरसत नव्हती व त्या संधीचा फायदा शिवरायानें घेतला. इकडे आपण एकादी गोष्ट केली व त्यामुळें मोंगल चिडले तरी, त्यांना कांहीं वर्षेंतरी आपल्याला थांबवून धरितां येईल हें शिवाजी पूर्णपणें ओळखून होता. शिवाजी व औरंगजेब यांचें या समयीं अशाप्रकारचें वर्तन होतें कीं, ते दोघेही एकमेकांस फसवून आपला डाव साधण्याची संधी पाहत होते. त्यांचें

मनें परस्परांविषयीं अगदीं साशंक असत. परंतु, शिवाजी शेरास सव्वाशेर भेटून अखेर त्याचाच विजय झाला.

नंतर औरंगजेब दिल्लीस भावांबरोबर चाललेल्या झगड्यांतून विजयी होऊन मोकळा झाला व त्यानें सैन्य पाठवून शिवाजीच्या ताब्यांतील कल्याण व भिवंडी हीं दोन ठाणीं घेतलीं. परंतु शिवाजी विजापूरकरांबरोबर युद्धांत गुंत-लेला असल्यामुळें त्याला तात्काल त्या गोष्टीचा सूड घेतां आला नाहीं. पण लवकरच तह होऊन त्या युद्धांतून तो मुक्त झाला. व त्यानें आपला मोर्चा मोंगलांविरुद्ध फिरविला. त्यानें मोरोपंत पिंगळे व नेताजी पालकर यांस सैन्य बरोबर देऊन मोंगलांच्या मुलखांत रवाना केलें. मोरोपंतानें जुन्नर व उत्तर भागां-तील मोंगलांचे कित्येक किल्ले हस्तगत केले. नेताजी तर मोंगली मुलखांतील खंडणी वसूल करीत थेट औरंगाबादेपर्यंत जाऊन थडकला. परंतु त्या वीर बहाद्दराला आडवा येण्याची एकाही मोंगल सरदाराची छाती झाली नाहीं. अशा रीतीनें मोहीम फत्ते करून तो पुण्यास परत आला.

या शिवरायाच्या कृत्यांनीं महत्त्वाकांक्षी औरंगजेब बादशाहाला अतिशय चीड आली. शिवाजी हा दक्षिणेंतील एका सामान्य मराठे सरदाराचा मुलगा आणि तो महान् बलाढ्य अशा दिल्लीपदपातशाहींतील मुलूख बलात्कारानें काबीज करतो याचें त्याला राहून राहून सखेदाश्चर्य वाटूं लागलें. तात्काल त्यानें दक्षिणेचा सुभेदार बलाढ्य शाहिस्तेखान यास शिवाजीला एकदम चिरडून टाकण्याचा हुकूम केला. त्या हुकमान्वयें खान एकदम चालून येऊन त्यानें चाकणच्या किल्ल्यास वेढा दिला. हा किल्ला सहज हस्तगत होईल अशी खानाला मोठी घमेंड होती. परंतु, शिवाजीचा सरदार फिरंगोजी नरसाळा यानें पुरे दोन महिनेपर्यंत खानास दाद दिली नाहीं. फिरंगोजी नरसाळा व त्याचें सैन्य इतक्या त्वेषानें लढत होतें कीं, त्यांच्या शौर्याचा खानास अत्यंत अचंबा वाटला. अखेर एक सुरुंग उडून किल्ल्याच्या तटाला एक लहानसें भोंक पडलें. त्यामुळें आंत जाण्यास मार्ग होऊन मराठ्यांचा निरुपाय झाला व किल्ला खानाच्या हातीं लागला.

फिरंगोजी पकडला गेला. त्याच्या अंगचें विलक्षण शौर्य पाहून खानानें त्याला बहुमानानें वागविलें. मराठ्यांची बाजू सोडून बादशाहांच्या नोकरींत् येण्याला त्यानें त्याला पुष्कळ आग्रह केला. खानाचें न ऐकल्यास कदाचित् आपल्या प्राणावरही येऊन बेतेल असा संभव असूनही तो निधड्या मनाचा पूर्ण स्वामिनिष्ट वीर खानाच्या म्हणण्यास कबूल झाला नाहीं. मराठ्यांच्या स्वाभिमानाला कलंक लागण्यासारखें कृत्य करण्याचें त्यानें साफ नाकारिलें. खानाच्या म्हणण्याचा तिरस्कार पूर्वक त्यानें धिक्कार केला !! तेंव्हा त्याच्या खऱ्या इमानाची प्रचीति पटून खानानें मोठ्या इतमामानें त्याला शिवरायाकडे पाठवून दिलें. शिवरायानें त्याचा केवढा गौरव केला असेल, हें सांगणें नकोच. फिरंगोजी सारखे पूर्ण स्वामिनिष्ट व देशकार्यार्थ जिवाची देखील पर्वा न करणारे पुष्कळ नरवीर त्या कालीं या महाराष्ट्रभूमीवर होऊन गेले आणि ह्मणूनच महाराष्ट्र-स्वराज्यस्थापनेचा इतिहास विशेष महत्वाचा झाला आहे.

खानानें आपलें मुख्य राहण्याचें ठिकाण पुणें केलें होतें, इतकेंच नव्हे तर तो खुद्द शिवरायाच्या राहत्या वाड्यांत उतरला होता. हा खानाचा उरमटपणा साहजिकच शिवाजीला आवडला नाहीं. त्याबद्दल त्याला योग्य शासन करण्या करितां शिवरायानें जी एक विलक्षण युक्ति योजिली तिच्यावरून त्याच्या साहचासी आणि अचाट कल्पकपणाची जेवढी तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. त्या वेळीं पुण्याच्या नजीकच सिंहगडावर शिवाजी राहत होता. मराठ्यांचा अचानक छापा वगैरे आपल्यावर येऊं नये ह्मणून खानाची कडेकोट तजवीज होती. नाक्यानाक्यांनीं पुणें शहराभोंवतीं जय्यत पहारे बसविलेले होते. कोणत्याही हत्यारबंद मराठ्यास आंत येण्याची मनाई होती. अशा प्रसंगीं दोन गुप्त ब्राम्हण हेर पाठवून शिवरायानें खाना कडील पुण्यांतील बारीक सारीक बातमी आणिली. पुण्याच्या एका मराठे शिलेदारापाशीं संधान बांधून ठेविलें. एके दिवशीं रात्र होण्याचे सुमारास एक लग्नासारखी वरात काढून तिच्यांत मिसळून अगदीं थोड्या निवडक लोकांनिशीं शिवाजी शहरांत शिरला. सिंहगडच्या रस्त्यावर हजार-

हजार, पांच-पांचशों, लोकांच्या टोळ्या त्यानें ठेवून दिल्या होत्या. कात्रजच्या घाटांतलि कांहीं झाडांना व जागजागीं बैलांचे थवे उभे करवून त्यांच्या शिंगांना तेलांत बुडविलेले पोत बांधाविलेले होते. सिंहगडच्या बाजूनें करणावाजून इशारत मिळाल्याबरोबर ते पेटवून द्यावे अशी अगाऊ तजवीज करून ठेविलेली होती. असें करण्यांत शिवाजी व त्याचे लोक कात्रजच्या बाजूनें पळ काढीत आहेत असें समजून खान व त्याची फौज यांनीं त्या बाजूनें पाठलाग करीत जावें असा डाव होता व तो साधलाही. जिकडे तिकडे निजानिज झाल्यावर मध्य रात्रीचे सुमारास शिवाजी आपल्या अनुयायांसह वाड्याच्या स्वयंपाक घराचे भितीला एक लहानसें भोंक पाडून त्यांतून वाड्यांत शिरला. त्याची चाहूल लागून खानाच्या बायका जाग्या झाल्या व दगा ! दगा ! असें ओरडून एकच गलका झाला. त्याबरोबर खान जागा होऊन घाबऱ्या घाबऱ्या एका खिडकीच्या वाटेनें जीव घेऊन पळून जाऊं लागला. शिवरायानें चपळाई करून खानावर एक वार तर केलाच; परंतु, तो निसटता लागून खानाचें फक्त एक बोट तुटलें. त्याचा मुलगा व पहारेकरी ठार मारले गेले. शिवाजी तात्काल बाहेर पडून त्यानें एकदम सिंहगडची वाट सुधारली. त्यानें जातां जातां करणा फुंकला व त्याबरोबर कात्रजच्या घाटांतलि दिवट्या पेटल्या. त्याबरोबर बैल सैरा वैरा पळूं लागले व त्या बाजूनें शिवाजी जात आहे असें समजून खानाच्या फौजेनें तिकडे पाठलाग केला. अशारीतीनें लढण्याचा प्रसंग न आणतां शिवरायानें खानाची खोड मोडिली. उजाडतांच खानाच्या सैन्यानें मोठ्या त्वेषानें सिंहगडावर चाल करून हल्ला सुरू केला. तें सैन्य टप्यांत येतांच शिवरायानें तोफांचा भडिमार करून खानाचे पुष्कळ लोक जाया केले. खानाच्या मनांत तोफखाना आणवून हल्ला करावयाचा विचार होता. परंतु, शिवाजीनें पूर्वी अकस्मात् दिलेल्या दग्याचें स्मरण होऊन तो कचरला. इतक्यांत त्याचा हत्ती तोफेचा गोळा लागुन ठार झाला. त्याबरोबर एकदम गलित धैर्य बनून खान पळून जाऊन पेडगांव येथें छावणी करून राहिला.

शिवाजीनें स्वराज्यस्थापनेसारखें अत्यंत बिकट कार्य हातीं घेतलें असल्या-मुळें त्या कामीं द्रव्याची त्याला वारंवार अडचण पडत असे. ही द्रव्यबलाची अडचण स्वतःच्या जहागिरीच्या वसुलांतुन अथवा त्यानें नवीन जोडलेल्या मुलखाच्या उत्पन्नांतून दूर होणें अशक्य होतें. यास्तव द्रव्यप्राप्तीकरतां मोठ-मोठीं व्यापाराचीं स्थानें लुटून तेथून द्रव्य आणणें त्याला भाग पडत असे. तरी तशा प्रसंगीं देखील गरीब दुबळ्या प्रजेला बुचाडून त्यानें त्यांच्या अल्पवित्ताचा केव्हांही अपहार केला नाहीं. जेथें अतिशय संपत्ति असून तिचा व्यय देशकार्यार्थ न होतां केवळ दुश्चव्यसनादिकांत होण्याचा संभव असे अशाच संपत्तीनें व ऐषआरामाच्या वस्तूंनीं फुललेल्या स्थानांवर शिवरायाची झडप असे. शिवरा-याच्या पदरीं बहीरजी नाईक म्हणून एक गुप्तहेर असून तो भिन्नभिन्न ठिका-णच्या बातम्या काढून आणण्यांत अत्यंत निष्णात असे. त्या वेळीं सुरत शहराची अतिशय भरभराट असून तेथें पुष्कळ श्रीमान व्यापारी लोकांची वस्ती होती. या शहराची बित्तंबातमी काढून आणून बहिरजीनें ती शिवरायाला निवेदन केली. तेव्हां शिवरायाचा त्या शहरावर छापा घालून तें लुटण्याचा विचार ठरला. आपल्या मनांतील खरा हेतु गुप्त ठेवून आपल्या मनांत दुसरेंच कांहीं कर्तव्य आहे असें आपल्या कंपूच्या बाहेरच्या लोकांस भासवून त्यांना फसविण्याचा शिवा-जीचा नित्यक्रम असे. त्या प्रमाणें नाशकाच्या बाजूला कांहीं निकडीचें काम काढून तो थेट नाशकास गेला. तेथेंच कांहीं दिवस मुक्काम आहे असें लोकांस भासवून ता. ५ जानेवारी सन १६६४ या दिवशीं चार हजार निवडक घोडेस्वारांनिशीं तो एकाएकीं सुरतेस जाऊन दाखल झाला. हें शहर मोंगलांच्या ताब्यांतील होतें; परंतु, त्यांच्या फौजेस शिवाजीचा मागमुसही न लागतां शिवरायानें तें सावकाश-पणें सहा दिवस लुटलें व तेथील पुष्कळ लूट त्यानें रायगडावर पोंचती केली. सुरतेस इंग्रजांच्याही कांहीं वखारी होत्या. परंतु ते त्याचे शत्रु नसून परकी व्यापारी असल्यामुळें व राजकीय बाबतींत त्यांचें त्या कालीं महत्व नसल्या-कारणानें शिवराया त्यांच्या फारसा वाटेस गेला नाहीं.

शिवाजी सुरतेस गुंतला असतां दुसरीकडे नेताजी पालकर मोंगलांना उपद्रव देतच होता; तरी मोंगलांच्या हातून त्याचें कांहीं एक पारिपत्य झालें नाहीं. या वेळींच शिवरायाच्या आरमारानेंही बरेंच काम केलें. त्यानें सुरतेहून मक्केस जाणारीं मुसलमान यात्रेकरूंनीं भरलेलीं मोंगलीं जहाजें लुटलीं व त्यांच्या वरील लोकांपासून पुष्कळ खंडणी वसूल करून तीं सोडून दिलीं. खुद्द शिवाजीनें औरंगाबादेपर्यंत स्वारी करून तो प्रदेश उध्वस्त करून टाकिला. अशाप्रकारें शिवराया मोंगलांबरोबर लढत असतां विजापुरच्या अदिलशहानें त्याच्याबरोबर झालेला तह मोडून त्यानें त्याच्या दोन फौजा कोंकण प्रांतीं रवाना केल्या; परंतु शिवरायानें त्यांचा सहज मोड केला. विजापूर सरकारचे सहा हजार लोक पडले. वेंगुर्ल्याचे लोक शिवरायाच्या विरुद्ध गेले, ह्मणून त्यानें तें बंदर लुटून फस्त केलें. नंतर दक्षिण किनाऱ्यानें खालीं उतरून शिवाजीनें बारसिलोर शहर लुटलें व तेथें पुष्कळ लूट मिळविली. या सर्व गोष्टी शिवरायानें एका सुरतेवरच्या मोहिमेंत घडवून आणिल्या व त्यांत तो पूर्ण यशस्वी झाला.

सुरतेकडील मोहीम यशस्वी करून शिवराया परत आला तेव्हां त्याला शहाजीराजे कर्नाटकांत घोड्यावरून पडून अकस्मात् निधन पावल्याचें दुःखकारक वर्तमान समजलें. या निधन वार्तेनें शिवराया व माता जिजाबाई यांना अत्यंत दुःख होऊन त्यांनीं अतिशय शोक केला. जिजाबाईच्या मनांत तर अत्यंत उद्वेग उत्पन्न होऊन व पतिनिधनानंतर कुलस्त्रीनें मागें जिवंतराहणें केवळ निरर्थक होय असें वाटून, त्यांनीं प्राणत्याग करण्याचा विचार केला. परंतु, शिवरायानें मोठ्या चातुर्यानें त्यांना तसें करण्यापासून परावृत्त केलें. कारण त्याच्या ठिकाणीं मातृभक्ति हा गुण पराकाष्ठेनें वासकरीत होता व जिजाबाईच्या ठिकाणींही पुत्रवात्सल्य अतिरेकानें वसत होतें, या गोष्टी-तर खऱ्याच; परंतु, शिवाजीनें प्रचंड यवनसत्तेविरुद्ध उठून स्वराज्यस्थापना करण्याचें जें खडतर असिधारा व्रत आरंभिलेलें होतें तें निर्विघ्न पाळलें जाऊन

त्याचें सांगता पूर्वक उद्यापन पारपडण्याला मातृ देवतेचें आरंभापासून मिळत आलेलें साहाय्य व प्रोत्साहन ईशकृपेनें जितकें अधिक दिवस मिळेल तितकें तें त्याला पाहिजे होतें. शहाजीराजे हयात असतां शिवरायानें जरी अनेक उलाढाली केल्या तरी आपल्याला त्यानें राजा हें पद जोडलेलें नव्हतें. तो मान पिता हयात आहे तोंपर्यंत त्यांचाच आहे असें त्यास वाटत होतें. आतां पित्यामागें राजा हें पद आपल्या नांवामागें जोडण्यास हरकत नाहीं, असें समजून उघड-उघडपणें तो आपल्याला राजा ह्मणवूं लागला. त्यानें आपल्या नांवाच्या शिक्क्याचीं नाणीं पाडण्यास सुरवात केली. त्याचे वडील विजापूर बादशाहीचे नोकर होते; परंतु तें नातें झुगारून देऊन आपण इतःपर विजापूरसरकारचे नोकर वगैरे नसून अगदीं स्वतंत्र सत्ताधारी आहों असें त्यानें लोकांत विदित केलें. अशा प्रकारें स्वराज्यसंस्थापनेचीं सरीं सरीं बाह्यचिन्हें त्यानें प्रकट केलीं. या गोष्टींनीं औरंगजेब बादशहा फारच चिडून गेला व त्यानें या मराठासत्तेचें समूळ उत्पाटन करण्याकरितां काय काय उपाय योजिले हें आपण पुढें पाहूं.

विजापुरचे अंकित होण्यापर्यंतचें शहाजीराजे यांचें पूर्वचारित्र या पूर्वी अवश्य तेवढें येऊन गेलेंच आहे. त्यांच्या उत्तरचरित्राचें संक्षेपतः वर्णन करण्याचें योग्यस्थल हेंच होय असें समजून त्याविषयीं दोन शब्द येथेंच लिहिणें प्रशस्त आहे.

ज्याप्रमाणें निजामशाहींत त्या सत्तेच्या स्वातंत्र्यरक्षणार्थ शहाजीराजे यांनीं मोठमोठे पराक्रम केले त्याप्रमाणें त्यांनीं आपल्या उत्तरवयांत विजापूरपातशाहीची सत्ता वृद्धिंगत करण्यासनव कर्नाटकांत मोठमोठीं पराक्रमाचीं कामें केलीं. या कारणास्तव तसेंच ते पहिल्याप्रतीचे इमानी नोकर असून तशी त्या दरबारची खात्री पटलेली असल्यामुळें त्यांचा तेथें विशेष वडेजाव असे. मुरार जगदेव, रणदुल्लाखान, सर्जाखान वगैरे मुख्यमुख्य हिंदु-मुसलमान अमीर-उमरावांची शहाजीराजे यांच्या ठायीं पूज्यबुद्धि असून सर्व कामांत त्यांचें त्यांना

साहाय्य होत असे. शहाजीराजे यांनीं कर्नाटकांत निकराच्या लढाया मारून अक्कलकोट, बागलकोट, बंगलोर, बाळापूर, कोल्हार वगैरे प्रांत विजापूरपातशाहीच्या प्रबल शत्रूंपासून जिंकिले व ते त्या सरकारकडून त्यांसच जहागिरी दाखल देण्यांत आले. अप्पाखान सरदार कनकगिरी बळकावून बसला होता, ती तो राजे यांस देईना. त्याजबरोबर लढतांना वडील पुत्र संभाजी मारला गेला; तरी नाउमेद न होतां उलट विशेष त्वेषानें लढून शहाजीराजे यांनीं कनकगिरी काबीज केली. पुढें त्यांनीं विजयराघव याचा पराभव करून तंजावर काबीज केलें. हें ठाणें सोईचें व राहण्याला प्रशस्त असें वाटून शहाजीराजे यांनीं तें आपलें मुख्य राहण्याचें ठिकाण केलें. तेथें द्वितीयपत्नी तुकाबाई व पुत्र व्यंकोजी यांसह ते राहूं लागले. नंतर लवकरच त्यांनीं त्रिचनापल्लीहि घेतली. सन १६६२ चे सुमारास बेदनूर प्रांताचा धनाढ्य पाळेगार भद्राप्पानाईक यानें बंडाळी माजवून तो अदिलशाही मुलखास अतिशय उपद्रव करूं लागला. त्याच्या नाशार्थ अदिलशहानें फौज पाठविली. तिच्यावर शहाजीराजे यांची मुख्य सरदार ह्मणून नेमणूक झाली. त्यांच्यापुढें नाईक याचा टिकाव न लागतां तो त्यांना शरण गेला त्याच्याकडे उदरनिर्वाहापुरता कांहीं थोडा प्रांत ठेवून बाकीचा सर्व राजे यांनीं विजापूर सरकारांत खालसा केला व त्याच्यावर आपला ताबा बसविला. हें वर्तमान विजापूर दरबारीं विदित झालें तेव्हां अदिलशहाला मोठा आनंद झाला. सुप्रसन्न मनानें मानपत्र, वस्त्रालंकार, हत्ती-घोडे वगैरे पाठवून शहानें राजे यांचा फार गौरव केला; याप्रमाणें फत्ते झाल्यावर दुसरीं बखेड्याचीं ठिकाणें काबीज करण्याकरतां राजे तुंगभद्राकांठीं बासवपट्टण येथें गेले. तेथून एक दिवस शिकारीला गेले असतां शिकार करतां करतां घोड्याचा एकाएकीं पाय निसटून घोडा व ते एकदम पडले व गतप्राण झाले. व्यंकोजीराजे इतर लोक बरोबर घेऊन तेथें आले व त्यांनीं त्यांची उत्तरक्रिया यथासांग केली. विजापुराहून दुखवट्याचीं पत्रें येऊन मुनसबदारीचीं वस्त्रें व्यंकोजीच्या नांवें आलीं. निधनस्थलीं छत्री बांधवून तेथील खर्चास एक

गांव लावून देण्यांत आला. ही नेमणूक अद्यापपर्यंत चालू आहे. अशा प्रकारें राजे यांच्या चरित्रक्रमाचा शेवट झाला. मृत्युसमयीं त्यांचें वय ७० वर्षांचें होतें.

शहाजीराजे यांनीं आपल्या पूर्व आणि उत्तर वयांत जीं मर्दुमकीचीं कामें केलीं, जीं अत्यंत भानगडीचीं मोठमोठीं राजकारस्थानें रचिलीं, निरनिराळ्या राज्यांत अनेक राजकीय घडामोडी करून मोंगलांसारख्या प्रचल बादशाही सत्तेवर जो आपला दरारा बसविला, अदिलशाही अंमल कर्नाटकावर स्थापित करण्यांत जें अचाट शौर्य प्रकट केलें, अनेक संकटांना न जुमानतां प्रथम निजामशाहीची आणि मागून अदिलशाहीची जी एकनिष्ठ सेवा केली, त्यांवरून ते धाडशी, राजकारणांत प्रवीण, मोठे हिंमत बाज, अत्यंत शूर आणि पूर्ण स्वामिनिष्ठ होते हें तर उघडच आहे. शहाजीराजे यांची मुत्सद्दीपणा विषयीं त्या कालीं मोठी ख्याती होती; इतकेंच नाहीं, तर त्यांच्या तोडीचे राजकारणकुशल पुरुष त्या कालीं फारच विरळा होते असें ह्मटलें तरी चालेल. साबाजी अनंत ह्मणून त्याकालीं एक मोठा राजकार्यधुरंधर पुरुष होऊन गेला; परंतु, त्यासही शहाजीराजे यांनीं मागें सारिलें होतें. देशाभिमान, शूरत्व वगैरे अलौकिक गुण जे शिवरायाचे अंगीं पल्लवित झाले ते शहाजीराजे यांच्यामध्यें अंकुरावस्थेंत होते; तेव्हां शिवाजी सारख्या दिव्य पराक्रमी पुत्ररत्नास शोभनील असेच त्याचे जन्मदाते शहाजीराजे होते यांत संदेह नाहीं. राजे विजापूरदरबारीं असतां मागें शिवरायानें स्वराज्य-संपादनार्थ जी खटपट चालविली होती तिला शहाजी राजे प्रत्यक्ष नाहींतरी अप्रत्यक्षपणें अनुकूलच असावे. निदान शिवरायाच्या मार्गांत ते कधींही आड आलेले इतिहासांत नमूद नाहीं. शिवाय अदिलशाही छत्राखालीं स्वशक्तीच्या जोरावर त्यांनीं बहुतेक स्वतंत्र असें स्वराज्य कोरून ठेविलेलें होतें. यावरून स्वराज्यस्थापनेची मर्यादित महत्वाकांक्षा मनांत धरून शहाजी राजे यांचे प्रयत्न चालले-होते व त्यांप्रमाणें त्यांच्याकडून पूर्वतयारीही झालेली होती, असें ह्मटल्यास हरकत नाहीं. याच पूर्वतयारीस शिवरायानें प्रत्यक्ष साकारस्वरूप प्राप्त करून दिलें.

पितापुत्रामध्यें भेद एवढाच होता कीं, पित्याचे मनांत प्रचलित मुसलमानी सत्तेच्या छत्राखालीं राहून व त्यांच्याच बाजूनें लढण्यांत मोठमोठे पराक्रम गाजवून ते स्वसंतोषानें देतील तितकें साध्य करून घ्यावें व स्वोत्कर्ष करावा, असें होतें. परंतु, पुत्राचे मनांत स्वतंत्रपणें स्वसामर्थ्यबल वाढविण्याचे प्रयत्न करावे व वेळ प्रसंग ताडून पाहून परकी सत्तेचें जड जोखड झुगारून देऊन स्वदेशाची मुक्तता करावी आणि अशा रीतीनें अगदीं स्वतंत्र असें स्वराज्य स्थापित करावें असें होतें. असें जरी होतें तरी शहाजीराजे यांची योग्यता कमी दर्जाची होती असें ह्मणतां येणार नाहीं. त्यांचें वर्तन त्या वेळच्या देशकाल परिस्थितीला अनुसरूनच होतें. सारांश शिवाजीराजे जर स्वराज्य-संस्थापक होत तर शहाजीराजे हे खास स्वराज्याचे संकल्पक होत यांत तिळमात्र संशय नाहीं.

असो; पिता मरण पावल्यावर आपल्या चारित्रनायकानें उघडपणें राजचिन्हें धारण केलीं. शाहिस्तेखानासारख्या बलिष्ठ सरदारासही शिवरायापुढें कांहीं एक न चालतां मूग गिळून स्वस्थ बसावें लागलें, तेव्हां औरंगजेबासही मोठी चिंता उत्पन्न झाली. त्याच्या मनांत विजापूरकर व आपण एक होऊनच झाला तर शिवाजीसारख्या प्रबल झालेल्या शत्रूचा मोड होईल असा विचार आला. त्याप्रमाणें त्यानें आपला एक वकील पत्र देऊन विजापुरास पाठविला. पत्रांतील आशय असा होता कीं, शिरजोर बंडखोर शिवाजी याचा आपण उभयतांनीं एक होऊन वेळींच जर कांटा काढून न टाकला, तर मुसलमानांचें राज्य क्रमें क्रमें साफ नष्ट होऊन त्याचा मागमुसही उरणार नाहीं. येथून त्याच्या पारिपत्यास्तव शूर लढवय्येसरदार ससैन्य पाठविण्याची योजना होत आहे; आपणही तिकडून त्याचा योग्य तो बंदोबस्त करावा. आदिलशहाला ही गोष्ट पसंत पडली व मोंगलांचें सैन्य येण्यापूर्वीच त्यानें खवासखान नामक सरदाराला शिवाजीवर पाठविलें; परंतु मराठी फौजेपुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं. औरंगजेबानें जयपूरचा जयसिंग आणि दिलेरखान या दोघां

पराक्रमी सरदारांस शिवरायाच्या नाशार्थ रवाना केलें. हे दोघे सन १६६५ च्या आरंभास दक्षिणेंत येऊन दाखल झाले. दिलेरखानानें पुरंदरास वेढा दिला व जयसिंगानें सिंहगडाला वेढा घातला. या वेळीं शिवाजीराजे पुणेप्रांतीं हजर नसून ते समुद्रांतील सफरेवर गेलेले होते. नेताजी पालकरही दुसरीकडेच गुंतलेला होता.

पुरंदरचे किल्ल्यावर मराठ्यांकडील सरदार मुरारबाजी देशपांडे म्हणून होता. मोंगली फौज वेढा देण्याकरतां जवळ येतांच त्यांना दाणा वैरण वगैरे कांहीं मिळूं नये अशी त्यानें तजवीज केली व एकाएकीं त्यांचें दारूगोळा वगैरे सामान पेटवून देऊन तें जाळून टाकिलें. तथापि पुनः सर्व व्यवस्था लावून दिलेरखानानें किल्ल्यास वेढा दिला. मुरारबाजी आपल्या हाता खालील दोन हजार निवडक मावळे व हेटकरी लोकांनिशीं इतक्या जोरानें लढत होता कीं, कांहीं दिवस दिलेरखानाची बिलकुल डाळ शिजली नाहीं. शेवटीं मोंगल सैन्यानें मोठ्या शिकस्तीनें खालचा कोट काबीज केला; तेव्हां मराठे वरच्या कोटांत गेले. किल्ला आपल्या आतां बहुतेक हातांत आला असा भरंवसा वाटून मोंगल लोक गाफीलपणें लढूं लागले. वरून मावळे लोकांनीं संधि साधून तोफांचा इतका जोराचा भडिमार सुरू केला कीं, त्याबरोबर मोंगल लोक अवसान सुटून पळत सुटले. मुरारबाजी तर त्यांचा पाठलाग करीत थेट दिलेरखानाच्या तंबूपर्यंत जाऊन भिडला. त्याच्या त्या अतुल राक्षसी पराक्रमाचा सर्वांना मोठा अचंबा वाटला. खानालाही त्यामुळें त्वेष चढून तो आपल्या सर्व लोकांनिशीं मराठ्यांवर धांवून आला. या चकमकींत पुष्कळ मराठे जखमी होऊन धारातीर्थी पतन पावले. मुरारबाजीची ढाल लढतां लढतां तुटून पडली तेव्हां हाताला शेला गुंडाळून तो रणधीर नरपुंगव त्यावर शत्रूचे घाव झेलून जिवाची परवा न करतां लढूं लागला. त्या झटापटींत त्यानें अचूक खानावर तरवारीचा वार केला. अशाप्रकारें घनघोर निकराचें युद्ध चाललें असतां खानानें केलेला वार मुरारबाजीला लागून त्याचें

शीर धडावेगळें होऊन तो गतप्राण झाला. शीर तुटून पडल्यावरही नुसत्या त्याच्या कबंधानें तीनशें मुसलमानांची कत्तल उडविली अशी एक आख्यायिका अद्याप प्रचलित आहे !

स्वराज्यसंस्थापनेच्या पवित्र कार्मी शिवाजीराजे यांना काया-वाचा-मनें करून साहाय्य करण्यांत ज्या रणशूर नरशार्दूल मराठे सरदारांनीं समरांगणावर जिवावर उदार होऊन स्वप्राणांची आहुत्या दिल्या, त्यांतच मुरारबाजींची अग्रेसरपणें गणना होते. ब्राम्हण, प्रभु, मराठे वगैरे सर्व जातींच्या लोकांनीं राष्ट्रहित साधण्यांत कशी शिकस्त करून सोडली व तसें करण्यांत अंतस्थ जातिवैमनस्याला त्यांच्याकडून यत्किंचित् देखील अवकाश मिळाला नाहीं, या तत्कालीन इतिहासाच्या विशिष्ट स्वरूपाचा अमळ विचार केला असतां राष्ट्रहित साध्य होण्यांस आपल्यांतील जातिवैचित्र्यच मुख्यतः आड येतें, अशी सबब कित्येक आधुनिक लोक पुढें आणितात ती किती पोंचट आहे हें व्यक्त होतें. असो; मुरारबाजींचें शव त्याच्या हाताखालच्या लोकांनीं शत्रूच्या हातीं लागूं न देतां त्याचे जरी तुकडे तुकडे झालेले होते तरी ते एकत्र करून त्यांनीं तें शिवाजीराजे यांजकडे पाठविलें. अत्यंत स्वामिनिष्ठ रणसिंह मुराबाजींचें छिन्नविछिन्न झालेलें तें शव पाहून दुःखातिरेकानें शिवरायाचें काळीज करपून जाऊन त्यांच्या मनाची काय स्थिति झाली असेल याची कल्पना वाचकांनींच करावी ! याप्रमाणें सेनानायक पडला तरी किल्ला मोंगलाच्या हातीं लागला नाहीं. जवळील रुद्रमाळ नांवाच्या किल्यावरून पुरंदरवर तोफांचा मारा करण्याची खटपट दिलेरखानानें केली; परंतु कांहीं एक उपयोग झाला नाहीं. पुरंदरच्या वरच्या कोटावर मारा कांहीं केल्या कसा तो लागू होईना व किल्ला हातीं येईना. तेव्हां निरुपाय होऊन जेमतेम वेढ्याचें काम सुरू ठेवून दिलेरखान कोटाखालीं तळ देऊन बसला.

दक्षिणेकडील समुद्रावरच्या मोहिमेवरून शिवाजीराजे पुणें प्रांतीं परत आले, तेव्हां त्यांना मोंगलांचें जंगी सैन्य आपल्यावर चालून आल्याचें समजलें. राजे जयसिंग आणि दिलेरखान हे दोघेही मोठे शूर आणि कर्तृत्ववान सर-

दार होते अशी उत्तरेकडे मोठी ख्याती होती. या ससैन्य दोन लढवय्यां बरोबर युद्ध करण्यांत जरी अखेर विजयश्रीनें माळ घातली, तरी स्वशक्तीचा ऱ्हास होण्याचा संभव आहे, ही गोष्ट चटकन् शिवरायाच्या लक्षांत येऊन चुकली. नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें त्यांनीं आपल्या मातेचा आणि इतर सरदारांचा, या समयीं काय केलें पाहिजे, याविषयीं विचार घेतला. स्वीकृत कार्य राष्ट्रहिताचें आहे तेव्हां जेणें करून कोणतीही गोष्ट करणें झाल्यास ती राष्ट्रहित विघातक होणार नाहीं अशी खबरदारी घेऊनच कठिण प्रसंगाला उक्त असेल तेंच केलें पाहिजे, असा विचार मनांत येऊन शिवाजीराजे बुचकळ्यांत पडले. युद्ध करून जय मिळविला तरी इतक्या उंचीपर्यंत चढविलेली स्वराज्याची इमारत मोठी जबरदस्त धक्का बसून कमजोर होणार, करितां स्वसामर्थ्य तिळमात्र देखील खर्चू न देतां ओढवलेलें संकट दूर कसें होणार याचें त्यांना मोठें गूढ येऊन पडलें. अशा संकट कालीं कुलस्वामिनी भवानी देवीचा जसा हुकूम होईल तसें पुढें आचरण करावयाचें असा त्यांचा परिपाठ असे; त्याला अनुसरून त्यांनीं भवानीमातेचें ध्यान केलें. तेव्हां त्यांच्या अंगांत देवीचा संचार झाला व तिनें पुढील शब्द त्यांच्या मुखानें वदविले, ‘ या हिंदु राजाचा पराभव तुझे हातून होणें नाहीं. त्याजबरोबर तूं तहच कर.’ ती आज्ञा प्रमाण समजून शिवाजीराजे यांनीं युद्धाचा बेत एकदम रहित केला.

या प्रमाणें तह करण्याचेंच निश्चित करून शिवरायांनीं रघुनाथपंडित यांस जयसिंगाकडे पाठविलें. ते जाऊन जयसिंगास भेटले व त्यांनीं त्यास शिवाजीराजे यांच्या मनांतील आशय कळविला. मराठे लोक दिवसा, रात्रीं केव्हांही अचानक एकदम येऊन छापा घालितात; रस्ते, नाकीं, पायवाटा, चोरवाटा सर्व बंद ठेवून पाळतीवर बसतात; रानांस आगी लावून मोंगली फौजेचा एकसारखा पिच्छा पुरवितात; अशाप्रकारें वाटेल त्या मार्गानें मुसलमानी सैन्यास मराठे गनिमी काव्यानें हैराण करीत आहेत, असा परिस्थितीचा विचार करून जयसिंगही तहाचें बोलणें करण्यास कबूल झाला. तो रघुनाथ पंडितांना

ह्मणाला ' औरंगजेब बादशहा बलवान्, पृथ्वीपति, त्यांशीं तुम्ही सख्य करावें; शत्रुत्वानें राहून या कालीं परिणाम लागणार नाहीं. आह्मी हिंदु, जयपूरचे राजे; तुह्मीहि उदेपूरचे थोर घराण्याचे वंशज, तुह्मी हिंदु धर्म स्थापन करिता, यास्तव आह्मी तुह्मास अनुकूल आहोंत; तुह्मी बादशहास शरण याल तर त्याजकडून तुह्मांस माफी देववून कांहीं मुलूखही जहागीर देववूं; याजबद्दल रजपुतांची आणभाक घेऊन तुमची खात्री करण्यास आह्मी तयार आहों. ' असें बोलून दिलेरखानाच्या सल्लयानें जयसिंगानें शिवरायास भेटीस बोलाविलें. त्याप्रमाणें ते उत्तम पोषाख करून जयसिंगाचे भेटीस गेले. शिवाजीराजे आल्याची वर्दी कळतांच जयसिंग सामोरा येऊन त्यानें सन्मानपूर्वक त्यांना आपल्या छावणींत आणिलें आणि आदरानें उच्चासन देऊन आपलया जवळ बसवून घेतलें; या भेटींत शिवरायांनीं त्याच्याशीं जें संभाषण केलें त्यावरून ते किती धूर्त होते व आपल्या भाषणशैलीनें कोणत्याहि खऱ्या हिंदूस स्वपक्षाकडे वळविण्याचें त्यांच्यामध्यें केवढें सामर्थ्य होतें हें दिसून येतें. ते ह्मणाले. ' तुह्मास जे गड पाहिजेत ते मी देतों. पुरंदर देतों, निशाण तुमचें चढवितों, पण मुसलमानास यश न देणें. मी हिंदु. आपण रजपूत, तेव्हां हिंदूच. राज्य मूळचें सर्व हिंदूंचें; आपणासारख्या विद्वान् व हिंदु धर्माचें रक्षण करणाऱ्या थोर पुरुषापुढें मी आपलें डोकें एकदां सोडून दहादां नमवीन. आपण आपल्या धर्माची व देशाची मानहानि होईल असें कधींहि करणार नाहीं. ' असे आपल्या अंगीं अगदीं बाणून गेलेले उदात्त विचार प्रगट करून त्यानें जयसिंगाचा लुप्त धर्माभिमान जागृत केला. शिवरायांची खरी थोरवी त्याला कळून आली. औरंगजेबाचा स्वभाव कपटप्रचुर व संशयखोर होता. ' हिंदूस हिंदु मिळूं नये, ' या हेतूनें जयसिंगाला मदत ह्मणून दिलेरखानास त्याजबरोबर पाठविलेलें होतें. त्याला कोणाचाच विश्वास येत नसे. ह्मणून परस्परांवर दाब रहावा एतदर्थ तो कोणत्याही स्वारीवर दोन सरदारांची योजना करीत असे. आपल्यावर फितुरीचा दोष येऊं नये ह्मणून जयसिंगानें प्रथम दिलेरखानाची भेट घेण्यास शिवाजीराजे यांस सांगितलें.

आपला मामा सुभानसिंग शिवाय ५० निवडक रजपूत शिपाई बरोबर देऊन त्यानें शिवरायांस दिलेरखानाकडे तहाचें बोलणें करण्यास पाठविलें. शिवाजीराजे पाहिजे ते किल्ले स्वाधीन करून तह करण्यास आले आहेत अशा आशयांचा मजकूर जेव्हां सुभानसिंगानें निवेदन केला तेव्हां दिलेरखानास आश्चर्य वाटलें. ' जयसिंग वडील आहेत, ते करतील तें आपल्यास मान्य आहे. ' असें सांगून त्यानें शिवरायांस निरोप दिला. पुढें तहाचीं कलमें ठरून तीं बादशहाच्या मंजुरीकरितां दिल्लीस लिहून कळविण्यांत आलीं. त्यांचा आशय खालीं दिल्याप्रमाणें होता.

औरंगजेब बादशाहाचे जे किल्ले शिवाजीराजे यांनीं काबीज केले असतील त्यांपैकीं पुरंदर, सिंहगड वगैरे २० किल्ले सोडून द्यावे. बाकीचे १२ किल्ले त्यांखालील मुलखांसुद्धां व इतर कांहीं प्रदेश शिवरायाकडे जहागिरी ऐवजी व्हावे. पुत्र संभाजी याच्या नांवें पांच हजार घोडेस्वारांची मनसब करून द्यावी. विजापूर मुलखांतून चौथाई व सरदेशमुखी हे हक्क शिवाजीराजे यांस मिळावे व त्यांबद्दल त्यानीं बादशाहास एक कोटी चाळीस लाख रुपये नजराणा द्यावा.

हा तह उभय पक्षांस अनुकूल असाच होता. चौथाई व सरदेशमुखी या हक्कांबद्दल शिवरायाची फार दिवसांपासून खटपट होती ती फलद्रूप झाली व त्यायोगें विजापूरमुलखांत याउपर वाटेल तसा धिंगाणा घालण्यास त्यांना सवड झाली. त्या राज्याची शक्ति परस्पर क्षीण होऊन तें जिंकण्याचें उद्दिष्ट काम सुलभ झालें असें औरंगजेबास वाटलें. जयसिंगाच्या आग्रहावरून आपण स्वतः दिल्लीस भेटीस येऊं इच्छितों असें शिवरायांनीं बादशहास लिहून कळविलें. परस्पर भेटी प्रतिभेटी, मेजवान्या प्रतिमेजवान्या वगैरे होऊन शिवाजीराजे व जयसिंग यांच्या मध्यें स्नेहभाव पुष्कळ वृद्धिंगत झाला.

तहाचीं कलमें कबूल होऊन बादशहाकडून शिवरायांस पत्र आलें. त्या प्रमाणें सिंहगड, पुरंदर वगैरे किल्ले खाली करून ते मोंगलाचे ताब्यांत देण्यांत

आले. त्या त्या किल्ल्यांवर मोंगलांनीं आपलीं निशाणें चढविलीं. फौज फार कमी असल्यामुळें सिंहगड, लोहगड व पुरंदर या तीन किल्ल्यांचाच फक्त उत्तम बंदोबस्त जयसिंगास करितां आला. शिवरायांच्या इमानाची खात्री होण्यास्तव बादशहानें विजापूर जिंकण्यांत जयसिंगास त्यांनीं मदत करावी असा हुकूम केला. लिहिल्याप्रमाणें तुम्हीं खुद्द दिल्लीस मुलाकतीस यावें ह्मणजे सर्व ह्मणणें ऐकून घेऊन मुद्दे असतील त्यांचा खुलासा समक्ष करूं. कोणत्याहि प्रकारें काळजी अगर दिक्कत धरूं नये. बेलाशक भेटीस यावें अशा मजकुराचें औरंगजेबाचें पत्र आलें. अशा रीतीनें हा तह तडीस गेला. प्रस्तुत ओढवलेलें संकट टळलें. शिवाजीराजे सहज ताब्यांत आले असें वाटून फार दिवसांचा विजापूर जिंकण्याचा हेतु सिद्धीस नेण्यास औरंगजेबास विशेष हुरूप आला.

वरील तहाचें बोलणें घाटत असतां शिवाजीराजे यांनीं एक निराळेंच बोलणें जयसिंगाशीं चालविलें होतें. तें बोलणें ह्मणजे जंजिऱ्याचा किल्ला व प्रांत आपल्या ताब्यांत असावा असें त्यांनीं मागणें केलें. जंजिरा ताब्यांत याल तरच तहांत ठरलेले सर्व किल्ले खालीं करून देण्यांत येतील, अशी शिवरायांनीं धमकीही देऊन पाहिली. परंतु ही मागणी बादशहाची परवानगी नसल्यामुळें जयसिंगास मंजूर करितां आली नाहीं. या मागणीवरून, प्रस्थापित स्वराज्यरूपी मंदिराची पश्चिम समुद्रकिनारा ही मजबूत अशी भिंत असून तिचें उत्तम संरक्षण झालें पाहिजे व तिचें महत्त्व विशेष आहे, या गोष्टी शिवरायांच्या लक्षांत आलेल्या होत्या, असें सिद्ध होतें. जंजिऱ्याचे सिद्दीनें जंजिरा आपल्या ताब्यांतून जाऊं न देण्याविषयीं या वेळीं फारच खटपट केली व त्यामुळें शिवाजीराजे यांनीं जंजिरा मिळण्याविषयीं घातलेला घाट फसला. तसें न होतां जर तो डाव साधला असता तर पुढील इतिहासाला कांहीं निराळेंच स्वरूप प्राप्त झालें असतें. यापुढील अल्प आयुष्यक्रमांत समुद्राचे बाजूनें जोराचे प्रयत्न करण्यास दुसऱ्या अनेक राजकीय भानगडींमुळें शिवरायांस पुरेसा अवकाश मिळाला नाहीं व त्यांचें चरित्रही मृत्यूनें अकालीं खुंटविलें हें महाराष्ट्रीयांचें दुर्दैव होय !

बादशहाच्या हुकमाप्रमाणें जयसिंगानें लागलीच आपला मोर्चा विजापूरकरांविरुद्ध फिरविला व त्या कामीं त्यानें शिवरायांस आपल्या साहाय्यास बोलाविलें. ते मोठ्या आनंदानें नेताजी पालकर यास बरोबर घेऊन मोठ्या सैन्यानिशीं जयसिंगाच्या मदतीस गेले. या युद्धांत मोठमोठे पराक्रम करून शिवाजीराजे यांनीं विजापूरकरांचे पुष्कळ किल्ले व मुलूख सर केले. याच युद्धांत फलटणचा प्रांत जिंकून त्यांनीं मंगळवेढें काबीज केलें. या युद्धांत व्यंकोजीराजे ( शिवरायांचे सापत्नबंधु ) विजापूरकरांचे तर्फेनें लढण्यास आले होते असें ह्मणतात; परंतु उभयबंधूंचा सामना झाला नाहीं. कारण तितक्यांत बादशहाच्या आमंत्रणावरून शिवरायांस दिल्लीस निघून जावें लागलें. अशा रीतीनें शिवरायांचें या युद्धांत जयसिंगास उत्तम प्रकारें साहाय्य झालें, त्याबद्दल त्यांचा विशेष गौरव करून जयसिंगानें सर्व हकीकत बादशहास पत्रद्वारा लिहून कळविली. तें पत्र वाचून बादशहानें शिवाजीराजे यांस दिल्लीस आपल्या भेटीस बोलाविलें.

दिल्लीपतीच्या निमंत्रणाप्रमाणें शिवाजीराजे दिल्लीस जाण्यास तयार झाले. तसें करण्यांत अनेकप्रकारें धोका आहे हें ते जाणून होते. औरंगजेबाचा स्वभाव अत्यंत कपटी असून तो कोणत्या वेळीं कसा दगा देईल; स्वतःच्या जिवास कांहीं अपाय झाला असतां आजपर्यंत स्वराज्यस्थापनेचे केलेले महत्प्रयास विफल होतील, आपल्या पश्चात् स्वराज्यावर शत्रूंचा घाला पडल्यास त्याचें निवारण कसें काय होईल, वगैरे शंका मनाला न शिवतां ते एकदम अविचारीपणानें दिल्लीस जाण्यास सिद्ध झाले अशांतला भाग नव्हता. त्यांनीं या सर्व गोष्टींचा पूर्ण विचार केलेला होता. दिल्लीस जाण्याविषयीं जयसिंगाचा त्यांना फार आग्रह होता. तेव्हां आपल्या जिवाला कांहीं अपाय न होण्याविषयीं जयसिंगाकडून प्रथम त्यांनीं हमी घेतली. जयसिंगाचा पुत्र रामसिंग दिल्लीस होता त्याला शिवाजीराजे यांच्या केसासही धक्का पोंचूं देऊं नये अशा विषयीं जयसिंगानें पत्र लिहिलें. नंतर जयसिंगाचा निरोप घेऊन शिवाजीराजे रायगडीं

आले. त्यांनीं तेथें सल्लागार मंडळी जमवून त्यांच्यामध्यें दिल्लीस जाण्यासंबंधानें पुष्कळ वाटाघाट केली माता जिजाबाईचेंही अनुमोदन घेतलें. शेवटीं नेहमींच्या त्यांच्या संप्रदायाप्रमाणें त्यांनीं श्रीभवानीमातेला कौल लाविला व कौलही जावें असाच मिळाला, तेव्हां जाण्याचाच निश्चय कायम झाला

याप्रमाणें जाण्याचें निश्चित ठरवून निघण्यापूर्वी शिवरायांनीं स्वराज्याचा आपल्या पाठीमागें बंदोबस्त कसा रहावा, याविषयीं जी व्यवस्था करून ठेविली तिचा विचार केला असतां त्यांच्या आंगच्या विलक्षण धूर्ततेची, शहाणपणाची आणि दूरदर्शीपणाची जितकी स्तुति करावी तितकी थोडीच होणार आहे. प्रथम त्यांनीं स्वतः सर्व किल्ल्यांची उत्तम प्रकारें तपासणी केली. सर्व ठिकाणचा उत्तम बंदोबस्त केला. रूवांना अगदीं सावध रहाण्याविषयीं त्यांनीं ताकीद दिली. सर्व राज्यकारभार हांकण्याकरितां त्यांनीं एक मंत्रिमंडळ स्थापिलें; त्यांत जिजाबाई आपल्या ठिकाणीं आहेत असें समजून त्यांच्या आज्ञेनें पेशवे–मोरोपंत पिंगळे, सुरनीस–अण्णाजी दत्तो व मुजुमदार–निळो सोनदेव यांनीं वागून सर्व राज्यकारभार पहावा असें शिवाजीराजे यांनीं ठरविलें. दैववशात् आपल्या जिवास कांहीं अपाय झाली तरी न डगमगतां तुम्ही पुत्र राजाराम यास घेऊन नेटानें स्वराज्य रक्षावें, स्वराज्यसंपादनाचें काम बंद पडूं देऊं नये, असें निर्वाणीचें सांगणें त्यांनीं सर्वांस सांगून ठेविलें. समागमें पुत्र संभाजी, तानाजी मालुसरे, बाळाजी आवजी, प्रतापराव गुजर वगैरे विश्वासपात्र, शूर, पराक्रमी माणसें घेऊन फौज, खजिना वगैरे लवाजम्यानिशीं उत्तम बंदोबस्तानें शिवराया दिल्लीस जाण्यास निघाले.

वरच्याप्रमाणें स्वराज्याची निरवानिरव करणें शिवरायांसारख्या अत्यंत धोरणी, बुद्धिमान्, शूर आणि राजकार्यधुरंधर पुरुषासहि आवश्यक असें वाटलें, यावरून हा प्रसंग किती आणीबाणीचा होता हें सांगावयास नकोच. या प्रसंगाला इतिहासकारांनीं मराठी राज्यावरील भयंकर आपात ( संकट ) असें म्हटलें आहे तें उगाच नाहीं. पूर्वी अफझूलखानाच्या वधप्रसंगीं, शाहिस्ते-

स्तानाच्या शासनप्रसंगीं, शिवरायाला स्वतःचे प्राण धोक्यांत घालणें भाग पडलें होतें; परंतु याप्रसंगीं औरंगजेबासारख्या अत्यंत महत्वाकांक्षी, अतिशय कपटी, प्रचंड कारस्थानी, अगदीं अविश्वासी आणि दगेखोर अशा प्रबल सार्वभौम बादशहाच्या कचाटींत आपण होऊन आपले प्राण देण्यासारखें होतें. परंतु अशा या नाजुक प्रसंगांत जाणूनबुजून उडी घालण्यांत शिवाजीराजे यांस तशींच कांहीं सबळ कारणें असून त्यांच्या मनांत स्वराष्ट्रोत्कर्षक असें कांहीं तरी महत्वाचें आमिष असलें पाहिजे, हें उघड आहे. एक तर आपल्या पाठीमागें स्वराज्याची व्यवस्था कशी काय राहते, आपल्या साथीदारांचें मनःसामर्थ्य आणि कर्तृत्वशक्ति यांची आपल्याबरोबर कितपत तयारी झालेली आहे, दक्षिणेंत आजुबाजूला मुसलमानांचा धुमाकूळ चालू असतां आपण हजर नाहीं असें पाहून स्वराज्यावर कांहीं अरिष्ट येऊन आदळलें तर आपल्या साह्यकारी मंडळीचें इमान, शौर्य, स्वामिनिष्ठा, देशभक्ति आणि कारस्थानीपणा इत्यादि गुण कितपत कसाला उतरतात, वगैरे वगैरे अनेक गोष्टींची पारख होऊन राष्ट्रैक्यबल किती वाढलें आहे तें समजेल. ' दिल्लीश्वरोवा जगदीश्वरोवा ' असे स्तुतिपाठ ज्या सार्वभौम सत्तेचे गाईले जातात तिचें असें वैभव तरी काय आहे। दिल्ली दिल्ली ह्मणजे असें आहे तरी काय ? त्या सत्तेची अंतःस्थिति व व्यवस्था कशी काय आहे, उत्तरेंतील रजपूत सरदारांच्या भेटीगांठी पडून त्यांचें हृद्गत काय आहे, त्यांच्या मनोविकारांची आणि विचारांची दिशा कोणती आहे, ते आपल्या उद्दिष्ट राष्ट्रकार्यास अनुकूल होण्याचा संभव आहे किंवा कसें, स्वीकृत देशकार्याची मजल तेथपर्यंत मारतां येणें कितपत शक्य व साध्य होईल, तिकडील साधारण प्रजाजन त्या सत्तेच्या राज्यव्यवस्थेनें संतुष्ट आहेत किंवा त्यांच्या मनांत असंतोषाचें बीज रुजलेलें आहे, इत्यादि पुष्कळ गोष्टींची आपल्याला माहिती होईल. अशा प्रकारचे अनेक फायदे मनांत आणून त्यांच्यापासून आपल्या पुढील कार्यक्रमास पुष्कळ उपयोग होईल, या उच्च हेतूनेंच शिवरायांनीं हें धाडस केलें असावें, यांत संशय नाहीं.

अस्तु: शिवाजीराजे निघाले ते प्रथम औरंगाबादेस जाऊन जयसिंगास भेटले. दिल्लीस आपली व्यवस्था चांगली रहावी अशा विषयीं जयसिंगाकडून त्यांनीं दिल्लीस पत्रें लिहविलीं. बादशाहापुत्र प्रवासावर निघाले असतां त्यांची मार्गांत जशी सुव्यवस्था राहते तशी शिवरायाची मार्गांत सुव्यवस्था रहावी अशा विषयीं प्रांतोप्रांतीं बादशाही अंमलदारांस दिल्लीपती कडुन पत्रें गेलेलींच होतीं. मुक्काम करीत करीत शिवाजीराजे मथुरेस गेले व तेथून ते दिल्लीस जाऊन पोहचले. रामसिंगाची व त्यांची भेट झाली. बादशहाची व आपली भेट बरोबरीच्या नात्यानें व्हावी, अशी शिवरायांनीं आपली इच्छा प्रगट केली. परंतु तसें होणें शक्य नाहीं असें सांगून रामसिंगानें त्यांची समजूत केली. ठरलेल्या दिवशीं शिवाजीराजे पुत्र संभाजीसह रामसिंगाबरोबर दिल्लीपतीच्या भेटीस दरबारीं गेले. शिवरायांनीं रीतीप्रमाणें बादशाहास सलाम केल्यावर त्यानें त्यांस जसवंतसिंग नामक रजपूत सरदाराचे खालचे बाजूस उभें राहण्यास सांगितलें. हा आपमान त्या मानी वीरपुरुषास सहन न होऊन त्याबद्दल तेथल्या तेथेंच त्यानें बादशहाच्या वर्तनाविषयीं आपला तिरस्कार व्यक्त केला. त्यामुळें बादशाहास शिवरायांविषयीं संशय येऊन त्यांचा रागही आलेला दिसला. नंतर कांहीं औपचारिक कुशल प्रश्न करून त्यानें त्यांस बिन्हाडीं परत जाण्याला रजा दिली व त्यांच्यावर चांगली नजर ठेवण्याविषयीं रामसिंगास हुकूम केला. तें काम करण्यासंबंधी रामसिंगानें आपली नापसंती दर्शविल्यावरून पुढें बादशाहानें शिवरायांस शहरचा कोतवाल पोलादखान याच्या स्वाधीन केलें व त्यांच्या वर ५००० स्वारांचा पहारा ठेवून दिला. परवानगीशिवाय कोणी त्यांच्या भेटीस जाऊं येऊं नये असा कडेकोट बंदोबस्त करण्यांत आला. ही व्यवस्था पाहून शिवरायांच्या डोळ्यांपुढें एकदम चक्क उजेड पडला. दिल्लीस येण्यांत आपण मोठी चूक केली असें त्यांस वाटूं लागलें. प्रचंड शक्ती अंगीं असलेला वनराजा—सिंह जसा पिंजऱ्यांत कोंडला जावा तशी या नर केसरीची कहींशी स्थिति झाली. आपल्यावर कोणता

भयंकर प्रसंग येऊन गुदरला आहे हें शिवाजीराजे यांनीं ओळखिलें. परंतु अशाही बिकट संकटकालीं तिळमात्र देखील न गडबडतां विलक्षण बुद्धिमत्ता खर्च करून त्यांनीं जी एक चमत्कार वाटण्यासारखी युक्ति योजिली व यशसंपादन केलें, त्या वरून त्यांचें धाडस किती भयंकर होतें, त्यांचें दूरदर्शित्व किती विलक्षण होतें, त्यांची कल्पकता किती अचाट होती, त्यांचें चातुर्य किती प्रशंसनीय होतें व त्यांच्या अनुयायी जनांची स्वामिनिष्ठा किती उज्वल व उत्कट होती या गोष्टींचें प्रतिबिंब स्पष्टपणें दृग्गोचर होतें. अशा प्रकारें पेंचांत येऊन पडल्यावर पहिली गोष्ट त्यांनीं केली ती ही कीं, बादशहाची परवानगी घेऊन बरोबरची सर्व फौज त्यांनीं परत देशीं पाठवून दिली. फक्त कांहीं निवडक विश्वसाचीं माणसें जवळ ठेवून घेतलीं. आपल्यालाही तितका खर्च कमी झाला असें वाटून बादशहाला ही गोष्ट बरीवाटली. नंतर कांहीं दिवस लोटल्यावर आपली प्रकृति अस्वस्थ असल्याबद्दल आपल्या पदरच्या लोकांकरवीं त्यांनीं शहरांत बातमी पसरविली. अमीर उमरावादि बडे-लोक त्यांच्या समाचारास येऊं लागले. पुढें आजार वाढून शरीरस्वास्थ्यफारच बिघडल्याविषयीं बहाणा करून विशेष कोणी भेटावयास वगैरे येऊं नये अशी इच्छा दर्शवून त्याप्रमाणें त्यांनीं तजवीज ठेविली. वैद्य हकीमादिकांचे औषधोपचार सुरू कराविले. पुढें बराच काळ गेल्या नंतर प्रकृति बरीच सुधारत चालली आहे असेंही वर्तमान त्यांनीं प्रसृत केलें. प्रकृतीला आराम वाटल्याबद्दल आनंदप्रदर्शित करण्यास्तव वैद्य, हकीम, अमीरउमराव इत्यादिकांकडे मेवामिठाई आणि फळफळावळ यांनीं भरलेले पेटारे पाठविण्याचा त्यांनीं क्रम सुरुकेला. प्रथम प्रथम थोडे दिवस ते पेटारे तपासून पहारेकरी बाहेर सोडीत असत परंतु पुढें विश्वास पटून तपासणी न करतां ते पेटारे सोडून देऊं लागले. ही संधि साधून एकेदिवशीं सायंकाळीं हिरोजी फर्जंद नांवाच्या आपल्या विश्वासू नोकरास आपल्या बिछान्यावर निजवून पुत्र संभाजी व आपण निरनिराळ्या दोन मिठाईच्या पेटाऱ्यांत बसून संकेताप्रमाणें ते शहराबाहेर निघून गेले. दुसरे

दिवशीं प्रात:काळीं हिरोजीही औषध आणण्याचें निमित्त करून निघून गेला. ते निघून गेले ही बातमी दुपारानंतर बादशहाचे कानावर गेली; तेव्हां त्यानें तपास करण्याविषयीं सक्तीचे हुकूम फर्माविले. औरंजेब मोठा कावेबाज, विलक्षण धूर्त व परकाष्ठेचा कपटी व अविश्वासी पुरुष होता तरी त्याच्या-हातावर तुरी देऊन शिवाजीराजे निसटून गेले. अशा रीतीनें या भयंकर संकट प्रसंगांतून या अजब धोरणी नरपुंगवानें आपली मुक्तता करून घेतली.

शिवरायां बरोबर जीं थोडीं विश्वासाचीं माणसें दिल्लींत होतीं तीं पूर्वींच कोणालाही संशय न येईल अशारीतीनें हळुहळू एकेक निघून गेलेलीं होतीं. पूर्वसंकेतानुरूप शहराबाहेर दोन उत्तम घोडे सज्ज करून ठेविलेले होते त्यांच्यावर स्वार होऊन शिवाजीराजे पुत्रासह दूर निघून गेले. संकेतस्थानीं इतर मंडळीही त्यांना येऊन मिळाली. तेथून सर्वांनीं वेषांतर करून भिन्न-भिन्न मार्गांनी ते दक्षिणेंत येण्यास निघाले. शिवाजी यांनीं एकदम थेट दक्षिणेचा मार्ग स्वीकारिला नाहीं, कारण तसें करणें धोक्याचें होतें. ते प्रथम मथुरेंत गेले. तेथें कृष्णाजीपंत, काशीपंत व विसाजीपंत ह्मणून त्रिवर्ग बंधु रहात असत. ते विश्वासार्ह होते. त्यांच्या घरीं पुत्र संभाजीस त्यांनीं ठवून दिलें. पुढें प्रयाग, काशी, गया वगैरे ठिकाणीं जाऊन, त्यांनीं यथाविधि तिरस्थळी यात्रा केली. तेथें त्यांनीं यथोचित पुष्कळ दान-धर्म केला. तेथून पुढें जगन्नाथपुरीला जाऊन गोंडवणांतून ते खालीं दक्षिणेंत उतरले भाग:-नगरावरून विजापूर मार्गानें घर सोडल्यापासून सुमारें दहा महिन्यांनीं शिवाजी राजे सुखरूप येऊन रायगडीं पोहोंचले. आधीं मागें संभाजी व इतर मंडळीही सुरक्षित येऊन दाखल झाली.

शिवाजीराजे स्वदेशीं सुरक्षितपणें येऊन पोंहोचल्याचें शुभ वर्तमान हां हां ह्मणतां जिकडे तिकडे पसरलें. सर्वांच्या मुखांवर त्यानें आनंदाची छटा दिसू लागली. लोकांनीं घरोघर मोठा आनंदोत्सव केला. किल्लोकिल्ल्यांवरून तोफांची सरबत्ती झडली. शिवरायांनीं आपल्या अनुयायांस योग्यतेनुरूप

मोठमोठीं पारितोषिकें देऊन अगदीं संतुष्ट केलें. आपल्या लोकांच्या कर्तबगारी-विषयीं आणि पूर्ण स्वामिनिष्ठेविषयीं त्यांना पराकाष्ठेचा अभिमान वाटूं लागला अशा प्रकारें शिवरायांच्या जिवावरचें महत्संकट टळून स्वराज्यसत्तेवर गुदर-लेल्या भयंकर आपाताचें निरसन झालें. आह्मां महाराष्ट्र वासियांस सानंद अभिमान वाटण्यासारखी गोष्ट ही कीं, शिवाजीराजे जरी दहामहिनेपर्यंत स्वराज्यांत स्वस्थानीं हजर नव्हते, तरी या अवधींत त्यांच्यामागें सर्व व्यवस्था यथास्थित चालली. सर्वांनीं आपापलीं कामें अगदीं चोख बजाविलीं. जण काय कांहींच कोठें कमजास्त घडून आलें नाहीं, अशा रीतीनें बिनबोभाट सर्व राज्यशकट सुरक्षित चाललें. मोंगली सैन्याच्या कब्जांत कांहीं किल्ले व सभों-वारचा मुलूख असून त्यांचा आसपास धुमाकूळ चालला होता, तरी एकही मनुष्य देशद्रोह करून शत्रूला जाऊन मिळाला नाहीं, हें तत्कालीन लोकांस तसेंच महाराष्ट्र स्वराज्यस्थापनेच्या इतिहासास विशेष भूषणास्पद आहे. या स्वराज्यावर ओढवलेल्या संकटापासून एकंदरींत कांहीं एक तोटा न होतां उलट राष्ट्रास पुष्कळ फायदेच झाले. राष्ट्रांत स्वराज्य उत्तम प्रकारें चालविण्याचा जोम लोकांच्या अंगीं किती आला होता याची उत्तम कसोटी लागली. दिल्ली-पतीच्या वजनाची शिवरायास चांगली अटकळ बांधतां आली: दिल्लीपद बाद-शाहीचा सर्वांना जो विलक्षण बाऊ वाटत होता तो त्यांचे मनांतून पार नष्ट झाला. मोंगली दरबार, मोंगली मुत्सद्दी, मोंगली सरदार, मोंगली सैन्य, मोंगली राज्यव्यवस्था आणि मोंगली राजनीति इत्यादि अनेक गोष्टींचें सूक्ष्म परीक्षण करावयास मिळून तदनुसार पुढील कार्यपरंपरा शिवाजी राजे यांस ठरवितां आली. दिल्लीपतीची सत्ता अंशा अंशानें कमी कमी होत जाऊन अखेर ती लय पावणार असें शिवरायांच्या ज्ञानचक्षूंस स्पष्टपणें कळून चुकलें. या एकंदर हकीकतीवरून शिवरायांनीं आरंभिलेल्या, स्वराज्यसंस्थापनेसारख्या राष्ट्रीय कार्जांत तनमनधनादि सर्वस्व खर्च करण्याकडे एकंदर जनसमाजाचा कसा लक्ष लागून गेलेला होता, हें उत्तम प्रकारें निदर्शनास येतें.

या प्रमाणें शिवाजी हातचा अचानक निसटून गेलेला पाहून औरंगजेब बादशाहा अतिशय क्रुद्ध व रुष्ट झाला. या कृत्यांत जयसिंग व त्याचा पुत्र रामसिंग यांचें आंतून अंग असलें पाहिजे असा संशय येऊन बादशहाची त्यांच्यावर इतराजी झाली. त्यानें जयसिंगास परत बोलाविलें. रामसिंगास दरबार बंद केलें जयसिंगाचे जागीं यशवंतसिंग नामक रजपूत सरदाराची नेमणूक करून त्याला बादशहानें दक्षिणेंत पाठविलें. दिल्लेरखानाचीही त्यानें उत्तरेकडे माळव्यांत बदली केली व त्याचे जागीं शहाजादा मुआज्जम यास त्यानें नेमिलें कोणावरच विश्वास नसल्यामुळें वरचेवर सरदारांची हालवा-हालव करण्यांत दिल्लीपतीचें फार नुकसान होतें. परंतु अपकर्ष व्हावयाचा असला म्हणजे मनुष्य कितीही धूर्त व कावेबाज असला तरी त्याची चूक त्याला कळत नाहीं. तशीच बहुतेक स्थिति औरंगजेबाची झालेली होती. बादशहाला शिवरायांच्या सुटकेमुळें चीड आली होती तर इकडे महाराष्ट्र वीरांनाही कपटप्रचुर बादशहानें शिवरायांना फसवून गिरफदार केल्यामुळें मोंगलराज्यरूपी जुनाट खोडाचे तुकडे तुकडे उडवून केव्हां सूड घेऊं असें झालें होतें. यामुळें कांहीं दिवस तहकूब असलेल्या या दोन सत्तां मधील युद्धानें पुनः जोरानें उचल खाली.

शिवाजीराजे परत येण्यापूर्वीच मोरोपंत पिंगळ्यांनीं मोंगलाकडे गेलेले किल्ले परत घेण्याचा धूमधडाका चालविलाच होता. शिवरायांनीं परत आल्याबरोबर कल्याण प्रांत व पुण्याच्या उत्तर बाजूचे कांहीं किल्ले परत घेतले. या समयीं देखील आपल्या नेहमीच्या शीलाप्रमाणें शिवरायांनीं आपला कार्यभाग साधून घेतला. शहाजादा व यशवंतसिंग यांच्या बरोबर युद्धप्रसंग आणण्याचें त्यांनीं टाळलें त्यांना पैसे भरून त्यांनीं खुष केलें. त्यांच्या मार्फत बादशहाची समजूत पाडून पूर्वीचाच तह कायम करविला. इतकेंच नाहीं, तर आणखीही कांहीं स्वतःला अनुकूल बाबी त्यांनीं त्याच्याकडून कबूल करून घेतल्या. त्या अशा कीं, बादशहानें शिवरायांस राजा हा किताब दिला. अर्थात् या

कलमानें त्यानें मराठ्यांचें स्वतंत्र राज्य स्थापित झाल्याबद्दल आपली कबुली दर्शविली. वऱ्हाडप्रांतीं एक नवी जहागीर शिवाजीराजे यांस देण्यांत आली. शिवरायांस मनगटाचे जोरावर उघडपणें जिंकून ताब्यांत आणण्याचे प्रयत्न निष्फल झालेले पाहून अशा प्रकारच्या नवीन सवलती दिल्यानें ते खुष होऊन पुन: केव्हां तरी आपल्या कपटजालांत अडकून पडतील असा औरंजेब बादशाहाचा अशा तऱ्हेचा तह करण्यांत कपटहेतु असावा; परंतु तो आगदीं विफल झाला, असें पुढील वृत्तांतावरून दिसून येईल.

खरोखर पाहतां या तहानें मराठ्यांचे फायदेच पुष्कळ झाले. शिवाजीराजे यांनीं बलाढ्य दिल्लीपतीच्या वैभवपूर्ण प्रचलित सत्तेला धाब्यावर बसवून स्वतंत्र स्वराज्यसंस्थापना केली व तिचें स्वातंत्र्य बादशाहाकडून उघड उघड कबूल करून घेतलें. एवढ्यावरून दक्षिणेंत मराठ्यांचें स्वतंत्र राज्य पूर्णपणें स्थापित झालें याबद्दल कोणालाही आतां शंका उरली नाहीं. इकडील राजेरजवाडे व एकंदर लोकसमूह यांच्याकडून शिवरायांना राजा हा मान मिळूं लागला. वऱ्हाडांतील जहागीर संभाळणें व संभाजीनें बादशाही फौजेंत मनसबदारी करणें या तहांतील दोन अटींमुळें सरहद्दीवर औरंगाबाद येथें कायमचें सैन्य ठेवून तिचें रक्षण करण्याची शिवरायांस आयतीच संधी मिळाली. प्रतापराव गुजर यास या फौजेवर सेनापती नेमून त्यांनीं त्यांस मोंगलांच्या हालचालींवर नजर ठेवावयास सांगितलें. या व्यवस्थेनें मोंगलांसंबंधीं बंदोबस्त ठेवण्याचेंही काम सुलभ झालें. सांप्रत इंग्रजसरकारची जशी वायव्य सरहद्दीवरची व्यवस्था आहे तशीच बहुतेक शिवरायांची ही व्यवस्था होती. हा तह करून शिवाजीराजे यांनीं दिल्लीपतीचें मांडलिकत्व पतकरिल्यासारखें दिसतें. परंतु इतर रजपूत राजे मांडलिकत्वाखालीं येऊन बादशाही सत्तेची प्रत्यक्ष नोकरी करून राहत असत; तसें न करितां शिवरायांनीं मनसबदारी आपल्या अल्पवयी मुलाच्या नावानें करून घेतली व स्वत:च्या राज्याचा कारभार पाहण्यास आपण

स्वतः अगदीं स्वतंत्र राहिले. हा फरक विशेष महत्वाचा असून ध्यानांत ठेवण्यासारखा आहे.

हा तह फार दिवस टिकला नाहीं. मोंगल आणि विजापूरकर यांच्या मध्यें चालू असलेलें युद्ध तह होऊन बंद पडलें. मराठ्यांकडून राज्याला होत असलेला उपद्रव या पुढें होऊं नये म्हणून विजापूर व गोवळकोंडा येथील सुलतानांनीं शिवाजीराजे यांस चौथाई व सरदेशमुखी या हक्कांबद्दल उघड उघड अनुक्रमें तीन लाख व पांच लाख रुपये देण्याचें कबुल केलें. अर्थात् हीं गोष्ट औरंगजेबास रुचली नाहीं. तशांत शहाजादा आणि यशवंत सिंह उलट शिवरायांना गुप्तपणें मदत करतात हें पाहून तर दिल्लीपतीचा क्रोध अनावर झाला. एकदम शिवरायांशी युद्ध सुरू करून त्यांचा पाडाव करण्याविषयीं त्यानें शहाजाद्यास पत्र लिहिलं. बादशाहाचा हेतु शिवरायांस कळवून शहाजाद्यानें प्रतापराव गुजर यास औरंगाबादेकडून फौज घेऊन निघून जाण्याची सूचना केली. त्याप्रमाणें प्रतापराव पुर्ण प्रांतीं निघून आला व बंद असलेलें युद्ध पुन: जोरानें सुरू झालें.

औरंगजेबाचा हेतु कळतांच शिवरायांनीं युद्धाची कडेकोट तयारी चालविली. पुरंदर व सिंहगड हे दोन किल्ले तहानें मोंगलांच्या ताब्यांत गेलेले होते, तेच प्रथम त्यांच्यापासून हिसकावून घेतल्यानें आपला खरा प्रभाव प्रकट होणार आहे असें समजून तेच आधीं सर करण्याचा त्यांनीं निश्चय केला. सिंहगडावर शत्रूचा अत्युत्तम बंदोबस्त असून तो काबीज करण्याचें काम मोठें बिकट होतें, या कामीं कोणाची योजना करावी या विषयीं शिवरायांना विचार पडला. तानाजी मालुसरे त्यांचा बाळपणापासूनचा जिवलग मित्र असून त्यांच्या अत्यंत विश्वासांतील होता. हें बिकट काम फत्ते करून पार पाडील तर हाच पाडील असा शिवरायांचे मनांत विचार आला. त्याप्रमाणें माता जिजाबाईंनीं मालुसरे यास बोलावून आणुन त्याला ही गोष्ट कळविली. या समयीं तानाजी आपल्या मुलाच्या लग्नाच्या खटपटींत होता. स्वामिकार्य आणि देशकार्य यांच्यापुढें स्वतःचें खाजगी कार्य केवळ तुच्छ होय असें समजून त्यानें लग्नाचें काम

बाजूला सारिलें. ' आपला धाकटा भाऊ सूर्याजी व एकहजार निवडक मावळे गाडी यांना बरोबर घेऊन सिंहगड आपण ताब्यांत आणतों ' असें हिंमतीचें आणि आवेशपूर्ण भाषण करून व शिवरायांची परवानगी घेऊन तो आपल्या लोकांनिशीं त्या स्वारीवर निघाला. रायगडावरून निघून एका अंधारे रात्रीं तो सिंहगडाखालीं येऊन दाखल झाला. किल्ल्यावर उदेभानू नांवाचा एक नामांकित रजपूतवीर मुख्य होता. या किल्ल्यावरील मोंगलांच्या सैन्याचा, तेथील त्यांच्या कडेकोट व जय्यत तयारीचा आणि त्या अवघड माऱ्याच्या जागेचा विचार करतां, थोड्याशा मावळे शिपाईगड्यांनीं हा किल्ला काबीज करण्यास सिद्ध होणें ह्मणजे हें काम खरोखरच विलक्षण धाडसाचें आणि मर्दुमकीचें होतें. तानाजीनें आपल्या लोकांच्या दोन टोळ्या करून एकीवर आपण मुख्य झाला आणि दुसरीवर त्यानें आपल्या भावाला मुख्य नेमिलें. आपल्या टोळीसह एका अनोळखी अवघड वाटेनें तानाजी किल्ल्यावर चढण्याचा प्रयत्न करूं लागला. व आपला भाऊ सूर्याजी याला त्याच्या टोळीसह मागें मदतीसाठीं त्यानें ठेवून दिलें. पहिल्याप्रथम तानाजीच्या टोळींतील एक हुशार व चपळ मावळागडी घोरपडीला दोरी बांधून तिच्या साह्यानें तटावर चढला. तेथून त्यानें सोडलेल्या दोरखंडाला धरून तीनशें मावळेगडी एकामागूनएक वर चढले व तेथून ते आंत किल्ल्यांत उतरले. त्यांची उदेभानूच्या रजपूत शिपयांस चाहूल लागून त्यांनीं एकदम मावळे लोकांवर जोराचा हल्ला केला. कांहीं वेळ उभय पक्षांमध्यें मोठें तुंबळ आणि निकराचें रणकंदन झालें. त्यांत पन्नास मावळे आणि पांचशें रजपूत कामास आले. त्याच वेळीं तानाजी आणि उदेभानु या दोन हिंमत बहाद्दर सेना नायकांची प्रत्यक्ष समरांगणीं गांठ पडून त्यांचा घनघोर संग्राम झाला. शेवटीं ते दोघेही वीर अगदीं हातघाईवर येऊन एकमेकांच्या हातून एकमेक मारले जाऊन धारातीर्थीं पतन पावले. सेनापति पतन पावलेला पाहून मावळे लोक कचरले, व त्यांचें पाऊल मागें हटलें. त्यांचा धीर सुटला. इतक्यांत सूर्याजी आपल्या टोळीला घेऊन तेथें येऊन पोंचला. त्यानें मोठ्या आवेशाचें

भाषण करून मावळे लोकांच्या अंगीं वीरश्री उत्पन्न केली आणि त्यांना पुनरपि लढण्यास प्रवृत्त केलें. त्या भाषणानें त्यांच्या अंगीं स्फुरण चढून त्यांनीं बेफाम होऊन रजपुतांवर इतका जोराचा मारा केला कीं, रजपूतसैन्याची एकसहा कत्तल उडाली. कांहीं वांचले ते पळून गेले व कित्येकांनीं कड्यावरून खालीं उड्या घेतल्या. पूर्वसंकेताप्रमाणें सूर्याजीनें एका झोपडीला आग लावून किल्ला सर झाल्याची वर्दी शिवरायांना दिली. त्यानें त्यांचें समाधान होऊन त्यांना मोठा आनंद झाला. परंतु दुसरे दिवशीं तानाजीच्या पराक्रमाचें आणि शोचनीय मृत्यूचें वर्तमान जेव्हां शिवराया आणि माता जिजाबाई यांच्या कानीं आलें तेव्हां त्यांना किती दुःख झालें असेल व त्यांनीं किती शोक केला असेल याची नुसती कल्पनाच करणें बरें.

एकंदर जगाचा इतिहास धुंडाळून पाहिला तरी तानाजीनें याप्रसंगीं जो अचाट पराक्रम गाजविला त्याच्या तोडीचे पराक्रम फार विरळा सांपडतील. स्वामिकार्यार्थ देह झिजवून व सर्व आयुष्य मनोभावें राष्ट्रकार्यात खर्च करून अखेर आणीबाणीच्या प्रसंगीं पंचप्राणांची रणयज्ञांत आहुति देऊनही राष्ट्रकार्य तडीस नेणारे जे थोडेसे नरव्याघ्र इतिहासांतरीं आढळतात त्यांतच तानाजीची गणना आहे. सिंहगड घेण्याला ज्या विलक्षण अडचणी होत्या त्यांचा विचार केला असतां, हा तानाजीचा पराक्रम केवळ अलौकिक होता असेंच म्हणावें लागतें. उदेभानूशीं लढतां लढतां तानाजीची ढाल तुटली तेव्हां तो डाव्या हाताची ढाल करून उजव्या हातानें लढत होता असें ह्मणतात. तानाजीच्या या घोर पराक्रमावर तुळसीदास शाहीर यानें त्या वेळीं केलेला पोवाडा सुप्रसिद्ध आहे. त्यांतील या प्रसंगाचें वर्णन फारच हृदयभेदक असून उत्साहजनक आहे. त्या कालच्या बऱ्याच लोकांनीं कमीअधिक प्रमाणानें असेच महापराक्रम गाजविले आणि ह्मणूनच मराठे ह्मणवून घेण्यांत महाराष्ट्रीयांना विलक्षण अभिमान वाटतो. असो. या रणप्रसंगांत रणसिंह तानाजी पडला व गड हातीं आला ह्मणून शिवरायांनीं या किल्याला या वेळीं सिंहगड असें नांव

दिलें. या प्रसंगानंतर एक महिन्याचे आंतच सूर्याजीनें पुरंदर किल्ला हस्तगत केला मोरोपंत पिंगळे व आबाजी सोनदेव यांनीं माहुलीचा किल्ला आणि सबंध कल्याण प्रांत जिंकला. लोहगडही शिवरायांनी काबीज केला. अशा रीतीनें मोंगलांकडे गेलेला बहुतेक मुलूख शिवरायांकडे परत आला.

यानंतर शिवाजीराजे यांनीं आपला मोर्चा पुनः एकवार सुरत शहरावर फिरविला. या समयीं सुरत शहर व्यापाराचें व त्यामुळें संपत्तीचें अगदीं माहेर-घर बनलेलें होतें. शिवाय तें मोंगलांच्या ताब्यांतील असून तेथील व्यवस्था व बंदोबस्त ठीक नव्हता आणि शिबंदीही अगदीं थोडी होती. ही संधि वायां न दवडितां शिवाजीराजे एकदम सुरतेच्या वेशीबाहेर येऊन थडकले. त्यांच्या अनुयायांनीं एकसारखी तीन दिवस तेथें मनमुराद लूट केली. यावेळीं इंग्रज, डच आणि फ्रेंच या लष्करी परकी व्यापाऱ्यांच्या तेथें वखारी होत्या. त्यांनाही शिवरायापुढें जा जी करणें भाग पडलें. शेवटचे दिवशीं मोंगलाचें सैन्य आपल्यावर चालून येत आहे असें शिवरायांना कळलें. तेव्हां तावडतोब त्यांनीं तेथून कूच केलें. त्यांचा विचार चांदवडाहून खालीं कोकणांत उतर-ण्याचा होता. परंतु तेथेंच त्यांची आणि मोंगलांची भेट झाली. तेव्हां बरोबर आणलेली लूट रायगडावर सुखरूप जाऊन कशी पोंचते अशी त्यांना मोठी पंचाइत येऊन पडली. परंतु अडचण आली म्हणून ते अडून थोडेच बसणार' त्यांतूनही पार पडण्याचा त्यांनीं मार्ग शोधून काढला. त्यांनीं आपल्या सैन्याच्या चार निरनिराळ्या टोळ्या केल्या. या शिवाय ज्या लोकांच्या स्वाधीन लूट केलेली होती त्यांची टोळी त्यांनीं निराळी स्वतंत्रच केली. या टोळीला संभा-ळून व शत्रूचें धोरण राखून बाकीच्या टोळ्यांनीं चालावें असें त्यांनीं ठरविलें. आपण स्वतः औरंगाबादेला जातों अशी त्यांनीं हूल उठवून दिली. सर्व टोळ्यांनीं पुढून मागून अथवा उजव्या अगर डाव्या बगलेनें जसें साधेल तसे शत्रुसैन्यावर छापे घालून गनीमी काव्यानें त्यांना जर्जर करून सोडण्याचा उपक्रम सुरू केला. या लढाईंत मोंगलांच्या फौजेवर दाऊदखान नामक प्रसिद्ध

मोंगल सरदार मुख्य असून त्याच्या मदतीला एखलासखान आणि बाकेखान असे दोन सरदार होते. प्रथम बाकेखान आपल्या लोकांसह एकटाच पुढें झाला. त्याचा शिवरायांनीं पुरा पराभव केल्यामुळें तो चांदवडच्या किल्ल्यांत दडून बसला. नंतर दाऊदखानाचें सैन्य पुढें आलें. त्याच्या आघाडीस एखलासखान होता. मराठ्यांनीं एकदम जोराचा हल्ला चढवून त्याला जखमी केलें. इतक्यांत दाऊदखान पुढें होऊन लढूं लागला, तेव्हां शिवाजीराजे आणि दाऊदखान यांच्यामध्यें प्रत्यक्ष युद्ध जुंपलें. ही लढाई फारच घनघोर झाली. पुष्कळ मोंगल सैन्य कामास आलें. मराठ्यांचीही बरीच हानि झाली. शेवटीं दाऊदखानाचा मोड होऊन त्यानें पळ काढला. तेव्हां त्याच्या लोकांची दाणादाण उडून जाऊन चार हजार घोडे व कांहीं लोक शिवरायांच्या हातीं लागले. मामूल वहिवाटीप्रमाणें त्यांनीं त्या लोकांस लवकरच सोडून दिलें. अशा प्रकारें शिवाजीराजे पूर्ण विजयी झाले. नंतर ते रायगडास सुखरूप येऊन पोंचले. पांच हजार घोडे आणि पांच कोटी होन, इतकी लुटीची गणती झाली. हा प्रसंग चांदवडची लढाई ह्मणून इतिहासांत प्रसिद्ध आहे.

एवढ्यानें मोंगलां बरोबरचें युद्ध संपलें, असें नाहीं. सुरतेच्या मोहिमेवरून आल्याबरोबर शिवरायांनीं प्रतापराव गुजर आणि मोरोपंत पिंगळे या दुकलीस मोंगल प्रदेशांत स्वारीवर पाठविलें. पिंगळे नाशिक जिल्ह्यांत शिरला. प्रतापराव खानदेशांत शिरून खंडणी वसूल करीत लुटालूट करूं लागला. पाटील कुळकर्ण्यांपासून चौथाईचा करार लिहून घेऊन तो त्यांना शिवरायांच्या नावें पावत्या लिहून देऊं लागला पावती दाखवितील त्यांना मराठ्यांकडून त्रास पोंचणार नाहीं असें त्यानें गांवोगांवच्या लोकांस शिवरायांच्या वतीनें जाहीर केलें. अशारीतीनें मोंगलांच्या मुलखांतही आपला चौथाईचा हक्क शिवाजीराजे यांनीं उपक्रमास आणिला. पिंगळे यानें दाऊदखानाला लढून अगदीं जेरीस आणिलें. मोंगलांचे औंध, पट्टा, साल्हेर वगैरे बरेच किल्ले त्यानें हस्तगत केले. या कृत्यांनीं औरंगजेब बादशहाला अनावर क्रोध आला.

एकदां स्वतः दक्षिणेंत जाऊन मराठ्यांची पुरी खोड मोडावी असेंही त्यास वाटूं लागलें. परंतु याचवेळीं उत्तरेंत रजपुतांशीं त्याचा झगडा सुरू होता व अफगाणिस्थानांतही युद्ध चालू असून त्याचा संसर्ग प्रत्यक्ष दिल्लीसही झाला होता. यामुळें दक्षिणेंतील धामधुमीकडे त्याला विशेष लक्ष देतां आलें नाहीं. शेवटीं यशवंत सिंगास परत बोलावून त्यानें त्याचे जागीं मोहबतखान नामक सरदाराची दक्षिणेंत नेमणूक केली व त्याचे हाताखालीं दिलेरखानास दिलें.

दक्षिणेंत आल्याबरोबर मोहबतखानानें मराठ्यांचे औंध व पट्टा हे दोन किल्ले घेतले. आपल्या सैन्याचे दोन भाग करून दिलेरखानानें चाकण व सालेर या दोन किल्ल्यांस वेढा दिला. हें वर्तमान लागतांच प्रतापराव आणि मोरोपंत सालेरी येथील मराठसैन्याच्या कुमकेस चालून आले. त्यांचा मार्ग अडविण्यासाठीं मोहबतखानानें एखलासखानास पाठविलें. या वेळीं जी लढाई झाली तिला सालेरची लढाई म्हणतात. प्रथम प्रतापरावानें हार खाल्ल्यासारखें दाखवून पळ काढिला. मोंगल सैन्यानें त्याचा पाठलाग केला. शत्रूला अंगावर घेऊन त्यानें एकदम उलट खाल्ली व इतका निकराचा मारा केला कीं, त्या बरोबर मोंगल सैन्यांत गोंधळ उडाला. उभय सैन्यें अगदीं निकरानें लढलीं. शेवटीं मोंगलांचा अगदीं पराभव झाला. त्यांचे कित्येक नामांकित सरदार आणि दहा हजार लोक धारातीर्थी पतन पावले. मराठ्यांकडील सूर्यराव काकडे नांवाचा इतिहास प्रसिद्ध सरदार या लढाईंत कामास आला. हा शिवरायांचा बाळपणचा खेळगडी असून आपल्या शूरत्वानें प्रसिद्धीस आलेला होता. याची शिवरायास इष्ट कार्यांत पुष्कळच मदत झाली होती. या लढाईंत दिलेरखान आणि एखलासखान यांच्यासारखे अहमहमिका बाळगणारे रणशूर व कसलेले योद्धे व औरंगजेबाचे पूर्ण विश्वासांतले सरदार मराठ्यांस हार गेले यावरून तत्कालीन मराठभाईंचा जोम किती वाढला होता व त्यांच्या अंगांत कशाप्रकारचें रक्त खेळत होतें याची कल्पना होते. एखलासखान तर मराठ्यांकडून जिवंत पकडला गेला व दिलेरखानास पळतां भुई थोडी झाली. या प्रसंगानें

शिवरायांच्या मावळे शिपायांची आणि घोडेस्वारांची पारख होऊन ते उत्तम कसास उतरले. सालेरचा वेढा उठवून मोंगल लोक औरंगाबादेस निघून गेले. पाडाव झालेले बरेच लोक शिवरायांच्या पदरीं राहिले. ज्यांची इच्छा नव्हती त्यांना शिवरायांनीं उदार मनानें सोडून दिलें. या लढाईत शत्रूचें पुष्कळ सामान मराठ्यांच्या हातीं लागलें. अशा प्रकारें शिवरायांच्या पूर्ण विजयांत सालेरच्या लढाईनें मोंगल युद्धाचा शेवट झाला. यानंतर मोहबतखानाच्या जागीं खानजहान याची नेमणूक झाली. परंतु त्यानें शिवरायांशीं लढण्याचें सोडून देऊन मराठ्यांशीं चालू असलेलें युद्ध बंद ठेविलें.

याच सुमारास अदिलशाही फौजेचा मुख्य सेनापति बहलोलखान यानें शिवरायांस सफाई बुडविण्याची खटपट चालविली होती. मोंगलयुद्ध संपण्या-पूर्वींच विजापूरदरबारीं शिवरायांविरुद्ध खटपट चालू होऊन त्यांचे व्यवहार मोंगलांशीं चालले होते. या सर्व गोष्टी शिवरायांस सहज कळत असत. विजापूरकर पूर्वीं झालेला तह मोडून आपल्यावर चालून येणार अशी मनाची खात्री होतांच शिवाजीराजे यांनीं विशाळगडावर मोठें सैन्य तयार केलें व त्याच्या निरनिराळ्या सरदारांच्या हाता खालीं निरनिराळ्या तुकड्या केल्या. एका तुकडीनें एकदम जाऊन पन्हाळा किल्ला काबीज केला. अण्णाजी दत्तो यानें हुबळी शहर लुटलें व तेथील इंग्रज, फ्रेंच व डच वखारवाल्यांपासून खंडणी घेतली. वाईपासून तुंगभद्रेपावेतों आणि पश्चिम किनाऱ्यावरील विजापूरच्या मुलखांत शिवरायांनीं जिकडेतिकडे मराठी अंमल बसविण्यास सुरवात केली. बहलोलखान मराठ्यांवर चालून येतांच शिवाजीराजे यांनीं त्याच्या-वर आपला सेनाधिपति प्रतापराव गुजर यास ससैन्य रवाना केलें. उंबराणी येथें उभय सैन्यांची भेट होऊन पुरे दोनप्रहर मोठी घनचक्कर चकमक उडाली. बहलोलखानाच्या लोकांस पिण्यास पाणी देखील मिळेना. तेव्हां त्यानें शरण येऊन मराठ्यांचे वाटेस याउपर न जाण्याचें कबूल केलें. प्रतापरावानें उदार होऊन त्याला जीवदान दिलें आणि त्यानें त्याच्याशीं तह केला. या बहलो-

लखानानें शिवरायांशीं विनाकारण प्रत्यक्ष वैर मांडलेलें होतें, त्यामुळें प्रताप-रावाचें हें करणें शिवाजीराजे यांस आवडलें नाहीं. त्याची पुरी खोड मोड-ल्याविना विजापूरकरांपासून आपण निर्भय होणार नाहीं हें ते जाणून होते. ह्मणून या कृत्याबद्दल प्रतापरावाची निर्भर्त्सना करून विजापूरकरांची पुरी खोड मोडल्याशिवाय आह्मांस तोंड दाखवूं नये, असा त्यांनीं त्यास निरोप पाठविला. शिवरायांच्या या बोलण्याचा लगेच प्रत्यय आला. प्रतापराव पाठ-मोरा झाल्याबरोबर बहलोलखान दिलेलें वचन गुंडाळून ठेवून मराठ्यांच्या मुलखात उपद्रव देऊं लागला. हा त्याचा कृतघ्नपणा सहन न होऊन प्रतापराव अगदीं त्वेषानें खानावर धांवून आला. त्या रागाच्या आवेशांत आपल्या सैन्याची व्यवस्थेशीर जुळवाजुळव करण्याचें देखील त्यास भान राहिलें नाहीं. यामुळें अर्थातच त्याची मात्रा चालली नाहीं. त्याच्या सैन्याची अगदीं त्रेधात्रेधा उडून गेली. प्रतापराव आणि त्याचे दुसरे पुष्कळ लोक या रणय-ज्ञांत बळी पडले. सुदैवानें या वेळीं हंसाजी नांवाचा एक दुय्यम प्रतीचा मराठासरदार अगदीं नजीकच्या प्रदेशांत कांहीं कामगिरीवर होता. त्याला प्रतापराव लढाईत पडून त्याच्या लोकांची दाणादाण झाल्याची खबर लागतांच तो मोठ्या वेगानें खानाच्या सैन्यावर चालून आला. त्याची कुमक मिळा-ल्या बरोबर घाबरून पळत सुटलेल्या प्रतापरावाच्या लोकांस धीर आला आणि त्यांनीं हंसाजीच्या धुरीणत्वाखालीं शत्रुसैन्यावर अगदीं निकराचा मारा केला. तो सहन न होऊन विजापूरचें सैन्य पराभूत होऊन विजापुरा-कडे पळून गेलें. या लढाईला जेसरीची लढाई असें नांव आहे. या लढाइत संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव या दोन अल्पवयस्क मराठवीरांनीं मोठा पराक्रम केला. हे दोन तरुण वीर पुढें मोठमोठे पराक्रम गाजवून प्रसि-द्धीस आले व त्यांची कीर्ति यावच्चंद्र दिवाकरौ अजरामर झाली आहे.

या लढाईत प्रतापरावासारखा वीर पुरुष बळी [illegible]

मध्य इमारत उभी करण्यांत प्रतापराव आणि तानाजी मालुसरे या दोन रणधीर वीरपुरुषांचें त्यांना अतिशय सहाय्य झालें असल्यामुळें अकालींच हे दोघे आपल्याला सोडून गेले हा विचार मनांत येऊन ते फार कष्टी झाले. हंसाजीनें अगदीं आणीबाणीच्या प्रसंगीं योग्य प्रसंगावधान दाखवून आपली बाजू संभाळिली ह्मणून खुष होऊन व त्याची योग्यता जाणून त्यांनीं त्याला हंबीरराव असा किताब दिला आणि प्रतापरावाच्या मृत्यूनें रिकामें झालेल्या सेनापतिपदावर त्याची नेमणूक केली. प्रतापरावाचें अंशतः तरी उतराई होण्याचे हेतूनें त्याची मुलगी जानकीबाई हिचा आपला मुलगा राजाराम याच्याशीं शिवरायांनीं पुढें विवाह केला.

असो; याच सुमारास घांटावर मोठा दुष्काळ पडला होता. यास्तव शिवाजीराजे यांनीं आपली छावणी कोकणांत चिपळूण गांवीं ठेविली. या वेळीं आपले कारकून, हवालदार वगैरे छावणींतील मंडळीस शिवरायांनीं पत्र लिहिलेलें उपलब्ध आहे. या पत्रांत छावणींतील लोकांचें रयतेशीं वर्तन कसें असावें; दाणा, वैरण वगैरे यांची तजवीज, खर्च वगैरे गोष्टी कशाप्रकारें कराव्या, आगीवाऱ्यासंबंधानें कशी सावधगिरी ठेवावी, इत्यादि गोष्टींचा शिवरायांनीं उपदेश केलेला आहे. या पत्राचा सारांश असा आहे कीं, दाणा, चारा वगैरे पागेंतील घोड्यांना लागणारे जिन्नस घेताचेच सांठविलेले आहेत तरी ते वाटेल तसे उधळमाधळ करून खर्च न करितां बेतायेतानें चार महिने पुरतील अशा रीतीनें खर्च करावे. रयतेपासून दाणे, भाकर, लकुड-फाटा वगैरे कोणताही जिन्नस फुकट मागून घेऊं नये, कारण दुष्काळ असल्यामुळें कुणबी अशा रितीनें नाडिले गेल्यास त्यांची उपासमार होऊन तळतळाट लागेल. मराठ्यांपेक्षां परके मोंगल बरे असें प्रजेस वाटेल. असंतोष माजेल. आगी-वाऱ्यासंबंधानें अतिशय काळजी घ्यावी. दाणा, वैरण वगैरे जिन्नस बाजारांतून रोख ... घेऊं नये.

वगैरे वगैरे. या वरून शिवाजी राजे यांची पागेकडील व्यवस्था किती उत्तम असे, त्यांची बारीकसारीक गोष्टींविषयीं देखील किती दक्षता असे, त्यांच्या ठिकाणीं प्रजावात्सल्य हा गुण किती श्रेष्ठ प्रकारचा होता, इत्यादी गोष्टी मूर्तिमंत डोळ्यापुढें उभ्या राहून मोठी धन्यता वाटते. अस्तुः पावसाळाभर सैन्य चिपळुणास ठेवून तो संपल्यावर शिवरायांनीं आपलें लष्कर विजापुराकरांवर पाठविलें. या वेळीं विजापुरांत पठाण व सिद्दी असे दोन पक्ष होऊन फार बखेडा माजलेला होता. बहिलोलखान पठाण यानें आपला प्रतिस्पर्धी सिद्दी यास ठार मारून सर्व राजसत्ता आपल्या हातीं घेतली होती.

याप्रसंगीं मुसलमानांनीं जंगी कारस्थान केलें. गोवळकोंडेकर, विजापूरकर, आणि दिल्लीवाले एक झाले आणि त्यांनीं शिवरायांचें पारिपत्य करण्याचा बेत केला. परंतु शिवाजीराजे कांहीं कमी धूर्त नव्हते. त्यांनीं सर्वांशीं एकदम उघड सामना करण्याचा प्रसंगच आणिला नाहीं. प्रत्येकास वेगवेगळें गांठून त्यांनीं आपला कार्यभाग साधला. विजापूरकरांचा सरदार हुसेनखानमायणा संपगांवास होता, तिकडे त्यांनीं हंबीरराव मोहिते सरनोबत यास पाठविलें. पठाण पांच हजार स्वार व प्रचंड तोफखाना यांनिशीं जय्यत तयारीनें होता. हंबीररावावर हुसेनखान एकदम चालून आला. मराठ्यांनींही लढण्याची अगदीं शिकस्त केली. पुरे सहा प्रहर लढाई चालली होती. हंबीररावाच्या लोकांनीं पठाणाच्या सैन्यांत शिरून लांडगेतोड करावी तशी माणसांची कत्तल चालविली. अखेर हुसेनखान हातीं लागला. या लढाईत घोडे, हत्ती, उंटें, डेरे, राहुट्या वगैरे अलोट युद्धोपयोगी सामान मराठ्यांच्या हातीं लागलें. इकडे अशा रीतीनें मराठ्यांना जयश्रीनें माळ घातली तोंच दुसरीकडे मोरोपंत पिंगळे यानें तुंगभद्रेच्या कांठीं असलेल्या कोपळ नांवाच्या किल्ल्यावर हल्ला केला व तेथील किल्लेदारापाशीं मोठें राजकारण लढवून युक्तीनें तो हस्तगत केला. कोपळचा किल्ला ह्मणजे मुख्य दक्षिणचा दरवाजाच. तो ताब्यांत आल्याकारणानें आस-

पासच्या कनकगिरी, रायदुर्ग, वगैरे किल्ल्यांची किल्ली हातीं आल्याप्रमाणें झाली व त्यामुळें तिकडील पुंडपाळेगार वगैरे लोकांवर चांगली दहशत बसली.

शहाजीराजे मृत्यु पावून शिवराया आपल्याला 'राजे' ह्मणवूं लागले, त्यांनीं आपल्या नांवाच्या शिक्क्याचीं नाणीं पाडिलीं वगैरे गोष्टींना सुमारें दहा वर्षें होऊन गेलीं. या मुदतींत शिवरायांनीं कोणकोणते पराक्रम केले, कसकसे विजय संपादन केले, उत्तरेकडील मोंगलांना व दक्षिणेंतील मुसलमानांना कसा हात दाखविला, स्वराज्याचा किती विस्तार केला, औरंगजेबासारख्या अत्यंत धूर्त, धोरणी व पराकाष्ठेच्या महत्वाकांक्षी व हिंदुद्वेष्ट्या बादशहाचे हातपाय मोडले जाऊन त्याला कसें स्वस्थ बसावयास लाविलें, इत्यादि गोष्टींचें वर्णन या भागांत आलेंच आहे. या गोष्टींचा असा परिणाम झाला कीं, दक्षिणेंत महाराष्ट्रापुरती तरी सर्व मराठ्यांची एक जूट झाली. प्रथम प्रथम शिवरायांच्या सामर्थ्याविषयीं कांहीं कांहीं मराठे सरदारांना जी शंका होती ती समूळ नष्ट झाली. सर्व मराठ्यांची शक्ति एकवटली जाऊन मराठ्यांच्या सत्तेस व्यवस्थित व स्थाइक असें स्वरूप प्राप्त व्हावें असें सर्वांना वाटूं लागलें. हा काल पावेतों महाराष्ट्राची साधारण अराजक स्थिति होती असें ह्मटलें तरी चालेल. ती बदलून स्वतःला शास्त्रोक्त यथाविधी राज्याभिषेक करवून घेऊन इतक्या उंचीपर्यंत उभारलेल्या स्वराज्यस्थापनेच्या टोलेजंग मंदिरास राज्याभिषेक करवून उत्तम कळस चढवावा असा विचार शिवरायांच्या मनांत आला. हा विचार त्यांनीं मातुश्री जिजाबाई, श्रीसमर्थ रामदास स्वामी व इतर सल्लागार मंडळ यांना व्यक्त करून दाखविला व त्यांनाही तो पसंत पडला. हा विचार त्यांनीं उपक्रमास कसा आणिला याचा विचार पुढील भागांत करूं.

---

# भाग ९ वा.

## श्रीछत्रपति शिवाजी महाराज.

मागील भागाच्या शेवटीं सांगितल्याप्रमाणें असा हा राज्याभिषेकरूपी राष्ट्रीय महोत्सव करण्याचें काय प्रयोजन असावें याचें प्रथम अल्पसें विवेचन करून नंतर त्या समारंभाचें वर्णन आणि तदनंतरच्या गोष्टी यांचा विचार करूं. एक तर मराठ्यांचे अंगीं विलक्षण जोम व स्फूर्ति उत्पन्न होऊन त्यांच्या ठिकाणीं राष्ट्रैक्य होण्यास आवश्यक असे गुण बाणवितां येतील व त्यांचें स्वतःचें असें एक स्वराज्य स्थापन करतां येईल अशी कल्पना प्रथम शिवाजीयांच्या डोक्यांत आली त्याला सुमारें ३० वर्षें होऊन गेलीं. या कल्पनेला साकार स्वरूप देऊन ती तडीस नेण्याची पूर्ण धमक आपल्यामध्यें आहे हें फक्त एकट्या शिवाजीयांनींच नव्हे, तर यांच्या साह्य कर्त्या सर्व माणसांनीं स्वपराक्रमांनीं आणि अढळ निश्चयबलानें या भरतखंडनिवासी सर्व लोकांच्या निदर्शनास आणून दिलें. यास्तव स्वराज्यसंस्थापनेचा विधियुक्त संस्कार जो राज्याभिषेक समारंभ तो सर्वांना आवश्यक असा वाटला. नाहींतर, महाराष्ट्रांत यावेळीं आणि यापूर्वीही पुष्कळ मराठे सरदार थोड्याफार प्रमाणानें स्वराज्याचा व स्वातंत्र्याचा उपभोग घेत होते. परंतु त्यांचें स्वरूप विस्कळीत असल्यामुळें त्यांच्या कर्तृत्वशक्तीचा महाराष्ट्राला एक राष्ट्र या नात्यानें कांहीं फायदा नसून त्या शक्तीचा आपसांत लढण्यांत अपव्यय होत असे. या सर्व सरदारांचें एकचित्त करून व आदिलशाही आणि मोंगलशाही या परकी सत्तांचा स्वराष्ट्रावरील ताबा झुगारून देऊन, महाराष्ट्राचें स्वातंत्र्य व एकराष्ट्रीयत्व यांची विधिपूर्वक स्थापना करणें, हेंच या राज्याभिषेकरूपी राष्ट्रीय समारंभाचें पहिलें प्रयोजन होय.

दुसरें प्रयोजन असें कीं, मराठ्यांचे प्रत्यक्ष शत्रू तसेंच आजूबाजूनें कोणताही एक पक्ष शंका व भीति यांमुळें न स्वीकारतां केवळ तटस्थ वृत्ति धारण केलेले कांहीं लोक, यांच्यावर वचक व दरारा बसविण्यासही राज्याभिषेक-समारंभ करण्याची शिवाजीराजे यांस जरूर भासली. आपण मोठमोठ्या लढाया मारिल्या, शत्रूंना नामोहरम करण्यासाठीं अव्याहत परिश्रम केले व कष्ट सोसले, अनेक राजकारणें लढवून अनेक राजकीय उलाढाली केल्या, इत्यादि सर्व गोष्टी केवळ स्वराज्यासाठींच होत व अशा प्रकारचें पूर्ण स्वराज्य स्थापन करण्याचा यथार्थता सर्वांना स्पष्टपणें भासविणें याला राज्याभिषेकाची आवश्यकता होती असें शिवरायांस वाटलें. मुळीं राज्यच अस्तित्वांत नव्हतें तों पर्यंत शिवाजी म्हणजे एक लुटारू, केवळ दरोडेखोर, फक्त स्वार्थ साधण्यासाठीं वाटेल त्यास लुबाडून स्वतःची तुंबडी भरणारा, अशी त्यांच्याविषयीं लोकांना कल्पना होणें साहजिक होतें आणि हीं विशेषणें कित्येकांनीं शिवरायांना दिलेलींही आहेत. परंतु या उज्वल शिवचरित्राचा अंमळ सूक्ष्मपणें विचार केला असतां आपल्याला असें दिसून येईल कीं, प्रथम प्रथम त्यांच्या हातून अशीं विशेषणें देण्यासारखीं कांहीं कृत्यें घडलीं खरीं, परंतु जसजसा स्वराज्याचा पाया भक्कम होत चालला तसतशी अशीं लुटारूपणाचीं कृत्यें करण्याची अवश्यकता त्यांना कमी कमी वाटूं लागून अशाप्रकारचीं कृत्यें त्यांच्या हातून घडेनातशीं झालीं. यावरून असें नाहीं का होत? कीं शिवरायांचीं बरींवाईट कृत्य बिलकूल स्वार्थमूलक नसून तीं केवळ राष्ट्रहित साधण्याप्रीत्यर्थ होतीं. शिवाय जगाचा असा न्यायच आहे कीं, प्रचलित राजसत्तेविरुद्ध कोणीही चळवळ करूं लागला कीं, तो प्रथम बंडखोर समजला जातो; परंतु, त्या चळवळींत यश प्राप्त होऊन त्यानें क्रांति घडवून आणिली कीं, तोच कायदेशीर राजा ठरतो. तद्वतच शिवरायांची स्थिति होती. शिवरायांच्या पराक्रमास सुरवात झाली त्यावेळीं स्वराज्य अस्तित्वांत नव्हतें. त्याची स्थापना करण्यासाठीं तत्कालीन प्रचलित परकी सत्तेविरुद्ध त्यांना उठावें लागलें तेव्हां त्यांची बंडखोर,

लुटारू म्हणून गणना होऊं लागली. परंतु त्यांना राज्याभिषेक होऊन जेव्हां ते स्वराज्यसंस्थापक बनले, तेव्हां निंदकांचीं तोंडें आपोआप बंद होऊन त्यांचाच पक्ष न्यायाचा होता व त्यांना हरकत करणारे तेच बंडखोर, लुटारू होत, अशी उलट कल्पना जगाची झाली. ही कल्पना लोकांचे मनांत प्रत्यक्ष-पणें बिंबविणें हाच राज्याभिषेक समारंभाचा मुख्य हेतु होय, व तो शिवरायांनीं तडीस नेला. तो काळ लोटून सुमारें तीन शतकें गेल्यानंतर ग्रॅन्टडफ-सारख्या थोर, शोधक आणि विद्वान् इतिहासकारानें तींच विशेषणें शिवरायांच्या पवित्र नांवामागें जोडून त्यांच्या धवलकीर्तीला डाग लावण्याचा प्रयत्न करणें हें अकारण द्वेषमूलक होय असेंच समजलें पाहिजे. मुसलमान इतिहासकारांनीं शिवरायांना नांवें ठेवणें, त्यांच्या दृष्टीनें त्यांचा त्यांनीं गुन्हा केलेला असल्यामुळें, कांहींसें क्षम्य होईल. पण, पूर्ण शांततेच्या काळीं इंग्रजांसारख्या लिन्हाईत ग्रंथकारांनीं शांत डोक्यानें सर्व गोष्टींचा विचार न करितां तशींच त्यांना नांवें ठेवून त्याच ग्रंथकारांचा अनुवाद करणें इतिहासाच्या दृष्टीनें केवळ अप्रशस्त होय, असेंच ह्मणावें लागतें.

तिसरें असें कीं, शहाजीराजे मृत्यु पावल्यापासून शिवराया आपल्याला राजे ह्मणवूं लागले, त्यांनीं आपल्या नांवाचीं नाणींही पाडलीं, तरी धार्मिक व लौकिकदृष्ट्या ते विधिपूर्वक अभिषिक्त झालेले नसल्यामुळें त्यांच्या राजास कायमचें शाश्वत स्वरूप प्राप्त झालेलें नव्हतें. तें स्वरूप राज्याभिषेकानें प्राप्त झालें. जे कित्येक मराठे सरदार अद्याप यवनी सत्तेच्या आश्रयानें होते, त्याप्रमाणेंच जे त्यांचे प्रत्यक्ष शत्रू होते, त्यांच्या मनांत स्वतःविषयीं आणि स्वराज्याविषयीं पूर्ण आदरभाव उत्पन्न करण्यास राज्याभिषेक समारंभासारखें दुसरें साधन नव्हतें. इतके दिवस शिवाजी ह्मणजे एक पुंडावा करणारा जबरदस्त असा एक सरदार, असें समजून प्रसिद्धपणें त्यांना येऊन मिळण्यास जे कांकूं करीत होते, त्यांच्या मनाची खात्री होऊन ते त्यांना येऊन मिळाले, आणि जे उघड शत्रू होते ते बरोबरीच्या नात्यानें त्यांच्याशीं तह वगैरे कर-

ण्यास पुढें झालें. सारांश शत्रु, मित्र आणि तटस्थ, या सर्वांकडून राज्य-संस्थापकाचा श्रेष्ठ मान शिवरायांस मिळण्यास राज्याभिषेकाचें प्रयोजन होतें हें स्पष्ट होय.

असो; या प्रमाणें राज्याभिषेकरूपी राष्ट्रीय समारंभ करण्याची कां अवश्यकता होती हें वरील विवेचनावरून वाचकांचें ध्यानांत आलेंच असेल. नित्य नियमाप्रमाणें शिवाजीराजे यांनीं या महत्वाच्या कामीं श्रीरामदास स्वामी, मातुश्री जिजाबाई आणि इतर सल्लागार मंडळी यांचें अनुमोदन पडल्यावर श्री भवानीमातेची अनुज्ञा घेतली. ती मिळाल्या बरोबर ते अभिषेकाच्या तयारीस लागले. शालिवाहन शक १५९६ ज्येष्ठ शुद्ध १३ (ता० ६ जून स० १६७४) हा दिवस उत्तम सुमुहूर्त असल्यामुळें अभिषेकासाठीं मुक्रर करण्यांत आला.

हा समारंभ व्यक्तिविषयक नसून राष्ट्रीय असल्या कारणानें त्याला साजेल अशी जंगी तयारी या समारंभाप्रीत्यर्थ करण्यांत आलेली होती. हा राष्ट्रीय महोत्सव करून शिवरायांनीं महाराष्ट्र स्वराज्यरूपी भव्य मंदिरावर हा सुवर्णाचा कळस चढविला असें ह्मटलें तरी चालेल. महाराष्ट्र देश आज तागाईत परकीयांचा गुलाम बनलेला होता, तो या दिवशीं राजरोसपणें स्वतंत्र झाला आणि राज्याभिषेक समारंभ हा त्याच्यावर सर्वांना दिसावा ह्मणून स्वतंत्रेचा छाप मारण्यांत आला. राज्याभिषेक फक्त क्षत्रियांसच होतो अशी त्यावेळीं जनतेची साधारण समजूत होती. शिवरायांचे कुलांत आजपर्यंत धार्मिक संस्कार क्षत्रियांच्या चालीरीतीप्रमाणें झालेले नसल्यामुळें त्यांना राज्याभिषेकाचा हक्क कसा पोंचतो? अशी तत्कालीन कांहीं लोकांच्या मनांत शंका येणें साहजिक होतें. परंतु, शिवाजीराजे कांहीं कमी धूर्त नव्हते. त्यांना ही अडचण या कार्यांत उभी राहील हें पूर्वींच कळून चुकलें होतें. ह्मणून त्यांनीं या समयीं सकलशास्त्रनिपुण प्रसिद्ध काशीकर पंडित गागाभट्टजी यांना मुद्दाम बोलावून आणिलें आणि त्यांच्या

-कडून वंशावळी वगैरे तपासवून आपलें अस्सल क्षत्रियत्व पूर्णपणें स्थापित केलें. तेव्हां अर्थात महाराष्ट्रांतील शास्त्री, पंडित वगैरे मंडळींचीं तोंडें बंद झालीं; कारण, गागाभट्टजीसारख्या महा विद्वान् पंडितानें जो शास्त्रनिर्णय दिला, त्याच्या विरुद्ध अकाढण्याची कोणत्याही महाराष्ट्र पंडिताची छाती नव्हती. परकी अंमलाखालीं राष्ट्राला हीन दशा आली म्हणजे स्वत्व दर्शविणारे धर्मसंस्कार, धर्मविधि वगैरे कसे नष्ट प्राय होऊन जातात याचें दक्षिणेंत आलेल्या क्षत्रियांचे व्रतबंध वगैरे विधि लुप्त झालेले होते, हें एक ढळढळीत उदाहरण आहे. त्याप्रमाणें शिवरायांचाही व्रत बंध झालेला नव्हता; म्हणून गागाभट्टजींनीं प्रथम त्यांचा यथासांग व्रतबंध केला. नंतर मोठमोठे शास्त्री, पंडित, प्रधान, मंत्री वगैरे लोकांस निमंत्रणें पाठवून त्यांच्या संमतीनें या समारंभांतील प्रत्येक कृत्य कसकसें करावयाचें हें ठरविण्यांत आलें. प्रत्येक कामाची व्यवस्था त्या कामाला योग्य अशा माणसाकडे सोंपविण्यात आली. छत्र चामर, सिंहासन इत्यादि राजचिन्हें आणि राज्याभिषेकाला अवश्य अशीं इतर उपकरणें शास्त्रोक्त रीत्या तयार करविण्यांत आलीं. सर्व महाराष्ट्र सरदार मंडळ, विद्वान् लोक, आप्त-स्वकीय-जन, लहान--थोर राजे, रजवाडे वगैरे सर्व निमंत्रित जन रायगडीं येऊन दाखल झाले. रायगड किल्ला हें ठिकाण सर्व बाजूंनीं अत्यंत बळकटीचें होतें म्हणून शिवाजीराजे यांनीं तेंच आपलें मुख्य राजधानीचें स्थान केलें. या कालीं रायगडाइतकें मजबूत, राजधानीला योग्य असें दुसरें कोणतेंच स्थल नव्हतें.

अखिल महाराष्ट्राच्या भाग्योदयाच्या या राष्ट्रीय महोत्सवाचें यथार्थ वर्णन करण्यास आमची लेखणी असमर्थ आहे. तरी अभिषेकवर्णनात्मक जसे येतील तसे दोन वेडेवांकडे शब्द लिहिणें, अवश्य आहे; सबब आम्ही तसें करण्यास धजलो आहों. अभिषेक समारंभासाठीं नेमस्त केलेल्या दिवशीं प्रातःकालीं शिवाजीराजे यांनीं स्त्रीपुत्रांसह मंगलस्नान करून उत्तम महावस्त्रें परि-

धान केली. ' नंतर श्रीभवानीदेवी, माता जिजाबाई आणि कुलगुरु इत्यादिकांना वंदन करून मुहूर्त समय प्राप्त होतांच मुद्दाम तयार करविलेल्या रत्नजडित सुवर्णाच्या सिंहासनावर ते विराजमान झाले. सप्तमहा नद्यांचीं आणि सागरांचीं तीर्थोदकें आणून त्यांनीं सुवर्ण कलश भरून ठेविलेलेच होते. ते कलश हातीं घेऊन अष्टप्रधान आठ दिशांना उभे राहिले. मुहूर्त घटिका प्राप्त होतांच ब्राह्मणांनीं वेदमंत्रांचा घोष सुरू केला. सर्व जनसमुहानें सर्व बाजूंनीं शिवछत्रपतींवर मंगलाक्षतांचा वर्षाव केला. आम्रपल्लवांनीं महाराजांवर तीर्थोदकांचें सिंचन करण्यांत आलें. त्यांच्या मस्तकावर राजछत्र धारण करण्यांत आलें. सर्व राज्यांत १०८ तोफांची सरबत्ती करण्यांत आली. महाराजांनीं आपली सुवर्णतुला केली. अतिशय दानधर्म करुन अभ्यागत अतिथींस त्यांनीं अगदीं संतुष्ट करून सोडिलें. आलेल्या सर्व पाहुण्यांस मेजवान्या देण्यांत आल्या. पुष्कळ ब्राह्मणभोजनें झालीं. पुष्कळ देवस्थानांस नेमणुका करून देण्यांत आल्या. समारंभास परकीय राजेरजवाड्यांकडून वकील वगैरे मंडळी आलेली होती त्या मंडळींस उत्तमोत्तम पोषाख व अलंकार वगैरे देऊन त्यांना निरोप देण्यांत आले. महाराजांनीं ' क्षत्रिय कुलावतंस शिवछत्रपति महाराज सिंहासनाधीश्वर ' असा किताब धारण केला. ' राज्याभिषेक शक ' नांवाचा नवीन शक सुरू केला. अष्टप्रधानांचीं फारशी नांवें होतीं तीं बदलून त्यांना संस्कृत नावें ठेविलीं. अशा रीतीनें हा राष्ट्रीय अभिषेक—समारंभ यथासांग निर्विघ्नपणें पार पडला. आजपर्यंत महाराजांनीं आपल्या राज्यांतील व्यवस्था प्रसंग पडेल तसतशी बदलली होती. परंतु या समयीं त्यांनीं तिला कायमचें असें व्यवस्थित स्वरूप दिलें, त्याचें वर्णन यथावकाश पुढें करण्यांत येईल.

अशाप्रकारें फार थाटानें चाललेला पुत्राचा राज्यारोहण समारंभ आणि सोहळा पाहून माता जिजाबाईच्या मनाची काय स्थिति झाली असेल ! त्यांना किती धन्यता वाटली असेल ! त्यांनीं किती आनंदाश्रु ढाळले असतील !

या गोष्टींची नुसती कल्पना करणें देखील अवघड आहे, मग त्यांचें हुबेहुब वर्णन करण्यास कोण समर्थ असणार! जो पुत्र उदरांत असतां अनेक संकटें प्राप्त झालीं, ज्याला लहानाचा मोठा करून आज या उच्चतम स्थितिप्रत आणण्यांत जिला पराकाष्ठेचे श्रम करावे लागले आणि अहर्निश पराकाष्ठेची काळजी वहावी लागली, त्या पुत्राच्या भाग्योदयाचा हा सुखसोहळा झालेला पाहून तिच्या नेत्रांचें पारणें फिटलें. जी इष्ट गोष्ट घडून यावी एतदर्थ ती सारखें डोळ्यांत तेल घालून वाट पहात होती, ती गोष्ट प्रत्यक्ष डोळ्यां देखत घडून आलेली पाहून तिच्या आनंदास पारावार राहिला नसेल! नाहीं बरें! माता या नात्यानें पुत्रासंबंधीं आपली इतिकर्तव्यता पूर्णपणें आटोपली असें वाटूनच जणों तिनें आपले डोळे पुढें लवकरच मिटले असावे असें वाटतें. असो यानंतर जिजाबाई फार दिवस वांचल्या नाहींत. अभिषेक समारंभानंतर सुमारें महिना पंधरा दिवसांचे आंतच त्यांचा अंत झाला.

अभिषेक–समारंभानंतर महाराजांनीं फक्त सहा वर्षें राज्य केलें. दुष्ट काळानें त्यांच्यावर घाला घालून त्यांना या भरतभूमींतून अकालीं ओढून नेलें हें महाराष्ट्रीयांचें महत् दुर्भाग्य होय. त्यांना आणखी कांहीं वर्षें जर दीनदयाळ प्रभूनें आयुष्य दिलें असतें, तर मराठ्यांच्या इतिहासाचें स्वरूप कांहीं निराळेंच दिसलें असतें. असो; या सहा वर्षांच्या अवधींत महाराजांच्या हातून चिरस्मरणीय अशीं दोन कामें झालीं. त्यांनीं कर्नाटक प्रांतावर केलेली स्वारी हें एक, आणि आजपर्यंत कमाविलेल्या स्वराज्याची व्यवस्था पूर्णावस्थेस आणून तिला कायमचें स्वरूप लावून दिलें हें दुसरें. पैकीं कर्नाटकच्या मोहिमेची हकीकत या भागांत संपवून त्यांची राज्यांतील व्यवस्था कशा प्रकारची होती, तिचें सामान्य धोरण कोणतें होतें वगैरे गोष्टींचा विचार पुढें महाराजांची योग्यता या सदराखालीं करूं.

ही मोहीम करण्याचें वरवर दिसून येणारें कारण म्हणजे विजापूर सरकारापासून शहाजीराजे यांनीं स्वपराक्रमबलानें जी जहागीर मिळविलेली होती

व जिचा उपभोग महाराजांचा सापत्न बंधु व्यंकोजी हा एकटाच घेत होता, त्या वडिलोपार्जित मिळकतीचा अर्धावाटा भावापाशीं मागणें हें होय. परंतु हें खरें कारण नसून महाराजांनीं पुढें केलेली अशी ही एक सबब होती. एकंदर अत्युदात्त अशा शिवचारित्राचें अवलोकन केलें असतां ज्यांनीं अव्याहत श्रम करून स्वतःच्या बाहुबलावर स्वकष्टार्जित असें स्वतंत्र स्वराज्य स्थापित केलें, ते शिवाजी महाराज आपल्या सापत्न बंधूजवळ वडिलार्जित जहागिरीचा हिस्सा मागण्यासाठीं आपसांत दुही माजविण्याइतके क्षुद्र मनाचे, लोभी व मत्सरी नव्हते हें उघड आहे. तर, ही मोहीम करण्याचीं खरीं व अंतस्थ कारणें कांहीं निराळींच होतीं. एकतर विस्तृत असा दक्षिण प्रांत जिंकिल्यानें स्वराज्याची मर्यादा पुष्कळ वाढण्यासारखी होती; तशांत तो प्रदेश जिंकण्याला विशेष आयास पडण्यासारखे नव्हते. दुसरें असें कीं, विजापूरकरांपाशीं कटकट चालूच होती तेव्हां त्यांचीही पुरी खोड मोडण्याचें महाराजांच्या मनांत होतें; त्यांतून कर्नाटकाकडे महाराजांच्या प्रभावाविषयीं लोकांत अज्ञान होतें तें नष्ट होऊन तिकडे आपला दरारा बसवावा असाही त्यांचा विचार होता. तिसरें असें कीं, व्यंकोजी आपल्याला विजापूर बादशाहीचा ताबेदार म्हणवीत असे. तो महाराजांनीं महाराष्ट्रांत प्रस्थापित केलेल्या स्वतंत्रस्वराज्याचा भक्त नव्हता; तेव्हां कर्नाटकांत जाऊन सापत्नबंधु व्यंकोजी याला महाराजांचे मनांतून आपलासा करावयाचा होता. त्याला दोन उपदेशाच्या गोष्टी सांगून त्याला त्यांच्या मनांत महाराष्ट्रस्वराज्याचा पूर्ण भक्त बनवावयाचा होता. परंतु हे मनांतील हेतु सिद्धीस नेण्याकरितां त्यांना कांहीं तरी सबब व निमित्त पाहिजे होतें. तीं या वेळीं आयतींच चालून आलीं; त्यांची हकीकत पुढें दिल्याप्रमाणें आहे.

दादोजी कोंडदेव यांना पुणे प्रांताच्या जहागिरीची व्यवस्था पाहण्याकरितां ठेवून नारोपंत हणमंते नांवाच्या कारकुनास शहाजीराजे यांनीं आपल्या बरोबर कर्नाटकांत नेलें होतें याचा उल्लेख मागें आलाच आहे. हा नारोपंत इ. स. १६६२ त वारला, तेव्हां त्याचा मुलगा रघुनाथ नारायण हणमंते याजकडे

त्याच्या बापाचें काम शहाजीराजे यांनीं दिलें. हा बापापेक्षांहा अधिक कर्तृत्ववान् निघाला. शहाजीराजे यांच्या निधनानंतर व्यंकोजीराजे यांचा कारभार यानें फारच उत्तम प्रकारें हांकला. परंतु, महाराजांच्या अभिषेक समारंभाचेसुमारास व्यंकोजीराजे व रघुनाथ नारायण यांचें परस्परांशीं कांहीं कारणावरून बनेनासें झालें होतें. अखेरीस तर दोघांमध्यें वितुष्ट येऊन रघुनाथ नारायण यास व्यंकोजीचा कारभार सोडून देणें भाग पडलें. तो तंजावर सोडून शिवाजी महाराजांकडे आला. त्यानें महाराजांस सर्व हकीकत निवेदन केली आणि कर्नाटक प्रांतावर मोहीम करण्याचा आग्रह केला. त्याच्या अंगच्या कर्तबगारीची, शहाणपणाची आणि स्वामिनिष्ठा व विश्वासूपणा यांची पारख करून महाराजांनीं तसें करण्याचें कबूल केलें. वडिलोपार्जित जहागिरीचा आपल्या भावापाशीं हिस्सा मागण्याकरितां आपण कर्नाटकीं जात आहों असें त्यांनीं बाहेर लोकांत जाहीर केलें. वास्तविक लोकांना सांगण्याकरितां त्यांनीं ही एक सबब पुढें केलेली होती. कर्नाटकासारखा विस्तृत प्रदेश स्वराज्यास जोडावा, विजापूरवाल्यांस सफाई बुडवावें, स्वराज्याची हद्द पूर्वकिनाऱ्यास भिडविण्याचा उद्योग करावा, व्यंकोजीस ताळ्यावर आणून त्याच्या ठिकाणीं स्वतंत्र स्वराज्याच्या कल्पना बिंबवाव्या, असेच त्यांचे ही मोहीम आरंभिण्यांत अंतस्थ हेतु असले पाहिजेत हें उघड आहे.

शिवाजी महाराज सुमुहूर्त पाहून रायगडाहून निघाले ते पन्हाळ्यास आले. त्यांनीं फौज वगैरे पुष्कळ सरंजाम बरोबर घेतला होता. या मोहिमेचे मुख्य प्रवर्तक रघुनाथपंत हणमंते तेही बरोबर होतेच. पन्हाळ्याहून निघून खंडण्या वसूल करीत करीत महाराज भागानगरास ( गोंवळ कोंड्यास ) येऊन दाखल झाले. तेथील शहाच्या आणि त्यांच्या भेटी प्रतिभेटी झाल्या. शहानें महाराजांचा आणि त्यांच्या बरोबरच्या लोकांचा फारच मोठा गौरव केला. महाराजांनींही शहाचा मोठा आदरपूर्वक पाहुणचार घेतला. उभयतांचा स्नेह होऊन तह ठरला. शहाचे मुख्य कारभारी आकण्णा व मादण्णापंत यांना

हिंदुधर्माप्रीत्यर्थ महाराजांनीं चालविलेले प्रयत्न पाहून अतिशय आनंद झाला आणि त्यांनीं महाराजांच्या सर्व मसलतींत त्यांना मनोभावें करून हरएक प्रकारची मदत करण्याचें वचन दिलें. भागानगरांत सुमारें १५ दिवस मुक्काम करून महाराज तेथून दक्षिणेंत जावयास निघाले.

तेथून महाराज निघाले ते तुंगभद्रातीरीं प्रेमळ येथें आले. या ठिकाणीं आनंदराव देशमुख कर्नाळकर भेटीस आले व पांच लक्ष होन खंडणी देण्याचें कबूल करून निरोप घेऊन परत गेले. तेथून श्रीमल्लिकार्जुन आणि निवृत्तिसंगम या पुण्यस्थळीं जाऊन त्यांनीं यथाविधि तीर्थयात्रा केली. तेथें असतां त्यांनीं पुष्कळ दानधर्म केला. पुष्कळ घाट बांधिले, मठ स्थापिले व धर्मशाळा उभ्या केल्या. अशीं अनेक पुण्यकर्मे करून ते स्वारीनिशीं चंदी ऊर्फ जंजी येथें येऊन दाखल झाले. या पूर्वीच त्यांनीं वेलोरचें ठाणें हस्तगत करण्यासाठीं फौज रवाना केली होती, तिनें तोफांचा मारा करून तो किल्ला काबीज केला. चंदीच्या किल्ल्यावर विजापूरकरांचा अबरखान नांवाचा अधिकारी होता. महाराजांपुढें आपला निभाव लागणार नाहीं असें जाणून त्यानें चंदीचा किल्ला महाराजांचे स्वाधीन करून दिला. महाराष्ट्राप्रमाणेंच महाराजांनीं कर्नाटक प्रांतीं बंदोबस्त लावून दिला. तेथेंही त्यांनीं जमीन मोजणी, प्रतबंदी, साऱ्याची आकारणी वगैरे वसूलपद्धति चालू केली. तेथून कावेरीच्या कांठीं त्रिवेदी येथें त्यांनीं मुक्काम केला.

या ठिकाणीं शहाजीराजे यांना राखेपासून झालेला मुलगा संताजी हा महाराजांस येऊन भेटला. त्याचा सन्मानपूर्वक गौरव करून त्यांनीं त्यास जंजी येथें मुख्य नेमिलें. नंतर व्यंकोजीस पत्र लिहिलें त्यांतील आशय असा होता कीं, तुह्मीं शहाणीं माणसें घालवून लाविलीं हें आह्मांस पसंत नाहीं. त्या संबंधी तडजोड करण्यास आम्हीं आलों आहों. परंतु त्यांत कांहीं निष्पन्न होईल असें वाटत नाहीं. तुम्हीं समजून कांहीं तडजोड केल्यास आह्मांस तिकडे येण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. तसें न केल्यास आमचा वडिलोपार्जित

मिळकतीचा अर्धावांटा मागण्यास्तव आम्हांस तिकडे येणें भाग आहे. तुमचे कडून जसें उत्तर येईल त्या प्रमाणें करूं. यावर व्यंकोजीकडून कांहीं मंडळी बोलणें चालणें करण्यास महाराजांकडे आली. त्यांचें बोलणें ऐकून घेऊन त्यांनीं आपले जवळील कांहीं मंडळी त्यांच्या बरोबर देऊन त्यांना परत व्यंकोजीकडे पाठविलें. तेव्हां व्यंकोजी महाराजाचे भेटीस आला. या भेटीच्या प्रसंगीं व्यंकोजीनें योग्य प्रकारें महाराजांची समजूत केली नाहीं. त्यांनीं आपल्यापरी पुष्कळ उपदेश करून व्यंकोजीला योग्य मार्गाकडे वळविण्याचा यत्न केला. त्यांच्या उपदेशाचा मथितार्थ असा होता कीं, जें वडिलांनीं संपादिलें त्याचे आपण दोघेही विभागी. तुम्ही आमचा विचार न घेतां आपल्या एकट्याच्याच विचारानें चालता हें उचित नाहीं. तुम्ही जें संपादिलें असेल त्याचा भाग आम्ही मागत नाहीं. तुम्हाला ईश्वरानें पुष्कळ सामर्थ्य द्यावें व तुह्मी अधिकाधिक संपादावें हीच आमची इच्छा; परंतु, वडिलार्जित दौलतीची वहिवाट आमचे विचाराशिवाय मनास मानेल तशीं करणें तुह्माला योग्य नाहीं. जें कांहीं असेल त्याचे कागद पत्र दाखवावे. तुम्ही आम्ही एक विचारें चालूं. तुम्हांस अडचण पडेल तेथें आम्ही मदत देऊं. कोणत्याही गोष्टी विषयीं मनांत खंत करूं नये. आमच्या बोलण्याचा अर्थ एवढाच कीं, आह्मी वडील तुह्मी धाकटे, तेव्हां आमचे विचारानें चालावें हें बरें; तसें न करितां स्वैरपणें वागून दौलतीचा खराबा करिता, जून्या पोक माणसांना त्रासवून घालवून लाविता, स्वराज्य द्वेष्ट्या यवनांच्या तंत्रानें चालता, अनुभवी, स्वामिनिष्ठ माणसांचा अव्हेर करून हलकट खुशामती लोक संग्रहीं ठेविता, या गोष्टी तुमच्या सारख्या शहाजीराजे यांच्या थोर पुत्रास शोभत नाहींत. तुह्मी रघुनाथपंतांचे विचारें वागावें ह्मणजे आमचा हिस्सा आह्मांला पावल्या प्रमाणें आहे. आह्मी जो खरामार्ग दाखवूं त्या मार्गानें चाला ह्मणजे आम्ही या दौलतीपैकीं कांहीं एक मागत नाहीं. दौलत आपल्याजवळ असली काय आणि आमच्याजवळ असली काय ! दोन्ही गोष्टी

सारख्याच आहेत. कारण, तुम्हीं व आम्हीं एकच आहों. व्यंकोजीच्या पदरच्या माणसांनाही हा महाराजांचा उपदेश बरोबर पटला व त्यांनींही त्याची समजूत घालण्याचा आपल्यापरी पुष्कळ प्रयत्न केला; परंतु त्याची समजूत पडली नाहीं. सुमारें दोन महिने तो महाराजांजवळ होता. अखेर महाराजांचें मन खट्टू होऊन त्यांनीं व्यंकोजीला निरोप दिला. जातेसमयीं व्यंकोजी व त्याची सर्व मंडळी यांनीं उत्तमोत्तम पोषाख, मेजवान्या, नजराणे, अलंकार वगैरे देऊन महाराजांनीं योग्य तो सर्वांचा सत्कार केला. या अत्युदार अशा वर्तनानें व्यंकोजीच्या पदरच्या सर्व माणसांचीं मनें महाराजांनीं वेधून टाकिलीं, तेव्हां तींही पुढें व्यंकोजीविषयीं नाराज झालीं.

यानंतर महाराजांनीं पुनः एकवार आपला वकील पाठवून व्यंकोजीचें मन इष्ट गोष्टीकडे वळविण्याचा यत्न केला. वकीलाचे हातीं व्यंकोजीला असा संदेश पाठविला कीं ‘ हल्लीं आमचेकडील माणसें बोलणें करण्याकरितां पाठविलीं आहेत. त्यांच्याजवळ सर्व गोष्टींचा निकाल करून द्यावा. तसें न केल्यास वांटा सुटणार नाहीं. द्यावा लागेल. तुम्हीं विचारानें चालल्यास कमीजास्तीचा विचार घरांतील आहे. ’ यावर व्यंकोजीकडून उत्तर आलें कीं, ‘ वडील असतां तुम्हीं पातशाहीशीं बंडपणा केला, तमाम मुलूख घेतला त्यामुळें वडिलांस कित्येक प्रकारें इजा झाली, आम्हीं वडिलाजवळ तंत्र देऊन राहिलों, त्यामुळें पातशहांनीं दौलत रक्षिली. वांटा देणें ही वतनदारी नाहींच. वतन बाप असेल त्याचा वांटा घ्यावा. चाकरीची दौलत सर्व विजापूरचे शहाची, आम्हीं शहाचे चाकर, त्यांचे हुकुमाचे मालक; यांत तुमचा संबंध नाहीं. ’ शिवाय त्यानें हा सर्व वृत्तांत विजापूर दरबारीं लिहून कळविला. परंतु विजापूर सरकारचे हातपाय शिवरायांनीं बहुतेक मोडून टाकल्याप्रमाणेंच असल्यामुळें तिकडून कांहींच होण्यासारखें नव्हतें; त्यामुळें व्यंकोजीस पादशाही दरबाराकडून बिलकुल उत्तेजन मिळालें नाहीं हें उघडच आहे.

व्यंकोजीनें महाराजांना दिलेला वरील जबाब विशेष मनन करण्यासारखा

आहे. त्यावरून शिवाजी महाराज आणि त्यांचा सापत्न बंधु व्यंकोजी यांच्या मध्यें केवढें महदंतर होतें हें व्यक्त होतें. महाराज स्वतः पारतंत्र्याच्या जड शृंखला तडातड तोडून टाकून स्वतंत्र स्वराज्यस्थापना करितात आणि आपल्या भावाला ताबेदारींतून मुक्त करून स्वातंत्र्याची अनुपम गोडी लावून देऊं पहातात, तर व्यंकोजी स्वमुखानें विजापूरपादशाहीचा आपण्याला उघडउघड ताबेदार ह्मणवितो आणि तिचा स्वतःला बंदा समजतो. त्या कालच्या राजकीय वातावरणाच्या परिस्थितीचा विचार करून व्यंकोजीनें आपण होऊन केव्हांच महाराजांना येऊन मिळावयास पाहिजे होतें. परंतु तसें न करतां महाराजांनीं स्वतः येऊन परोपरीनें समजाविलें असतांही त्याची समजूत पडत नाहीं. इतकेंचनव्हे, तर तो त्यांच्या विरुद्ध जाऊं पहातो, यावरून त्याच्या अंगीं धोरण बिलकुल नसून तो स्वतःचाच हितशत्रु होता असेंच ह्मटलें पाहिजे.

असो; विजापूर दरबाराकडून जरी व्यंकोजीला साहाय्य मिळालें नाहीं, तरी कित्येक उपद्व्यापी मुसलमानांनीं त्याला महाराजांविरुद्ध उघडपणें युद्ध करण्याची भर दिली. त्याप्रमाणें त्यानें महाराजांकडील हंबीरराव मोहिते याच्या हाताखालील टोळीवर एकदम चाल केली. गृहकलह वाढूंनये एवढ्याक-रतां महाराज जरी भावापाशीं युद्ध करूं इच्छीत नव्हते, तरी तसाच प्रसंग येऊन ठेपल्यास लढण्याची त्यांच्या सैन्याची जय्यत तयारी होती. उभय सैन्यांची लढाई झाली तींत व्यंकोजीचा पूर्ण पराभव झाला व त्याचे पुष्कळसे लोक हंबीररावाच्या हातीं पडले. हें भावाच्या पराभवाचें वर्तमान महाराजांना कळलें तेव्हां त्यांनीं व्यंकोजीला आर्जवाचें व समजुतीचें असें एक पत्र लिहिलें. त्यांतील सारांशः—'घडलेला प्रकार अनिष्ट झाला; आतां तरी पत्र पाहतांच अर्धा वांटा द्यावा. यापुढें वडिलांचे चालीनें चालावें, दुष्ट दुर्मद मर्दावे, प्रजेचे आशीर्वाद घ्यावे. रीतीचें असेल, त्यास आमच्याकडून अंतर पडणार नाहीं. दौलत तुम्हांजवळ तीच आम्हांजवळ. परंतु मुलखी वांटा

घेणें एवढ्याच साठीं कीं, भाऊपणाचा वारसा पुढें मार्गे होऊं नये. उभयपक्षीं बेकिलाफ चालावें, परस्परें हिताहित जाणावें.' हें न मानेल तर तुंगभद्रातीरापासून पन्हाळ्यापर्यंत तीन लक्ष होनाची जागा तुम्हांस तुमचे मर्जीजोगी वाटेल तेथें घ्यावी. बाकी आमचा अंमल आम्हीं करूं.' याच सुमारास महाराजांनीं व्यंकोजीराजे यांस लिहिलेलें एक विस्तृत पत्र हल्लीं उपलब्ध झालेलें आहे तें येणेंप्रमाणें:—

"श्री महादेव. श्री कुलस्वामिनी.

श्री सहस्त्रायु चिरंजीव अखंडित लक्ष्मी अलंकृत राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री येंकोजीराजे प्रति राजश्री शिवाजीराजे, आशिर्वाद; येथील क्षेम जाणोन स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे. उपरी कैलासवासी साहेबीं कैलासगमन केला, त्यास आज तेरा वर्षें झालीं. महाराजांचे पैके व जडाव व हत्ती व घोडे व मुलूख अवघेही राजश्री रघुनाथपंतीं तुम्हांला राज्यावर बैसवून संपूर्ण राज्य तुमचे हातीं दिलें. ऐशियास आमचा अर्धा वांटा तेरा वर्षें तुम्हींच खादला. आम्हीं जरी तुम्हांजवळी मागावें, तर बहुत दूर होता. बऱ्याबोलें तुम्हीं देणार नाहीं. म्हणून तेरा वर्षें सबुरी केली. मनामध्यें ऐसाविचार केला, कीं थोरें महाराजांचे पुत्र तेही आहेत. जेसमयीं आम्हांला फावेल, तेसमयीं आम्हीं वेव्हार समजोन घेऊं असें मनीं धरोन राहतों. ऐशियास राजकारणप्रसंगें आम्हीं कुतुबशहाचे भेटीस भागानगरास गेलों. तेथून कर्नाटकांत गेलों. चंजीस आलों. चंजी घेतली; वेयेलूर तर्फेचा मुलूख घेतला व सदरखानास झगड्यांत मोडून गर्दीत मेळविलें. सदरखानाचे हातीं मुलूख होता तेवढाही घेतला. त्यावरी मजलदरमजल कावेरी तीरास गेलों. तेथून तुम्हांला पत्रें लिहिलीं, कीं राजश्री गोविंदभट गोसावी व राजश्री काकाजीपंत व राजश्री निळोबानाईक व राजश्री रंगोबा नाईक व तिमाजी बक्षियार राऊ असे भले लोक आम्हां[१] पासीं पाठविणें. म्हणून तुम्हांला बहुतांरीतीं लिहून पाठविलें. त्यावरून सदरहू भले लोक

आम्हां पासीं पाठवून दिले. त्या भल्या लोकांशीं बहुतांरीतीं घरोबियाचा व्यवहार सांगून आमचा अर्धा वांटा आम्हांस वेन्यां बोलें द्या म्हणून सांगून पाठविलें. व त्यांबरावरी राजश्री कृष्ण ज्योतिषी, व कृष्णाजी शेखजी असे आपले तर्फेनें भले लोक दिले. हे भले लोक तुम्हां जवळी जाऊनें बहुतां-रीतीं बोलले, कीं घरकलह करूं नये. आपला अर्धा व.टा मागतात तो द्यावा, असें बोलले. परंतु कपट बुद्धि तुम्हीं ऐसी मनी धारिली, कीं या समयांत आम्हीं थोर राजे झालों आहों. आम्हांसी आपण खांसा भेटीस येऊन तुम्हां जवळ नरमी बहुत दाखवावी, आणि आमचा वाटा बुडवावा. तेरा वर्षें सारें राज्य आपणच खादलें, पुढें ही आपणच सारें राज्य खावें अशी बुद्धि मनीं धरून वांटियाचा निवाडा—तह न करितां आपण खासाच आमचे भेटीस आले. यास आमची व तुमची भेट जाहली. त्या उपरी आम्हीं बहुतां रीतीं तुम्हांसी बोलिलों कीं आमचा अर्धा वांटा द्या. परंतु तुहीं वांटा द्यावा हा विचार मनीं धराचना. मग जरूर जाहलें, कीं तुह्मीं धाकटे भाऊ; आपण होऊन आमचे भेटीस आले, यास तुम्हांला धरावें आणि वांटा मागावा ही गोष्ट थोरपणाचे इजती मध्यें लायख नव्हे. यानिमित्त तुह्मांला चंजाउरास [ तंजावरास ] जाण्याचा निरोप दिला. तुम्ही चंजाउरास गेलेसी. त्याउपरी गृहकलह वाढवूं नये, वाढविल्यानें पहिले युगीं पांडव कौरव बहुत कष्टी झाले, ते सारी भारताची कथा मनांत आणून गृहकलह वाढविलियांत उभय पक्षीं कष्टी होइजेतें. असें मनांत जाणून राजश्री शामजी नाईक व कान्हेरीपंत व शिवाजी शंकर यांहातीं मागतें बहुतां रीतीं सांगून पाठविलें, कीं तुम्ही व आह्मी वांटे करून घेऊं, परस्परें समाधानें राहूं. परंतु तुम्हीं दुर्योधनासारखी दुष्ट बुद्धि धरून संधि न करावा, युद्ध करावें ऐसेंच मनीं धरिलें. एशियास अम्हांला रायगड प्रांतें बहुत कांहीं कार्य होतें. यानिमित्तें चिरंजीव संनाजी भोसले व राजश्री रघुनाथपंत व राजश्री धीरराव असे ते प्रांतीं ठेवून आम्हीं स्वार होऊन तोरगळ प्रांतास आलों.

येथें अशी खबर ऐकिली, कीं तुम्हीं तुरुक लोकांच्या बुद्धीस लागून, आमचे लोकांशीं झगडा करावा असें मनीं धरून आपली सारी जमेत एकवट करून आमचे लोकांवर पाठवून दिलेत. ते वालगोंडपुरास आले. तुमचे लोक चालून आल्यावर तुमचे आमचे लोकांत थोर झगडा झाला. तुमचे लोक पराजय पावले. प्रतापजीराजे व भिवजीराजे व शिवाजी डबीर असे तिघे धरिले, व कितीएक लोक मारिले. कितीएक लोक पळून दाणादाण होऊन गेले. ऐसा समाचार ऐकिला. हें ऐकून बहुत नवल असें वाटलें कीं, कैलसवासी महाराज, त्यांचे तुह्मी पुत्र, बहुत थोर लोक, असें असून कांहीं विचार करीत नाहीं व धर्माधर्म विचारीत नाहीं. असें असतां कशी व्हाल याचें नवल काय? तुह्मी ह्मणाल कीं काय विचार करावा? तरी ऐसा विचार करावा होता कीं, अधर्मे करून तेरा वर्षे आपण सारें राज्य खादलें-तें खादलें; आतां अर्धा वांटा मागतात तो त्यांचा त्यांना द्यावा; आणि आपण सुखी रहावें; ऐसा विचार करावा होता. दुसरा विचार करावा होता, कीं श्री देवाची व श्रींची कृपा त्यांवरी पूर्ण झाली आहे. दुष्ट तुरुकांला ते मारितात. आपल्या सैन्यांत तुरुक लोकच असतां जय कसा होतो, आणि तुरुक लोक कसे वांचूं पाहतात हा विचार करावा होता; आणि युद्धाचा प्रसंग पाडावा नव्हता. परंतु दुर्योधनासारखी बुद्धि करून युद्ध केलें आणि लोक मारविले. जें जाहलें तें जाहलें. पुढें तरी हट्ट न करणें. तेरा वर्षे राज्य खादलें तें खादलें. या उपरी कितेक आमचे आह्मीं घेतले असे. अरणी, बंगळूळ, कोलार, ईसकोट, शिराळकोट व किरकोळ जागे व चंजाऊर असे जे जागे तुमचे हातीं उरले आहेती, ते आमचे लोकांचे हातीं देणें, आणि जमेत, पैका व जडाव हत्ती व घोडे यांचा अर्धा वांटा देणें. ऐसा विचार करून आम्हांशीं संधि करणें. तुह्मी ऐसा संधि निर्मळपणें केलिया आम्ही आपणापासून तुम्हाला तुंगभद्रे अल्याड पन्हाळप्रांतीं तीन लक्ष होनांची दौलत देऊं, अथवा आह्मांजवळील दौलत तुम्हांला मानेना, तरी कुतुबशाहास अर्ज करून त्यापासून तुम्हांस तीन लक्षांची

दौलन देऊं. असे दोनही विचार तुम्हांला लिहिले आहेत. या दोनही मधील एक मनीं धरून मान्य करणें. हट्टाचे हातीं न देणें. आपल्या आपल्यांत आपण कलह करावा आणि कष्टी व्हावें याचें कांहीं प्रयोजन नाहीं. या उपरी तरी आमचा आपला संधि व्हावा असे बुद्धि मनीं धरून वांटियाचा व्यवहार निर्गमून टाकणें, आणि सुखी राहणें. गृहकलह बरा नव्हे. आम्हीं रीतीनें वडीलपणें आजवरी तुम्हांला सांगितलें. आतांही सांगतों. ऐकाल तरी बरें. तुह्मी सुखी पावाल. न ऐकाल तरी तुह्मांच कष्टी व्हाल. आमचें काय चालतें! बहुत काय लिहिणें (मोर्तब)"

हें पत्र सविस्तर येथें उतरण्याचें कारण इतकेंच कीं, तें या कर्नाटकाच्या मोहिमेसंबंधीं अत्यंत महत्त्वाचें आहे. या एका पत्रावरून अनेक गोष्टींचा उलगडा होतो. ही मोहीम करण्यांत महाराजांचा उद्देश कोणता होता हें जरी यांत स्पष्टपणें नमूद केलेलें नाहीं, तरी त्याविषयीं स्पष्ट अनुमान काढतां येतें. शिवाय महाराजांनीं कोणकोणत्या गोष्टी या मोहिमेंत केल्या, ते कोणकोणच्या स्थळीं गेले, कोणकोणते प्रदेश त्यांनीं हस्तगत केले वगैरे गोष्टींचा खुलासा या पत्रांत केलेला आहे. या पत्रावरून आणि इतर अनेक पुराव्यांवरून असें अनुमान होतें कीं, महाराजांच्या मनांत ही मोहीम सिद्धीस नेऊन मराठ्यांचें स्वतंत्र स्वराज्य स्थापित झालें असें बाहेर देखील स्पष्टपणें सर्वांच्या निदर्शनास आणून द्यावयाचें होतें. व्यंकोजीनें अलगपणें स्वतंत्र राहूं नये, त्यानें स्वतःला अदिलशाहीचा अंकित समजूं नये, मराठ्यांचीं दोन भिन्न राज्यें असूं नयेत. हे विचार त्यांच्या मनांत घोळत होते. भावाच्या क्षुद्रवित्ताचा अपहार करणें या क्षुद्र विचाराचा विटाळ त्यांच्या थोर मनाला होणें शक्यच नव्हतें. दुसऱ्याचे आपण ताबेदार, ही पूर्वापार हाडीं मासीं खिळलेली घातुक समजूत झुगारून द्या, आमच्यापासून वाटेलतर दुसरी जहागीर घ्या, आपले शत्रु जे तुरुक लोक त्यांची बुद्धि ऐकूं नका, आपण थोर राजे झालों असा वृथा डौल मिरवूं नका, श्रीशंभूची पूर्ण कृपा म्हणून आम्हांस भराभर सर्व कार्यांत यश येत गेलें

यागोष्टीचा कांहीं विचार करा, अशाप्रकारें परोपरीनें महाराजांनीं व्यंकोजीस उपदेश केला. या गोष्टी कशाच्या द्योतक होत, याचा ज्याचा त्यानेंच आपल्या मनाशीं विचार करावा. सारांश, ही मोहीम करण्यांत महाराष्ट्र—स्वराज्यरूपी उभारलेल्या टोलेजंग इमारतीस बाहेरूनही उत्तम तटबंदी करणें, हाच महाराजांच्या मनांतील मुख्य उद्दिष्ट हेतु होता असेंच विचारांतीं दिसून येईल.

वरील महाराजांचें पत्र वाचून व्यंकोजीचें मन अतिशय उदास झालें. त्याच्या जिवाला त्यावेळेपासून कसें तें चैन पडेनासें झालें. ही त्याची मनःस्थिति पाहून त्याची चतुर स्त्री दिपाबाई हिनें त्याचें समाधान केलें, आणि रघुनाथपंतांस शरण जाऊन त्यांच्याकडून महाराजांच्या मनाचें सांत्वन करण्याचा तिनें सल्ला दिला. तो व्यंकोजीस पटून त्यानें रघुनाथपंतांस लीनतेचें पत्र पाठवून आपल्या भेटीस बोलाविलें. त्याप्रमाणें ते तंजावरास भेटीस आले. व्यंकोजीनें सत्कारपूर्वक त्यांचा गौरव केला. दिपाबाईनेंही परोपरीनें त्यांची विनवणी करून त्यांची समजूत केली. तेव्हां रघुनाथपंतांनीं उभय बंधूंचा सलोखा करून दिला. त्या संबंधाचे कागद पत्र वगैरे महाराजांकडे रवाना करून ते जंजीस निघून गेले.

महाराजांनीं रघुनाथपंतांकडे मान्यता दर्शक जबाब लिहून पाठविला त्यांत असे उद्गार काढिले कीं. ‘ आमची भावजई शहाणी, पुढील होण्यमाण जाणून विचारावरी आणिलें; उत्तम झालें. आह्मांस विभाग घेऊन तरी काय कर्तव्य? त्यांज करितांच संपादन करणें. जनरीति ह्मणून बोलणें आलें. आह्मांस तरी मेळवून काय कर्तव्य. पदरची मनुष्यें यांचें चालावें, आपली कीर्ति उरावी इतका अर्थ; विचारांनीं चाललें असतां आह्मांस फार श्रेयस्कर आहे. ’ याचप्रसंगीं रघुनाथपंतांनीं दक्षिणेंतील आपला कारभार आपले बंधु जनार्दनपंत यांस सांगून, आपण स्वतः व्यंकोजीचा कारभार पहावा व कर्नाटकाचा बंदोबस्त ठेवावा असें ठरवून व्यंकोजीशीं करण्याचे करारमदार महाराजांनीं लिहून पाठविले. ते फारच महत्वाचे आहेत सबब त्यांतील मुख्य मुख्य कलमें देऊन त्यांजविषयीं दोन शब्द लिहिणें अवश्य आहे.

हें एकंदर १९ कलमांचें पत्र आहे. परंतु त्यांतील पुढील कलमें विशेष मनन करण्यासारखीं आहेत. ( १ ) दरखदार व कामदार यांचे इतल्याशिवाय कामकाज होऊं नये. लौकिकांत त्यांचे हातीं कांहीं नाहीं असें दिसूं नये. दरखांत खलेल करूं नये. भूषण देऊन चालवावें. ( २ ) शागीर्द पेशा मंडळी चांगली कुलीन इमानी पाहून जवळ रूपेंत ठेवावी. बातमी सर्वा ठायींची राखावी, परंतु ऐकतात असें दुसऱ्यास कळूं न देतां जरबेंत वागवून, नाजूक कामीं चाकरी घेत जावी. ( ३ ) शत्रु-मित्राचे ठायीं संस्थान माफक वकील व बातमीदार ठेवून दुसऱ्यास न समजतां, सर्व जागेंतील बातमी आणवीत असावी. ( ४ ) पागा, पथकें, तोफा वगैरे कारखाने कायम व हुशारींत ठेवावे; चाकरीचा रायता नित्य ठेवावा. गाफिली येऊं देऊं नये. ( ५ ) दुष्ट, व हिंदुद्वेषी यांस आपले राज्यांत ठेवूं नये व बंदोबस्त राखावा. ( ६ ) लहान थोरांशीं तह वगैरे करितांना तंटा न पाडतां गोरगरीब अनाथ यांचा अभिमान धरून चालावें. ( ७ ) देवस्थानें वगैरेंचा बंदोबस्त चांगला ठेवून उच्छेद करूं नये. ( ८ ) फिर्यादीचा इनसाफ तोडतांना पैशाचा लोभ न धरितां, गोरगरिबांचा अभिमान धरून चालावें. ( ९ ) वचन प्रमाण झाल्यावर दंडेली करणें आपले कुलांत झालें नाहीं व पुढें होऊं नये. ( १० ) विजापूरकरांचा व आमचा वडिलांमार्फत तह ठरला त्यांत, विजापूरकरांची चाकरी आपण अगर व्यंकोजी करणार नाहीं, प्रसंग पडेल तेव्हां इमानें इतबारें मदत करूं, त्यास अंतर पडणार नाहीं, इतकेंच ठरलेलें आहे. तरी त्याप्रमाणें पांच हजार पर्यंत फौजेची मदत विजापूरकरांनीं मागितल्यास करीत जावी. चाकरी करणें असें समजूं नये. ( ११ ) एकमेकांचे हद्दींतील चोर वगैरे गुन्हेगार दुसरे हद्दींत गेल्यास ते एकमेकांनीं एकमेकांचे स्वाधीन करण्यास हरकत सांगूं नये.

यांना तहाचीं कलमें अथवा करारमदार म्हणण्यापेक्षां तीं सामान्य आणि राजकीय नीतीचीं उदात्त मूलतत्त्वेंच होत असें म्हटलें पाहिजे. हीं जशीं राजनीतींत अतिशय उपयुक्त आहेत तशींच तीं सामान्य जनांच्या व्यवहारांत

देखील सारखींच उपयोगीं पडण्यासारखीं आहेत. पहिल्या कलमांत हाताखालील नोकरांच्या विचाराशिवाय कोणतीही गोष्ट करूं नये, त्यांच्या हातीं कांहींएक अधिकार नाहीं असें बाहेर दिसूं देऊं नये, त्यांचे वेतन चुकतें करण्यांत खळखळ करूं नये व बक्षिसें वगैरे योग्य प्रसंगीं देऊन त्यांना खुष ठेवावें वगैरे यजमानाचे अंगीं अवश्यक असे जे गुण ते व्यंकोजीच्या मनावर ठसविण्याचा यत्न केला आहे. दुसऱ्या कलमानें आसपासचीं माणसें कशीं असावीं हें सांगून त्यांच्या कडून सर्व ठिकाणचें वर्तमान काढवून आणीत जावें, परंतु त्यांच्याच ओंजळीनें पाणी आपण पीत आहों असें त्यांना वाटूं न देतां त्यांना जरबेंत वागवून त्यांच्यापासून नोकरी घेत जावी, असें धोरण ठेवण्याविषयीं उपदेश केलेला आहे. तिसऱ्या कलमांत परकी राज्यांतून आपले तर्फेचे वकील वगैरे लोक ठेवण्याचा जो सांप्रत उपयुक्त प्रघात आहे त्याचें स्पष्टीकरण केलें आहे. चवथ्या कलमांत सैन्य सदोदित जय्यत तयारींत ठेवावें, त्याला नेहमीं काम पडत जाऊन तें केव्हांही आळसानें गंजलें जाऊन विलासी बनूं नये वगैरे गोष्टी सांगितल्या आहेत. पांचव्या कलमानें दुष्ट, हिंदुद्वेषीलोकांना आपल्या राज्यांत थारा दिल्यानें राज्याचें नुकसान होईल तेव्हां त्यांना बंदोबस्तांतच ठेविलें पाहिजे ही गोष्ट व्यंकोजीच्या नजरेस आणिली आहे. सहाव्यांत कनिष्ठ व श्रेष्ठ अशा विषम दर्जाच्या लोकांचा तंटा लागला असतां भांडणास उत्तेजन न देतां समेट घडवून आणावा व तसे करतांना दुर्बलपक्षाचा अभिमान धरून चालावें हें उत्तम तत्व प्रतिपादिलेलें आहे. सातव्यांत देवस्थानांची व्यवस्था उत्तम ठेवून त्यांचा उच्छेद केव्हांही होऊं नये म्हणून बजाविलेलें आहे. आठव्या कलमांत न्याय देतांना लांच घेण्याच्या दुष्ट खोडीचा निषेध केलेला आहे. पुढच्या कलमांत एकदां वचन दिल्यावर त्याला हरताळ लागेल असें वर्तन कधीं ही घडूं नये अशा विषयीं आपल्या कुल परंपरेचें व पूर्वजांचें स्मरण करून देऊन उपदेश केला आहे. दहावें कलम फारच महत्वाचें आहे. यांत विजापूरकरांचें व आपलें नातें धनी व चाकर

अशाप्रकारचें नसून बरोबरीचें आहे असें झालेल्या तहाचें स्मरण देऊन स्पष्टपणें व्यंकोजीच्या मनावर ठसविलेलें आहे. शेवटच्या कलमांत चोर वगैरे गुन्हेगार एका हद्दींतून दुसऱ्या हद्दींत पळून गेल्यास त्यांच्या गुन्ह्याला उत्तेजन न देतां त्यांना पकडून देणें हें सामान्य नीतीच्या रक्षणासाठीं प्रत्येक राजाचें कर्तव्य आहे असा जो अर्वाचीन सुधारलेल्या राज्यपद्धतींतील एक नियम आहे तो सांगितला आहे.

याप्रमाणें या कर्नाटकावरील मोहिमेंतील हें भाऊबंदकीचें प्रकरण उभय बंधूंचा सलोखा होऊन कायमचें निकालास लागलें. सर्व महाराष्ट्र पूर्णपणें ताब्यांत येऊन व स्वतंत्र होऊन त्याचा उत्तम बंदोबस्त केल्यानंतर महाराजांनीं हा जो दक्षिणदिग्विजय आरंभिला, त्यावरून त्यांच्या मनांत सार्वभौम हिंदुपद्पादशाहीची कल्पना घोळूं लागली होती असें अनुमान करण्यास जागा आहे. औरंगजेबाचें दीर्घायुष्य जर परमेश्वरकृपेनें त्यांना प्राप्त झालें असतें, अथवा तितकें जरी नाहीं, तरी आणखी दहापंधरा वर्षें ते जर अधिक जगले असते तर आसेतुहिमाचलापर्यंत आपल्या राज्याची मर्यादा वाढवून वरील कल्पनेस मूर्तस्वरूप त्यांनीं खास आणिलें असतें; परंतु तसा ईश्वरीसंकेत नव्हता असें समजून समाधान मानणें बरें. या भाऊबंदकीच्या तंट्यांत जो पत्रव्यवहार झालेला आहे त्यावरून त्या तंट्याचें स्वरूप तर दृग्गोचर होतेंच, पण त्याहूनही महाराजांची योग्यता किती उच्च प्रकारची होती याची कल्पना अधिक स्पष्टपणें करितां येते. मागें जी कलमवारी दिली आहे तिच्यावरून तत्कालीन प्रचलीत असलेल्या व्यावहारिक आणि राजनीतिविषयक कल्पना उत्तम व्यक्त होतात. महाराजांची राज्यकाभाराचीं धोरणें काय होतीं, राज्यशकट उत्तम प्रकारें हांकण्यास कोणकोणते गुण अंगीं अवश्य असले पाहिजेत, दोन भिन्न भिन्न सत्तांमधील व्यवहार कोणत्या नीतितत्वांवर बद्ध केलेले असावे इत्यादि राजकीय विषयांची फोड देखील' वरील कलमवारी वरून चांगली करतां येते. शिवाजी महाराजांच्या राज्यपद्धतीचें उदात्त स्वरूप समजण्यास वरील कलमवारींत सांगित-

लेल्या तत्वांचीं ओळख असणें अत्यंत आवश्यक आहे, इतकेंच केवळ नव्हे, तर प्रत्येक इतिहासाध्ययन जिज्ञासूनें तीं सूत्रवत् पाठ करण्यालायक आहेत. सांप्रत सालचाय, वसई वगैरे ठिकाणच्या तहाचीं निरस कलमें मुखोद्गत करण्यांत आणि लढायांचे सन, तारखा वगैरे तोंडपाठ करण्यांत होतकरू विद्यार्थीवर्ग जो बुद्धिव्यय आणि कालक्षेप करितात तो त्यांनीं महाराजांनीं आपल्या भावास लिहून पाठविलेल्या कलमांचें पठन करून त्यांतील उदात्ततत्वें पूर्णपणें समजून घेण्यांत केला तर किती तरी अधिकपटीनें इतिहासाध्यायन केल्याचें श्रेय त्यांच्या पदरीं पडेल. सारांश, सुधारणेच्या शिखराप्रत जाऊन पोहोंचलेलीं अशी ज्यांच्या विषयीं सांप्रत साधारण समजूत झालेली दिसते अशा अर्वाचीन युरोपस्थ राष्ट्रांच्या राजनीतितत्वांची आणि महाराजांच्या राजनीतितत्वांची तुलना करून पाहिली असतां, स्थूलमानानें तीं कोणत्याही प्रकारें कमी योग्यतेचीं नव्हतीं असें सहज कळून येईल.

कर्नाटकीं जातांना महाराजांनीं गोंवळकोंड्याच्या कुतुबशहाशीं तह करून सख्य केलें, या संबंधीं मागें मजकूर आलाच आहे. परंतु हें सख्य दिल्लेरखानास न रुचून व महाराज कर्नाटकांत गुंतले आहेत अशी संधि पाहून त्यानें अकस्मात् एकाएकीं कुतुबशहावर स्वारी केली. धूर्त मादण्णापंत बेसावध नव्हता. त्याला या स्वारीची अटकळ पूर्वींच झालेली होती, ह्मणून तो तयारीनेंच होता. त्यानें दिल्लेरखानाच्या सैन्याचा पराभव करून ती स्वारी परत हटविली.' हें वर्तमान महाराजांस कर्नाटकांत कळलें; तसेंच औरंगजेब आपल्या पारिपत्याची जय्यत तयारी करीत आहे असेंही त्यांच्या कानीं आलें; तेव्हां कर्नाटकची कामगिरी रघुनाथपंत, संताजी भोसले, धनाजी जाधव व हंबीरराव मोहिते इत्यादि नवीन दमाच्या, शूर, धाडसी व धोरणी पुरुषांवर सोंपवून महाराज लगबगीनें महाराष्ट्रांत परत आले. परत येतां येतां विजापूरच्या फौजेच्या व त्यांच्या कित्येक चकमकी उडाल्या त्यांत त्यांना पूर्ण यश आलें.

१

कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांमधील प्रदेशांत विजापूरचा सरदार युसुफखान मायणा ह्मणून होता. वरील प्रदेश बहुतेक रानटी व ओसाड असून त्यांतील रहिवाशांस व प्रवाशांस पुंडपाळेगार लोकांपासून फार त्रास होत असे. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं साजरा गोजरा वगैरे नवीन किल्ले महाराजांनीं बांधिले होते. प्रांताचा बंदोबस्त होणें अवश्य आहे; तुमच्या हातून होत नसल्यास आम्ही करितों, असा मजकूर महाराजांनीं विजापूर दरबारीं कळविला होता. परंतु त्यांच्याकडून त्या बाबतींत कांहींच तजवीज झाली नाहीं. सबब महाराजांनीं किल्ले वगैरे बांधून स्वतः त्या प्रांताचा बंदोबस्त केला. ही गोष्ट युसुफखानास खपली नाहीं. शिवाय, तेथील जमीनदार वगैरे लोकांनीं हंबीररावाकडे अशी तक्रार केली कीं, 'हा युसुफखान फार खस्त आहे. याची नेकनजर नाहीं. जुलूम जाजती करणें, बायकापोरांस उपद्रव देणें गोवधादि निंद्य कर्में करणें. हा अविचारी, याचे हाताखालीं वागण्यास आह्मीं फार कंटाळलों. याजकरितां तुह्मीं यश द्या, आह्मांस या दुष्टाचे हातून सोडवा. याचा संसर्ग आह्मांस नको असें करा.' जमीनदारांच्या या विनंतीस मान देऊन व त्यांना आश्वासन देऊन त्यानें त्यांस परत लाविलें. स्वाधेंत मजकूर रघुनाथपंत व धनाजी जाधव यांचे कानावर घालून हंबीररावानें जमीनदारांचे मुलखांत जागोजाग आपलीं ठाणीं बसविलीं. ही हकीकत खानास कळतांच तो फौजेसहित हंबीररावाच्या थोड्याशा लोकांवर चालून आला. या समयीं उभय सैन्यांमध्यें जें अचाट युद्ध झालें त्याचें वर्णन अंगावर रोमांच उभे करण्यासारखें आहे! "मायणा शरीरें करून जबर, कजाखही विशेष. हंबीररावाजवळ सरंजाम थोडा, मायण्याची जमियत मोठी, असें असतां हंबीररावानें वीज चकाकतां अंधःकार दूर होऊन शुद्ध उदकधारा नजरेस येते, तद्वत् सैन्यांत हलकल्लोळ होऊन खानाचे लोकांनीं रस्ता देऊन जसे वेणीचे केंस दुभांग करून स्त्री वेणी घालिते, तशा-रीतीनें हंबीररायानें हत्यार चालवितांच फळीफुटोन दुभांग केलें. शेंकडों

मनुष्य जातांयेतां मारिले, खान नामोहरम होऊन पळूं लागले, त्यास धरून आणिलें. सरंजामसुद्धां सर्व लष्कर पाडाव करून आणिलें. हंबीररावाकडील फक्त पांचपन्नास लोक जखमी झाले. हें वर्तमान विजापुरीं गेल्यावर मायण्यास सोडविणेचा विचार काय करावा, अशी चिंता दरबारांत उत्पन्न झाली. शेवटीं मायण्यास सोडविण्याकरितां विजापुराहून फौज रवाना झाली. हंबीरराव तयारीनेंच होता. दुआबांत विजापूरची फौज येतांच उभयतांची तलवार चालूं लागली. लढाईची एकच गर्दी उसळली. विजापूरकरांचा पराभव झाला. दांतीं तृण धरून शरण आले त्यांजकडे न पाहतां, ज्यांनीं शस्त्र उचलिलें, त्यांचा चेंदा काढिला. चार घटका लढाई मातबर झाली. इतक्यांत धनाजी जाधव वगैरे दुसरे सरदार विजापूरची फौज आलेली ऐकून, हंबीररावाचे मदतीस आले. मग चहूंकडून लांडगे—तोड करून बेजार करून दिले. मुक्कामीं छापा घालावा, चालत्यामार्गीं लांडगे–वृका सारखे पाडाव करावे, याप्रमाणें विजापुरास पोंचेपर्यंत गलबल करून दिली. आईस लेंकरूं, लेंकरास आई ओळखीना, आपला जीव वांचला तरी सर्व कांहीं मिळेल, परंतु पळावें असेंच मनास वाटावें; पुनः 'मराठ्यांचे लढाईची गांठ ईश्वरा घालूं नको,' असें अंतःकरणांत म्हणावें." अशा रीतीनें विजापूरच्या फौजेचा पुरापुरा मोड झाल्यावर धनाजी जाधव महाराजांचे भेटीस रायगडीं गेला. मोहीते वगैरे सरदार परत कर्नाटकाचे बंदोबस्तास गेले. महाराजांना अत्यानंद होऊन ते मोठ्या समारंभानें सामोरे आले तेव्हां त्यांच्या मुखांतून असें उद्गार निघाले कीं, 'हीं मनुष्यें प्रतिसृष्टि निर्माण करतीं. आम्हीं नसतां पादशाहीशीं स्पर्धा करून मुलूख घेऊन गर्वहत केला. आम्हांशीं बोलण्यास त्यांस उरूज न राहिला. यांचे उतराई कोठें व्हावें ! असो. आमच्या साह्यार्थ हे देवलोकींहून मनुष्यरूपी निर्माण झाले असेंच वाटतें.' महाराजांनीं प्रसन्न चित्त होऊन त्यांना वस्त्रें व अलंकार दिले; शाबास म्हणून व नांवाजणी करून त्यांचा मोठा गौरव केला. धन्य शिवाजीमहाराज आणि धन्य त्यांचे साह्यकर्ते धनाजी

जाधवासारखे एकनिष्ट नोकर! असा योग महाराष्ट्राला एकवार लाभला म्हणूनच त्याचा त्या कालीं हां हां म्हणतां उद्धार झाला. ही लढाई सावनूरची लढाई म्हणून प्रसिद्ध आहे.

कर्नाटक काबीज करण्याकरितां महाराजांनीं जी मंडळी मागें ठेविली होती त्यामंडळी पैकींच दादजी प्रभु नांवाचा एक अत्यंत स्वामिभक्त सरदार होता. यानें पुंडपाळेगारांस जिंकून त्यांचा उत्तम बंदोबस्त केला. तसेंच त्यानें बेलवाडीचा भुइकोट मोठ्या शौर्यानें लढून सर केला. या संग्रामांत एका महाराष्ट्रीय वीरस्त्रीचें नांव तिच्या अंगच्या विलक्षण शौर्यामुळें पुढें आलेलें आहे. या स्त्रीनें दादजी प्रभूबरोबर जो रणप्रसंग केला, त्याची गोष्ट फार मनोवेधक आहे. ती अशी—बेलवडीचा किल्ला येसप्रभु नामक एका ठाणेदाराचे ताब्यांत होता. हा किल्ला विजापूरकरांचा असावा. तो घेण्याकरितां दादजी प्रभु यानें त्याला वेढा दिला. वेढा देऊन तीन महिने लोटले तरी किल्ला सर होईना. तेव्हां दादजीनें फितुरी मंत्राचा प्रयोग करून कोणाकडून किल्ल्यांतील घरांस आग लावविली. किल्ल्यावरील लोक आग शमविण्यांत गुंतले आहेत अशी संधी साधून त्यानें आपली फौज किल्ल्यावर चढविली. त्या प्रसंगीं जें हातघाईचें व निकराचें रणयुद्ध झालें त्यांत येसजीप्रभु कामास आला. त्याबरोबर येसजीच्या सैन्याचा धीर सुटून किल्ला दादजीच्या हातीं पडण्याच्य बेतांत होता. इतक्यांत येसजीची वीर पत्नी सावित्रीबाई हिनें पतिनिधानाचें दुःख गिळून टाकून आपल्या लोकांस धीर देऊन परत युद्धास प्रवृत्त केलें. स्वतः पतीची तरवार हातांत घेऊन घोड्यावर स्वार होऊन ती वीरस्त्री युद्धास सिद्ध झाली. पुरे दोन प्रहर मोठ्या शिकस्तीचें युद्ध करून तिनें दादजीस मागें हटविलें. जातीनें स्त्री होऊन ती इतक्या त्वेषानें लढते असें पाहून किल्ल्यांतील सर्व लोकांस पराकाष्ठेचें स्फुरण चढलें. त्यांनीं दुसरा निकराचा हल्ला केला, परंतु दुर्दैवानें त्यांत त्यांना यश आलें नाहीं.

म. गा. हल्ल्यांत दादजीनें सावित्रीबाईच्या घोड्याचे मागील दोन पाय छाटून

काढिले. त्याबरोबर बाई जमिनीवर पडली व लढतांलढतां तिचा उजवा हात तुटून ती दादजीच्या लोकांकडून घेरली जाऊन पकडली गेली. नंतर दादजीनें किल्ला हस्तगत केला व सावित्रीबाईस किल्ल्यांतील सर्व धनवित्तासह त्यानें महाराजांकडे आणिलें. त्यांनीं तिच्या शौर्याची तारीफ करून तिचा उत्तम सत्कार केला व चांगली नेमणूक करून देऊन तिला परत बेलवाडीस सुरक्षितपणें पोंचवून दिलें. हे उदाहरण असें आहे कीं, या वरून तत्कालीन महाराष्ट्रस्त्रिया किती शूर, पाणीदार व स्वाभिमानी होत्या हें दिसून येतें.

या प्रमाणें या कर्नाटच्या मोहिमेचा शेवट झाला. या पूर्वींच्या आयुष्यक्रमांत ह्मणजे सुमारें २५।३० वर्षांचे मुदतींत जेवढा मुलूख शिवाजीमहाराजांनीं काबीज करून स्वतंत्र केला, सरासरी तितकाच मुलूख त्यांनीं या दक्षिण दिग्विजयानें फक्त २।३ वर्षांचे अवधींत जिंकिला, एवढ्यावरूनच ही स्वारी किती महत्वाची झाली हें समजून येतें. ही स्वारी फत्ते करून महाराजांनीं स्वराज्याची मर्यादा फारच विस्तृत केली. दिलेरखानाविरुद्ध विजापूर शहराचा त्यांनीं बचाव केला त्याबद्दल त्या सरकाराकडून त्यांना कोपल, बल्लारी वगैरे प्रांत मिळून तंजावरसुद्धां द्रवीड देशावरील त्यांचा ताबा पक्का झाला. स्थूलमानानें मराठीराज्याची हद्द थेट दक्षिणेपर्यंत जाऊन भिडली. सांप्रत ज्याला ह्मैसुरप्रांत ह्मणतात तो त्यांच्या ताब्यांत आला. महाराजांच्या कारकीर्दीनंतर हंबीरराव, जनार्दनपंत, धनाजी जाधव वगैरे सरदार जे फार उदयास आले ते याच स्वारीनें प्रथम प्रसिद्धीस आले. या सरदारांना आपल्या नेहमींच्या वहिवाटी विरुद्ध महाराजांनीं वंशपरंपरा जहागिरी करून दिल्या, या एकाच गोष्टीवरून स्वतः महाराजांना देखील या स्वारीचें किती महत्व वाटत होतें हें दिसून येतें.

या नंतर दिल्लीचा बलाढ्य सत्ताधीश औरंगजेब बादशहा आणि शिवाजीमहाराज यांच्यामध्यें पुनः एकवार युद्ध जुंपलें. या युद्धाला कोणतीं सामान्य कारणें झालीं यांचा आपण प्रथम विचार करूं.

मोंगलांबरोबर चाललेलें पहिलें युद्ध इ. स. १६७२ त संपलें. या नंतर

मराठी सत्तेचें स्वरूप अगदीं भिन्न झालें. त्या सत्तेनें विजापूरच्या मुसलमानी सत्तेचा पूर्ण पाडाव केला. महाराजांनीं स्वतःस राज्याभिषेक करवून भारतीय पुरातन पद्धतीवर प्रसिद्धपणें स्वराज्याची स्थापना केली. नंतर अचाट दिग्विजय करून दक्षिणेंत स्वराज्याची मर्यादा फारच विस्तृत केली, इतकेंच केवळ नाहीं, तर, मराठ्यांच्या अचाट सामर्थ्याचा सर्वत्र दरारा बसविला. या गोष्टींमुळें औरंगजेबाच्या मनाला दहशत बसून या नूतन मराठसत्तेचा पाडाव कसा करितां येईल अशाविषयीं त्याच्या मनाला सारखी तळमळ लागून राहिली. तशांत, "सैतानासही मंत्राचा उपाय असतो, तें मृत सैतान व हें जिवंत सैतान; नेत्रपातें स्थिरतेंत आलें पाहावें, झांकनांच येऊन लुटून मारून गेलें. धुंडावें तरी ठिकाण लागत नाहीं. राहतात कोठें, खातात काय, विसावा केव्हां घेतात याचा शोध लागत नाहीं. यामुळें दिक्क आहों; " अशाप्रकारचें महाराजांच्या विलक्षण कर्तबगारीचें वर्णन प्रत्यक्ष बादशहाच्या दक्षिणेंतील सरदारांकडून त्याला दिल्लीस पोंचूं लागलें, त्यामुळें औरंगजेबाला महाराजांचें पारिपत्य केव्हां होईल असें होऊन तो त्या उद्योगाला लागला. दुसरें असें कीं, महाराजांनीं गोंवळकोंडेकरांपाशीं सख्य केलें याचा सर्व मोंगल सरदारांस अतिशय राग आला. मुसलमानीसत्तेचेंच सख्य संपादन करून मराठे आपल्यास चीत करूं पाहतात, ही गोष्ट त्यांच्या अंतःकरणांस फार झोंबूं लागली. तेव्हां कुतुबशाही आणि मराठशाही या दोन्ही सत्तांचा एकदम समाचार घेण्याची त्यांनीं तयारी चालविली. तिसरें असें कीं, मोंगल सरदार—दिल्लेरखान याच्या मनांत विजापूरपादशाहीशीं तह करून शिवाजीमहाराजांचा कोंडमारा करण्याचें होतें, परंतु औरंगजेबाच्या मनांतून दोघांचींही नाकें सारखींच ठेंचावयाचीं होतीं; त्यामुळें त्यानें विजापूरकर आणि मराठे यांना एकदम जिंकण्याविषयीं आपल्या सरदारांस हुकूम पाठविला. इकडे दिल्लेरखानानें महाराजांचा वडील मुलगा संभाजी यास फुसलावून फितूर केल्यामुळें महाराजांनाही आपलें सारें सामर्थ्य मोंगलांच्या

प्रत्ययास आणून देण्याची अवश्यकता वाटली. अशा—अशा कारणांनीं या युद्धाची सिद्धता झाली.

वरील कारणांनीं हें युद्ध सुरू झालें तें पुढें सतत ३० वर्षे चालू होतें ह्मटलें तरी चालेल. या युद्धांत लहान मोठ्या अनेक मोहिमी झाल्या, त्यांपैकीं पहिली मोहीम महाराजांचे हयातींत झाली. तिचाच विचार प्रस्तुत कर्तव्य आहे.

औरंगजेबाचा दक्षिणेंतील कारभार त्याचा सरदार दिलेरखान हा मुखत्यारीनें पहात होता. महाराज कर्नाटकांत असतां त्यानें त्यांच्या मुलखांत धामधूम केल्यामुळें मोरोपंत पेशवे उत्तरेकडे त्याच्या बरोबर लढण्याकरितां गेले त्यांनीं तिकडे औंध व पट्टा हे दोन किल्ले काबीज केले. हंबीररावानें दुसरीकडून जाऊन बऱ्हाणपुरापर्यंत मुलूख लुटला व नर्मदानदी उतरून भडोच परगण्यांतून खंडणी वसूल केली. यामुळें दिलेरखानानें महाराजांचा कल्याणप्रांत लुटला. अशा प्रकारें कित्येक दिवस धामधूम चालू होती. शेवटीं महाराजांचा नवीन स्नेही कुतुबशहा यास जिंकिला ह्मणजे महाराजांस चांगलीच तंबी दिल्याप्रमाणें होईल, असा डाव मनांत योजून दिलेरखानानें गोंवळकोंड्यावर चाल केली. परंतु मादण्णापंताच्या उत्तम तयारीमुळें खान कसा नोंडघसीं पडला याचा संबंध मागें आलेलाच आहे. नंतर खानानें विजापुरावर स्वारी केली तेव्हां आदिलशहानें शिवाजी महाराजांकडे मोंगलांविरुद्ध मदत मागितली तेव्हां त्यांनीं तावडतोब मोंगलांवर स्वारी करून त्यांचें जालना शहर लुटलें. यास्तव महाराजांवर शहाजादा फौजेसह चाल करून गेला. रणमस्तखान, आसदखानादि बलाढ्य मुसलमान सरदार त्याच्या साह्यास होते. ही लढाई इ. स. १६७७ त संगमनेर येथें झाली. आरंभीं मराठ्यांस अपयश आलें. शिधोजी निंबाळकर पडला; संताजी घोरपडे पराभूत होऊन मागें फिरला. ही स्थिति अवलोकन करून महाराजांनीं कांहीं शेलक्या स्वारांनिशीं शत्रुसैन्यावर इतक्या त्वेषानें हल्ला चढविला कीं, त्याबरोबर मोंगल सैन्याची दाणादाण होऊन तें चहूंकडे पळून गेलें. या लढाईंत महाराजांनीं

प्रत्यक्ष स्वतःच्या अंगमेहनतीवर आणि मर्दुमकीवर जयश्री मिळविली. जी लूट मिळाली ती त्यांनीं रायगडावर पोंचती केली. यापुढें मोरोपंत पेशव्यानें उत्तरेकडील बहुतेक किल्ले जिंकून ते हस्तगत केले. अशा रीतीनें अन्य बाजूंनीं मोंगलांना शह देऊन दिल्लेरखानाची अदिलशाही राजधानी वरील मिठी सोडविण्याचा महाराजांनीं उद्योग केला खरा, परंतु त्याला न जुमानतां दिल्लेरखान विजापूर सोडून गेला नाहीं. ह्मणून तावडतोब येऊन विजापूरबादशाहीचा बचाव करण्याविषयीं विजापूरकरांकडून महाराजांना निरोप आला व तिकडे ते जाण्याकरितां निघाले. परंतु मध्यंतरीं एक मोठें विघ्न उपस्थित झालें. महाराजांचा वडील पुत्र संभाजी फितूर होऊन मोंगलांना जाऊन मिळाल्याची अशुभ वार्ता त्यांच्या कानावर आली व त्या गोष्टीचा बंदोबस्त करण्याच्या उद्योगास ते प्रथम लागले.

संभाजी मोंगलांना फितूर झाला या गोष्टीचा महाराजांना मोठा विस्मय वाटला. सहज थोडीशी बोलाचाली झाल्यावरून संभाजी रुसून घराबाहेर पडला तो थेट मोंगलांच्या छावणींत जाऊन दिल्लेरखानाला भेटला. खानाला या गोष्टीचा फार हर्ष वाटला. त्यानें संभाजीला ठेवून घेऊन त्याला नेमणूक करून दिली व तें आनंदाचें वर्तमान त्यानें दिल्लीस कळविलें. परंतु बादशहाच्या मनावर ही गोष्ट ऐकून फार निराळाच परिणाम झाला. त्याला संभाजी फितूर होणें हें केवळ अशक्य वाटलें; व तसें वाटणें साहजिक होतें. कारण आजपर्यंत महाराजांकडील एकही मनुष्य शत्रूला वश झाल्याचें उदाहरण बादशहाला आढळलेलें नव्हतें. तेव्हां प्रत्यक्ष त्यांचा पुत्र संभाजी आपणाला वश होतो हें कसें संभवेल, असें औरंगजेबाला वाटलें. त्यांतून त्याचा स्वभाव फार संशयी असल्यामुळें संभाजी वश तर नाहींच, पण उलट हेर ह्मणून तो आला असावा, असा त्याच्या मनाचा ग्रह झाला. त्यानें संभाजीस कैद करून एकदम त्याची दिल्लीस रवानगी करून देण्याविषयीं खानास हुकूम सोडला. याच संधीस संभाजीला दोन हितोपदेशाच्या गोष्टी सांगून त्याची

समजूत पाडण्याकरितां महाराजांचे लोक खानाकडे आले होते. संभाजीस एकवार दिलेलें आश्वासन बाजूला ठेवून बादशहाच्या हुकुमाप्रमाणें त्याचा विश्वासघात करण्याचें अनुचित धाडस खानाला झालें नाहीं. त्यानें संभाजीची व महाराजांच्या लोकांची मुलाकत करून देऊन संभाजीला आपले छावणींतून पळून जाण्याची भर दिली. त्याप्रमाणें तो रायगडीं महाराजांकडे निघून आला. त्यांनीं आपल्या मुलाचें मन फारसें दुखविलें नाहीं. परंतु त्याला गोड शब्दांनींच उपदेश करून त्याची त्यांनीं समजूत केली. पुढें त्यांनीं संभाजीला विठ्ठल त्रिंबक कारभारी, सूर्याजी कंक वगैरे चांगल्या लोकांच्या नजरेखालीं पन्हाळगडावर ठेवून दिलें. नंतर महाराजांच्या अंतकालपावेतों संभाजी पन्हाळगडींच होता.

या नंतर महाराजांचे मोंगलांबरोबर फारसे युद्ध प्रसंग झाले नाहींत. दक्षिणेंत कर्नाटकप्रांतीं मोहिम नेऊन ज्याप्रमाणें त्यांनीं स्वतंत्र स्वराज्याची मर्यादा विस्तृत केली त्याप्रमाणें उत्तरेकडेही स्वराज्याची मर्यादा वाढविण्याची त्यांची मनीषा होती व गुजराथप्रांतांत त्यांचे प्रयत्न सुरू होते. परंतु त्यांच्या हयातींत ते चांगलेसे सफल झाले नाहींत.


असो. येथपर्यंत शिवाजीमहाराजांनीं जे अतुल पराक्रम केले, प्रसंगविशेषीं जे अजब मुत्सद्दीपणाचे व्यूह रचून ते यशस्वी केले, जी स्वदेशाची व स्वधर्माची सेवा केली व अनेक बिकट युद्धप्रसंग करून ज्या मोठमोठ्या मोहिमा तडीस नेल्या त्यांचें वर्णन यथामति आणि यथाशक्ति आम्ही केलें आहे. हीं सर्व अलौकिक कृत्यें करून त्यांनीं जें एक महत्कार्य पूर्णपणें तडीस नेलें तें 'महाराष्ट्र स्वराज्यसंस्थापना' हें होय. ही स्वराज्यसंस्थापनारूपी भव्य इमारत पाया शुद्ध आणि भरभक्कम अशी उभी करण्यांत त्यांना आजन्म काळजी वहावी लागली व अमरणांत सतत कष्ट सोसून देह झिजवावा लागला. सबंध आयुष्यक्रमांत ऐषआरामाचा अथवा विश्रांतीचा असा एकही दिवस त्यांना लाभला नसेल. त्यांत राज्याभिषेकानंतर लवकरच त्यांचें मुख्य आधारदैवत

ज्या मातोश्री जिजाबाई त्यांनीं आपला देह ठेविला. तेव्हांपासून त्यांचें मन अगदीं खिन्न आणि उदास झालेलें होतें; त्यांत संभाजीच्या दुर्वतनाची भर पडून त्याच्या फितुरीनें तर महाराजांना परमावधीचें दुःख झालें. अशा गोष्टींमुळें त्यांच्या अवतार समाप्तीचा काल समीप येऊन ठेपला. गुडघ्यांत गळूं झाल्याचें निमित्त होऊन एकाएकीं त्यांना ज्वर भरला. सात दिवस ज्वराची पीडा होऊन तिच्यांतच चैत्र शुद्ध १५ श. १६०२ (ता. ५ ऐप्रील सन १६८०) या दिवशीं या स्वराज्यसंस्थापक अद्वितीय महापुरुषाचें देहावसान झालें.

मृत्युसमयीं महाराजांचें वय फक्त ५३ वर्षांचें होतें; ह्मणजे त्यांना अकालींच मृत्यूनें गांठलें असें होतें आणि तेंही ते फार दिवस आजारी न पडतां एकाएकींच ह्मटलें तरी चालेल. शिवाय त्यांच्या विश्वासांतील सर्व कर्ती माणसें त्यावेळीं त्यांच्या सन्निध हजर नव्हतीं. मोरोपंत पेशवे, हंबीरराव मोहिते इतरत्र गुंतलेले होते. बाळाजी आवजी चिटणीस, प्रल्हादपंत व रामचंद्र निळकंठ अमात्य अशीं फक्त तीन माणसें त्यांच्या जवळ होतीं. यामुळें ह्मणा अथवा वडील पुत्र संभाजी राज्यपदाला अयोग्य होय असें वाटून मन निराश झाल्यामुळें ह्मणा, राज्यासंबंधीं अमुक एक निश्चित अशी व्यवस्था महाराजांनीं कोणापाशीं सांगितली नाहीं. 'सर्वांनीं एकविचारें चालून राज्याचें व धर्माचें रक्षण करा,' एवढ्या मोघम शब्दांनीं जवळच्या मंडळीस उपदेश करून त्यांनीं देह ठेविला. महाराजांच्या मनाला व्यक्ति विषयक स्वोत्कर्षाचा गंधही न लागतां त्यांचें सर्व आयुष्य सतत स्वराष्ट्रोत्कर्षविषयकविचार करण्यांत गेलेलें असल्या कारणानें निधनकाळीं त्यांच्या मुखांतून निघालेल्या वरील मोघम उपदेशांतच पुढील राज्यव्यवस्थेचें निश्चित धोरण त्यांनीं सांगून ठेविलें होतें असें ह्मणणें अधिक सयुक्तिक होईल. असो; महाराजांचे मागें त्यांना वडील संभाजी व धाकटा राजाराम असे दोन पुत्र होते. मरणसमयीं खजिन्यांत नऊ कोट रुपये, ५३ हजार तोळे सोनें, २०० तोळे माणकें,

१०० तोळे मोत्यें, ५०० तोळे हिरे, शिवायें मुचलक धान्य, कापड व हत्यारें इतकी शिल्लक होती !

हें शिवचरित्र वीररस प्रधान आहे, आपल्या चरित्रनायकाचे ठिकाणीं वीरत्व हा गुणतर प्राधान्यें करून होताच, परंतु स्वराज्यसंस्थापनेसारखें श्रेष्ठ राष्ट्रकार्य घडवून आणून तें दीर्घकालपर्यंत टिकाऊ करण्यास वीर पुरुषाचे अंगीं कल्पकपणा, योजकता, सद्वर्तन, स्वधर्मनिष्ठा, लोकपुढारीपणा राजनीतिनिपुणत्व वगैरे वगैरे अनेक गुण असावे लागतात. हे सर्व गुण शिवाजी महाराजांचे अंगीं होते हें या कथानकांत वेळोवेळीं प्रसंगानुरोधानें दिग्दर्शित झालेलें आहे; तरी त्यांचें खुलासेवार स्पष्टीकरण व्हावें म्हणून वाचकांकरितां या पुस्तकाला महाराजांची योग्यता हा स्वतंत्र भाग जोडिला आहे. तसेंच हें श्रेष्ठ देशोद्धाराचें काम सफल करण्यांत समर्थरामदासस्वामींनीं हातभार कसा लाविला, त्यांनीं परिस्थित्यनुरूप धर्मजागृतीचें राष्ट्रीयजागृतींत कसें पर्यवसान केलें व त्या मुळें रामदासांची योजकता आणि महाराष्ट्रीयांचीं इनिकर्तव्यता हा सुयोग कसा जुळून आला, यागोष्टींचें विवेचन पुढच्याभागांत केलें आहे.



# भाग १० वा.

## श्रीसमर्थ रामदास आणि श्रीछत्रपति शिवाजीमहाराज.

"यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥
परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम्
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥"

भगवद्गीता.

अर्थ— हे अर्जुना, ज्या ज्या काळीं धर्माची पायमल्ली होऊन अधर्माचा जिकडे तिकडे सुळसुळाट होतो, त्या त्या योग्य काळीं दुष्टांचा संहार आणि साधूंचें रक्षण होऊन धर्म संस्थापनेसाठीं ह्मणजे धर्माची चिघडलेली घडी पुनः नीट बसावी ह्मणून मी अवतार घेत असतों.

वरील अवतरण भगवद्गीतेमधील आहे. यांत श्रीकृष्ण भगवानांनीं आपला शिष्य अर्जुन याला, आपल्याला केव्हां केव्हां आणि कोणकोणतीं कार्यें घडवून आणण्याकरितां या भूपृष्ठावर अवतरावें लागतें, हें सांगितलें आहे. 'इतिहासाची पुनरावृत्ति होत असते' असें जें एक आधुनिक मत प्रचारांत आलेलें आहे, त्यांतील रहस्य वरील गीता श्लोकांत अन्य शब्दांनीं गोंविलेलें आहे. आपल्या पुराणग्रंथांतून दहा मुख्य अवतार आणि दुसरे पुष्कळ उप-अवतार होऊन गेल्याबद्दल वर्णन आहे. या सर्व अवतारांनीं वर दिलेल्या अवतरणांत सांगितल्याप्रमाणें दुष्टांचें शासन, सुष्टांचें रक्षण आणि धर्मसंस्थापना—योग्य कर्तव्यांची योग्य घडी बसवून देणें, हींच कार्यें घडवून आणिलीं होतीं. श्रीरामदासस्वामी हे मारुतीचा अवतार असून श्रीशिवाजी

महाराज हे शंकराचा अवतार होता आणि या दोन अवतारी पुरुषांनीं वरील कार्यँच करून दाखविलीं अशी कल्पना पूर्वकालीन सर्व सहृदय भाविक लोकांची होती व ती अजूनही जशीच्या तशीच बहुतेक अर्वाचीन लोकांमध्यें प्रचलित आहे. अशी कल्पना असण्यास श्रीसमर्थरामदासांनीं या स्वराज्यसंस्थापनेच्या श्रेष्ठ कार्यास धर्मसंस्थापनेची जोड देऊन कसा हातभार लाविला हें पाहण्यापूर्वी, प्रथम त्यांच्या जीवनचरित्राचें थोडेंसें निरीक्षण करूं.

रामदासांचे मूळ पुरुष कृष्णाजीपंत ठोसर नांवाचे देशस्थ ब्राह्मण होते. यांना चार पुत्र होते. पैकीं दशरथपंत हे सातारा जिल्ह्यांत जांब ह्मणून गांव आहे तेथें येऊन राहिले. यांच्याकडे बारा गांवांची ज्योतिषवृत्ति आणि कुळकर्ण होतें. हें मोठे रामोपासक होते व पुढें यांच्या वंशांतील सर्व पुरुष पूर्ण रामोपासक निपजले. दशरथपंतांना रामाजीपंत नांवाचा पुत्र होता. याप्रमाणें कृष्णाजीपंत, दशरथपंत आणि रामाजीपंत ही रामदासांच्या वंशांतील मूळपुरुषांची त्रयी होय. त्या पुढील १९ सावे पुरुष सूर्याजीपंत हें होत. हे रामोपासक तर होतेच. शिवाय, ते सूर्यनारायणाची आराधना करीत असत. यांच्या स्त्रीचें नांव राणूबाई. या मोठ्या साध्वी असून अत्यंत पतिसेवाधर्मपरायण अशा होत्या. राणूबाई आणि सूर्याजीपंत हींच रामदासांचीं मातापितरें होत. धन्य त्यांची कुशी! कीं जिच्या ठायीं रामदासांसारखें महन् साधुरत्न निर्माण झालें!

रामदासांना एक वडील बंधु होते. त्यांचें नांव गंगाधरपंत. हे देखील परम भगवद्भक्त असून मोठे अधिकारी पुरुष होते. यांच्या उत्कट भगवद्भक्तीवरून, सदाचरणावरून आणि कडकडीत उपासनेवरून, लोकांत यांना श्रेष्ठ ही पदवी प्राप्त झालेली होती. यांच्या पाठीवर शके १८३० रामनवमीचे दिवशीं राणूबाईच्या पोटीं श्रीरामदासांचें जन्म झालें. सूर्यनारायणाच्या प्रसादानें हा पुत्र झाला असें समजून सूर्याजीपंतांनीं यांचें नांव 'नारायण' असें ठेविलें. पुढें त्यांच्या रामसेवेच्या निदिध्यासामुळें आणि त्यांनीं अलौकिक सामर्थ्याचे

अनेक चमत्कार करून दाखविल्यामुळें ते श्रीसमर्थरामदास या यथार्थ नांवानें जगांत प्रसिद्ध झाले. यांची लहानपणची बाललीला कांहीं विलक्षण प्रकारची होती. हें नेहमीं हांसतमुख असत. लहान असतां रडणें हें कसें तें त्यांना मुळींच ठाऊक नव्हतें ! जन्मल्या पासून दोन वर्षांतच तें चांगले बोलूंचालूं लागले. त्यांची देहकांति फारच देदीप्यमान् होती. त्यांचा बाळपणाचा स्वभाव अतिशय हूड असे. क्षणभर एका जागेवर त्यांचें पाऊल कसें तें ठरत नसे. सदोदित उड्या मारण्याचा छंद. एक सारख्या माकडाप्रमाणें त्यांच्या चेष्टा चालू असावयाच्या. बरोबरीच्या पोरांना वानरासारख्या वांकुल्या दाखवावयाच्या. या त्यांच्या खोड्या जाऊन त्यांची वृत्ति कांहीं शांत व्हावी म्हणून ते ५।६ वर्षांचे झाले तेव्हां वडिलांनीं त्यांना शाळेंत घातलें. परंतु त्यांची बुद्धि इतकी विलक्षण तीव्र होती कीं, पंतोजीला अवगत असलेलें सारें शिक्षण त्यांनीं एका वर्षांतच पटकावून टाकिलें ! इतकेंही करून पोरांबरोबर रात्रंदिवस हुदडणें, अतिशय उंच उंच वृक्षांवर सहज वानराप्रमाणें चढणें, एका डहाळीवरून दुसऱ्या डहाळीवर उडी मारणें, झाडाच्या अगदीं लहान् फांदीच्या शेंड्याला लोंबकळून घरांच्या पाख्यांवर अगर भिंतींवर सहजरीत्या झेंप टाकून उतरणें, इत्यादि त्यांच्या हनुमानलीला त्या अवधींत चालूच होत्या. या त्यांच्या लीलेवरून हे मारुतिरायाचे खास अवतार असले पाहिजेत अशी लोकांची खात्री झाली. हे सात वर्षांचे असतांच यांचे वडील निवर्तले.

समर्थांपेक्षां श्रेष्ठ २।३ वर्षांनीं वडील होते. या उभय बंधूंमध्यें उत्तमप्रेमभाव असे. वडिलांच्या वियोगाचें दुःख गिळून व मातुश्रीची सेवा करून हीं दोन मुलें गुण्यागोविंदानें राहत. या उभयतांचा ईशभक्तिकडे सारखाच ओढा होता; परंतु समर्थांचा त्यांतूनही वैराग्याकडे विशेष कल होता. श्रेष्ठांचा विवाह पूर्वीं झालेला होता. आतां राणूबाई समर्थांच्या विवाहाचा विचार करूं लागल्या. परंतु समर्थांच्या विवाहाच्या गोष्टी त्या बोलूं लागल्या कीं, समर्थांना फार चिरड व राग येत असे. कारण ते विवाहास कबूल नव्हते. एकदां

त्यांच्या लग्नाची गोष्ट सहज घरांत निघाली तेव्हां ते इतके रागावले कीं, कोणाच्या नकळत घरांतून निघून ते रानांत पळून गेले व एका झाडावर चढून बसले. कोणी समजाविण्यास गेलें कीं, ते बेलाशक त्याच्यावर दगड फेंकून मारीत. शेवटीं श्रेष्ठांनीं जाऊन त्यांची समजूत केली व त्यांना घरीं आणिलें.

मुलाचे दोन हातांचे चार हात केव्हां होतील? असें प्रत्येक मातेला साहजिकपणें वाटत असतें. त्यांत समर्थांच्या हट्ट पाहून त्यांच्या लग्नाविषयीं राणूबाईंना फार उत्कंठा लागून राहिली. त्यांनीं पुष्कळांना मध्यस्थ घालून त्यांची समजूत पाडण्याचा खटाटोप केला परंतु तो निष्फल झाला. शेवटीं एक दिवस 'अंतःपाट धरीपर्यंत तरी नाहीं ह्मणणार नाहीं' असें समर्थांपासून त्यांनीं वचन घेतलें व त्या त्यांच्या विवाहाच्या तयारीस लागल्या. मुलगी नेमस्त होऊन विवाहाची अगदीं तयारी झाली, तरी समर्थांनीं कांहीं एक गडबड केली नाहीं. तेव्हां ते आतां ताळ्यावर आले, असें सर्वांस वाटूं लागलें. मुहूर्त निश्चित झाला. सीमंतपूजन, पुण्याहवाचन वगैरे पूर्वविधि होऊन गेले. लग्नघटि प्राप्त होतांच ब्राम्हणांनीं वधूवरांमध्यें अंतःपाट धरिला व मंगलाष्टकें ह्मणण्यास सुरवात केली. त्यांतील 'सावधान' हा शब्द उच्चारिला जातांच समर्थ एकदम दचकले व सावध झाले. सावध असूनही ब्राह्मण 'सावधान' ह्मणतात तेव्हां खरोखरच येथें कांहीं तरी दगा असावा असें त्यांना वाटलें व ते एकदम धूम पळत सुटले. मातुश्रीला दिलेलें वचन पुरें झालें असें समजून ते जे पळून गेले ते त्यांचा लोकांनीं कितीही तपास केला तरी सांपडले नाहींत. तेव्हां त्यांच्या मातुश्रींना पराकाष्ठेची चिंता उत्पन्न झाली. त्या फार शोक करूं लागल्या. श्रेष्ठांनीं त्यांच्या मनाचें समाधान केलें. ते ह्मणाले 'आई, आपण कांहीं एक काळजी करूं नये. समर्थ सुखरूप आहेत.' हें ऐकून राणूबाईंचें मन जरा स्वस्थ झालें. कारण, तपोबलानें श्रेष्ठ अंतर्ज्ञानी झाले होते अशी त्यांची खात्री होती.

समर्थ 'सावधान' होऊन विवाहमंडपांतून ऐनसमयीं पळून गेले ते तीन दिवसपर्यंत जांबगांवांतच एका अश्वत्थवृक्षाच्या ढोलींत दडून बसले होते. तेथून निघून ते नाशकाजवळ टाकळी म्हणून गांव आहे तेथें गेले. तेथें राहून त्यांनीं बारा वर्षें मंत्रपुरश्चरणें करून तेरा कोटी रामनामाचा जप केला. शेवटीं साक्षात् रामदर्शन घडून त्यांना अनुग्रह झाला. नंतर प्राप्त झालेलें गुज हृदयांत ठसण्यासाठीं पुढें बारा वर्षें अखिल भरतखंडभर फिरून त्यांनीं तीर्थपर्यटण केलें. या पर्यटणांत एकंदर देशाची दुःस्थिति त्यांच्या लक्षांत आली. भरतखंडाची परकी यवनी राजसत्तेच्या जुलुमामुळें झालेली दैना त्यांच्या प्रत्यक्ष नजरेस आली. तेव्हां परदास्यपंकांतून भरतखंडवासीजनांची मुक्तता होऊन त्यांची सर्व बाजूंनीं आत्मिक उन्नति व्हावी हा विचार त्यांच्या मनांत आला व ही गोष्ट घडवून आणण्यास कोठें राहून यत्न करावे ? याविषयीं ते विचार करूं लागले. 'आपण कृष्णातीरीं जाऊन जगदुद्धार करावा' असा श्रीरामचंद्रांनीं प्रत्यक्ष-दर्शनानें समर्थांस दृष्टांत दिला व त्याप्रमाणें ते कृष्णातीराच्या खनाळांत येऊन राहिले व सर्व राष्ट्राची चिंता वाहूं लागले. अशा प्रकारचें हें समर्थ रामदासांचें थोडक्यांत जीवनचरित्र आहे. यापुढें देशोद्धारार्थ त्यांनीं अखिल जनांस जो सामान्य उपदेश केला व शिवाजी महाराजांस प्रत्यक्ष आपला शिष्य करून त्यांचें राजकारण यशस्वी करण्यास जें सहाय्य केलें त्याचा अल्पसा विचार करून आपण हें प्रकरण संपवूं.

मृत प्राणी जिवंत करणें, मृत्तिकेचें सुवर्ण करणें, भोजनसामुग्री कांहीं एक संग्रहीं नसतां व ती जवळपास मिळण्याचा संभव नाहीं अशा केवळ ओसाड रानांत, स्वसामर्थ्यबलानें वाटेल तितक्या अभ्यागत जनांस पंचपक्वान्नांचें भोजन घालणें इत्यादि अनेक अद्‌भुत दैवी चमत्कार, तुकाराम, एकनाथ, ज्ञानेश्वरादि इतर साधुसंतांप्रमाणें समर्थांनींही आपल्या आयुष्यक्रमांत करून दाखविल्याविषयीं त्यांची प्रसिद्धि आहे. त्यांच्याचप्रमाणें समर्थांच्या ठिकाणीं स्वार्थत्याग, वैराग्य, निरहंकार, ईश्वरभक्ति, सर्वांभूतीं समता इत्यादि श्रेष्ठ गुण

वास करीत होते. परंतु बाकीच्या साधुपुरुषांत आणि समर्थांमध्यें एक विशिष्ट फरक होता; तो हा कीं, समर्थ मुत्सद्दी साधु होते. इतर साधुपुरुषांपेक्षां समर्थ एक पायरी पुढें सरकले. बाकीच्या साधूंनीं सामान्य जनसमूहाला भक्तिमार्गाचें वळण लावून समाजांत एकीचें बीज पेरिलें. स्वतःच्या स्वार्थत्यागानें व निरपेक्षतेनें समाजांत स्वार्थत्यागाचें आणि निरपेक्ष बुद्धीनें कर्तव्य करण्याचें वारें उत्पन्न केलें. सर्वांठायीं समताबुद्धि ठेवून समाजांतील मत्सरबुद्धीचा नाश केला. सारांश, राष्ट्रैक्य होऊन स्वराज्य स्थापना सिद्ध होण्यास साधारण जनसमूहाच्या ठिकाणीं जे राष्ट्रीय गुण बाणावे लागतात ते त्यांनीं आपल्या प्रयत्नांनीं उत्तम प्रकारें बाणविले. अशा रीतीनें जनाची तयारी होऊन व पूर्वसिद्धतेचा पाया उत्तम रचलेला पाहून समर्थरामदासांनीं त्या पायावर धर्मसंस्थापनेची इमारत उभी केली व तिच्यावर स्वराज्यसंस्थापनेचा कळस चढविण्यांत महाराजांस उतम प्रकारें साह्यय केलें.

ही कामगिरी समर्थांनीं ज्या जिवंत वाणीनें घडवून आणिली तिचा संग्रह दासबोध नांवाच्या आपल्या ग्रंथांत त्यांनीं करून ठेविला आहे. तत्कालीन लोकांस या उपदेशपर वाणीचा उपयोग होऊन त्यांचें पुनरुज्जीवन तर झालेंच परंतु दासबोधाची थोरवी इतकी मोठी आहे कीं, त्या उपदेशाचें मनन पूर्वक पठन व तदनुसार वर्तन कोणत्याही राष्ट्रानें कोणत्याही परिस्थितींत एकदिलानें केल्यास त्या राष्ट्राचा जीर्णोद्धार करण्यास तो ग्रंथ समर्थ होईल; आणि ह्मणूनच समर्थांची वाणी जिवंत वाणी आहे असें समजलें जातें.

समर्थांनीं दासबोध नांवाचा ग्रंथ लिहून त्यांत जो उपदेश केलेला आहे तो अतिशय व्यापक आहे. साधारपणें कोणत्याही विषयाचें विवेचन या ग्रंथांत त्यांनीं वगळलेलें नाहीं. या ग्रंथाचें समग्र विवेचन करणें या लहानशा पुस्तकाच्या आटोक्याबाहेरचें आहे. तरी त्यांतील मुख्य मुख्य तत्त्वांची दिशा कळावी ह्मणून अल्पसें विवेचन प्रस्तुत स्थलीं अयोग्य होणार नाहीं.

मुख्यतः प्रपंच , राजकारण आणि परमार्थ हे तीन विषय रामदासांनीं महाराष्ट्रीयांना उत्तम प्रकारें समजावून दिले. या तीन तत्वांचें उत्तम रसायण तयार करून त्याला त्यांनीं महाराष्ट्रधर्म असें नांव दिलें. या नांवांत त्यांनीं एक प्रकारची जादू भरलेली होती. वैदिकधर्म, पौराणिकधर्म अथवा सनातन हिंदु धर्म हीं प्रचारांतील नांवें न देतां महाराष्ट्रधर्म असें एक नवीनच नांव त्यांनीं प्रचारांत आणलें. तत्कालीन परिस्थितींत महाराष्ट्राचा ह्मणून एक कांहीं निराळाधर्म आहे ही गोष्ट त्यांनीं लोकांच्या मनांत बिंबवून दिली. 'मराठा तेवढा मिळवावा ! महाराष्ट्र-धर्म वाढवावा' हें समर्थांच्या उपदेशाचें अगदीं थोडक्यांत सार आहे ह्मटलें तरी चालेल. प्राक्कालीन व तत्कालीन इतर साधुसंतांनीं जो धर्मासंबंधानें उपदेश केलेला होता त्याचा समावेश रामदासांच्या महाराष्ट्र-धर्मांत तर होतच होता; परंतु त्याहूनही त्यांत कांहीं जास्त अर्थ समाविष्ट केलेला होता. अन्यथा महाराष्ट्र या उपपदाचें कांहीं प्रयोजन नव्हतें. या महाराष्ट्र शब्दांत पुष्कळ गूढार्थ भरलेला होता. महाराष्ट्र देशाची अवघड निसर्ग रचना, महाराष्ट्रीय लोकांच्या अंगीं दृग्गोचर होत असलेलें तेज, प्रयत्न झाल्यास परस्थांस घालवून देण्याचें त्यांच्या अंगचें सामर्थ्य इत्यादि गोष्टी समर्थांच्या मनांत होत्या असें महाराष्ट्र या शब्दयोजनेवरून व्यक्त होतें. इतर साधूंच्या उपदेशाची झोंड वैराग्य, ईश्वरभक्ति, समबुद्धि इत्यादि गुण जनतेच्या अंगीं बाणविण्याकडे होती; परंतु यांच्या बरोबरच मायदेशासंबंधानें प्रत्येकाचें कर्तव्य म्हणून कांहीं एक आहे हें समर्थांनीं महाराष्ट्रीयांचें मनांत ठसवून दिलें. स्वधर्मभक्तीला स्वदेशभक्तीची जोड पाहिजे. स्वधर्म भक्तीच्या जोरावर लोकांत ऐक्य निर्माण करून त्यांनीं जुलमी यवनीसत्तेचा पाडाव करावा व स्वराज्य संपादन करावें; स्वराज्यसंस्थापनेवांचून स्वधर्मोन्नति होऊन परमार्थसाधनाचा मार्ग सांपडणें नाहीं. स्वधर्म आणि स्वराष्ट्र यांचा अत्यंत निकट संबंध आहे, यांची जोडी फुटली कीं, जनोत्कर्षाची सर्व बाजूंनीं वाढ खुंटलीच म्हणून समजावें, असा समर्थांच्या उपदेशामृताचा इतिनिष्कर्ष

आहे. दासबोधांत रामदासांनीं आत्मचरित्र वर्णन केलें आहे तें असें- ' खनाळामध्यें जाऊन राहे । तेथें कोणीच न पाहे ॥ सर्वत्रांची चिंता वाहे । सर्व काळ ॥ १ ॥ तेथें कोणाचें चालेना । अनुमात्र अनुमानेना ॥ कष्ट घालून राजकारणा । लोक लवी ॥ २ ॥ लोकीं लोक वाढविले । तेणें अमर्याद झाले ॥ भूमंडळीं सत्ता चाले । गुप्तरूपें ॥ ३ ॥ उपासनेचा गजर । स्थळोस्थळीं थोर थोर ॥ प्रत्ययानें प्राणिमात्र । सोडविले ॥ ४ ॥ यावरून समर्थ अत्यंत स्वराष्ट्राभिमानी, अत्यंत दूरदर्शी, अत्यंत धोरणी, राजकीय उन्नतीकडे समाजाचें तन-मन-धन वेधून इष्ट कार्य सिद्ध करण्यांत सदा निमग्न व राजकारणांत पूर्ण तरबेज असे असून त्यांच्या ठिकाणीं कडकडीत वैराग्य, पराकाष्ठेचा निस्पृहपणा, राष्ट्रकार्याबद्दल कळकळ आणि परमात्मरूपीं आत्मनिवेदन हे गुण किती उज्वलतेनें चिबलेले होते हें दिसून येतें.

समर्थ एका ठिकाणीं फारसे राहत नसत. गांवोगांव फिरून एकंदर जनसमाजाची स्थिती सर्व प्रकारें कशा प्रकारची आहे, याचें ते सूक्ष्म अवलोकन करीत व ती सुधारण्याविषयीं एकांतीं बसून विचार करण्यांत ते निमग्न असत. तत्कालीन लोकस्थितीचें वर्णन करितांना दासबोधांत त्यांनीं पुढें दिल्याप्रमाणें लिहिलें आहे—ब्राम्हण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले । गुरुत्व सांडून झाले । शिष्य शिष्यांचे ॥ आतांचे ब्राह्मणीं काय केलें । अन्न मिळेना ऐसें झालें ! तुम्हां बहुतांचे प्रचीतीस आलें । किंवा नाहीं? ॥ विप्रीं सांडिला आचार । क्षत्रीं सांडिला विचार । जनीं दोष झाले फार । तेणें होतसे संहार ॥ बहू वृष्टी अना वृष्टी । दास ह्मणे केली सृष्टी । दुःख दारिद्र्य उद्वेगें । लोक सर्वत्र पीडिले ॥ सनातन आर्यधर्मांतील वर्णाश्रमधर्मव्यवस्था बिघडली आहे व तिची घडी योग्य रीतीनें पुनः बसविल्याविना सर्व बाजूंनीं ओढवलेली महाराष्ट्रावरील दुःखपरंपरा नष्ट होणें नाहीं, ही गोष्ट समर्थांच्या ध्यानांत आली आणि ह्मणूनच व्यवहारांतील हजारों विषयांवर नियम करून ठेवणें त्यांना अवश्य वाटलें. दासबो-

यांतील प्रत्येक ओंवी म्हणजे एकएक अमोल असा नियमच आहे म्हटलें तरी चालेल.

शिवाजी महाराजांना कीर्तनें पुराणें वगैरे ऐकण्याचा बाळपणापासून फार नाद असे. त्यांच्या श्रवणानें ते बहुश्रुत झालेले होते व ईश्वरचरणीं त्यांची दृढ भक्ति स्थिर झालेली होती. श्री भवानी देवी त्यांचें उपास्य दैवत होतें. आपल्या उपास्य दैवताच्या अनुज्ञेवांचून ते कोणताही कार्यारंभ करीत नसत, अथवा महत्वाच्या कामगिरीवर निघत नसत. भवानी मातेच्या कृपाछत्राच्या छाये खालीं आपण आहों; म्हणूनच हर एक कार्यप्रसंगीं आपल्याला सिद्धि प्राप्त होते व आपले वरचे दुर्धर प्रसंग टळतात, या उच्च भावनेच्या जोरावर आत्मविश्वासानें त्यांनीं आरंभित स्वराज्यस्थापनेचें काम नेटानें पुढें चालविलेलें होतें. एकदां कीर्तनाला बसले असतां हरिदास-बुवांनीं धृवाख्यान लावून सद्गुरूविना मोक्षप्राप्ति नाहीं, या विषयाचें उत्तम निरूपण केलें. ती गोष्ट त्यांच्या मनांत बिंबून त्या दि-वसापासून सद्गुरुप्राप्तीविषयीं त्यांना ध्यास लागून गेला. रंगनाथस्वामी, जयरामस्वामी, बोधलेबुवा, आनंदमूर्ति, तुकारामबुवा, इत्यादि समकालीन साधु-संतांच्या ठिकाणीं त्यांची दृढ भक्ति असून ते त्यांच्या दर्शनाला नेहमीं जात असत. तुकारामबुवांना आपले गुरु करावे असें मनांत आणून त्याप्रमाणें शिवाजी महाराजांनीं अनुग्रह करण्याबद्दल त्यांना विनंति केली. परंतु तुका-रामांनीं श्रीसमर्थरामदास आपल्यापेक्षां श्रेष्ठतर असल्याविषयीं सांगून त्यानांच गुरु करण्याविषयीं आग्रह केला. श्रीभवानीमातेचाही समर्थांनाच गुरु करण्याविषयीं स्वप्नांत दृष्टांत झाला. समर्थांची कीर्ति महाराजांच्या कानावर पूर्वीच आलेली होती व त्यांच्या दर्शनाचा लाभ घेण्याचीही त्यांची इच्छा होती. परंतु तसा योग तोंपर्यंत आला नव्हता. वरील देवीचा दृष्टांत आणि तुकारामबुवांचा उप-देश झाल्यापासून समर्थांच्या दर्शनाची महाराजांना सारखी तळमळ लागली. समर्थांचा मुक्काम एका ठिकाणीं क्वचितच असे. आज ते एका गांवीं तर उद्यां

त्यांची स्वारी दहावीस कोसांवर दुसरेच ठिकाणीं असावयाची, म्हणून दर्शनाचा योग जुळून येईना. समर्थांचें दर्शन घेतल्याशिवाय अन्नग्रहण करावयाचें नाहीं, असा निश्चय करून महाराज निघाले. समर्थांचें दर्शन होण्याला बरेच प्रयास पडले. परंतु शेवटीं महाराजांचा अढळ दृढनिश्चय पाहून समर्थांनीं त्यांना दर्शन दिलें. ही गोष्ट इ. स. १६४९ त घडली ह्मणजे या वेळीं महाराजांचें वय अवघें २२ वर्षांचें होतें. या पहिल्या भेटीच्या प्रसंगीं समर्थांनीं जो महाराजांना उपदेश केलेला आहे त्यावरून शिवरायासारख्या सच्छिष्याला रामदासांसारखे समर्थच सद्गुरु योग्य होत हें उघड होतें. राष्ट्राच्या वाङ्मयापासून राष्ट्राला अंतःस्फुर्ति मिळत असते. योग्य अंतःस्फूर्ति राष्ट्रांत निर्माण होऊन तिला वाङ्मयानें उत्तरोत्तर पुष्टि मिळत चालली म्हणजे अखेर तिला राष्ट्रपुरुष निर्माण करण्याचें सामर्थ्य प्राप्त होतें. महाराष्ट्र–वाङ्मयाला श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या वाणीनें सुरवात केली. त्यांच्यानंतर अनेक साधुसंतांनीं आणि कवींनीं त्या वाङ्मयाचें आपल्या लेखणीनें उत्तम पोषण केलें. याचा परिणाम असा झाला कीं, महाराष्ट्रांत एकसहा सरसकट सर्व लोकांमध्यें अंतःस्फूर्तीचा उदय होऊन तिचा परिपाक रामदास आणि शिवाजी हे दोन राष्ट्रपुरुष निर्माण करण्यांत झाला. अर्वाचीन लेखक उत्क्रांतिशास्त्र ह्मणतात तें हेंच. या उत्क्रांति शास्त्राच्या तत्वान्वयें जे हे दोन राष्ट्रपुरुष अवतीर्ण झाले, त्यांच्यांत गुरुशिष्याचा संबंध जडून महाराष्ट्राला एकाकालीं हा अपूर्व कपिलाषष्ठीचा सुयोग लाधला व त्या योगें राष्ट्रोद्धाराचें महत्कार्य तडीस गेलें.

प्रथम भेटीच्या प्रसंगीं समर्थ रामदासांनीं शिवाजीमहाराजांना जो उपदेश केला त्यांतील थोडे वेंचे पुढें दिल्याप्रमाणें आहेत—'तीर्थ क्षेत्रें मोडलीं। ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं॥ सकळ पृथ्वी आंदोळली। धर्म गेला॥ १॥ देव धर्म गो ब्राह्मण। करावया संरक्षण॥ हृदयस्थ झाला नारायण। प्रेरणा केली॥ २॥ उदंड पंडित पुराणिक। कवीश्वर याज्ञिक वैदिक॥ धूर्त तार्किक सभानायक। तुमच्या ठायीं॥ ३॥ या भूमंडळाच्या ठायीं। धर्म रक्षी ऐसा

नाहीं ॥ महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं । तुम्हांकरितां ॥ ४ ॥ कित्येक धर्मकृत्यें होतीं । संत महंत वागती ॥ धन्य धन्य तुमची कीर्ति । विश्वीं विस्तारली ॥५॥ कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सुटले ॥ कित्येकांस आश्रय झाले । शिवकल्याण राजा ॥ ६ ॥ तुमचे देशीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाहीं घेतलें ॥ ऋणानुबंधें विस्मरण झालें । काय नेणूं ! ॥ ७ ॥ सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ति । सांगणें काय तुम्हांप्रति ॥ धर्मस्थापनेची कीर्ति । संभाळली पाहिजे ॥ ८ ॥ उदंड राजकारण तटलें । तेणें चित्त विभागलें ॥ प्रसंग नसतां लिहिलें ॥ क्षमा केली पाहिजे ॥ ९ ॥ अशा तऱ्हेचा उपदेश करून समर्थांनीं सनातन आर्यधर्माची झालेली दुःस्थिति शिवरायांच्या मनांत प्रतिबिंबित केली. ती दुःस्थिति घालविण्याचें सामर्थ्य एकट्या शिवरायांमध्यें आहे असें त्यांना सांगून त्यांच्या भक्तीस आणि उद्योगास समर्थांनीं प्रोत्साहन दिलें. गोब्राह्मणप्रतिपाल करून आरंभिलेल्या स्वराज्यस्थापनेच्या कार्यांत त्यांना ईश्वरीप्रेरणेचें साहाय्य आहे असें ध्वनित करून समर्थांनीं त्यांचा आत्मविश्वास दृढ केला. सारांश, धर्मस्थापना आणि स्वराज्यस्थापना यांचा निकट संबंध आहे असें दर्शवून व शिवरायांचा हेतु व योग्यता जाणून समर्थांनीं आपला योग त्यांना कळविला.

या प्रथम भेटीनंतर या गुरुशिष्यांच्या भेटी वारंवार पडत असत. इतकेंच केवळ नाहीं, तर हरएक महत्वाच्या कार्यारंभीं महाराज समर्थांची आज्ञा घेत असत आणि तदनुसार वर्तन करीत असत. समर्थ शिवरायांस नुसता उपदेशच करून स्वस्थ बसले नव्हते, तर अखिल भरतखंडभर मठस्थापना करून शिवकार्याला अनुरूप अशी जनसमाजाची शारीरिक आणि मानसिक तयारी करण्याची खटपट त्यांनीं चालविली होती. त्यांनीं एकंदर ७०० मठांची स्थापना केली. प्रत्येक मठांत आपला एक एक पट्टशिष्य त्यांनीं ठेवून दिला. त्यांच्याकडून ते दुहेरी काम करवीत असत. एक तर त्यांनीं सामान्यपणें जनसमाजाला उपदेश करीत असावें आणि दुसरें गुप्त हेरांचें काम करून इत्थंभूत सर्व बातम्या महाराजांना देत रहावें. त्या बातम्या उघड उघड न देतां त्यांची भाषा सांकेतिक

असे. ही संकेतयोजना इतकी विलक्षण असे कीं, तिच्यायोगें संकेतार्थ तर महाराजांना समजावाच; परंतु सामान्य अर्थही मोठा उदात्त आणि उत्तेजक असा असावा. समर्थांचे पट्टशिष्य कल्याणस्वामी मिरजेचे किल्यांत असतां तेथून त्यांनीं संदेशार्थ कविता लिहून शिवाजीमहाराजांकडे पाठविल्या त्यांत त्यांनीं संकेतरूपानें विजापूरचा सरदार-अफजुलखान स्वारीवर निघाल्याचें वर्तमान महाराजांना कळविलें. त्या कविता या----विवेकें करावें कार्य साधन। जाणार नरतनू हें जाणून ॥ पुढील भविष्यार्थीं मन । रहाटोंचि नये ॥ १ ॥ चालों नये असन्मार्गीं । सत्यता बाणल्या अंगीं ॥ रघुवीरकृपा ते प्रसंगीं । दास महात्म्य वाढवी ॥ २ ॥ रजनीनाथ आणि दिवाकर । नित्यनेमें करिती संचार ॥ घालिताती येरझार । लाविलें भ्रमण जगदीशें ॥ ३ आदिमाया मूळ भवानी । हेच जगताची स्वामिनी ॥ एकांतीं विवेक धरूनी । इष्ट योजना करावी ॥ ४ ॥ प्रत्येक चरणाचीं प्रथमाक्षरें एकत्र वाचुन त्यांच्यापुढें शेवटचे दोन चरण, आहेत तसे सबंध वाचले ह्मणजे, या कवितांतील संकेत कळून येतो व सदर प्रसंगाच्या या कविता ह्मणजे इषारा होता हें ध्यानांत येतें. शिवाय, या कवितांचा सामान्य अर्थ देखील किती गंभीर आणि स्फूर्तिजनक आहे हेंही सहज दिसून येतें.

समर्थांनीं महाराष्ट्र स्वराज्यसंस्थापक श्री शिवाजीमहाराज यांना निरनिराळ्या प्रसंगीं राजधर्म ह्मणजे काय ! क्षत्रिय धर्म ह्मणजे काय ! ब्राह्मण धर्म ह्मणजे काय ! इत्यादि विषयांवर उपदेशरूपानें व्याख्यानें देऊन जें प्रोत्साहन दिलें त्यांतील वेंचक उतारे वाचकांसाठीं आम्हीं दिले आहेत; त्यावरून महाराजांचा एकंदर पराक्रम आणि त्यांचा वर्तनक्रम हीं समर्थांच्या उपदेशाशीं किती तंतोतंत जुळत होतीं हें वाचकांचे लक्षांत येईल.--'प्रस्तुत यवनांचें बंड । हिंदु उरला नाहीं चंड । बहुत दिवसांचें मुंड । शास्ता न मिळे तयांसी ॥ देव ब्राह्मण-उच्छेदिले । कर्म अवघें भ्रष्टविलें । नामसंकीर्तन लोपलें । दुष्टयोगें ॥ पापराशी मळावले । धर्मवान् निर्बळ झाले । आनंद गौरव विराले । संकट

काळें ॥ संकटें पापकाळ उदेला । देवीं घेतल्या सोळा । ब्राह्मणीं सोडिल्या टिळे-माळा । तद्रूपवर्तती ॥ दुष्ट भाषणें करिती । नानापरी जाचिती । रघुनीशीं नावडती । ह्मणोनि योजना केली ॥ तुह्मी आम्हांत अंशभूत । प्रजेचें करा कांहीं हित । धर्म स्थापावा तुम्हां उचित । कार्यपरत्वें ॥ धर्माकरितां मरावें । मरोनि अवघ्यांसी मारावें । मारतां मारतां घ्यावें । राज्य आपुलें ॥ राज्य आहे धर्म नीतीचें । नीतिकरितां सर्वसाचे । साच चालतां वैभवाचें । मान पावती ॥ मानाकरितां तलवार घेतली । वैरीकुळें संहारिलीं । प्रकट कीर्ति जगीं झाली । आनंद मूर्ति ॥ आनंद असावा सर्वांठायीं । शूरवें करावी कमाई । कमाई करितां सुख देई । पावेल तोची ॥ आधीं मनुष्य ओळखावे । योग्य पाहुनि काम सांगावें । निकामी हे दवडावे । एकीकडे ॥ पाहोन समजोन कार्यकरणें । तेणें कदापि नये उणें । कार्यकर्त्यांच्या गुणें । कार्य भाग होतो ॥ अमर्याद फितवे चोर । यांचा करावा संहार । शोधिला पाहिजे विचार । यथा तथ्य ॥ मनुष्य राजी राखणें । हींच भाग्याचीं लक्षणें । कठीणपणें दुरी धरणें । कांहीं एक ॥ न्यायसीमा उल्लंघू नये । उल्लंघितां होतो अपाय । न्याय नसतां उपाय । होई कैंचा ॥ उपाधीस जो कंटाळला । तो भाग्यापासोनि च्यवला । समरीं धीर सांडिला । तोही खोटा ॥ संकटीं कंटाळो नये । करावे अत्यंत उपाय ॥ उदंड मुंडें असावीं । सर्वही एक न करावीं । वेगळालीं कामें घ्यावीं । सावधपणें ॥ मोहरा पेटला अभिमाना । मग तो जीवाकडे पाहीना । त्यासी देऊनिया माना । कार्य भागीं योजावा ॥ ज्यासीं जिवाचें भय । त्यानें युद्धा जाऊं नये । कांहीं एक उपायें । पोट भरावें ॥ विन्मुख होतां नरक प्राप्ति । पळोनि येतां फजीती । यश मेळवितां संपत्ती । सहज पावे ॥ मारितां मारितां मरावें । मारोनि रणीं जिंकावें । जगोनि आलिया भोगावें । वैभव कांहीं ॥ नजर करारी राखणें । काबू आल्या कत्तल करणें । रणशूरांचीं अंतःकरणें । चकित होतीं ॥ ऐसे अवघेच उठतां । परदळाची कायशी चिंता । हरणें पळती उठतां चित्ता । चहूंकडे ॥ शूरें तकवा सोडूं नये

तकवा धरितां पावनो जय। वरा ओळखोनि समय। उडी टाकावी॥ देवमात्र उच्छेदिला। आपुला धर्म बुडविला। यापरीस मृत्यु भला। बोळखाना?॥ मराठा तितुका मेळवावा। आपुले जीवीं जीववावा। आपल्या समान करावा। निष्ठा पाहोनी॥ देवद्रोही तितुके कुत्ते। मारोनी घालावे परते। देवदास पावती फत्ते। संशय नाहीं॥ देव मस्तकीं धरावा। अवघा कल्लोळ करावा। मुलूख सर्व बुडवावा। धर्मस्थापनेसाठीं॥ मुलूख राखावा आपुला। त्यामाजी परकी बोळखिला। तो पाहिजे बुडविला। अगोदरची॥ विवेक विचार सावधपणें। तुळजावराचे निगुणें। दीर्घ प्रयत्न करणें। रामें रावण मारिला॥ ऐसी हे तुळजा भवानी। प्रसिद्ध रान वरदायिनी। रामदास ध्यातो मनीं। रात्रंदिवस॥

हा समर्थांचा उपदेश अतिशय मार्मिक असून सतत मनन करण्यासारखा आहे. यांतील प्रत्येक शब्दांत किती खोल अर्थ भरलेला आहे हें महाराष्ट्र सहृदय वाचकांस स्पष्टोक्तीनें सांगण्याची आवश्यकता नाहीं. या वरून शिवाजीमहाराजांच्या प्रचंड उद्योगाला आंतून रामदासांकडून किती स्फूर्तिजनक प्रोत्साहन मिळत असे हें उत्तमप्रकारें निदर्शनास येतें. शिवाय सक्रिय राष्ट्रीय चळवळीला समर्थांच्या साधुत्वापासून जी अंतःस्फुर्ति प्राप्त झाली तिचा उपयोग स्वराज्यस्थापनेच्या महत्कार्यी महाराजांना किती झाला याचीही चांगली अटकळ बांधतां येते. सारांश समर्थांचा हा उपदेश आणि शिवरायांचें तदनुसार प्रत्यक्ष आचरण, यांमध्यें इतकें निकट सादृश्य आहे कीं त्यावरून शिवकालीन महाराष्ट्र-प्रमुख मंडळीच्या उद्योगाची दिशा आणि तत्कालीन राजकीय चळवळींचें धार्मिक स्वरूप या गोष्टी स्पष्टपणें नजरेस येतात.

श्रीसमर्थ रामदास, श्रीशिवाजी महाराज आणि या उभयतांचे अनुगामी, या सर्वांचा मिळून त्याकाळीं एक स्वतंत्र पंथच सुरू झाला होता. या पंथाचा मुख्य पाया ह्मटला ह्मणजे अत्यंत स्वार्थत्याग व व्यक्तिविषयक हिताची अत्यंत बेपर्वाई हा होय. एक राष्ट्रीयत्वाला अगदीं अवश्यक असे हे वरील

गुण या पंथांतील मुख्य माणसांनीं सर्व महाराष्ट्राला शिकविले व त्या शिक्षणानें महाराष्ट्रीयांचें परम कल्याण झालें. या पंथाचीं मुख्य तत्त्वें सनातन आर्यधर्मांतील अध्यात्म विद्येच्या तत्त्वांवर देशकालपरिस्थितीला अनुकूल असे थोडेंचहुन फेरफार करून रचिलेलीं होतीं. 'शत्रुंजय, प्रजाःपालय, धर्मरक्ष,' हा गोपालकृष्णानें भारतकालीं पांडवांना केलेला उपदेश आणि समर्थांनीं महाराजांस केलेला उपदेश, यांचें निकट साम्य आहे. श्रीकृष्ण भगवानांच्या सदुपदेशाचा सुपरिणाम जसा पांडव आणि पांडवानुयायी सर्व लोकांच्या मनांवर उत्तम प्रकारचा झाला, तसाच श्रीसमर्थांच्या सदुपदेशाचा परिणाम शिवाजीमहाराज आणि त्यांची साहाय्यकारी मंडळी यांच्यावर उत्तम प्रकारें घडून आला. असो; श्रीसमर्थांनीं 'दासबोध' नामक एक सर्वोत्तम ग्रंथ लिहून सकल महाराष्ट्राला तारण्यासाठीं एक विशाळ नौका तयार केली व हीच नौका त्या कालीं अखिल राष्ट्र कर्तव्यतत्पर करण्यास मूळ कारण झाली.

एकदां समर्थ रायगडावर भिक्षेकरितां गेले असतां शिवाजीमहाराज आपल्या वाड्यांत त्या दिवशीं असल्याचें त्यांना समजलें. तेव्हां ते त्यांच्या वाड्यांत मुद्दाम भिक्षा मागण्यासाठीं गेले. देवडीवर उभे राहून 'जयजय रघुवीर समर्थ' म्हणून नित्यसांप्रदायाप्रमाणें समर्थांनीं गर्जना केली. महाराजांच्या कानावर ती आरोळी जाऊन सद्गुरु समर्थांची ती प्रसादवाणी त्यांनीं तत्काल ओळखिली. अशा सत्पात्रीं कोणती भिक्षा अर्पण करावी असा निमिषमात्र विचार करून त्यांनीं चिटणिसाला हांक मारली आणि त्याच्या करवीं 'श्रीसमर्थ चरणीं सर्व राज्य अर्पण केलें आहे' अशी अर्पण पत्रिका लिहून घेऊन व तिच्यावर शिक्कामोर्तब करवून ती त्यांनीं समर्थांच्या झोळींत घातली. ती समर्थांनीं पाहून महाराजांस म्हटलें 'कां शिवबा, आम्हांस राज्य दिलेंत आतां तुम्हीं काय करणार ?' महाराजांनीं करद्वय जोडून विनंति केली 'आपल्या चरणसेवेंत राहून कालक्रमणा करणार.' हें भाषण ऐकून समर्थांनीं शिवरायांस उपदेश केला तो अत्यंत बोधप्रद आहे. ते म्हणाले 'शिवबा ! ज्याचें कर्म

त्यानें करणें हेंच योग्य आहे. ब्राम्हणांनीं स्नानसंध्या व ज्ञानार्जन करून असावें. क्षत्रियांनीं क्षात्रधर्म पाळावा; यांतच उभयतांस मोक्षप्राप्ति आहे. ज्याचें कर्म त्यानें यथायोग्य बजावणें हीच कायती सर्व जन्मांतील इतिकर्तव्यता आहे. पूर्वी रघुपतिनीं कुलगुरु वसिष्टाला अर्ध राज्य अर्पण केलें, त्या वेळीं त्यांनींही त्यांस योगवासिष्ट रूपानें नीति, न्याय, धर्म सांगितला. जनकानेंही याज्ञवल्क्यांस राज्य अर्पण केलें, तेव्हां त्यांनींही त्यास राजधर्म सांगितला. यास्तव आम्हा गोसाव्याला तरी हें राज्य काय करावयाचें आहे ? कदाचित् घेतलें तरी त्याला सांभाळावयास प्रधान नको का? तोच तूं हो; आणि मांसच राज्य म्हणून संरक्षण कर म्हणजे झालें.' तेव्हां महाराज निरुत्तर झाले व अर्पित राज्य परत घेतल्याशिवाय मार्ग नाहीं असें त्यांस वाटलें. शेवटीं त्यांनीं समर्थांस विनंति केली कीं, 'आतां आपल्या पादुका तरी मजपाशीं द्याव्यात; म्हणजे त्यांची स्थापना करून मी आपलें राज्य चालवीन.' त्याप्रमाणें त्यांनीं आपल्या पादुका महाराजांच्या हवालीं केल्या. नंतर पुनः महाराजांनीं प्रार्थना केली कीं 'हें राज्य आपलें आहे, माझें नव्हे; हें समजण्याकरितां कांहीं तरी त्यावर आपली निशाणी असावी.' समर्थांनीं यावर आज्ञा केली कीं, 'आम्ही गोसावी, आमचें राजचिन्ह तें काय असणार? भगवींवस्त्रें! याकरितां आज पासून मराठ्यांचा झेंडा भगवा करावा.' या वेळेपासून मराठ्यांचें भगवें निशाण चालू झालें. ही गोष्ट अशी आहे कीं, राजापासून तों थेट रंकापर्यंत एका कालीं मराठ्यांच्या अंगीं स्वार्थत्याग, निःसीम निष्ठा, निरपेक्षता इत्यादि राष्ट्रीय सद्गुण किती प्राधान्यें करून बाणलेले होते याचा कल्पना उत्तम करितां येते. राज्यपदासारखें उत्तमोत्तम पद प्राप्त झालेला शिवाजी आपलें सर्वस्व जें राज्य तें सद्गुरुचरणीं अर्पण करण्यास तयार होतो! आणि समर्थांसारखे केवळ दिगंबर वृत्तींत असलेले पुरुष त्याचा काडीमात्र देखील अभिलाष न धरितां तें जशाचें तसें परत शिवरायाच्या पदरांत टाकितात! यावरून त्याकाळचें महाराष्ट्र खरोखर महाराष्ट्र या

श्रेष्ठ पदवीला जाऊन पोंचलें होतें यांत संदेह नाहीं. ज्या महात्म्यांनीं या पुण्यभूचें महाराष्ट्र हें नांव यथार्थ केलें त्यांची थोरवी काय वर्णन करावी !

या प्रमाणें रामदास पंथी शाखेनें राष्ट्रशिक्षणाचें काम किती चोखपणें बजाविलें व या शिक्षणाचा संस्कार साधारण जनसमाजावर होऊन त्यांतील नररत्नें महाराजांना स्वराज्यस्थापनेच्या बिकट कार्यप्रसंगांत किती उपयोगी पडलीं याची साक्ष, समर्थ आणि त्यांचें शिष्यमंडळ यांनीं सर्व देशभर फिरून सकल जनांना अत्यंत उदात्त, अतिशय व्यापक आणि विलक्षण जोमदार असा स्वकर्तव्य दर्शक उपदेश केला व तो महाराष्ट्रीयांच्या आचार–विचारांत आणि वर्तनांत उत्तम प्रकारें परिवर्तित झालेला अनुभवास आला, या गोष्टीनें उत्तम पटते. आधींच महाराष्ट्रासारखी सुपीक कर्मभूमि; ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकारामादि श्रेष्ठ साधुपुरुषांनीं आणि मालोजी, शहाजी व इतर मराटेशूर सरदार इत्यादि वीरपुरुषांनीं धर्मजागृति आणि स्वदेशप्रीति या आउतांनीं ती उत्कृष्टपणें नांगरून, वेणून व साफसूप करून बीजोद्भव उत्तम प्रकारें होण्यासारखी तयार केली; शिवरायासारखा महपुरुष निर्माण होऊन त्यानें स्वराज्य–वृक्षाचें बीज या भूमींत पेरून त्याची योग्यरीतीनें जोपासना चालविली व तिच्या योगें या बीजाला जोराचे अंकुर फुटून त्यावर समर्थांनीं आपल्या जीवंत वाणीनें समयोचित उपदेशामृताचा सारखा वर्षाव केला; याचा परिणाम असा झाला कीं, या तयार झालेल्या लहानशा रोपाची वाढ होऊन त्याचा मोठा शाखाविस्तार झा॰ा व या प्रचंड वृक्षाला स्वराज्यसंस्थापनेसारखें अमृतोपम मधुर फळ येऊन तें महाराष्ट्रीयांना मनमुराद चाखावयास मिळालें.

येथपर्यंत केलेल्या या भागांतील विवेचनावरून समर्थांचें पूर्वचरित्र, जनसमाजाला उपदेश करण्यासारखा अंगीं अधिकार प्राप्त होण्यास्तव त्यांनीं केलेली खडतर तपश्चर्या आणि उत्कट रामसेवा, नंतर सर्व देशभर हिंडून लोकस्थितीचें त्यांनीं केलेलें निरीक्षण, त्या निरीक्षणांत सर्व बाजूंनीं देशाला

अवनतस्थिति प्राप्त झालेली आहे असें आढळून आल्यामुळें ती सुधारण्याकरितां त्यांनीं योग्य त्या उपदेशाचा केलेला भडिमार, त्या उपदेशांत राजकीय उन्नति होण्यासाठीं प्रथम जनतेची धार्मिक उन्नति झाली पाहिजे व या उभय प्रकारच्या उन्नतींची उत्तम सांगड बसल्याविना एकंदर राष्ट्रोन्नति होणें नाहीं इत्यादि तत्त्वांचें त्यांनीं केलेलें प्रतिपादन, शिवरायांच्या स्वराज्य स्थापनेच्या कामीं समर्थांनीं केलेलें उत्तम साहाय्य वगैरे वगैरे गोष्टींचें सामान्य ज्ञान वाचकांस झालेंच असेल. इ. स. १६८० त शिवाजी महाराज स्वर्गवासी झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं समर्थ ही समाधिस्थ झाले. अखेरपर्यंत समर्थांची दिव्य शक्ति महाराजांस प्रोत्साहन देण्यास हजर होती, हें त्यांचें महत्पुण्य होय ! महाराज निवर्तल्यावर राजपुत्र संभाजीला समर्थांनीं पत्रद्वारें केलेला उपदेश एकट्या संभाजीला नसून सर्व महाराष्ट्रीय लोकांस तो लागू आहे, सबब समर्थांच्याच शब्दांत त्यांतील आशय सांगून आह्मी या प्रकरणाची रजा घेतों—' शिवरायास आठवावें । जीवित्व तृणवत् मानावें ॥ इहलोकीं परलोकीं रहावें । कीर्ति रूपें ॥ १ ॥ शिवराजाचें आठवावें रूप । शिवराजाचा आठवावा प्रताप । शिवराजाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं ॥ २ ॥ शिवराजाचें कैसें चालणें । शिवराजाचें कैसें बोलणें । शिवराजाची सलगी देणें । कैसें असे ॥ सकळ सुखांचा त्याग । करूनि साधिजे तो योग ॥ राज्यसाधनाची लगबग । कैसी असे ॥ ४ ॥ त्याहून करावें विशेष । तरीच ह्मणावें पुरुष ॥ याउपरी आतां विशेष । काय लिहावें ? ' ॥ ५ ॥

# भाग ११ वा.

## महाराजांची योग्यता.

शिवाजी महाराज हे एक अलौकिक थोर पुरुष होऊन गेले. देहस्वरूपी शिवाजीमहाराज अगाध कालाच्या भयंकर जबड्यांत शिरून नष्ट झाले असले तरी आपल्या लोकोत्तर कीर्तिरूपानें ते अजरामर झालेले आहेत. अशा अद्वितीय महापुरुषाची योग्यता ठरविणें हें काम अत्यंत बिकट आहे; किंबहुना ती अचुक ठरविणें कांहींसें मानवी शक्तीच्या आटोक्या बाहेरचें आहे, असें ह्मटल्यास तें वावगें होणार नाहीं. शहाजीसारखा कट्टा वीर आणि अट्टल कारस्थानी पुरुष ज्याचा पिता, जिजाबाईसारखी थोर योग्यतेची वीरपत्नी ज्याची माता, दादोजीकोंडदेवासारखा व्यवहारनिपुण आणि पूर्ण स्वामिनिष्ठ महात्मा ज्याचा बाळपणचा गुरु, प्रत्यक्ष आदिशक्ति जगन्माता श्री भवानी देवी ज्याचें आराध्य दैवत, तानाजी मालुसरे, मोरोपंत पिंगळे, बाजी देशपांडे व धनाजी जाधवासारखे जिवासजीव देणारे नरव्याघ्र ज्याचे साहाय्यकारी, समर्थांसारखे जगदुद्धारार्थ केवळ निर्माण झालेले अवतारी महात्मे ज्याचे पाठीराखे, त्या महापुरुषाची योग्यता ठरविण्याचें सामर्थ्य शब्दांत कोठून येणार! अशा अलौकिक महात्म्याची योग्यताही केवळ लोकोत्तर होय! तथापि लौकिकदृष्ट्या या थोर पुरुषाचीं जीं कृत्यें इतिहासांतून नमूद आहेत त्यांवरून महाराजांची योग्यता दर्शविण्याचा शक्य तेवढा प्रयत्न आह्मीं करणार आहों. त्यावरून अलौकिक थोर पुरुषांचीं लौकिक कृत्येंही देशाला किती हितपरिणामी होतात हें वाचकांच्या ध्यानांत येईल.

महाराजांच्या योग्यतेचा विचार करितांना विचार करण्यासारखी पहिली गोष्ट म्हणजे त्यांची मुलकी राज्यव्यवस्था ही होय. महाराज विलक्षण शूर

होते, अत्यंत धाडसी होते, अतुल पराक्रमी होते वगैरे वगैरे गोष्टी तर खऱ्याच; परंतु स्वराज्यसंस्थापनेसारख्या पवित्र श्रेष्ठ कार्यांत पूर्ण यशस्वी होण्यास केवळ एवढेच गुण पुरेसे नसतात. जगाच्या इतिहासांत केवळ शूर, वीर, पराक्रमी, धाडसी असे पुष्कळ पुरुष होऊन गेलेले आहेत, परंतु त्यांना राज्यसंस्थापकाचा श्रेष्ठ मान मिळवितां आला नाहीं. तो मान शिवाजीमहाराजांना मिळाला याचें कारण त्यांनीं मिळविलेल्या राज्यांत त्यांनी सुरू केलेली उत्तम प्रकारची मुलकी राज्यव्यवस्था हें होय. महाराजांनीं चालविलेल्या सक्रिय राष्ट्रीयचळवळींत त्यांना पूर्ण यश आलें आणि त्यांच्या निधनकालानंतर लवकरच मराठीराज्यावर ओढवलेल्या राष्ट्रसंकटांतून महाराष्ट्र शात्रूद निभावलें व मोंगल बादशाहीसारख्या अवाढव्य रुत्तेबरोबर सतत पाव शतकपर्यंत टक्कर देऊन त्यानें आपलें राष्ट्रीय स्वातंत्र्य पुनः प्रस्थापित केलें या गोष्टी घडून येण्यास महाराजांची नियमबद्ध आणि न्यायी राजपद्धतिच पुष्कळ अंशीं कारणीभूत झाली. ही त्यांची राज्यपद्धति प्रत्येकानें समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्या कालीं प्रचलित असलेल्या मुसलमानी अगर हिंदु राजपद्धतींपेक्षां महाराजांची योजना अगदीं भिन्न प्रकारची होती आणि तिच्यावरून त्यांची अचाट कल्पकता आणि विलक्षण बुद्धिमत्ता प्रकट झालेली आहे. विशेष ध्यानांत घेण्यासारखी गोष्ट ही कीं, स्वातंत्र्यझगडा संपून स्थिरस्थावर झाल्यावर जेव्हां महाराजांच्याच वंशजांनीं त्यांनीं घालून दिलेला नवीन धडा गिरविण्याचें सोडून दिलें आणि ते पूर्व वळणावर आले, तेव्हां त्याचा परिणाम असा झाला कीं, ज्या आपसांतील दुहीचा आणि कलहाचा नायनाट करण्याचा नवीन राज्यपद्धतीनें महाराजांनीं प्रयत्न केला, त्याच दुर्गुणांचें त्यांच्या वंशजांनीं पुनरपि बीजारोपण केलें आणि अखेर आपल्या सर्वस्वाचा नाश करून घेतला. असो; अखिल भरतभूमीवर आपली एकट्याचीच प्रत्यक्ष सत्ता गाजवावी अशी महाराजांनीं केव्हांही महत्वाकांक्षा धरिली नाहीं. स्वजनांना राष्ट्रीयस्वातंत्र्य प्राप्त व्हावें, त्याचें

एक राष्ट्र बनावें, स्वत्व संरक्षण करण्याचें सामर्थ्य त्याच्या ठिकाणीं यावें आणि महाराष्ट्र ही एक स्वतंत्र सत्ता आहे असें अन्य सत्तांना मान्य व्हावें एवढ्याचकरितां त्यांचे प्रयत्न चालू होते; परंतु महाराष्ट्राव्यतिरिक्त इतर सर्व सत्तांचें अगदीं निर्मूलन व्हावें असें त्यांनीं कधींही मनांत आणलें नाहीं. गोवळकोंडें, बेदनूर आणि विजापूर या राज्यांशीं ते मित्रत्वानें वागत होते, तेलंगण, म्हैसूर आणि कर्नाटक या त्यांच्या खुद्द मालकीच्या प्रांतांत महाराजांनीं केव्हांही अकारण ढवळाढवळ केली नाहीं, द्रवीड देशांतील वडिलार्जित सर्व जहागीर त्यांनीं आपला सावत्र बंधु व्यंकोजी याजकडेसच अबाधित चालू ठेविली होती, या गोष्टींचा नीट विचार केला असतां वरील विधानाची सत्यता कळून येईल. मोंगली ठिकाणांकडून चौथाई आणि सरदेशमुखी हे दोन हक्क वसूल करण्यांतच महाराज संतुष्ट होते. स्वतःच्या अमला खालील मुलुख ह्मणजे स्वराज्य आणि स्वराज्याबाहेरील इतर राजांचा मुलूख ह्मणजे मोंगलाई असा त्यांनीं स्पष्ट भेद केला होता. त्यांनीं ज्या मुलकी संस्था निर्माण केल्या त्या मुख्यत्वें स्वराज्याकरितां ह्मणजे मराठ्यांच्या खास अमलाखालील मुलखाकरितां होत्या. महाराजांनीं स्वराज्याचे निरनिराळे चवदा भाग केलेले होते व त्यांना प्रांत अशीं संज्ञा होती. पुणें, मावळ, सातारा, पन्हाळा, दक्षिण-कोंकण, उत्तरकोंकण, नाशिक, बनगड, बेदनूर, कोल्हार, श्रीरंगपट्टण, कर्नाटक, वेलूर आणि तंजावर अशीं या प्रांतांचीं नांवें होतीं.

महाराजांच्या ताब्यांत एकंदर दोनशें ऐशीं ( २८० ) किल्ले होते असें बखरींतून वर्णन आहे. एका अर्थी महाराजांचे डोंगरी किल्ले व त्यांच्या टप्यांतील भूप्रदेश ह्मणजे त्यांच्या मुलकी राज्यकारभाराचीं तितकीं केंद्र-स्थानेंच होतीं म्हटलें तरी चालेल. नवे किल्ले बांधण्यांत आणि जुने दुरुस्त करण्यांत त्यांनीं पाण्यासारखा पैसा खर्च केला. सर्व किल्ल्यांवरील शिबंदीची आणि दारुगोळा, धान्य, वैरण वगैरे सामुग्रीचा व्यवस्था फारच उत्तम

प्रकारची असे. शत्रूचे हल्ले मार्गे परतविण्यांत अथवा शत्रुसैन्यावर हल्ले चढविण्यांत, महाराजांचे वेळीं व नंतर, मराठ्यांना महाराजांच्या या किल्ल्यांचा फारच उपयोग झालेला आहे. तोरणा. रायगड, सिंहगड, रांगणा, पन्हाळा. पुरंधर वगैरे नांवें मराठ्यांच्या तेथील मर्दुमकीच्या कृत्यांनीं अजरामर झालेलीं आहेत. सातारप्रांतीं सातारा किल्ला औरंगझेबाच्या अफाट सैन्याविरुद्ध कित्येक महिने सारखा लढत होता आणि अखेर जरी तो मोंगलांच्या हातीं गेला तरी राजारामाच्या कारकीर्दींत पंतप्रतिनिधींनीं हाच किल्ला प्रथमतः मोंगलांपासून हिसकावून घेतला. तोरणा आणि रायगड हे महाराजांचे पहिले विजयस्तंभच होत; शिवनेरी तर त्यांचें जन्मस्थान. बाजीप्रभु यानें आपल्या अतुल शौर्यानें पुरंधर हें नांव संस्मरणीय करून ठेविलें आहे. नरवीर तानाजी मालुसरे आणि सिंहगड यावचंद्रदिवाकरौ अजरामर झालेले आहेत. सिद्धी जोहारानें घातलेला कडेकोट वेढा आणि त्यांतून महाराजांनीं आपली करून घेतलेली सुटका या कृत्यांबद्दल पन्हाळा इतिहासप्रसिद्ध आहे. नरशार्दूल बाजी देशपांड्याच्या आत्मयज्ञानें रांगणा हें नांव कधींही स्मरणपटलावरून पुसलें जाणारें नाहीं. मालवण व कुलाबा मराठ्यांच्या आरमाराचीं मुख्य स्थलें होतीं. अफझुलखानाच्या वधानें प्रतापगड, आणि मी मी ह्मणविणाऱ्या मोंगलीसेनानींबरोबर वीर मावळे गड्यांनीं केलेल्या भयंकर रणसंग्रामांनीं माहुली वसालेरी, हीं नांवं इतिहासांतून केव्हांही नष्ट होण्यासारखीं नाहींत. याप्रमाणेंच कल्याण, भिवडी, वांई, कऱ्हाड, सुपें, खटाव, बारामती, चाकण, शिरवळ, मिरज, तासगांव आणि कोल्हापूर या किल्ल्यांनीं मराठ्यांच्या इतिहासांत ज्या महत्वाच्या कामगिऱ्या बजाविल्या त्यामुळें महाराजांनीं जी त्यांच्याविषयीं इतकी काळजी घेतली ती यथायोग्य होती असें कोण ह्मणणार नाहीं?

प्रत्येक किल्ल्यावर महाराजांनीं नेमिलेला एक एक मराठा जातीचा हवलदार असून, त्याचे हाताखालीं प्रत्येक बुरजाचे संरक्षणाकरितां एक एक मराठा मदननीस असे. हवलदाराच्या साहाय्यार्थ देशस्थ—कोकणस्थ—

कऱ्हाडे या तीन वर्गांपैकीं एका वर्गांतील ब्राह्मण ज्ञातीचा एक सुभेदार अथवा सबनीस असून प्रभु जातीचा एक कारखानीस असे. हवलदार व त्याच्या हाताखालील मराठे कामगार यांच्या ताब्यांत लष्करची व्यवस्था असे. ब्राह्मण सुभेदाराकडे मुलकी व वसुलाचें काम असून प्रभु कारखानिसाकडे घासदाणा, दारूसामान वगैरेंची योग्य तजवीज ठेवणें आणि किल्ल्यांतील पडझडीची डागडुजी करणें हीं कामें असत. अशा रीतीनें हे तीन वर्ग श्रमविभागाच्या तत्त्वावर एकत्र गोंविलेले असल्यामुळें या व्यवस्थेनें परस्परांवर एक प्रकारचा दाब राहून मत्सराला जागा राहिलेली नव्हती. तटातटांवरून उत्तम रखवालदार पहाऱ्यावर नेमिलेले असून आसपासच्या खालील भूप्रदेशावर व रानावर रामोशी व महार मांग या खालच्या वर्गांतील लोकांचा बंदोबस्त असे. चौकीदार, पहारेकरी इत्यादि रक्षक लोकांनीं रात्रीं अगर दिवसा कसकशीं कामें बजावावयाचीं याजबद्दल उत्तम नियम बांधून दिलेले होते. किल्ल्यांवरील शिबंदीची संख्या किल्ल्याच्या महत्त्वाच्या मानानें कमीअधिक असे. प्रत्येक किल्ल्यांत कायमची वस्ती असून आंतील सर्व लोकांचा फायदा किल्ल्याच्या संरक्षणापासूनच व्हावा, अशी एकंदर व्यवस्था असल्यामुळें एक एक किल्ला ह्मणजे एक एक स्वतंत्र राज्यच होतें ह्मटलें तरी चालेल. फौज बाहेर मोहिमेवर गेली असतां, ब्राह्मण सुभेदार व प्रभु कारखानीस किल्ल्याची डागडुजी व सामानसुमानाचा व पैशाचा सैन्यास पुरवठा करण्यांत गुंतलेले असत. कारण मोहिमेवरील फौजेस सामान पुरविण्याची पाळी केव्हां कोणत्या किल्ल्यावर येईल याचा नेम नसे. ग्रांट डफनें ह्मटलें आहे 'किल्ल्यांतून बाहेर व बाहेरून आंत कोणी केव्हां जाणें, गस्त फिरणें, पहारे चौक्या सांभाळणें व त्यांजवर देखरेख ठेवणें, पाणी, धान्य, वैरण व युद्धसामान वगैरे जय्यत तयार ठेवणें, या गोष्टींविषयीं अगदीं सक्त व सूक्ष्म नियम शिवाजीनें केलेले असून प्रत्येक शाखेवरील मुख्य मुख्य अधिकाऱ्यांचीं बारीकसारीक कामें सुद्धां त्यानें ठरविलेलीं होतीं; व ते नियम मोडण्यास तिळभर

देखील सवड ठेविलेली नव्हती. इतकें असूनही शिवाजीचा या सर्व बाबींचा खर्च फारच काटकसरीनें बांधिलेला होता ' असो, प्रत्येक दहा शिपायांवर एक नाईक असे. शिपायांचीं हत्यारें ह्मणजे बंदुकी, ढाला, तरवारी, बरच्या, भाले व पट्टे हीं होतीं. प्रत्येक मनुष्याला रोख अगर धान्यरूपानें नक्त पगार त्याच्या त्याच्या योग्यतेच्या मानानें ठरलेला असून तो वेळचेवेळीं त्याला मिळण्याविषयीं पूर्ण खबरदारी घेतली जात असे.

किल्ल्यांवरून सपाट भूप्रदेशाकडे नजर वळविली असतां असें दिसून येतें कीं, हल्लीं चालू असलेल्या तालुका पद्धतीप्रमाणेंच महाराजांनीं आपल्याराज्याचे विभाग केलेले होते व त्यांना महाल अथवा प्रांत ह्मणत. लाख सव्वालाखपर्यंत सरासरीनें प्रांताचा अथवा महालाचा वसूल येत असे. दोन अगर तीन महाल मिळून एक सुभा अगर जिल्हा होत असे. सुभेदाराचा वार्षिक पगार सरासरीनें चारशें होन ह्मणजे दरमहा १०० रुपये असे. गांवचा पाटील, कुळकर्णी, देशमुख अगर देशपांडे यांच्याकडे पूर्वीच्या मोगलीराज्यांतून सर्वस्वीं वसुलाचें काम सोंपविलेलें असें, ती पद्धत महाराजांनीं साफ मोडून टाकिली. या गांवकामगारांकडुन अथवा जिल्हा कामगारांकडून त्यांचें पूर्वापार वतनी उत्पन्न महाराजांनीं काढून घेतलें अशांतला भाग नव्हता; परंतु त्यांच्या हातांत जी एकंदर वसुलाची व्यवस्था असे ती त्यांनीं काढून घेतली व ती सुभेदार व महालकरी यांच्या ताब्यांत दिली. दोन तीन खेड्यांमिळून त्यांनीं कमाविसदार ह्मणून एक एक कारकून नेमिला व त्याच्याकडे प्रत्यक्ष वसूल घेण्याचें काम सांगितलें. महाराजांच्या राजवटींत, खेड्यांतून अथवा महालांतून जमीनसारा मक्ते देऊन वसूल करणें, ही जी जुनी जुलमी पद्धत तिला केव्हांही थारा मिळाला नाहीं.

महाराजांचें लष्कर मुख्यतः दोन प्रकारचें होतें—घोडेस्वार व पायदळ. स्वारांहून पायदळाची संख्या जास्त असे. दहा पायदळ शिपायांवर एक एक नाईक असे. अशा पांच तुकड्यांवर ह्मणजे पन्नास शिपायांवर एक हवलदार, दोन हवलदारांवर ह्मणजे शंभर शिपायांवर एक जुमलेदार व दहा जुमल्यांवर ह्मणजे

हजार शिपायांवर एक हजारी ह्मणून कामगार असे. अशा पांच हजार फौजेवर सरनोबत नांवाचा एक मुख्य कामगार असे. घोडेस्वारांत दोन प्रकार होते—बारगीर आणि शिलेदार. पंचवीस बारगिरांवर अथवा शिलेदारांवर एक एक हवलदार असे. असे पांच हवाले मिळून एक जुमला आणि दहा जुमले मिळून एक हजारी होत असे. अशा पांचहजाऱ्यांवर एक पंच हजारी असे व या सर्वांवर घोडेस्वारांचा सरनोबत ह्मणून एक मुख्य कामगार असे. दर पंचवीस घोड्यांस एक एक नालबंद व भिस्ती असे. प्रत्येक मराठा जातीच्या लष्करी अंमलदाराचे हाताखालीं एक ब्राह्मण सबनीस व प्रभु कारखानीस अथवा ब्राह्मण मुजुमदार आणि प्रभू जमनीस अशी व्यवस्था असे. पावसाळ्यांत निवाऱ्याच्या जागा पाहून तेथें बारगिरांचे घोडे ठेवीत असत. या ठिकाणी घास दाणा वगैरे जिन्नसांचा भरपूर पुरवठा केलेला असे. घोडे स्वारांना राहण्यासाठीं बराकी बांधलेल्या असत. अधिकाऱ्यांपासून खालच्या दर्जाच्या नोकर लोकांपर्यंत सर्वांना वेळच्या वेळीं रोख पगार मिळत असे. पागापंचहजारी व पागाहजारी यांचा पगार अनुक्रमें दोन हजार होन व एक हजार होन इतका होता. पायदळावरच्या हजारीला पांचशें होन पगार असे. पायदळ अगर घोडेस्वार यांच्या कमजास्त दर्जाप्रमाणें. पायदळांत नऊ ते तीन रुपये व घोडेस्वारांत वीस ते सहा रुपये या प्रमाणें पगाराचें प्रमाण होतें. वर्षांतून आठ महिने मोंगली प्रदेशांतून चौथाई व सरदेशमुखीचें उत्पन्न वसूल करून ह्मणजे मुलुखगिरीवर सैन्याचा बहुतेक खर्च भागत असे. बाहेर मुलुखगिरीवर असतांना बरोबर बायकापोरें ठविण्याची सर्वांना सख्त मनाई असे. पायदळ शिपायाला अथवा घोडेस्वाराला लुटींत मिळालेल्या प्रत्येक वस्तूचा सडान् सडा हिशोब द्यावा लागे. कोणी कांहीं लपवून ठेविल्यास त्याला कडक शिक्षा होत असे. चांगल्या वर्तनाबद्दल जामीन घेऊन सैन्यांत भरती करण्याचा परिपाठ होता. सैन्यांतील वरिष्ठ अंमलदारांना चौथाई व सरदेशमुखी वसुलाचा पैन्‌पै हिशोब द्यावा लागत असे. महाराजांच्या वेळीं नोकरीबद्दल कोणालाही

वतन अगर जहागीर करून देण्याचा त्यांचा बिलकूल रिवाज नव्हता. इतकी जरी महाराजांची सैन्यांतील शिस्त कडक होती तरी विजयादशमीच्या सुमुहूर्तादर जेव्हां सैन्यांत भरती होत असे तेव्हां घाटमाथ्यावरील शूरमावळे गडी, कोकणांतील लढवय्येहेटकरी आणि खुद्द महाराष्ट्रांतील निधड्याछातीचे शिलेदार व बारगीर यांच्या झुंडीच्याझुंडी मराठ्यांच्या राष्ट्रीय निशाणाखालीं जमा होण्यास तिळमात्रही अडचण पडत नसे.

नोकरलोकांना रोख पगार देणें आणि प्रजेपासून कोणाला मक्ता न देतां प्रत्यक्ष सरकारसारा वसूल करणें, या दोन सुधारणांवर महाराजांचा मोठा भर होता. या दोन्ही पद्धति त्यांनीं आपल्या सर्व राज्यभर चालू केल्या होत्या. त्यांची पक्की खात्री होऊन चुकली होती कीं, पूर्वी जमीनदार वगैरे लोकांकडे सारावसूलीचें काम मक्तेदारीनें सोंपविण्यांत आलेलें असल्यामुळेंच जिकडे तिकडे घोंटाळा माजून राहिलेला होता. कारण, हे लोक प्रजेपासून वसूल जास्त करून सरकारांत भरणा कमी करीत असत व त्यामुळें त्यांना नाना प्रकारच्या भानगडी उपस्थित करण्यास व मुख्य सत्तेच्या हुकुमांत ढवळाढवळ करण्यास चांगलें फावत असे. त्यांच्या जागीं वसुली कामावर शिवाजीमहाराजांनीं कमाविसदार, महालकरी आणि सुभेदार असे पगारी नोकर नेमिले. पिकें उभीं असतां पहाणी करून सरकारसारा ठरविण्याचें काम कमाविसदाराचें होतें. ही आकारणी नक्त अथवा धान्य अशी दोन प्रकारची असे. सान्याचा आकार ठरवितांना शेतांची काळजीपूर्वक मोजणी केली जात असे. मोजणीबुकांतून जमीनीच्या मालकांचीं नांवें नोंदलीं जात असत आणि त्यांच्यापासून सरकारसान्याबद्दल वार्षिक कबुलायती घेतल्या जात. धान्याच्या बाबतींत प्रत्यक्ष उत्पन्नाच्या दोनपंचमांशापेक्षां सरकारसारा कधींही अधिक घेतला जात नसे. दुष्काळाच्या सालांत अगर कांहीं आकस्मिक कारणांनीं पिकें बुडालीं तर सढळ हातानें शेतकऱ्याला तगाई मिळत असे. ही तगाई चार पांच वर्षांत हप्त्याहप्त्यांनीं वसूल करण्यांत येत असे.

सुभेदाराकडे दिवाणी व फौजदारी अशीं उभय प्रकारचीं कामें असत. त्या कालीं दिवाणे करून सोडणाऱ्या दिवाणी कोर्टांना विशेष महत्त्व नसे, कारण वाद उपस्थित झाले तर ते सुभेदार निकालासाठीं ग्रामपंचांकडे पाठवीत असे. विशेष महत्वाचे खटले दुसऱ्या गांवच्या ग्रामपंचायतीकडे न्याय होण्यासाठीं पाठविण्याचा रिवाज होता.

सुभ्यांतील मुलकी व्यवस्थेवर मुख्य राजधानींतील पंतअमात्य आणि पंतसचिव या दोन मुख्य कामगारांची देखरेख असे. त्या वेळचे पंतअमात्य आणि पंतसचिव ह्मणजे हल्लींचे फायनान्स मिनिस्टर आणि अकाउन्टंट जनरल होत ह्मटलें तरी चालेल. प्रत्येक सुभ्याचे हिशोब त्यांच्याकडे तपासणीकरितां पाठविले जात व त्यांच्याकडून तपासतांना हिशोबांत ज्या चुक्या निघत त्यांच्याबद्दल गुन्हेगारांना योग्य शासन होत असे. सुभेकामगारांचें काम तपासण्याकरितां आपल्या हाताखालील लोक खालीं सुभ्यांत पाठविण्याचाही त्यांना अधिकार दिलेला होता. मुख्य प्रधान पेशवा असून त्याच्या खालोखाल पंतअमात्य आणि पंतसचिव यांचा दर्जा होता. त्यांच्याकडे वर सांगितलेलीं मुलकीकडील कामें असून शिवाय लष्कराचाही ताबा असे. महाराजांचें अष्टप्रधान म्हणून जें मुख्य मंत्रिमंडळ असे त्यांत या दोघांचें महत्त्व बरेंच होतें. पेशवे मुख्य प्रधान असून ते सिंहासनाजवळ महाराजांच्या उजव्या हाताकडे पहिल्या आसनावर बसत. सेनापतीकडे सर्व लष्करची व्यवस्था असून त्याचा मान सिंहासनापाशीं महाराजांच्या डाव्या बाजूला पहिल्या पदावर बसण्याचा असे. पेशव्यांच्या शेजारीं अमात्य आणि सचिव यांचा बसण्याचा मान होता. सचिवाचे खालीं मंत्र्याची जागा असून त्याच्याकडे राजाच्या खाजगी कामांचा ताबा असे. सुमंताकडे परराज्यांशीं पत्रव्यवहार वगैरे करण्याचें काम असून त्याचें स्थल डाव्या बाजूला सेनापतीच्या खालीं असे. सुमंतानंतर पंडितराव म्हणून एक प्रधान बसे व तो धर्मसंबंधीं सर्व प्रकरणांची व्यवस्था पाही. याच्या खालीं डाव्या हाताकडे मुख्य न्यायाधीश बसत असे. याप्रमाणें महाराजांच्या प्रधानमंडळाची रचना होती.

यावरून वरील व्यवस्थेंत आणि सांप्रतच्या हिंदुस्थानसरकारच्या रचनेंत पुष्कळसें साम्य आहे असें वाचकांचे लक्षांत येईल. थोड्याशा बाबतींत फरक आहे परंतु तो भिन्न परिस्थितीनें झालेला आहे. ज्या धोरणावर ही प्रधान-मंडळाची योजना महाराजांनीं सुरू केली व ती आपल्या हयातीपर्यंत यथोचित प्रकारें चालू ठेविली तें धोरण महाराजांच्या मागून येणाऱ्या पुरुषांनीं अबाधित एकनिष्ठपणें जर चालविलें असतें तर ज्या संकटांनीं मराठमंडळाचा अखेर नाश झाला तीं संकटें खात्रीनें टळलीं असतीं. न्यायाधीश आणि पंडितराव यांच्या खेरीज साधारणपणें अष्टप्रधानांच्या हातीं मुलकी आणि लष्करी असे दोन्ही अधिकार होते. अशा प्रकारें लष्करचाही ताबा असल्यामुळें मोठमोठ्या लढाया मारून जे विजयश्री संपादण्यांत हातखंडा असत त्यांचें स्वभावतःच राज्यांत विशेष वर्चस्व होई. त्या कालच्या धामधुमीच्या देशकालस्थितीला अनुसरून कारभारीमंडळ युद्धकलानिपुण होतें व याच गोष्टींत जरी मराठ-शाहीच्या अखेर विनाशाचें बीज आहे तरी महाराजांनीं तो टाळण्यास्तव एक उत्तम तोड काढलेली होती ती ही कीं, प्रधानमंडळापैकीं कोणाचाही हुद्दा वंश-परंपरेनें चालू नये, असा त्यांनीं नियम केलेला होता. याला प्रत्यंतर, त्यांनीं आपल्या राजवटींत माणकोजी दहातोंडे, नेताजी पालकर, प्रतापराव गुजर आणि हंबीरराव मोहिते असे निरनिराळे चार सेनापती नेमिले; पहिल्या पेशव्या-कडून पेशवाईचा अधिकार काढून तो त्यांनीं मोरोपंत पिंगळे यास दिला; त्याचप्रमाणें त्यांनीं पंतअमात्यही वेळोवेळीं कारणपरत्वें बदलले. सारांश, कोणताही हुद्दा एकाच विशिष्ट कुलांत आनुवंशिक चालावा असें आत्म-घातकी धोरण न ठेवितां प्रत्येक हुद्दा त्याला योग्य अशा कोणत्याही माणसाला मिळावा असें त्यांनीं ठरविलें होतें. दूरदृष्टी पोहोंचवून महाराजांनीं स्वीकारलेलें हें उत्तम धोरण त्यांच्या निधनानंतर सरासरी शाहू-महाराजांच्या आरंभ कालापर्यंत साधारणतः पाळलें गेलें. परंतु त्यानंतर पेश-वाई म्हणजेच मराठशाही होऊन 'योग्यतेला अनुरूप अशी अधिकाराची वाटणी व्हावी' हें महाराजांचें राज्यकारभारांतील उदात्त तत्व सुटलें आणि तिला पूर्वीचें

'योग्यता नसली तरी अधिकार आनुवंशिक चालावे' हें परिणामीं घातक चळण लागलें हें महाराष्ट्राचें केवळ दुर्दैव होय। म्हणूनच महाराष्ट्र सत्तेचा जो अखेर घात झाला त्याबद्दल शिवाजी महाराजांकडे किमपिही दोष येत नाहीं. त्याबद्दल जर कोणाला दोष द्यावयाचा असेल तर तो महाराजांनीं देशस्थितीचा पूर्णविचार करून घालून दिलेला कित्ता गिरविण्याचें अजीबात ज्यांनीं सोडून दिलें त्यांनाच दिला पाहिजे.

आणखी एका बाबतींत देखील महाराज त्या कालाच्या पुष्कळ पुढें गेलेले दिसतात. ती बाबत म्हणजे आपल्या मुलकी अगर लष्करी कोणत्याही अंमलदाराला केव्हांही जहागीर तोडून देण्याच्या ते अगदीं विरुद्ध होते ही होय. पेशवे अगर सेनापती पासून तों अगदीं कनिष्ठ शिपाई अगर कारकुनापर्यंत प्रत्येकाला खजिन्यांतून नक्त पगार देण्याविषयीं ते अगदीं दक्ष असत. प्रत्येकाचा पगार स्पष्ट ठरलेला असून तो त्याला वेळचेवेळीं नियमित मिळण्याविषयीं त्यांचा कडक नियम असे. जहागीर तोडून देण्याच्या पद्धतीवर त्यांचा मोठा कटाक्ष होता. याचें कारण राज्याची परिस्थिति चांगली आणि जहागीर देण्याचा हेतु शुद्ध असला तरी देखील या पद्धतीचा दुरुपयोग होण्याचा विशेष संभव असतो हें होय. जहागिरदार स्वाभाविकपणेंच एक मोठा जमीनदार बनूं इच्छितो आणि त्यांत आनुवंशिक बंधनांनीं त्याचें मोठें प्रस्थ वाढलें म्हणजे बळजबरीचे उपाय योजल्याविना त्याला दूर करूं पहाणें मोठें अवघड असतें. आधींच आपल्याकडे लोकांचा कल आपसांत दुही माजवून कलह करण्याकडे असतो आणि जहागिरी तोडून देण्याची रीत आणि जहागिरीच्या उत्पन्नांतून सैन्य ठेवण्याची परवानगी यांच्या योगें त्यांत आणखी भर पडते ती इतकी कीं, सुव्यवस्थित शासनपद्धति बहुतेक अशक्य होऊन बसते. महाराज तर जमीनदार लोकांना स्वसंरक्षणासाठीं किल्ले बांधून त्यांत राहण्याची परवानगीसुद्धां न देतां, इतर रयतेप्रमाणें त्यांना साध्या घरांतून राहण्यास भाग पाडीत असत. महाराजांचे कारकीर्दींत प्रसिद्धीस आलेल्या मोठ्या लोकांपैकीं एकाला देखील आपल्या वंशजांना आपल्या पाठीमागें मोठमोठ्या स्थावर मिळकती राखून ठेवतां आल्या नाहींत.

अठराव्या शतकाच्या आरंभीं शाहू महाराजांचे कारभारी जसे आनुवंशिक बडे जमीनदार होऊन बसले तसे मोरोपंत पिंगळे, आबाजी सोनदेव, रावो बल्लाळ, दत्तो अण्णाजी, निराजी रावजी, प्रतापराव गुजर, नेताजी पालकर, हंबिरराव मोहिते, तानाजी मालुसरे व येसाजी कंक या ब्राह्मण व मराठे शूर शिवसरदारांपैकीं कोणा एकाला देखील करतां आलें नाहीं. याचें कारण महाराजांना आपल्या हाताखालील लोकांचा उत्कर्ष सहन न होऊन त्यांनीं त्यांना तसें करूं दिलें नाहीं हें नसून व्यक्तिवाचक उत्कर्षापेक्षां स्वदेशोन्नतीची किंमत त्यांना अधिक कळत होती, ह्मणून त्यांनीं त्यांना तसें करण्यास सवड ठेविली नाहीं हें होय.

महाराजांनीं आपल्या राजवटींत फक्त देवालयांना आणि धर्मसंस्थाना वंशपरंपरा कांहीं नेमणुका करून दिल्या होत्या. याचें कारण अशा संस्था म्हणजे त्या सार्वजनिक हिताच्या गोष्टी असून ज्यांच्याकडे अशा स्थावर मिळकती लावून दिलेल्या असत त्यांना लष्करीकाम करावें लागत नसे आणि ह्मणून ते साधारणतः राज्याला डोईजड होण्याचा संभव नव्हता. धार्मिक संस्थांपैकीं दक्षिणा देऊन विद्येला उत्तेजन देण्याची जी पद्धति तिला शिवाजी महाराजांचा मोठा आश्रय असे. सांप्रत परीक्षांच्या निकालांवर बक्षिसें देण्याची जी रीत आहे तिची ही पूर्ववृत्ति होती असें ह्मटलें तरी चालेल. दक्षिणा देण्याचें प्रमाण असें ठरविलेलें होतें कीं जितका ब्राम्हण जास्त शिकलेला व जितका तो अधिक प्रवीण तितकी त्याला अधिक दक्षिणा मिळत असे. त्या काळीं सार्वजनिक शिक्षणसंस्था नसून गुरुगृहीं राहून विद्यार्थ्यांना विद्यार्जन करावें लागत असे. गुरु आणि त्यांचे शिष्य यांना वर्षासनें लावून दिलेलीं असत व त्यायोगें त्यांना उदरनिर्वाहाची पंचाईत न पडतां अध्ययन आणि अध्यापन हीं दोन्हीं कामें वर्षभर उत्तम प्रकारें चालत. महाराज राज्यारूढ झाले त्या वेळीं संस्कृत विद्या अगदीं निकृष्ट दशेस जाऊन पोंचलेली होती, परंतु तिला प्रोत्साहन देण्याकरितां त्यांनीं ज्या शिक्षण पद्धती सुरू केल्या त्यांच्यायोगें महाराष्ट्र लवकरच संस्कृत विद्येचें माहेरघर होऊन बसलें. हुषार

विद्यार्थी विद्याभ्यासासाठीं काशींत जाऊन रहात व तेथून विद्येंत प्राविण्य संपादन करून जेव्हां ते परत स्वदेशीं येत तेव्हां परिक्षा घेऊन शिवाजीमहाराज त्यांना मोठमोठीं इनामें देत असत. ही विद्येला उत्तेजन देणारी दक्षिणेची पद्धत मोंगलांनीं संभाजीराजे यांना पकडल्यानंतर तळेगांवच्या दाभाड्यांनीं चालविली होती. पुढें जेव्हां दाभाड्यांचें राज्यांतील महत्व नष्ट झालें तेव्हां पुण्याच्या पेशव्यांनीं ही महत्वाची कामगिरी आपल्या शिरावर घेतली व तिची मर्यादा बरीच विस्तृत केली. शेवटीं शेवटीं मराठी राज्य इंग्रजांच्या हातीं पडण्याच्या सुमारास तर दक्षिणेची रक्कम पांच लाखांवर गेली होती असें ह्मणतात.

महाराजांच्या मुलकी राज्यव्यवस्थेचें जें येथवर सविस्तर विवरण केलें आहे, त्यावरून असें दिसून येईल कीं, त्यांची राज्यपद्धति तत्पूर्वींच्या अगर तन्नंतरच्या राज्यपद्धतींपेक्षां पुष्कळ महत्वाच्या बाबतींत अगदीं भिन्न प्रकारची होती. पहिली बाबत ह्मणजे मराठी राज्याचे केवळ आधारस्तंभच असे जे डोंगरी किल्ले, त्यांना महाराजांनीं विशेष महत्त्व देऊन नांवारूपास आणिलें ही होय. दुसरी गोष्ट अशी कीं, एकाच विशिष्ट कुलांत मोठमोठे अधिकार वंशपरंपरेनें चालण्याची घातुक चाल राज्यांत सुरू होती ती त्यांनीं मोडून टाकिली. तिसरें असें कीं, मुलकी अथवा लष्करी अधिकाऱ्यांना स्थावर उत्पन्नाच्या जहागिरी तोडून देण्याचें त्यांनीं साफ नाकारलें. चवथी बाबत ही कीं, जिल्हा अगर गांवकामगारांच्या मध्यस्थीशिवाय प्रत्यक्ष सरकारी नोकर नेमून सरकारसारा वसूल करण्याची त्यांनीं नवी पद्धत घालून दिली. पांचवें असें कीं, मक्तेदारीनें जमिनी देण्याची चाल त्यांनीं बंद केली. सहावी महत्वाची बाब म्हटली म्हणजे अष्टप्रधानांचें एक मंत्रि-मंडळ स्थापून त्यांनीं त्यांच्याकडे राज्यांतील भिन्न भिन्न कामें सोंपवून दिलीं आणि अशा प्रकारें अल्पसंख्यांक प्रजासत्तात्मक राज्य पद्धतीचा पाया घालून दिला. सातवी बाबत म्हणजे एकंदर राज्यकारभारांत मुलकी कारभाराला अग्रस्थान देऊन लष्करी तत्त्वाला त्यांनीं दुय्यम स्थल दिलें ही होय. आठवी आणि शेवटची गोष्ट म्हणजे लहान मोठ्या सर्व अधिकाराच्या जागांवरून ब्राह्मण, प्रभु आणि

मराठे यांच्या योग्यप्रमाणानें नेमणूका करून त्यांनीं आपसांतील दुहीचा, अंतःकलहाच्या आणि मत्सराचा नायनाट केला व परस्परांवर परस्परांचा योग्य तेवढा दाब राहील अशी व्यवस्था केली.

वर जें शिवाजी महाराजांच्या राज्यव्यवस्थेचें अल्पतः वर्णन केलें आहे तें वाचून त्यांची योग्यता किती थोर होती, याचें वाचकांना अनुमान करतां येईलच. परंतु, मुळांत ह्मणण्यासारखा कांहीं आधार नसतां स्वतःच्या बुद्धिमत्तेवर व हिंमतीवर एवढा मोठा विस्तृत प्रदेश काबीज करून व स्वराज्याची स्थापना करून, महाराजांनीं अशा प्रकारच्या उत्तम राज्यव्यवस्थेचा जो धडा स्वकीयांना घालून दिला त्याचा अधिकार अंगीं प्राप्त होण्यास त्यांच्या अंगचे जे राष्ट्रीय सद्गुण कारण झाले त्यांचा थोडासा विचार करून व शेवटीं उपसंहारात्मक दोन शब्द लिहून आह्मी आमच्या प्रिय वाचकांची रजा घेऊं इच्छितों.

शिवाजी महाराजांच्या शूरत्वासंबंधानें विशेष लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. त्यांचें सबंध आयुष्य अतिशय धामधुमींत आणि लढायांत गेलेलें असल्यामुळें ते उत्तम शूर होते, ही गोष्ट अनेक प्रसंगीं पूर्णपणें व्यक्त झालेली आहे. परंतु ते नुसते शूर होते इतकेंच नव्हे, तर ते उत्तम सेनानीही होते. केवळ जो शूर त्याला उत्तम सेनानी ह्मणतां येणार नाहीं. सेनानीपणाला शौर्याखेरीज आणखी इतर गुण असावे लागतात. विरुद्ध बाजूच्या सैन्याची स्थिति कशा प्रकारची आहे, कोणत्या स्थळीं अगर प्रदेशीं लढाई दिली असतां स्वपक्षाचा जय होईल, शत्रु–सैन्याला तोंड देण्यास इष्टानिष्ट काल कोणता, शत्रु—सेनेची रचना कशी केलेली आहे व उलट स्वसैन्याची मांडणी कशारीतीनें केल्यानें खात्रीनें यशप्राप्ति होईल इत्यादि गोष्टींचें धोरण उत्तम सेनानीला ठेवावें लागतें. या गोष्टींचें धोरण महाराजांचें किती प्रशंसनीय होतें हें त्यांना केव्हांही युद्धांत माघार खावी लागली नाहीं यावरून व्यक्त होत आहे. त्या वेळच्या युद्धकलेंत महाराज परम निपुण होते, इतकेंच नाहीं, तर त्या कलेंत विशिष्ट प्रकारची सुधारणा घडवून आणून ते एक पायरी सर्वांच्या पुढें

गेले होते असें ह्मणावें लागतें. ही कला ह्मणजे त्यांनीं सुरू केलेला गनिमी काव्यानें लढण्याचा युद्ध-प्रकार होय. हा प्रकार समजून घेण्याला त्यांच्या शत्रूंची युद्धपद्धति कशी होती व त्यांनीं तिच्यांत फरक कोणता केला, हें पाहिलें पाहिजे त्यांचे मुख्य व बलाढ्य शत्रु मोंगल होत. मोंगल बादशहा-औरंगझेब स्वारीवर निघाला म्हणजे तो बरोबर सैन्याचें मोठें लटांबरचें लटांबर घेऊन निघत असे. त्याच्या स्वारीविषयीं असें सांगतात कीं सैन्याची अघाडी जेथें असेल तेथें त्याची पिछाडी येऊन पोंचली म्हणजे एक दिवसाच्या कुचाची पराकाष्ठा झाली. त्यामुळें मोंगलीसैन्य म्हणजे एक चालता बोलता बाजारच आहे कीं काय असें भासे. सारांश, हें सैन्य अतिशय अवजड असे. अशा सैन्याविरुद्ध लढण्याकरतां महाराजांनीं जर आपलें सैन्य तशाच दरबारी थाटाचें तयार केलें असतें तर त्यांचा मोंगलांपुढें निभाव लागताना. अशा सैन्याला अगदीं सळोकींपळो करून सोडतां यावें अशा करतां त्यांनीं स्वतःचें सैन्य अगदीं सुटसुटीत असें तयार केलें होतें. मोंगलांचें सैन्य फार मोठें असून त्यांच्याजवळ तोफांचाही भरपूर पुरवठा असे. त्या तोफांचा मारा सुरू होण्या-पूर्वींच शत्रु-पक्षाकडील हजारों लोक गारद करतां यावे व तसें झालें म्हणजे शत्रूचा सहज पराभव व्हावा, अशी युक्ति महाराजांनीं शोधून काढिली. ही युक्ति म्हणजे गनिमी लढाईची होय. शत्रूला कधींही समोरासमोर तोंड न देतां अजूबाजूनें अथवा पिछाडीनें अचानक छापा घालून शत्रूचें बरेचसें सैन्य कापून काढावयाचें; शत्रु-सैन्यांत गोंधळ उडवून द्यावयाचा; उलट शत्रूनें हल्ला केला कीं, दूर पळून जावयाचें व संकेतस्थलीं पुनःएकत्र जमून शत्रु-सैन्यांत सांवरासांवर होऊन स्थिरस्थावर होते आहे न होते आहे तोंच, शत्रूच्या पिछाडीवर एकदम हल्ला चढवावयाचा. रात्रीचे देखील महाराज स्वस्थ बसत नसत. शत्रूला दाणा-गोटा, गवत चारा वगैरे मिळण्याची देखील पंचाईत पडावी, अशा व्यवस्थेंत नें निमग्न राहत. या गनिमीकाव्याच्या युद्ध-प्रकारानें शत्रूचें अतिशय नुकसान होऊन महाराजांना स्वतःला सैन्यासह अगदीं सुरक्षित राहतां येत असे. अशा लढायी मारणारें सैन्य सुटसुटीत असावें लागतें व त्याप्रमाणें तें महा-

राजांचें होतें. मोंगलांसारखें अवडंबर बरोबर असतें तर तसें त्यांना करतां आलें नसतें. शत्रूवर अचानक हल्ला करून त्याला घाबरवून सोडण्यास जी सैन्याच्या हालचालींत सफाई असावी लागते ती महाराजांच्या सारख्या सुटसुटीत लष्करालाच शक्य व साध्य होण्यासारखी असते. आज सिंहगडावर तर उद्यां पन्हाळा किल्ल्यावर, परवां सुरतेस तर तेरवां बऱ्हाणपूर शहरीं महाराजांचा मुक्काम असे याचें कारण तरी हेंच होय. त्यांच्या सैन्यांतील लोकांना खाण्यास कांदाभाकर, नेसण्यास पंचा अथवा लंगोटी आणि डोकीला घाळण्यास मुंडासें असलें म्हणजे त्यांना दुसऱ्या कशाचीही गरज लागत नसे. असो. मराठ्यांच्या या नवीन युद्ध-प्रकारामुळें मराठे माणसें नसून सैतान आहेत कीं काय असें मोंगलांस वाटे. त्यामुळें शत्रूस जिंकण्याचा हुरूप अथवा उमेद मोंगली सैन्यांतून पार नष्ट होऊन गेली. मुसलमानांच्या सैन्याचा तळ जेवढ्या जाग्यावर पडलेला असे तेवढाच पाया करून ते लढत असत; परंतु महाराजांच्या रणक्षेत्राचा पाया शिवनेरीपासून थेट पन्हाळगडापर्यंत सह्याद्रीपर्वताच्या सर्व रांगा व्यापून टाकीत असे. त्यांच्या या गनिमी प्रकारामुळें त्यांच्या शत्रूपाशीं तोफांचा भरणा जरी जास्त असे तरी त्यांच्याच तोफांचा त्यांना उपयोग होण्यास मोठी मारामार पडे. कोठें तरी व कशी तरी लहालटी व लुटालूट करून पळून जावयाचें, असा जो त्यांच्या युद्धपद्धतीवर कित्येक आक्षेप करितात तो असमंजसपणाचा असून महाराजांच्या नवीन पद्धतीचें त्यांना मर्मच कळलें नाहीं असें ह्मणावें लागतें. त्या काळच्या एकंदर परिस्थितीचा जो सूक्ष्म विचार करील त्याला त्यांनीं युद्धकलेचें एक नवीन शास्त्रच निर्माण केलें असें कळून येईल.

महाराजांच्या अंगचा दुसरा विशिष्ट राष्ट्रीय गुण ह्मणजे त्यांच्या अंगचें लोकनायकत्व अथवा त्यांचा लोकपुढारीपणा हा होय. त्यांच्या बाळपणापासूनच हा गुण त्यांच्यामध्यें दृष्टीस पडत होता. लहानपणीं समवयस्क खेळगडी बरोबर घेऊन खेळतांना महाराज पुढाकार घेत असत व ते म्हणतील त्याच्या विरुद्ध त्यांचे सोबती जात नसत. नंतर त्यांच्या तारुण्यारंभापासून तर मावळे, हेट-

करी लोकांत मिळूनमिसळून वागून व त्यांचें धुरीणत्व पत्करून त्यांनीं महाराष्ट्र स्वराज्यस्थापनेसारखें केवढें श्रेष्ठ देशकार्य तडीस नेलें हें सर्वांना विदितच आहे. याप्रमाणें एक महत्त्वाचा उद्दिष्ट हेतु तडीस नेण्याचे कामीं त्यांनीं पुढाकार घेतला परंतु केव्हांही माघार न खातां तो त्यांना सफल कसा करतां आला, या गोष्टीचा थोडा विचार केला पाहिजे. त्या कालीं बंगाल्यांत प्रतापादित्य आणि राजपुतान्यांत दुर्गादास यांनीं स्वतंत्र स्वराज्यस्थापनेचे उद्योग केले होते, परंतु ते त्यांना तडीस नेतां आले नाहींत. नंतर पंजाबांत रणजितसिंग, दक्षिणेंत निझाम उल्मुलूख व म्हैसूर प्रांतीं हैदर अल्ली यांनीं स्वतंत्र होऊन कांहीं काल पावेतों स्वातंत्र्याचा उपभोग घेतला, परंतु शिवाजीमहाराजांसारखी टिकाऊ व विस्तृत स्वराज्यसंस्था त्यांना निर्माण करतां आली नाहीं. याचें कारण ते खरे लोकपुढारी अथवा लोकनायक नव्हते हें होय. त्यांनीं स्वतःच्या मनगटाच्या जोरावर, शूरपणाचे बळावर, धाडसावर व केवळ स्वोत्कर्षाच्या महत्वाकांक्षेनें प्रेरित होऊन थोडेसे लोक वश करून विवक्षित काल पावेतों स्वतंत्रपणा मिरविला खरा, परंतु स्वजनांचा जो उत्कर्ष तोच आपला उत्कर्ष, स्वदेशाचें ज्यांत कल्याण तेंच आपलें कल्याण, स्वराष्ट्राचा जो अपकर्ष तोच आपला अपकर्ष, इत्यादि खऱ्या लोकनायकाचे उदात्त विचार जसे महाराजांचे मनांत अंतःस्फूर्तीनें बाणलेले होते तसे ते त्यांच्यांत बाणलेले नव्हते म्हणून त्यांच्या कृतींत टिकाऊपणा आला नाहीं व त्यांचीं राज्यें बुडबुड्याप्रमाणें अकस्मात् उत्पन्न होऊन पुढें नष्टप्राय झालीं. "जो लोकांकरितां प्राण देण्यास तयार आणि ज्याच्या करितां लोकही प्राण देण्यास तयार तोच खरा पुढारी," अशी जी एका विद्वान् लेखकानें लोक पुढाऱ्याची व्याख्या केली आहे ती महाराजांना उत्तम लागू पडते. एकदां एक पठाणखान आपल्या गोटाभोंवतीं खंदक खणून व त्यांत जळतीं लांकडें खच्चून भरून निधास्त घोरत पडला असतां पांच पंचवीस वीर मावळेगडी तयार होऊन त्या खंदकांत आडवे पडले व त्यांनीं एक तात्पुरता पूल तयार करून त्यावरून महाराजांचा खानाच्या गोटांत शिरकाव करून दिला; रांगण्याच्या खिंडींत उभा राहून महाराजांचे

प्राण वांचविण्यासाठीं बाजी देशपांडे या वीरानें आत्मप्राणांची आहुति दिली; सिंहगड घेण्याची आज्ञा होतांच पुत्राचें लग्न अर्धें टाकून स्वकर्तव्य करण्यास तानाजी मालुसरे धावून गेला व धारातीर्थी पतन पावला; उलटपक्षीं अफझुलखानासारखा महाबलाढ्य राक्षस सरदार चालून आला असतां महाराज त्याला एकटेच भेटावयास जाऊन त्यांनीं स्वतःचा जीव धोक्यांत घातला. शाहिस्तेखानाला शिक्षा करण्याचे हेतूनें त्यांनीं पुण्याचे वाड्यांत मोठ्या अपरात्रीं शिरण्याचें धाडस केलें आणि औरंगजेबासारख्या महाबलाढ्य परंतु कपटी बादशहाला दिल्लीस ह्मणजे खुद्द त्याच्या राजधानींत भेटावयास जाऊन त्यांनीं बंदिवास पत्करिला, हे प्रसंग वरील खऱ्या लोकपुढाऱ्याची व्याख्या महाराजांना कशी लागू पडते याचे उत्तम द्योतक आहेत. तात्पर्य, आपल्या देशबांधवांचा उद्धार करण्यांत स्वकर्तव्य बजावीत असतां मृत्यू आला तरी बेहतर, अशी सर्व स्वदेशबांधवांची अढळ भावना करून दिल्यानें आणि या न्याय्य कामांत परमेश्वर अपयश कदापि देणार नाहीं, अशी त्यांच्या मनाला साक्ष पटवून दिल्यानें महाराजांना सर्व लोक अनुकूल झाले व त्यांनीं आरंभिलेल्या सत्कार्यांत सिद्धि मिळवून देण्यासाठीं आपलीं शिरकमलें परमेश्वर चरणीं अर्पण करण्यास तयार झाले. यामुळेंच पुढारी या नात्यानें महाराजांची योग्यता अप्रतिम ठरते.

ज्याप्रमाणें महाराज अत्यंत शूर होते, अप्रतिम सेनानी होते आणि कर्तृत्ववान पुढारी होते, त्याप्रमाणेंच ते अद्वितीय मुत्सद्दीही होते. या भागाच्या आरंभीं त्यांच्या राज्यव्यवस्थेचें जें वर्णन केलें आहे त्यावरून त्यांच्या या गुणाची स्थूल कल्पना करतां येते. परंतु या गुणासंबंधीं ज्या ठळक ठळक गोष्टी आहेत त्या एकत्र नमूद केल्यानें मुत्सद्दी या दृष्टीनें त्यांची योग्यता किती थोर होती हें ध्यानांत येईल. महाराजांनीं प्रथम विजापूरकरांचा तोरणा किल्ला तेथील किल्लेदाराला वश करून काबीज केला, तेव्हां त्या सरकारचा आपल्यावर रोष होऊं नये म्हणून त्यांनीं एक नम्रतेचा खलिता लिहून त्यांत तें काम त्यांनीं केवळ त्या सरकारच्या फायद्याकरितांच केलें आहे असें समजाविलें व त्यांना कांहीं कालपावेतों तरी स्वस्थ बसावयास लाविलें. नंतर एकामागून एक किल्ले घे-

ण्याचा व नवे बांधण्याचा सारखा क्रम सुरू ठेविल्यानें, विजापूरकरांस चीड येऊन शहाजीराजे यांस जिवंत भिंतींत चिणून मारण्याचा जेव्हां त्यांनीं महाराजांस धाक घातला, तेव्हां दिल्लीच्या मोगलांकडून परस्पर शह आणून त्यांनीं पितृमुक्तता केली व पुढें चार वर्षेपर्यंत विजापूरकरांच्या वाटेस न जातां ते स्वस्थ बसले. वरील प्रसंगीं एकदम युद्धप्रसंगावर महाराज आले नाहींत, याचें कारण विजापूरसारख्या दृढप्रस्थापित सत्तेशीं टक्कर देण्याचें सामर्थ्य मराठ्यांच्यामध्यें तोंपर्यंत आलेलें नव्हतें, सबब साम, दाम आणि भेद या तीन मार्गांचेंच त्यांनीं अवलंबन केलें व यांतच त्यांचा मुत्सद्दीपणा दिसून येतो. तसें न करतां ते जर एकदम वर्दळीस आले असते तर पुरा जम न बसलेल्या नूतन मराठसत्तेचा नाश होण्याचा संभव होता. परंतु जेथें जेथें सामदामादि नीतीचा उपयोग नव्हता, तेथें तेथें महाराजांनीं लढण्याची शिकस्त करून आपलें कार्य साधलें आहे. तात्पर्य, वेळप्रसंग जाणून उद्दिष्ट कार्याला धक्का न लागू देतां जो वर्तन करितो तोच खरा मुत्सद्दी व त्याप्रमाणेंच महाराजांकडून हरएक बिकट प्रसंगीं वर्तन झालेलें आहे. यानंतरचा त्यांचा मुत्सद्दीपणा विशेष कसोटीस लागण्याचा प्रसंग म्हणजे औरंगजेबाच्या बोलावण्याप्रमाणें ते दिल्लीस गेले त्या वेळचा होय. दिल्लीस जाण्यांत आपल्या गैरहजरींत स्वराज्याची व्यवस्था कितपत राहते, उत्तरेंतील रजपूत सरदार व सामान्य प्रजाजन मोंगली राज्यपद्धतीनें संतुष्ट आहेत किंवा नाराज झालेले आहेत, दिल्लीपतीच्या वैभवांत खरोखर कांहीं राम आहे किंवा तें बाहेरून दिखाऊ परंतु आंतून पोखरलेलें असें आहे इत्यादि मुत्सद्दीपणाचे डाव होते, परंतु ते फसल्यासारखे होऊन बादशहाच्या बंदिवासांत आजन्म कुजत पडावें लागतें अथवा प्राणावर येऊन बेततें कीं काय, असा जेव्हां महाराजांना मोठा पेंच येऊन पडला तेव्हां तो त्यांनीं मुत्सद्दीपणानेंच कसा सोडविला व आपली पुत्रासह कशी मुक्तता करून घेतली ही गोष्ट वाचकांचे स्मरणांत असेलच. स्वतःला राज्याभिषेक करविण्यांत देखील कोंचसें राजकारण अगर मुत्सद्दीपणा होता ही गोष्ट सुद्धां मागें जीं राज्याभिषेकाचीं कारणें दिलीं आहेत त्यावरून वाचकांचे ध्यानांत येऊन चुकलीच असेल. एकदां बुंदेलखंडांतून छत्रसाल राजा आपण होऊन दक्षिणेंत महाराजांचे साहाय्यास आला

असतां 'तुम्ही आपल्या मुलखांत राहून तुर्क मोंगलांशीं सतत झगडा चालू ठेवा, जेव्हां जेव्हां ह्मणून ते तुमच्यावर हल्ले करतील तेव्हां तेव्हां मी तुमचें साहाय्य करून त्यांचे बेत फसवीन' अशा अर्थाचा महाराजांनीं जो छत्रसाल राजाला उपदेश केला, त्यावरून महाराष्ट्रांतील आपली चळवळ जोमांत चालून तिला यश येण्याकरितां इतर सर्वत्र मोंगलांविरुद्ध दंगल सुरू असली पाहिजे, हा मुत्सद्दीपणा महाराजांच्या पूर्ण लक्षांत होता व त्याप्रमाणें उत्तरे-कडील रजपूत राजे जे मोंगलां विरुद्ध लढत होते त्याकामीं महाराजांचें आंतुन त्यांच्याशीं कांहीं सूत्र असावें असें अनुमान निघतें. एकंदरींत, महाराज लेचपेचे मुत्सद्दी नसून मोठे धूर्त व कट्टे मुत्सद्दी होते ही गोष्ट सिद्ध आहे. शिवाय गुप्त हेर ठेवून चोहोंमुलखांतील बातम्या काढून आणणें, तारायंत्र नसूनही विशिष्ट खुणांनीं किल्लोकिल्ल्यांवरून निमिष मात्रांत संकेत पाठविणें, सरहद्दीवर उत्तम बंदोबस्त ठेवणें वगैरे त्यांच्या सामान्य मुत्सद्दीधोरणांचा निर्देश या पुस्तकांत स्थलोस्थलीं केलेलाच आहे.

शेवटीं महाराजांचा स्वभाव आणि त्यांचें खाजगी वर्तन यांचा विचार करणें बाकी आहे, तो करून आपण हें प्रकरण संपवूं. त्यांचें अगदीं बाळपणापासून सर्व आयुष्य संकटांत व स्वराज्यस्थापनेची दगदग करण्यांत गेलें असल्यामुळें त्यांचा स्वभाव फार कंटक बनला होता. जेवणखाण कांहीं नसून दोन दोन चार चार दिवस घोड्यावरचे घोड्यावर चणे फुंकीत त्यांना प्रवास करावा लागे. भूक तहान मारण्यांत अगदीं हलक्या शिपायाच्यानें देखील त्यांची बरोबरी करवत नसे. याप्रमाणें संकटमय शिपाईबाण्यांत व सर्व प्रकारच्या स्थितींत त्यांचे दिवस गेल्यानें त्यांना जगाचा अनुभव विशेष आला होता व त्याचा उपयोग करून घेण्याइतकी त्यांची बुद्धि कुशाग्र होती. ते बोलण्यांत सत्यनिष्ठ, गंभीर व मधुरवचनी असल्यामुळें वाटेल त्या मनुष्यावर त्यांची छाप तेव्हांच बसे. ते अल्पसंतुष्ट असत व स्वतःच्या वर्तनानें ते इतरांना थोडक्यांत संतुष्ट राहण्यास भाग पाडीत. त्यांना उगाच भपका केलेला आवडत नसे. प्रत्येक गोष्ट स्वतःला स्वानुभवानें कळतअसल्यामुळें लोकांच्या खऱ्या अडचणी त्यांना चांगल्या समजत. ते जाणूनबुजून साहस करणारे नव्हते, तरी

साहसाशिवाय भागणार नाहीं अशी खात्री पटल्यावर कसल्याही संकटांत उडी घालण्यास ते मागें पुढें पाहत नसत. त्यांचा स्वभाव दुष्ट नसून अतिशय दयाळु असे. परंतु दुष्ट कृत्याबद्दल दुष्टास शासन करण्यांत ते फार क्रूर असत. त्यांनीं पुष्कळ गांवें लुटलीं परंतु केवळ लुटीसाठीं ह्मणून त्यांच्या हातून कोणाची प्राणहानि झाली असें एकही उदाहरण मिळणार नाहीं. उलट गरीबबापडे लोक, निराश्रित बायकापोरें यांचें त्यांच्याकडून उत्तम संगोपन झाल्याचे पुष्कळ दाखले सांपडतील. सारांश, दीनाचे दयाळु, परंतु दुष्ट मगरूर लोकांचे ते काळ होते व यांतच खरा दयाळुपणा आहे. या त्यांच्या गुणामुळेंच गरीब लोक त्यांना केवळ देवाप्रमाणें भजत. सहसा लढाईवर प्रसंग न आणतां युक्तिप्रयुक्तीनें ते आपलें काम साधीत ह्मणून कित्येक त्यांना भित्रे समजतात. पण लढाई करून रक्तपात केल्याशिवाय जर काम साध्य होत असेल तर बुद्ध्या लढाई करुन व्यर्थ रक्तपात, मनुष्यहानि इत्यादि घोर परिणाम घडवून आणून शूर म्हणवून घेण्यांत मतलब व शहाणपणा कोणता? हें आह्मांला कळत नाहीं. कित्येक प्रसंगीं समरांगणीं स्वपराक्रमानें जय मिळवून आपल्या पक्षाची त्यांनीं बाजू राखिली व अनेक प्रसंगीं जाणून बुजून संकटांत उडी घेतली या गोष्टी भित्र्यास्वभावाच्या द्योतक खास नव्हत. ते कपटी होते असाही एक प्रवाद आहे; परंतु देशोद्धारासारखें महत् सत्कार्य पारपाडण्याच्या प्रयत्नांत तशाच एखाद्या कठीण प्रसंगीं कुटिल राजनीतीचा—जिला सांप्रत 'डिप्लोमसी' (राजकारणचातुर्य) हें बडें नांव दिलें जातें—तिचा प्रयोग करवा लागला ह्मणून ते स्वभावाचे कपटी होते असें ह्मणणें कदापि उचित होणार नाहीं. त्यांची धर्मावर दृढ श्रद्धा होती, धर्मोन्नति व देशोन्नति या गोष्टी परस्परावलंबी आहेत अशी त्यांची ठाम समजूत होती, त्यांची पितृभक्ति पराकाष्ठेची होती, त्यांचें मातृप्रेम विलक्षण होतें, परस्त्रीचे ठिकाणीं मातेप्रमाणें त्यांचा पूज्य भाव असे, कोणत्याही व्यसनापासून ते अगदीं पराङ्मुख होते, स्वप्रजेविषयीं ते पोटच्या पोराप्रमाणें काळजी बाळगीत व गुरूचे ठिकाणीं त्यांची सर्वस्वबुद्धी या त्यांच्या प्रशंसनीय गुणांचें कितीही वर्णन केलें तरी तें अपुरेंच होईल सारांश, खाजगी काय किंवा सार्वजनिक काय सर्व सद्गुण असे एकत्र एकवटलेले सांपडणें केवळ दुर्मिळ आहे व ह्मणूनच महाराजांना अलौकिक महापुरुष ही संज्ञा आहे.

# भाग १२ वा.

## उपसंहार आणि बोध.

हें 'श्रीशिवछत्रपति चरित्र' निरनिराळ्या दृष्टींनीं मनन करण्यासारखें असून अत्यंत बोधप्रद आहे. या भरतखंडाच्या अर्वाचीन इतिहासांत शिवचरित्रामुळें घडून आलेली जी महाराष्ट्र स्वराज्यसंस्थापना तिच्या इतकी विलक्षण महत्त्वाची, व बोधपर अशी दुसरी गोष्ट नाहीं. ही जी अत्यंत महत्त्वाची ऐतिहासिक गोष्ट तिचें सामान्य स्वरूप काय होतें, ती घडून येण्याला कारणें कोणतीं झालीं आणि तिचे परिणाम काय झाले इत्यादि गोष्टींचा आपण विचार केला पाहिजे. तिच्या कारणांचा विचार केला असतां आपल्याला असें दिसून येईल कीं, साधुसंतांनीं स्वतःच्या स्वार्थत्यागी वर्तनानें, निरपेक्ष बुद्धीपूर्वक जनहितासाठीं केलेल्या उपदेशानें सनातन आर्यधर्माचीं उदात्त तत्त्वें लोकांच्या मनावर ठसविलीं आणि शूर मराठेसरदारांनीं तीं ग्रहण करून परंपरा ढासळूं पहात होती ती सावरून धरून आपल्या ब्रीदाचा, आपल्या शीलाचा, आपल्या धर्माचा, आपल्या भाषेचा व आपल्या देशाचा अभिमान जागृत ठेवण्याचे प्रयत्न सुरू केले आणि स्वराज्य स्थापनेला अनुकूल अशी एकंदर परिस्थिति तयार केली. दुसरें असें कीं, या परिस्थितीचा योग्य कार्याकडे योग्य उपयोग करून घेण्यांत श्रीसमर्थ रामदासांची अजब योजकता आणि शिवाजी महाराजांची विलक्षण बुद्धिमत्ता यांची भर पडली. या दोन कारणांचा मिलाफ होऊन महाराष्ट्राचा सर्व बाजूंनीं उत्कर्ष झाला आणि स्वराज्याची स्थापना झाली. आतां या शिवचरित्राच्या स्वरूपाचा विचार करतां पहिली गोष्ट ध्यानांत येते ती ही कीं, एका कालीं सर्व महाराष्ट्रीय लोक

एक राष्ट्र या बंधनानें एकत्र गोंविले जाऊन त्यांस स्वातंत्र्य प्राप्त झालें व जगाच्या इतिहासांत ते प्रसिद्धीस आले. दुसरी गोष्ट अशी कीं, महाराष्ट्रीयांच्या अंगचे अनेक राष्ट्रीय सद्गुण प्रकाशमान होण्याला स्वराज्यस्थापना ही उत्तम संधि प्राप्त झाली. अंगांत कर्तबगारी आहे परंतु योग्य प्रसंग नाहीं; बरें, योग्य प्रसंग आला तर अंगीं कर्तबगारी नाहीं, तर तीं दोन्हींही व्यर्थच. परंतु प्रसंग व कर्तबगारी यांचा सुयोग शिवाजीमहाराजांचे वेळीं जुळून आला. तिसरी ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, महाराष्ट्रांत ज्या निरनिराळ्या जाति आहेत त्या शिवकालापूर्वी विस्कळीत होत्या म्हणजे व्यक्तिविशिष्ट, फार तर जातिविशिष्ट, प्रयत्न चालून एक बंधनाच्या अभावीं ते विफल होत असत. त्या जातींचें पुनरपि एकवार ऐक्य व संमेलन झालें. हें ऐक्य शिवाजी महाराजांनीं घडवून आणलें म्हणजे प्रत्येकाचें स्वतःचे संबंधानें आणि स्वदेशाचे संबंधानें असें उभय प्रकारचें कर्तव्य असून विरोधाचे प्रसंग टाळून उभय प्रकारचें कर्तव्य कसें साधावें हें त्यांनीं महाराष्ट्रबांधवांस उत्तमप्रकारें शिकविलें. हिंदु, मुसलमान, ब्राह्मण, मराठे, वैश्य, शूद्र इत्यादि सर्व प्रकारच्या लोकांनीं आपण एकाच मायभूच्या लेंकरें आहोंत ही भावना जागृत ठेवून व खाजगी हितसंबंध सार्वजनिक प्रसंगीं विसरून जाऊन एकदिलानें राष्ट्रहित–समाजहित–सार्वजनिक हित–यांच्यासंबंधीं आपलें कर्तव्य बजाविण्यास तयार असलें पाहिजे; या कर्तव्यापासून जो च्युत झाला तो माणुसकीस मुकला, त्याला इहलोकीं सुख नाहीं, परलोकीं सुख नाहीं, किंवा त्याला मोक्षही नाहीं. अशा प्रकारची सर्व लोकांची सर्वसाधारण समजूत करून देऊन स्वकर्तव्य बजाविण्याची अपरिहार्य जबाबदारी महाराजांनीं प्रत्येक माणसाच्या मागें लावून दिली. चवथी गोष्ट म्हणजे महाराष्ट्रधर्मासंबंधाची होय. 'महाराष्ट्रधर्म' याचा खरा अर्थ मागें सांगितलाच आहे. त्या अर्थाच्या धोरणानें स्वराज्य स्थापनेचा विचार करणें, गोब्राह्मण प्रतिपालक हें विशेषण महाराजांस लावतात त्याचा खरा अर्थ समजून घेणें, साधुसंतांचें कर्तव्य केवढें मोठें असतें आणि रामदा-

सांसारखे थोर महात्मे सर्व समाजास कसें निराळें वळण लावूं शकतात य गोष्टीचें विचारपूर्वक मनन करणें, हें श्रेष्ठ कर्तव्य बजावण्याकरितां सर्व देशभर मठस्थापना करून महाराष्ट्रीयांस सुशिक्षित करण्याची योजना रामदासांनीं करून ठेविली आणि अत्यंत स्वार्थत्यागाची खूण जीं संन्यासवृत्तीचीं भगवीं वस्त्रें त्यांच्याच वर्णाचें निशाण म्हणजे भगवाझेंडा हें मराठ्यांचें राष्ट्रीय निशाण त्यांनीं ठरविलें या गोष्टींतील मर्म समजून घेणें; सारांश देश, काल, वर्तमान व एकंदर परिस्थिति यांच्या अनुरोधानें जरी प्रयत्नांची दिशा बदलावी लागली तरी आपल्या देशाची पूर्ण प्रगति होण्यास व आपला देश इतर स्वतंत्र देशांच्या मालिकेंत जाऊन बसण्यास सर्व लोकांमध्यें पूर्ण ऐक्यभाव, स्वधर्माचा पूर्ण अभिमान, परधर्माविषयीं पूर्ण सहिष्णुता, अत्यंत स्वार्थत्याग, देशकल्याणाची उत्कट कळकळ, ईश्वराचे ठिकाणीं दृढ श्रद्धा, अचल पितृभक्ति व निःसीम मातृप्रेम इत्यादि सर्व ठिकाणीं सदा सर्वदा सारखेच उपयुक्त असे जे हे श्रेष्ठ गुण त्यांची देशांत झपाट्यानें वाढ करण्यास झटलें पाहिजे हाच महाराजांच्या या उदात्त चरित्रापासुन सर्वांनीं शिकण्यासारखा मुख्य धडा आहे.

अखेर या थोर विभूतींचें चरित्र लिहिण्याची बुद्धि देऊन ज्या जगन्नियन्त्या परमेश्वरानें माझ्यासारख्या पामराला यथामति दोन वेडेवांकडे शब्द लिहिण्याचें सामर्थ्य दिलें व कार्य तडीस पोंचविलें त्या सर्व श्रेष्ठ जगच्चालकाचें स्मरण करून मी आपली लेखणी खालीं ठेवितों.

५०

समाप्त